|| श्रीराम ||

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ७८

# || अक्षरधारा ||

(श्रीदासराममहाराजांच्या संकीर्ण वाङ्मयाचे संकलन)

ॐ

संपादक

दीपक चंद्रशेखर केळकर

आवृत्ती पहिली सांगली सन २०२०

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ७८**

# अक्षरधारा

**संपादक, प्रकाशक :**

**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**

घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,

सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.

दूरध्वनी :०२३३-२३३१७४७

भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

**प्रथम आवृत्ती** इ.स.२०२०

**प्रकाशन दिन :** माघ शु. ९ शके १९४१

सोमवार दि. ०३.०२.२०२०

प.पू.श्रीमामामहाराज केळकर पुण्यतिथी

© **सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन**

**अक्षर जुळणी :**

पॉप्युलर एस.ॲण्ड टी. इन्स्टिटस्यूट, सांगली

श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे

**मुद्रक :**

श्रीकृष्ण मुद्रणालय, औद्योगिक वसाहत, सांगली

**स्वागत मूल्य** : रु.२००/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**

श्री. दीपक चंद्रशेखर केळकर

घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,

सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.

दूरध्वनी :०२३३-२३३१७४७

भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०

ईमेल - dasrammaharajkelkar1920@gmail.com

## संपादकीय

**“माझा मराठाचि बोलु कौतुके । अमृतातेही पैजा जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।” ज्ञा.६-१४**

या संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओवीप्रमाणे असणाऱ्या श्रीदासराममहाराजांच्या अक्षरांच्या धारा म्हणजे ‘‘अक्षरधारा’’ हा ग्रंथ होय. श्रीदासराममहाराजांनी विपुल प्रमाणात ग्रंथ लेखन केले. यातील बहुतांश ग्रंथलेखन प्रकाशित स्वरूपात साधकांना यापूर्वीच उपलब्ध करून दिलेले आहे. श्रीदासराममहाराजांच्या दासरामगाथा व दासरामगाथा पुरवणी यातील अभंगांव्यतिरिक्त, तसेच श्लोक रचना, आरती संग्रह यातील श्लोक व आरत्यांव्यतिरिक्त, श्रीदासराममहाराजांनी एकनाथी भागवत, भगवद्गीता, पांडवगीता यावरील भावार्थ टीका, कूट पदांचे अर्थ, अभंग, श्लोक, आरत्या, सवाया, प्रासंगिक लेख व काव्ये, पत्रे, निबंध इ. स्वरूपातील विपुल लेखन त्यांच्या निरनिराळ्या वह्यांमधून केलेले आढळून आले. असे हे लिखाण लघु स्वरूपात असलेने ते स्वतंत्रपणे प्रकाशित करता येणे शक्य नव्हते. वर नमूद केलेले सर्व लिखाण एकत्रित प्रकाशित करावे असा संकल्प मनात आला व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस प्रारंभ केला आणि बघता बघता पद्य विभाग व गद्य विभाग मिळून एकूण जवळपास ४०० पानांचा ग्रंथ तयार झाला. या सर्व कार्यामध्ये मला श्री. प्रसन्न गोखले, श्री.नारायणराव देशपांडे व श्री. रमेशराव लाळे यांचे बहुमोलाचे सहकार्य लाभले आहे. ‘‘घन घन माला नभी दाटल्या । कोसळती धारा ।।’’ या भावगीतातील उक्तीप्रमाणे श्रीदासराममहाराज यांच्या उत्फूर्त / अनुभवसंपन्न अक्षरधारा या ग्रंथात अक्षरशः कोसळत आहेत.

अशा या ‘अक्षरधारा’ या ग्रंथास अत्यंत अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना श्रीदासराममहाराजांचे कृपांकित श्री. नारायणराव देशपांडे यांनी लिहिली आहे. या प्रस्तावनेत काय आले नाही असे नाही. पूर्णपणे यात विषय आला आहे. यामुळे यावर मी काही लिहावे असे नाही. तसेच माझे लिखाणाला शेवटी मर्यादा आहेत आणि मी हे जाणून आहे. तसेच या ग्रंथाचे अक्षर जुळवणीचे काम श्री. भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे यांनी केले असून, मुद्रिते तपासण्याचे किचकट काम श्री. रमेश गोपाळराव लाळे यांनी अचूकपणे केले आहे. तसेच या ग्रंथाच्या उत्कृष्ट व सुबक छपाईचे काम श्रीकृष्ण मुद्रणालय, सांगली यांनी वेळेत पूर्ण करून दिले आहे, त्या सर्वांचा मी आभारी आहे.

असा हा श्रीदासराममहाराजांचा ‘‘अक्षरधारा’’ हा ग्रंथ सर्व साधकांच्या पसंतीस उतरेल यात शंका नाही.

**श्रीअण्णांचा कृपाभिलाषी,**

**दीपक चंद्रशेखर केळकर**

## || अक्षरधारा ||

## प्रस्तावना

आधुनिक काळात महाराष्ट्रातील संतपरंपरेमध्ये सांगली येथे श्रीदासराममहाराज हे एक श्रेष्ठ संत होऊन गेले. चिमडसंप्रदायातील परंपरेमध्ये श्रीदासराममहाराज हे त्या संप्रदायाचे कळस होऊन राहिले आहेत. त्यांचे ठिकाणी योग, ज्ञान व भक्ती यांचा त्रिवेणी संगम झालेला होता. आपले पितृदेव श्रीमामामहाराज केळकर यांनी अखंड ३८ वर्षे केलेल्या कीर्तनाची परंपरा पुढे ३९ वर्षे श्रीदासराममहाराजांनी अखंडपणे चालविली. कीर्तन, प्रवचन, निरूपण व लेखन यामध्ये हे साधु रममाण होऊन राहिले. दासराममहाराजांना वयाच्या ७ व्या वर्षीच आत्मयाची काव्यस्फुर्ती झाली. त्यानंतर त्यांचे हातून अनेक प्रकारचे पारमार्थिक लेखन झाले. त्यांनी आपले लेखन अनेक वह्यांमधून अक्षरबद्ध केलेले आहे. गद्य व पद्य विभागामध्ये असलेले त्यांचे लेखन, निबंध, लेख, पत्र, चरित्रे, अभंग, पदे, सवाया, श्लोक व आरत्या अशा विविध अंगांनी विस्तारलेले आहे. त्यांच्या ह्या अप्रकाशित संकीर्ण स्वरुपातील स्फुट वाङ्मयाचे संकलन म्हणजे प्रस्तुतचा ''अक्षरधारा'' हा ग्रंथ होय. या ग्रंथाच्या पहिल्या भागामध्ये पद्य वाङ्मय व दुसऱ्या भागामध्ये गद्य वाङ्मय अशी विभागणी केलेली आहे. प्रत्येक भागाची विषयानुसार विभागणी केली असून, त्यामध्ये विविध प्रकरणांचा समावेश केलेला आहे. प्रस्तुत ग्रंथातील लेखनाचा परामर्श सारांशरूपाने खालीलप्रमाणे दिलेला आहे.

# भाग -१ (पद्य विभाग)

## विभाग - १

### श्रीएकनाथमहाराजकृत वाङ्मयावरील श्रीदासराममहाराज लिखित पद्य वाङ्मय

प्रकरण १ : श्रीएकनाथमहाराजकृत प्रकाश दीपिका : श्रीदासराममहाराजकृत

टीका व भावार्थ

श्रीएकनाथमहाराजांच्या प्रकाशदीपिका या ग्रंथातील ५३ ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी विस्तृत ओवीबद्ध टीका लिहिली असून, त्याचा थोडक्यात गद्य भावार्थही सांगितला आहे. येथे श्रीकृष्णांनी उद्धवाला सहजावस्थेमधील प्रणवानुसंधान कसे असते ते सांगितले आहे. चैतन्यरूपाने देहामध्ये उसळणारे जीवन सुषुम्नाकार करून, त्यामधील उर्ध्वमुख प्राणगतीवर मनाची स्थिरता केली असता, सुषुम्नेच्या अंतर्गत उमटणारा ध्वनी ऐकू येतो. त्या ध्वनीशी समरस होऊन ऊर्ध्वदृष्टीने त्या प्राणगतीवर लक्ष ठेवावे. अशाप्रकारे अलक्ष्याला लक्ष केले असता चिदाकाशात अस्तित्वरूप निजत्व प्रगट होईल. चिदाकाशस्थ सिंहनादरूपी जीवनकला आणि सोहंरूप नीलप्रकाशयुक्त ज्योती यांचा येणारा अनुभव म्हणजे निजत्वाचे प्रगट होणे. या सोहं आत्मप्रकाशानेच सूक्ष्म अशा पीतप्रभेचा म्हणजेच मूळ मायेचा साक्षात्कार होतो. याठिकाणी दृष्टीची तादात्म्यता झाली असता तिचा निजचैतन्यात प्रवेश होतो. हीच उन्मनी अवस्था असून येथील निजतेजाचा प्रकाश म्हणजे ब्रह्मस्वरूप होय.

## प्रकरण २ : श्रीएकनाथी भागवतातील श्रीदासराममहाराज संग्रहित मंगलाचरणातील दोन श्लोक व त्यावर श्रीदासराम-महाराज लिखित ओवीबद्ध टीका

पहिला श्लोक : ‘‘संतवच गुरुं वंदे------’’

दुसरा श्लोक : ‘‘भक्त्या भागवतं भावं----’’

वरील दोन श्लोकांवरती श्रीदासराममहाराजांनी ४६ ओव्या लिहिलेल्या आहेत. पहिल्या श्लोकावरील टीकेमध्ये श्रीदासराममहाराज म्हणतात की, समत्वाचा तोष म्हणजेच संतोष. संतोष हाच गुरु आहे. ‘सोहं तोचि सद्गुरुराव’. हा सद्गुरु समभावाने तोषलेला, संतोषरूप असतो. चिदाकाश हाच संतोषरूप सद्गुरुचा गाभारा असतो. हा सोहंसद्गुरु देवाचे/आत्मरुपाचे गुप्त रूप दाखवितो.

अध्यायात एकत्रित केल्या आहेत. नित्यपाठासाठी ह्या ओव्या एकत्रित केल्या असून त्याला 'श्रीएकनाथी भागवत नित्यपाठ स्तोत्र' असे शीर्षक दिले आहे. श्रीकृष्णांनी उद्धवाला केलेल्या ब्रह्मज्ञानाचा सारांश येथे आलेला आहे. भगवान सांगतात की, नामगुणानी भरलेल्या मायेमुळे जीवाला माझ्या स्वरूपाचे विस्मरण होऊन विषयासक्ती वाढते. माझे स्मरण होऊन माझे सोहंस्थान प्राप्त होण्यासाठी सोहंहंसाचे साधन करावे लागते. या साधनेमध्ये प्राणासह ओंकार ऊर्ध्वगामी झाला असता, जो अतिसूक्ष्म नाद उत्पन्न होतो, त्याला योगी 'अनाहतशब्द' म्हणतात. चिदाकाशामध्ये अनाहत शब्दही विराम पावला असता, सोहं चे शुद्ध स्फुरण उठते. अशातऱ्हेने निर्गुणी मन लागले असता, तो जीव स्वतःच श्रीकृष्ण होतो.

**प्रकरण ५ : श्रीएकनाथीभागवत पंचवीस श्लोकी पंचाध्यायी (श्रीदासराममहाराज संपादित)**

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रीदासराममहाराजांनी एकनाथी भागवतातील निवडक २५ ओव्या ५ अध्यायामध्ये एकत्रित करून, प्रस्तुत केल्या आहेत. दशमद्वारीच्या दर्शनानंतर, एकादश स्थानामध्ये परमात्मा स्थित आहे. त्याचा निजबोध झाला असता, 'सर्वाभूती भगवत्भाव' ही स्थिती प्राप्त होते, असे पहिल्या दोन अध्यायामध्ये म्हटले आहे. तिसऱ्या अध्यायात, मायेचा निरास होऊन परमात्मप्राप्ती होते असे सांगून, चौथ्या व पाचव्या अध्यायात, रामकृष्णादि अवतारी पुरुषही देहधारण करून स्वधर्म पाळतात. परंतु अविवेकी लोक मात्र सर्वश्रेष्ठ विश्वनिर्मात्याचे स्मरण न करता, स्वतःचा नाश करून घेतात असे म्हटले आहे. हे पाच अध्याय म्हणजे भागवताचे पंचप्राण असून, हा भागवतधर्म सर्वांसाठी खुला आहे, असे त्याचे महात्म्य येथे सांगितले आहे.

**प्रकरण ६ : श्रीएकनाथीभागवत पंच श्लोकी पंचाध्यायी (श्रीदासराममहाराज संपादित)**

## प्रकरण २ : श्रीदासराममहाराज लिखित ओव्या (२५ ओव्या)

श्रीदासराममहाराजांनी ह्या २५ ओव्यांमधून साधनेची प्रक्रिया थोडक्यात सांगितली आहे. पंचतत्त्वांच्या शरीरामध्ये सहस्रदळामध्ये मुख्यप्राण/ चैतन्य आत्मा स्थित आहे. साधन करून शुद्ध जीवन सहस्त्रदळी आले असता, चत्वार देहाचा पूर्ण निरास होतो व अलक्ष्य परमात्मा लक्ष होतो. चत्वार देहाच्या निरासाबरोबरच चित्त हे चैतन्यमय होऊन वृत्ती नाहिशी होते. परमात्मा लक्ष झाल्याची खूण म्हणजे चिद्‌प्रकाशरूप परमात्म्याला कवटाळून नेत्रबाहुली त्याच्याशी एकरूप होते व सर्वत्र चिद्‌प्रकाश दिसू लागतो. अशा अद्वय स्थितीमध्ये निरपेक्ष भक्तीसुखाचा अनुभव येतो.

हे सर्व होण्यासाठी प्रथम सद्गुरुकृपेने साधन साधावे लागते. साधन साधले असता, भ्रूमध्यातील पवित्र त्रिकूटस्थानी उपाधीभूत जीवनाची आत्यंतिक शुद्धी होऊन, नाद-प्रकाशयुक्त प्राण सहस्रदळी धावू लागतो. सहस्रदळी चिदाकाशाचे ठिकाणी आले असता, सद्गुरु त्या साधकाचा अहंभाव काढून घेतात. तेथे द्वैतभावाच्या निर्मितीचे मूळ असलेले ‘चंचळपण’ संपून निश्चळ परमात्म्याचा साक्षात्कार होतो.

## प्रकरण ३ : गुरुदास्ये राजयोग निरूपण

योगामध्ये श्रेष्ठ योग । तो हा जाणावा राजयोग ।।

प्रजा व राजा यांच्या संबंधामध्ये राजाचे जे स्थान आहे, तसेच सर्व योगामध्ये राजयोग हा सर्वश्रेष्ठ आहे. अशा या राजयोगाचे निरूपण श्रीदासराममहाराजांनी ३१ ओव्यांमधून केलेले आहे. राजयोगाची लक्षणे सांगताना त्यांनी त्याच्या स्पष्टीकरणासाठी ‘बहिर्व्योम स्थितं नित्यं ।’ व ‘चतुर्वेद धरो विप्रो’ सारख्या उत्तरगीतेतील श्लोकांचा संदर्भ दिलेला आहे.

नासाग्री अर्धदृष्टी करून खेचरीमुद्रा लागली असता, चिदाकाशामध्ये स्वरूपाची खूण प्रगट होते. अशी खूण म्हणजे प्रथम नीलप्रकाशयुक्त ताऱ्याचे दर्शन होते. तो नीलप्रकाशयुक्त तारा म्हणजेच निरुपाधिक सोहंज्योती होय.

सर्व पापे नाहिशी होऊन, त्याला विष्णुलोकाची प्राप्ती होते, अशी या श्लोकाची फलश्रुती सांगितली आहे.

**प्रकरण २ : श्रीगुरुगीता सार स्तोत्र**

या प्रकरणात गुरुगीतेतील १४ सार ओव्या 'गुरुगीता सार स्तोत्र' या शीर्षकाखाली एकत्रित केल्या आहेत. भगवान शंकर व जगन्माता पार्वतीदेवी यांच्यामधील संवाद म्हणजे 'श्रीगुरुगीता' होय. गुरु हे परब्रह्मस्वरूप, आनंदस्वरूप असून, गुरुतत्त्व हे सर्वश्रेष्ठ आहे. अशा या ज्ञानस्वरूप व ध्यानाचे आधारस्थान असलेल्या गुरुप्रसादानेच आपल्याला स्वरूपाचे ज्ञान होते, अशा प्रकाराने येथे गुरुंचे वर्णन केले आहे. काळ व मृत्यू अशा सर्वप्रकारच्या भयापासून रक्षण करणारे गुरुतत्त्व हेच कल्याणकारी आहे. अशा अनेक प्रकाराने श्रेष्ठ अशा गुरुतत्त्वाचे महात्म्य या गुरुगीतेत वर्णिलेले आहे.

**प्रकरण ३ : सप्तश्लोकी गीता (समश्लोक व अर्थासह)**

येथे श्रीदासराममहाराजांनी भगवत्‌गीतेतील निवडक सात श्लोक घेऊन त्यावरती समश्लोकी टीका लिहिली असून, प्रत्येक श्लोकाचा गद्य अर्थही दिलेला आहे. पहिल्या श्लोकामध्ये प्रणव अक्षर ॐकाराचे महत्व सांगितले असून, दोन ते चार श्लोकामध्ये, भगवंताचे महात्म्य वर्णिलेले आहे. पाचव्या श्लोकामध्ये अज्ञान हे ज्याचे मूळ आहे, अशा प्रपंचवृक्षाचे वर्णन आलेले आहे. सहाव्या व सातव्या श्लोकामध्ये माझ्या ठिकाणी मन ठेऊन, माझा भक्त हो, असे केले असता तू मजप्रत येशील, अशी भगवंताने ग्वाही दिलेली आहे.

**प्रकरण ४ : अध्यात्मरामायणातील ९ श्लोक (गद्य अर्थासह).**

श्रीदासराममहाराजांनी अध्यात्मरामायण बालकांडातील उमामहेश्वर संवाद श्रीरामहृदय प्रथम सर्गातील एकूण ५६ श्लोकांपैकी नऊ श्लोक, गद्य भावार्थासह येथे प्रस्तुत केलेले आहेत. वेदान्तातील बिंब-प्रतिबिंब वाद हा

यातील पहिल्या चार कानडी पदांमधून श्रीगुरुलिंगजंगममहाराजांचा निंबरगीकर, सिद्धानंद, नारायण, भाऊराय सद्गुरु अशा अनेक नावांनी निर्देश केलेला आहे. पहिल्या व दुसऱ्या पदामध्ये स्वरूपाचा साक्षात्कार घडवून, चारी मुक्ती प्रदान करणाऱ्या गुरुलिंगजंगममहाराजांचा जयजयकार केलेला आहे. तिसऱ्या पदामध्ये सद्गुरुनाथ गुरुलिंगजंगममहाराज हे निरंजन निर्विकारी स्वरूप असून, शरणागत भक्तावर दया करून त्यांचे रक्षण करणारे आहेत. हे नामप्रिय सद्गुरुनाथ इच्छित वर देणारे आहेत, असे म्हटले आहे. चौथ्या पदामध्ये गुरुदेव म्हणजेच नारायण (गुरुलिंगजंगममहाराज) व हरि हे एकच आहेत असे म्हटले आहे. पाचव्या पदामध्ये शिवनाम हेच गुरुनाम असून ते अमृततुल्य आहे, असे म्हटले आहे. सहाव्या व सातव्या पदामध्ये, इडा व पिंगला एकत्र येऊन, रामकृष्ण नामाने जीवभाव लयास जाऊन, सहस्रदलात निर्गुण सिद्धानंदांचा साक्षात्कार होतो, असे म्हटले आहे. शेवटचे आठवे पद हे मराठीमध्ये असून यामध्ये देवस्वरूप असलेले रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, हालसिद्ध व गुरुलिंगजंगममहाराज यांचा जयजयकार करून त्यांना नमस्कार केला आहे.

**२ : श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेले गुरुलिंगसिद्धनामस्तोत्र(संस्कृत)**

या प्रकरणामध्ये श्रीदाससराममहाराजांना संस्कृतमधून श्रुत झालेले ४ श्लोकी 'गुरुलिंगसिद्धनाम' स्तोत्र प्रस्तुत केले आहे. या स्तोत्रामध्ये कृतयुगातील रेवणसिद्धच पुढे अनेक युगामध्ये मरुळसिद्ध, एकोराम, विश्वपंडित, काडसिद्ध व हालसिद्ध या नावाने प्रसिद्ध झाले असून ह्या सिद्धनामांच्या पठाने सर्व सिद्धी वश होतात, असे म्हटले आहे.

**३ : श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेले सिद्धनाम स्तोत्र (संस्कृत)**

श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या दोन श्लोकी 'सिद्धनाम' स्तोत्रामध्ये, रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, एकोराम व पंडिताराध्य ह्या

**प्रकरण ३ : श्रीदासराममहाराजकृत श्री गीतानामावली स्तोत्र**

या प्रकरणात चार श्लोकांची गीतानामावली, त्याच्या फलश्रुतीसह दिलेली आहे. या स्तोत्रामध्ये गंगा, गायत्री, सीता, सत्या, सरस्वती अशी गीतेची अनेक गूढ नावे सांगितली आहेत. ही नावे म्हणजे तत्त्वार्थ सांगणारी ज्ञानमंजिरी होय. जो माणूस स्थिर मनाने ह्या नामांचा नित्य जप करतो, त्याच्या भयाचा नाश होऊन ज्ञान मिळते व त्याला परमपदाची प्राप्ती होते, अशी फलश्रुती शेवटच्या श्लोकात सांगितली आहे.

## विभाग - ४

## श्रीदासराममहाराज कृत सवाया

सवाया या काव्याप्रकारातून सामान्यतः देव व संतमहात्मे यांची स्तुती व त्यांचे महात्म्य यांचे वर्णन केले जाते. या प्रकरणामध्ये चिमड संप्रदायातील सहा संतमहात्म्यांवर श्रीदासराममहाराजांनी सवाया केल्या आहेत. यामध्ये चिमडक्षेत्रीच्या सद्गुरुमाई श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर, श्रीदाजीसाहेबमहाराज व श्रीउद्धवजीमहाराज यरगट्टीकर, प.पू.श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांच्या पत्नी आईसाहेबमहाराज कोटणीस, सद्गुरु श्रीगोपाळरावजी कोटणीस व सद्गुरु श्रीशिवरामबुवा ब्रह्मचारी यांचा समावेश आहे.

## विभाग - ५

## श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना

श्रीदासराममहाराजांनी केलेल्या लेखनापैकी काही लेखन श्लोकबद्ध आहे. विविध महात्म्यांचे गुणगौरव करणारे १० श्लोक येथे प्रस्तुत केले आहेत. त्यामध्ये भगवान शंकर, संप्रदायिक संत - श्रीनिंबरगीकरमहाराज, श्रीमामामहाराज, इतर संप्रदायातील संतांमध्ये श्रीनृसिंहसरस्वती, अमलानंद, मामामहाराज देशपांडे, कैवल्यधाम हे स्थान, तसेच श्रीज्ञानदेवतेहेतिशी व श्रीरामपाठ अशा ग्रंथांचाही समावेश आहे.

## विभाग - ७
## श्रीदासराममहाराज कृत आरत्या

या विभागमध्ये एकूण २५ आरत्या आहेत. त्यामध्ये सर्वप्रकारच्या संप्रदायातील संत-महात्म्यांच्या आरत्या आहेत. तसेच श्रीहालसिद्धांच्या दोन आरत्या कानडीमधून लिहिलेल्या आहेत. या आरत्यांमध्ये काकडारती, भूपाळीही असून, श्रीहरिपाठ, रामपाठ, भगवत्गीता अशा ग्रंथांच्याही आरत्या श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या आहेत. यामध्ये श्रीतुकाराममहाराजांचा निर्याणाचा अभंग असून प.पू.सद्गुरु श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांची कुलदेवता सन्नती चंदला परमेश्वरी यांचीही आरती आहे. या सर्व आरत्यांमधून श्रीदासराममहाराजांच्या मनात केवळ आपलाच संप्रदाय नाही, तर अन्य सर्व थोर संतमहात्म्यांच्याविषयी, वसत असणारा प्रेमभाव दिसून येतो.

## विभाग - ८
## श्रीदासराममहाराज लिखित संकीर्ण वाङ्मय

यामध्ये २९ प्रासंगिक काव्ये आहेत. यामध्ये अनेक संतमहात्म्यांची साठीशांती, एकाहत्तरी, अमृतमहोत्सव अशा विविधप्रसंगी केलेली काव्ये, तसेच विविध ग्रंथांसाठी मांगलिक आशीर्वादपर काव्ये, श्रद्धांजली काव्य असे अनेक प्रकार समाविष्ट आहेत. प्रासंगिक काव्याबरोबरच दासराममहाराजांनी कौटुंबिक लग्न/मुंजीच्या समारंभासाठी म्हणून अध्यात्मिक विचारसूत्रामध्ये गुंफलेली अशी अनेक मंगलाष्टके देखील लिहिली आहेत.

# भाग - दोन (गद्य विभाग)

### प्रकरण १ : कैवल्यवैभव या ग्रंथामधील कूट अभंगांवरील श्रीदासराममहाराज लिखित संक्षिप्त टीपा

कैवल्यवैभव ग्रंथामध्ये जनाबाई, मुक्ताबाई, एकनाथमहाराज, ज्ञानदेव

श्रीदासराममहाराजांनी केलेल्या प्रासंगिक कीर्तनांची संक्षिप्त टिपणेही या प्रकरणामध्ये दिलेली आहेत. दिनांक २६.०३.१९५४ रोजीचे पहिले कीर्तन - ''रंग उन्मनीचा एका भावे त्याचा'' या अभंगावरील कीर्तनात दासराममहाराजांनी सुखदुःख, दृश्य-अदृश्य, अशा सर्व द्वंद्वात्मक गोष्टींमधील सापेक्षता सिद्ध केली आहे. या द्वंद्वात्मक जगातील मायेला आवरा व आम्हाला मुक्त करा अशी प्रार्थना या अभंगामध्ये श्रीतुकाराममहाराजांनी केली आहे.

दिनांक २४.०६.१९५४ रोजीचे दुसरे कीर्तन :- ''संपत्ती सोहळा नावडे मनाला'' तुकाराममहाराजांच्या या अभंगावरील कीर्तनात, 'तळमळ असेल, आदर असेल, निष्ठा असेल तर, अशा भक्ताची चक्रपाणी वाट पहात असतो' असे विवरण श्रीदासराममहाराजांनी केले आहे.

दिनांक १२.०७.१९५४ रोजीचे तिसरे कीर्तन :- ''रामराम म्हणता जावा माझा प्राण'' तुकाराममहाराजांच्या अभंगावरील कीर्तनामध्ये, प्राणाशी गाठ पडण्यासाठी असंग परमात्म्याचा संग घडणे आवश्यक आहे. असे झाले असता, जीवाशिवाची गाठ पडून दोघेही परमात्मस्वरुपाशी एकरूप होतात, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

दिनांक २.१०.१९५४ रोजीचे चौथे कीर्तन :- ''चित्त धावे विषयावरी । नाम वदताहे वैखरी ।।'' या श्रीएकनाथमहाराजांच्या अभंगावरील कीर्तनात, 'जो आत्मानुभवी' आहे, त्याचे चित्त, विषयावर जाणार नाही, कारण त्याच्या चित्ताचा विषय केवळ 'नारायण' झालेला असतो, व नारायणाशी तादात्म्य हाच आत्मानुभव होय असे श्रीदासराममहाराज सांगतात.

सिटीहायस्कूलमधील व्यक्तिमत्त्व विकास शिबीर प्रसंगी श्री. प्र.स.भावे यांनी श्रीदासराममहाराजांची मुलाखत घेतली होती. त्या मुलाखतीदरम्यान श्री.भावे सरांनी, मुलांच्या वरती होणारे संस्कार, त्यांची वर्तणुक इ. संबंधात पाच प्रश्न

अनात्याचाराच्या योगेच राष्ट्रसंपदा मिळणे शक्य आहे असे म्हटले आहे. 'खेडेगावची राहणी' या निबंधात, खेडेगावची साधी राहणी, तसेच लोकांच्या ठिकाणी असणारे धिटाई, काटकपणा व संघवृत्ती इ. गुणांचे वर्णन केलेले आहे. याव्यतिरिक्त इतरही निबंधातून श्रीदासराममहाराजांनी आपले मौलिक विचार मांडलेले आहेत. श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या 'प्रभातकाळ वर्णन' या निबंधातून, त्यांचे ठिकाणी असलेली 'वाङ्मयीन सौंदर्यदृष्टी', ही विशेषत्वाने उल्लेखनीय गोष्ट आहे.

### प्रकरण ५ : श्रीदासराममहाराज लिखित संतांची संक्षिप्त चरित्रे व माहिती

श्रीदासराममहाराजांनी खालील तीन चरित्रे थोडक्यात लिहिली आहेत.

१. श्रीराजाराममहाराज :- श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या या चरित्रामध्ये, चिमडचे साधुमहाराजांचे परमशिष्य व भक्त असलेले राजाराममहाराज हे साधुमहाराजांचे कृपेने परमपुरुष होऊन परमाधिकारी झाल्याचे म्हटले आहे.

२. श्रीरामराव तिकोटेकरमहाराज :- गुरुदेव रानडे यांनी ज्यांना 'प्राज्ञिक' म्हणून गौरविले, अशा श्रीभाऊसाहेबमहाराजांचे शिष्य, श्रीरामराव तिकोटेकरमहाराजांचे चरित्र येथे दिलेले आहे.

३. स्वामी श्रीविश्वरानंदजी :- जगन्माता शारदामातेंच्याकडून दीक्षा प्राप्त करून घेऊन, ज्यांनी रामकृष्णमठाच्या सेवेतच आपले जीवन समर्पित केले, अशा श्रीवीरेश्वरानंदजींचे चरित्र श्रीदासराममहाराजांनी सारांशाने लिहिले आहे. याच प्रकरणात श्रीदासराममहाराजांनी, आप्पाचीवाडी व घोसरवाडची हालसिद्धनाथ परंपरा व चिमड संप्रदायाची परंपरा यांच्या संबंधाविषयी माहिती सांगितली आहे.

याप्रकरणात पुढे, प.पू.सद्गुरु श्रीदादामहाराज कोटणीस यांच्या निर्याणाची सविस्तर हकिगत श्रीदासराममहाराजांनी सांगितली असून चिमडचे महाराजांचे शिष्य श्रीरामचंद गोपाळ दीक्षित यांची एक आठवणही सांगितली

पत्ररुपाने दि.११.०८.५२ रोजी पाठविला होता. तोच येथे दिलेला आहे. तसेच सांगली येथील कैवल्यधाम येथे प.पू.श्रीहणमंतरावजी कोटणीसमहाराज पुण्यतिथी उत्सवाचे (१९५०) इतिवृत्त सविस्तरपणे लिहिलेले आहे.

**प्रकरण १० : श्रीदासराममहाराज यांचे अमृतहस्ते झालेले समारंभ व महत्वपूर्ण घटना**

श्रीदासराममहाराज यांचे हस्ते झालेल्या २०२ समारंभ व महत्वपूर्ण घटनांची यादी येथे प्रस्तुत केली आहे.

**प्रकरण ११ : श्रीदासराममहाराज यांच्या लेखनाची यादी**

श्रीदासराममहाराजांनी विविध प्रकारचे पारमार्थिक लेखन केले आहे. येथे त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचे नांव, कोणत्या वर्षी तो लिहिला, कोणत्या दिवशी लिहिला व कोणत्या वहीमध्ये तो लिहिलेला आहे असा विविध तपशील असलेल्या लेखनाची यादी येथे प्रस्तुत केली आहे.

**प्रकरण १२ : श्रीदासराममहाराज संकलित काही संतांची जयंती, पुण्यतिथी, पर्वकाळ यादी**

यामध्ये, संतांचे नाव, तिथी, पर्वकाळ व स्थान इ. तपशील असलेल्या काही संतांच्या जयंती व पुण्यतिथीची श्रीदासराममहाराजांनी तयार केलेली यादी दिलेली आहे.

**प्रकरण १३ : श्रीदासराममहाराजांच्या प.पू.श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी श्रुत केलेली/प्रकाशरुपाने दिलेली/स्फुरलेल्या पदांची लिखित नोंद**

श्रीदासराममहाराजांना प.पू.श्रीनिंबरगीकर महाराजांनी ‘‘गुरुलिंगगीता’’ श्रुत केली. या पदांची लेखनतिथी, वेळ, स्थळ इत्यादी तपशीलांची लिखित नोंद श्रीदासराममहाराजांनी केलेली आहे. त्या तपशिलांचे संकलन करून, त्या लिखित नोंदीचा तपशील येथे दिलेला आहे.

आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या अनेक प्रकारच्या अप्रकाशित वाङ्मयाचे प्रकाशन, अनेक ग्रंथाद्वारे केले जात आहे. या विविध ग्रंथाद्वारे पुढील पिढीकरिता अनमोल असा अध्यात्मिक ठेवा प्राप्त होणार आहे.

विशेषतः मुमुक्षु व साधकांना, त्यांच्या अध्यात्मिक वाटचालीमध्ये श्रीदासराममहाराजांचे अक्षर वाङ्मय मार्गदर्शक ठरणार आहे. त्यांच्या सर्व अप्रकाशित वाङ्मयाचा शोध घेऊन, ते प्रकाशित करण्याच्या या कार्याचे श्रेय श्री. दीपकजी केळकर यांना जाते. या कार्यासाठी त्यांनी घेतलेला ध्यास व अविश्रांत मेहनत याचे हे फळ आहे. श्रीरामनिकेतन परिवार याबद्दल त्यांचा सदैव ऋणी राहील.

श्रीदासराममहाराज यांचे अलौकिक वाङ्मय असलेल्या प्रस्तुतच्या ‘अक्षरधारा’ या ग्रंथाची प्रस्तावनारूपी सेवा माझे हातून व्हावी, ही केवळ श्रीदासराममहाराजांची इच्छा होय. माझे सद्गुरु श्रीदासराममहाराजांची कृपा व प.पू.श्रीअण्णांचे प्रेम यामुळे हे शक्य झाले आहे.

अखेरीस भगवान सद्गुरु श्रीगुरुलिंगजंगममहाराज, भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, प.पू.श्रीमामामहाराज व प.पू. श्रीदासराममहाराज या सर्वांचे चरणी अनेक दंडवत घालून येथेच थांबतो.

सांगली.

दादांचा चरणरज
नारायण देशपांडे

| प्रकरण क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३. | सप्तश्लोकी गीता (दासरामकृत समश्लोक व गद्य अर्थासह) | ५८ ते ६० |
| ४. | संस्कृत श्लोक ९ (श्रीदासरामकृत गद्य अर्थासह) | ६१ ते ६२ |
| ५. | श्रीदासबोधातील सार ओव्या (१०९ ओव्या) | ६३ ते ६९ |
| ६. | श्रीदासराममहाराजांना आवडणारे २ श्लोक | ६९ |
| ब) | श्रीदासराममहाराज श्रुत पदे/स्तोत्रे (श्रीगुरुलिंगगीतेमध्ये समाविष्ट नसलेली पदे/स्तोत्रे) | |
| | १.श्रीदासराममहाराज श्रुत झालेली पदे (८ पदे) | ७० ते ७२ |
| | २. श्रीगुरुलिंगसिद्धनाम स्तोत्र | ७३ |
| | ३. सिद्धनाम स्तोत्र | ७३ |
| | ४. सिद्ध स्तोत्र | ७४ |
| क) | श्रीदासराममहाराज कृत वाङ्मय | |
| | १. श्रीकोटणीस कुलदैवताष्टक | ७४ ते ७५ |
| | २. श्रीमद्भगवद्गीताष्टक सार स्तोत्र | ७५ ते ७६ |
| | ३. गीतानामावली स्तोत्र | ७६ |
| | **विभाग क्रमांक ४** | |
| ४. | श्रीदासराममहाराज कृत सवाया | ७७ ते ७८ |
| | **विभाग क्रमांक ५** | |
| | श्रीदासराममहाराज कृत श्लोक रचना | ७९ ते ८२ |
| | **विभाग क्रमांक ६** | |
| | श्रीदासराममहाराज अभंग व पदे | ८३ ते १०५ |
| | **विभाग क्रमांक ७** | |
| | श्रीदासराममहाराज आरत्या | १०६ ते ११७ |
| | **विभाग क्रमांक ८** | |
| अ) | श्रीदासराममहाराज कृत प्रासंगिक काव्ये | ११८ ते १३५ |

| प्रकरण क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३. | श्रीदासराममहाराज लिखित गुरुलिंग गीतेतील पदांचा तपशील दर्शविणारा तक्ता | ३०८ ते ३२३ |
| १४. | अ. काही संतांच्या निर्वाण (समाधी) स्थळांची यादी | ३२४ ते ३२५ |
| | ब. काही संतांच्या जन्म स्थळांची यादी | ३२५ ते ३२७ |
| | क. श्रीनिंबरगी संप्रदायातील संतांच्या जयंत्या, अनुग्रह तिथी, पर्वकाळ व पुण्यतिथींची यादी | ३२८ ते ३३१ |
| | ड. अन्य संतमहात्मे जयंती-पुण्यतिथी यादी | ३३२ ते ३३८ |

# भाग क्रमांक - १

# श्रीदासराममहाराज लिखित संकीर्ण वाङ्मय

# पद्य विभाग

## विभाग क्रमांक १ - श्रीएकनाथमहाराज कृत वाङ्मयावरील श्रीदासराममहाराज लिखित पद्य वाङ्मय

| प्रकरण क्र. | तपशील |
|---|---|
| १. | श्रीएकनाथमहाराजकृत प्रकाश दीपिका श्रीदासराममहाराजकृत विस्तृत ओवीबद्ध . |
| २. | श्रीएकनाथी भागवतातील श्रीदासराममहाराज संग्राहित मंगलाचरण (दोन श्लोक) व त्यावरील श्रीदासराममहाराज लिखित ओवीबद्ध टीका |
| ३. | श्रीएकनाथी भागवतामधील श्रीदासरामहाराज संग्राहित संक्षिप्त पाठ प्रसाद स्तोत्र (श्रीदासराममहाराज कृत गद्य भावार्थासह) |
| ४. | श्रीएकनाथी भागवत नित्यपाठ स्तोत्र (श्रीदासराममहाराज संपादित) |
| ५. | श्रीएकनाथी भागवत पंचवीस श्लोकी पंचाध्यायी (श्रीदासराममहाराज संपादित) |
| ६. | श्रीएकनाथी भागवत पंचश्लोकी पंचाध्यायी (श्रीदासराममहाराजसंपादित) |

-

**विभाग क्रमांक २ श्रीदासराममहाराज कृत ओवीरचना**

१. अपरोक्ष गुह्यज्ञान (२० ओव्या)

२. श्रीदासराममहाराज लिखित ओव्या (२५)

३. गुरूदास्ये राजयोग निरूपण (३१ ओव्या)

**विभाग क्रमांक - ३** श्रीदासराममहाराज संपादित, श्रुत व कृत वाङ्मय

## अ) श्रीदासराममहाराज संपादित वाङ्मय

१. श्रीदासराममहाराज कृत श्रीमद्भगवद्गीताष्टक सार स्तोत्र

२. श्रीपांडवगीता सार स्तोत्र

३. श्रीगुरुगीता सार स्तोत्र

४. सप्तश्लोकी गीता
(दासरामकृत समश्लोक व गद्य अर्थासह)

५. गीतेतील मूळ संस्कृत श्लोक ९ (श्रीदासरामकृत गद्य अर्थासह)

६. श्रीदासबोधातील सार ओव्या (१०९ ओव्या)

७. श्रीदासराममहाराजांना आवडणारे २ श्लोक

## ब) श्रीदासराममहाराज श्रुत स्तोत्रे

१. श्रीदासराममहाराज श्रुत झालेली पदे (८ पदे)
(श्रीगुरुलिंगगीतेमध्ये समाविष्ट नसलेली कानडी/मराठी पदे)

२. श्रीगुरुलिंगसिद्धनाम स्तोत्र

३. सिद्धनाम स्तोत्र

४. सिद्ध स्तोत्र

**क) श्रीदासराममहाराज कृत अष्टक/स्तोत्र**

१. श्रीकोटणीस कुलदैवताष्टक

२. श्रीमद्भगवद्गीताष्टक सार स्तोत्र

१५. कैवल्यधाम वरील श्लोक

१६. श्रीरामपाठ वरील श्लोक

१७. न. या. पै. सा. पुस्तकालयावरील श्लोक

**विभाग क्रमांक ६ श्रीदासराममहाराज कृत अभंग / पदे**

**अ) प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचे संबंधित अभंग**

१. श्रीरामेश्वरालागी सांष्टांग नमन

२. ज्ञानेश्वर माऊली ग माय

३. औदुंबरा फांदी उगवला अश्वत्थ

४. दर्शनी भला हा पाहूनी दर्शन

५. गुरुकृपा भाग्य थोर

६. गुरूपदकमली मनोभृंग

७. माझ्या वडिलांचा ऐसा असे भाव

८. माझ्या वडिलांचा ऐसा दृढ भाव

९. जे भासी भासले पाहता काकी मुख

१०. ज्ञानेश्वर माऊली ग माय माझी

**ब) श्रीहालसिद्धनाथ संबंधित अभंग**

१. ज्ञानियांचा झाला जो का साक्षात्कार

२. सभामंडपाचा शुभारंभ केला

३. इस्पुर्ली ग्रामात एक धनगर

४. जय जय सिद्धनाथ केला

५. राम चालिलासे प्रेमे घोसरवाडी

६. गोविंदा भेटाया आले गोविंदनाथ

७. सिद्धपुजेचे श्रवण

१५. जे जे घडे तो तो वाटे चमत्कार

१६. नामात सद्गुरू डोल रे

१७. हनुमंत कीर्तनी प्रगट होय आत्मबोध

१८. भाई भक्तीची जननी

१९. हनुमंत चरित्राचा दाता श्रीसद्गुरू

२०. श्रीसुवर्ण सिद्धलिंगम् (श्रुत पद)

२१. रेवणसिद्धेशम् (श्रुत पद)

२२. एका काली सांगली ही नाट्य पंढरी होती

२३. प.पू.श्रीमामासाहेब देशपांडे यांचा निर्याणाचा अभंग

२४. प.पू.श्रीगुरुसिद्धप्पामहाराज निंबरगीकर यांचा निर्याणाचा अभंग

२५. श्री दिगंबर यांचा निर्याणाचा अभंग

२६. प.पू.श्रीराधाबाईअक्का, हरीपूर यांचा निर्याणाचा अभंग

२७. प.पू.स्वामी अमलानंद यांचा निर्याणाचा अभंग

२८. श्रीरामदासस्वामींच्या श्रीराममंत्राच्या पहिल्या १० श्लोकांवर श्रीदासराममहाराज यांनी केलेले १० अभंग

२९. श्रीदासराममहाराजकृत ओरम् कीलणय पाठ

**विभाग क्रमांक ७ श्रीदासराममहाराज कृत आरत्या**

१. श्रीरेवणसिद्ध - प्रारंभी तू देवा

२. श्रीरेवणसिद्ध - आरती रेवणसिद्धा

३. श्रीहालसिद्धनाथ - जय जय ज्योतिर्लिंगा(कानडी)

४. श्रीहालसिद्धनाथ - आरती हालसिद्धा

–

## विभाग क्र.८ श्रीदासराममहाराज कृत प्रासंगिक काव्ये व मंगलाष्टके

### अ) प्रासंगिक काव्ये :-

१. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर षष्ठ्यब्दीपूर्ती काव्य

२. श्रीसिद्धगिरीमहाराजांवरील ११ बिल्वपत्रे

३. श्रीमामासाहेब दांडेकर श्रध्दांजली काव्य

४. श्रीगुरुदेव रानडे यांचेवरील काव्य

५. श्रीदत्तमहाराज कवीश्वर अमृतमहोत्सव प्रसंगीचे काव्य

६. श्रीनृसिंहसरस्वती मठीमध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराज चित्र स्थापना प्रसंगीचे काव्य.

७. श्रीपांडुरंग विजय या ग्रंथावरील काव्य

८. श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी यांचेवरील साठीशांती निमित्त काव्य

९. कैवल्यधामावरील काव्य

१०. श्रीतात्यामहाराज तेली नामसप्ताह शुभारंभ प्रसंगीचे काव्य

११. श्री.मोरबा कुलकर्णी (भजनपटू) यांचेवरील काव्य

१२. सिटी हायस्कूल हीरक महोत्सव प्रसंगी केलेले काव्य

१३. दीपलक्ष्मी मासिकावरील काव्य

१४. गुरूपौर्णिमेनिमित्त पुष्पांजली

१५. श्रीगुरूदेव रानडेसाहेब जन्मशताब्दी निमित्त प्रेमपुष्पांजली

१६. श्रीदासराममहाराजांनी स्वतःचे साठीशांती निमित्त केलेले पद

१७. श्रीदासराममहाराजांनी स्वतःचे एकाहत्तरी निमित्त केलेले पद

५.	श्री. प्रकाश सदाशिव भावे

६.	चि.सौ.कां. गीतादेवी आपटे

**मुंज मंगलाष्टके**

१.	चि. संजय ऊर्फ रामचंद्र पांडुरंग कोटणीस

२.	चि. धनंजय ऊर्फ रघुनाथ पांडुरंग कोटणीस

३.	चि. नारायण केशव आपटे

४.	चि. पंकज मधुकर शिपुरकर

५.	चि. हणमंत ऊर्फ प्रसन्न पांडुरंग गोखले

होणे हीच ज्याची समाधी, ज्यात सहजस्थितीचा अनुभव येणे शक्य नाही. म्हणून सहजस्थितीचे प्रणवानुसंधान कसे असते, हेच देवा, तुम्ही मला सांगावे, असे उद्धव म्हणतात.(२)

**३) येथे तव माझे चित्त । अखंडित भोगू पहात ।**
**तुम्ही बोलिले निश्चित । अवकाश पडे ।।३।। (मूळ)**

**टीका :** माझे चित्त हे तुझेचि । म्हणोनि तया आवड हेचि । तयासि हे भोगरुची । स्वरूपाचिये ।।१।। निरुपाधिक अखंड । आत्मयाचा भोग अखंड । चिदांश चित्तासी गोड । अखंडत्वे ।।२।। तुमचे बोलणे श्रवणपुटी । पडता पडे आत्मया मिठी । निःसंदेह ज्ञानदृष्टी । शब्द ग्रासे ।।३।। अवकाश भेद होता लय । सावकाश तो प्रलय । आकाश संकाश वलय । प्रकाश ते ।।४।।

**अर्थ :** या ठिकाणी माझे चित्त हे तुझेच असल्याने, हे चिदांश चित्त निरुपाधिक अखंड आत्म्याचा अखंड भोग घेऊ पहात आहे, आणि त्यात देवा, तुमचे बोलणे श्रवणपुटावर निःसंदेहपणे पडले की अवकाश भेदच लयाला जातो. (३)

**४) तृषा लागलिया केवळ । कूप खणोनि प्राशिजे जळ ।**
**क्षुधा लागली प्रबळ । धाविजे सैरू ।।४।। (मूळ)**

**टीका :** तहानेलिया जीवे । विहीर खणोनि पाणी प्यावे । भुकीयाने धावावे। अन्नासाठी ।।१।। ऐसिच माझीये स्थिती । तहानभूक हेचि निगुती । तरी आत्मयाची प्राप्ती । केऊती होय ।।२।। माझे जीवनची तहानजले । जीवन प्राप्तीसी भुकेले । जीवनची जगावे भले । वाटे मज ।।३।।

अर्थ : तहानलेल्याने विहीर खणून पाणी प्यावे अगर अत्यंत क्षुधित जीवाने सैरावैरा धावावे असेच होत आहे. म्हणजे तो केव्हा तृप्त व्हायचा?(४)

**५) देवा ऐसे न कीजे आता । धीर न धरवे माझिया चित्ता ।**
**मीन जळेविण ठेविता । राहे कैसा ।।५।। (मूळ)**

**टीका :** मासा जळाविण । जगज्जीवना वाचून मन । केवी पावे समाधान । सांगावे जी ।।१।। तुम्हीच आमुचे आत्मजीवन । त्यातचि माते मिसळून । द्यावे आत्मसमाधान । अधिरिया ।।२।। कारण चित्त चैतन्याची । फारकत सदाचि । बहिर्मुख जीवन साची । भ्रांतावस्थे ।।३।। चित्तासी न धरवे धीर । मनी घ्यावा जी विचार । माझे जाणुनी अंतर । अंतर नुरवी ।।४।।

अर्थ : जळाशिवाय मासा आणि जगज्जीवनाशिवाय मन राहणार कसे ? व ते पाण्याबाहेर तहानेने व्याकुळ होऊन पाहतील तर त्यांना समाधान होणार कसे ? या कारणामुळे देवा, तुम्ही आत्मजीवनस्वरूप असल्याने, त्यातच मला मिसळून घ्यावे. कारण चित्त चैतन्याची बहिर्मुख अवस्थेत (भ्रांतावस्थेत) फारकत झाल्याने या चित्ताला धीरच धरवत नाही.(५)

**६) पाहुनि उद्धवाची परमस्थिती । विशेष संतोष जाहला चित्ती ।**
**आलिंगोनी परमप्रिती । बोलत असे ।।६।। (मूळ)**

**टीका :** प्रेमाची पराकाष्ठा । हीच भक्तीची प्राणप्रतिष्ठा । जेथ देहाची प्रतिष्ठा। उरलीच ना ।।१।। ऐसी उद्धवाची स्थिती । पाहोनि संतोषे भगवद्मूर्ती। चित्त चैतन्य आलिंगिती । एकमेका ।।२।। चित्त चैतन्याचे आलिंगन। हेचि बोलके भाव पूर्ण ।। बोलणे झाले ओठेविण । पोटीचेची ।।३।। पोटीचे पोटी सामावले । तेचि ते ओठी आले । म्हणोनि तया मोले। नसे जगी ।।४।।

**अर्थ :** प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ती. या स्थितीत उद्धवाची ही अत्युच्च भूमिका पाहून, भगवंतांना विशेष आनंद वाटला व चित्त चैतन्याचे आलिंगन होऊन, भगवान बोलू लागले. (६)

**७) उध्दवा आमुच्या हृदयीचे गूज । केवी राखू चोरूनी तुज ।**

**सर्व बीजांचे निजगूज । सांगत असो ।।७।। (मूळ)**

**टीका :** उद्धवा मम हृदयीचे गुज । चोरूनिया तुज । किंवा तुमचे चोरूनी हृदयीचे गुज । रक्षितो मी ।।१।। हेचि निजगुजा गुज । केवी राखो लपवोनि तुज । सर्व बीजांचे निजगुज । सबीज ते ।।२।। सबीज तो प्रणव । नाद प्रकाश जीवन लाघव । संजीवन अपूर्व । समाधिस्थिती ।।३।।

**अर्थ :** आमच्या हृदयीचे गुज चोरून तुला किंवा तुला चोरून या हृदयीचे गुज मी राखत असतो. हेच उद्धवा सर्व बीजांचे निजगुज आहे. (७)

८) **एथे सर्वांगाचे करूनी कान । आत्मरूप चैतन्यपण ।**
**स्थिर करोनि मन । सावध पाहे ।।८।। (मूळ)**

**टीका :** हात पाय नाक कान । डोळे फुटले ज्यातून । त्या सर्वांगाचे करोनि कान । व्हावे हे श्रवण स्वानुभवा ।।१।। शरीरी सळसळे चैतन्य । हे आत्मस्वरूप जीवन । तो प्रवाह दृष्टी होऊन । मध्य धारे येईजे ।।२।। मध्यधारेचा उभा आडवा । छेद घेऊनी बरवा । उर्ध्वगामी गती रहावा । प्रज्ञाचक्षू ।।३।। तेथचि हे प्रज्ञास्थित । होता स्थिर मन चित्त । दक्षतेने लक्षित । अंतरदृष्टी ।।४।। ऐसिया दृष्टी पहावे । आघवे जाणोनि घ्यावे । कळो येईजे स्वभावे । साक्षात्कारा ।।५।।

**अर्थ :** ज्यातून नाक, कान, डोळे, हात फुटले त्या सर्वांगाचे कान करून चैतन्यरूपाने शरीरभर उसळणारे (सळसळणारे) हे आत्मरूप, जीवनस्वरूप प्रवाहाचे मध्यधारेतील उभा-आडवा छेद घेऊन,त्या ऊर्ध्वमुख गतीवर मनाची स्थिरता करून, मोठ्या दक्षतेने लक्ष लावून पहावे. (८)

९) **आमुचा ऐश्वर्ययोग । जे मत्स्वरूपाचे निजांग ।**
**तयाहोनी नसे चांग । सर्वस्व हे ।।९।। (मूळ)**

**टीका :** हा आमुचा ऐश्वर्ययोग । चैतन्य विलास ते अंग । अंगेचिया अंगभोग।

निजस्वरूपी ।।१।। जया परि या जगी चांग । नाही ऐसाचि हा रंग। तेथ होती जे दंग । गुंगोनिया ।।२।। का हेचि सारसर्वस्व । याचे सर्वी वर्चस्व । येणेचि हे दृश्य सर्व । रंगले वाही ।।३।। परी ते कळेना । म्हणोनि आकर्षणे नाना । उगाच करिती तणाणा । बाह्याकारे।।४।।

**अर्थ :** हा आमुचा ऐश्वर्ययोग म्हणजे चैतन्याचा विलास आहे की जो विलास म्हणजे माझ्या निजस्वरूपाचे ते अंग आहे की ज्यापेक्षा जग काही चांगले दाखविताच येणार नाही, असे हे सर्वस्व आहे. (९)

**१०) जेथोनि सर्व घडले असे । परि कवणासीही न प्रकाशे ।**
**विरिंची आदि करूनि आभासे । वांछिताती ।।१०।। (मूळ)**

**टीका :** केला पेहेराव मनुष्ये । तो मनुष्यासी न प्रकाशे । मनुष्येची त्या प्रकाशे । ऐशी स्थिती ।।१।। चैतन्ये घडले दृश्य ज्यात । दृश्ये न येते प्रकाशात । चैतन्येचि दृश्य प्रकाशात । हेचि वर्म ।।२।। वायूप्रकाश आत्मया ठायी । रजोगुणी ब्रह्मा होई । परी तयासी हे नये सोई । प्रकाशावया आत्मया ।।३।। तोही येथ असमर्थ । मग असमर्थ का होय समर्थ । हे ओळखणे यात । ओळख हे ।।४।।

**अर्थ :** ज्याप्रमाणे मनुष्याने केलेला पेहेराव, त्याला प्रकाशित करू शकत नाही, त्याप्रमाणे ज्याठिकाणी हे सर्व दृश्य ज्यात घडले आहे, त्याकडून हे चैतन्य प्रकाशात येऊ शकत नाही. वायुरूप आत्म्याचे ठिकाणी उत्पन्न झालेला रजोगुणी ब्रह्माही ज्यावर प्रकाश पाडून, चैतन्यास प्रकाशात आणण्यास असमर्थ आहे. (१०)

**११) हे गतीची निजगती । येणे परमपुरुषाची प्राप्ती ।**
**याहूनी नसे त्रिजगती । आणिक काही ।।११।। (मूळ)**

**टीका :** हे त्रैलोक्य गतिमान । गतीने गती वाढवी पूर्ण । गतीची निजगती चैतन्य । आणि जे का निजत्वी ।।१।। आत्मा गतीमान । तेणेचि

सर्व गतीमान । गतीने गती आकलन । साधन हे ।।२।। येणे परमपुरुषाची प्राप्ती । होत असे विश्रांती । याहुनी नाही दृश्य जाती । आन काही ।।३।। जेणे विश्वासी आली गती । ते गतीची निजगती हृदयगतीसी जेणे गती । हृद्य हृदयी ।।४।।

**अर्थ :** हे त्रैलोक्य गतीमान असून, गतीने गती वाढविणारे आहे. पण हे चैतन्य, गतीची निजगती म्हणजे ती गती निजत्वात आणणारे असल्याने, यानेच परपुरुषाची प्राप्ती होत असते. (११)

**१२) उद्धवा याचे कारण । सहजस्थितीचे आसन ।**
**ध्वनी अंतर्गत करून । ध्यान लक्षी ।।१२।। (मूळ)**

**टीका :** सहजस्थिती अभंग जेणे । पहाता जीवोपाधीने । अकृत्रिम सहजासने। सहजता ।।१।। तेथ उठणारे ध्वनी । अंतर्गत लक्षुनी । नाद लय जे ठिकाणी । प्रगट ध्यान ।।२।। त्या ध्यानीच लक्ष । जेणे भेटे परमपुरुष । प्राप्ती होय अनिवाश । विनायासे ।।३।। जेथे नसती आयास । मग कैचे सायास । म्हणोनि ते अनायास । प्रकाशले।।४।।

**अर्थ :** जीवोपाधीने ज्या सहजस्थितीचा भंग होत नाही, अशा अकृत्रिम सहजतेचे आसन करून, त्यात होणारे ध्वनी अंतर्गत करून, नाद लयाने त्याठिकाणी प्रगट होणाऱ्या ध्यानावर लक्ष ठेवावे, हेच परमपुरुषाचे प्राप्तीचे कारण आहे. (१२)

**१३) ध्यान ठेविजे वृत्ती । नाद लावूनी श्रोत्री ।**
**नयन गर्भाप्रती । भ्रूमध्ये लक्षी ।।१३।। (मूळ)**

**टीका :** होता सहजवृत्ती । अंतर्गत ध्वनी उठती । सर्वांगाचे कान ऐकती । न बर्हिकर्ण ।।१।। तेथ होऊनी समरस । चंद्रसूर्य दृष्टी दक्ष । ऊर्ध्व गतीमान लक्ष । आदळती बिंदूवरी ।।२।। जेथ या चंद्रसूर्य गती। तिरप्या ऐशा बिंदूवरी खिळती । भ्रूमध्य नयनगर्भ लक्षिती । एकतान ।।३।। ऐसा जो भ्रूमध्य लक्षी । तोचि तो आत्मा लक्षी । जेथ

अलक्षचि साक्षी । येत असे ।।४।।

**अर्थ :** सहजवृत्तीवर हा अंतर्गत ध्वनी ठेवून, सर्वांगाचे कान तेथे समरस करून, चंद्रसूर्यात्मक गतीमान ऊर्ध्वदृष्टीने, चंद्रसूर्यांच्या गती ज्या बिंदूवर तिरप्या आदळतात, अशा भ्रूमध्यांतर्गत नयनगर्भावर जीवास लक्ष ठेवावे लागते.

**१४) ऐसे लक्ष लक्षिता । निज प्रगटले तत्त्वता ।**
**अणूरेणू पूर्ण भरिता । दिसतील सहजी ।।१४।। (मूळ)**

**टीका :** येणे परी अलक्ष लक्ष । का लक्षी जाहले अलक्ष । आस्तिभाव निजत्व प्रत्यक्ष । प्रगटे पै ।।१।। की जे अणुरेणू । भरोनि परिपूर्णू । सहजावस्थे जीवनू । येता प्रचिती ।।२।। जेवी जागृती दृश्य सृष्टी । स्वप्नी स्वप्नसृष्टी । सुषुप्ती ये शून्य दिठी । तेवीच हे ।।३।। कल्पनेमाजी कल्पनासृष्टी । ज्ञानावस्थे ज्ञानदृष्टी । सहजावस्थे सहजदृष्टी । अलक्ष लक्षी ।।४।।

**अर्थ :** याप्रमाणे अलक्षच लक्ष होत आहे हे लक्षात घेऊन, लक्षिता अस्तित्वरूप निजत्व प्रगट होईल की जे अणूरेणूमध्येही परिपूर्ण भरलेले, जागृतावस्थेत दृश्य, स्वप्नावस्थेत स्वप्नसृष्टी, सुषुप्तीत शून्य, त्याप्रमाणे सहजावस्थेत दिसून येईल. (१४)

**१५) मुक्त मोती कृश मोडी । तुज पाहता दिसती दृष्टी ।**
**रौप्य तारा-राशी सृष्टी । भरली दिसे ।।१५।। (मूळ)**

**टीका :** जेथ जीव दशा बुडूनी जाय । मुक्तस्वरूप चैतन्य माय । समुद्राकार न सामाये । दिसे जीवा ।।१।। कोठे लहान मोठे मोती । स्वयंतेजे झळकती । श्वेततारक स्वरूप प्रचिती । जिये सृष्टी ।।२।। ऐक जी उद्धव । ऐसा येई येथ अनुभव । तोचि स्वानुभव । प्रणवाभ्यास।।३।।

**अर्थ :** ज्यात जीवदशा बुडून जाते, अशाप्रकारे लहानमोठे, मुक्तस्वरूप

श्वेत व तारकरूपात भरलेली सृष्टीच त्या जीवास दिसू लागते.(१५)

**१६) अनेक घुंगरू तळपती । की नक्षत्रे डळमळती ।**
**असती पुष्पे डोलती । मधुर वाते ।।१६।। (मूळ)**

**टीका :** जीवन कळेतील मधुरू । ऐशा वायुरूपे नक्षत्रू । डळमळावी ऐसे घुंगरू । अनुहत निनादिती ।।१।। निनादोनि तळपती । कैसी ध्वनीचिये दीप्ती । जेणे आस्तिभाव पुष्पे डोलती । जीवन विकासू ।।२।। जयांचा परिमळ सुगंध । दरवळोनी देई आमोद । पूर्णावस्था उत्क्रांत बोध । स्वयेचिया ।।३।। नसता वृक्ष पल्लव । पुष्पे डोलती हे अपूर्व । ऐसा नवलाव । वायू जीवनी ।।४।।

**अर्थ :** जीवनकळेतील मधूर अशा वायुरूपाने नक्षत्रेही डळमळून जावीत असे घुंगरू अनुहताचा निनाद करीत तळपत आहेत, की ज्या योगाने जीवनाची विकसीत झालेली व सुगंध परिमळ दरवळून टाकणारी, पूर्ण उत्क्रांत पावलेली पुष्पे, वृक्ष, पल्लव नसताही डोलत आहेत. (१६)

**१७) इंद्रनीळाची नीज ज्योती । राघवा नेत्राची दिसे पंक्ती ।**
**तेज गुंडाळले झळकती । अनेकत्वे ।।१७।। (मूळ)**

**टीका :** सोऽहंस्वरूपी ज्योती । झळके तृतीयनेत्री । इंद्रनील मण्यांची पक्ती। अमर्याद ।।१।। गुंडाळी तेजास । एकत्वी झळाळी प्रकाश । अनंतत्त्वे सावकाश । सकारा ठायी ।।२।। परा पश्यन्ती मध्यमा । वैखरीची होय सीमा । सोऽहं ज्योतीचा महिमा । (निरंजन अनुपमा) काय बोलो ।।३।।

**अर्थ :** सोऽहंस्वरूपात असलेली ज्योती म्हणजे तृतीय नेत्रातील इंद्रनील मण्यांची पंक्ती असल्याप्रमाणेच अमर्याद आहे, की जी तेजासही गुंडाळून टाकील अशी अनेकत्वे एकत्वात झळकती आहे. का (=कारण) ती अनंतच आहे. (१७)

**१८) क्षणक्षणा रूप पालटे । झळकता विजु हारपे ।**
**ज्वाळा भासती अपापे । प्रकाशतेजे ।।१८।। (मूळ)**

**टीका :** चैतन्याचा विलास । नित्य नवा त्याचा प्रकाश । नाविन्यपूर्ण उल्हास। स्वरूप झळके ।।१।। जेथे बुद्धीचा आलट । तेथे जीवनाचा पालट । क्षणक्षणा निघोट । एकसरा ।।२।। नेत्रबाहुली पसरवणारी। सहस्रारी चमकणारी । माथया पीतप्रभा खरी । विद्युलता।।३।। तेही हरपे ज्या तेजी । ऐसा स्वयंप्रकाश सहजी । साक्षात्कार होय जी ।आपेआप।।४।।

**अर्थ :** चैतन्याचा विलास हा क्षणाक्षणाला नित्य नवीन असून, त्यातील नाविन्यपूर्ण स्वरूप झळकू लागले की नेत्र बाहुली पसरविणारी, सहस्रदळाचे माथ्यावर चमकणारी, पीतप्रभा स्वरूपिणी विद्युल्लता ही हरपून जाते की, ज्या तेजाचे प्रकाशाने प्रज्वलित स्वरूपाचा आपोआप साक्षात्कार होतो. (१८)

**१९) चंद्रसूर्य दिसती उगवले । अनेक तेज पाहता फाकले ।**
**ऐसे तेज पाहिले । दृष्टीस भासे ।।१९।। (मूळ)**

**टीका :** चंद्रसूर्य गतींचे तेज । प्रगटले दृष्टीया सतेज । अनेकत्वाचे तेज । फाकले नेणे ।।१।। ऐसे हे तेज । जे दावी निज । हेचि असे गुज । परमार्थाचे ।।२।। श्रवणातोनी नयनी । निजत्वची उघडपणी । चिन्मयमार्गेची वाहणी । चैतन्याची ।।३।।

**अर्थ :** चंद्रसूर्य गतींचे तेज प्रगट झालेले पाहिले की अनेकत्वाचे तेज फाकलेले दृष्टीस भासते. (१९)

**२०) तयाचे ऐकिजे कारण । प्रथम अंधःकार निबीडपण ।**
**ते अष्टधा प्रकृती जाण । निश्चयेसी ।।२०।। (मूळ)**

**टीका :** गाढ अवस्थात्मक शून्य । हेचि प्रथम असून । अनेकत्वाचे कारण । कारण हे ।।१।। तेथे जे चंचळ । उठले कल्लोळ । झाला तो खेळ ।

अष्टधेचा ।।२।। पंचभूते तीन गुण । अष्टधा प्रकृती मिळून । जाहली हे तत्त्वज्ञान । निश्चित उघड ।।३।। तोचि अंधःकार । जेथ दडे चैतन्य लहर । दुर्लक्ष अपार । दृष्टी जाले ।।४।। प्रकाशाचा अभाव । हा अंधाराचा स्वभाव । दुर्लक्ष दृष्टी सावेव । अंधार तो।।५।।

**अर्थ :** अनेकत्वाचे कारण शून्यात्मक गाढ अवस्था हीच प्रथम असून, पंचमहाभूतात्मक व त्रिगुणात्म अशी अष्टधा प्रकृती चंचळत्वाने बनली आहे, हे निश्चित होय. (२०)

**२१) जे प्राणिया होय गती । ते इये अंधःकारे पडती ।**
**तया मत्स्वरूपाची प्राप्ती । नव्हे येणे ।।२१।। (मूळ)**

**टीका :** प्राणधारी प्राणीयास । हे गती होता अशेष । दूतांचे काळोखी वास । विशेषत्वे ।।१।। सत्यासत्याचा निवाडा । आता न येचि दृष्टीपुढा । भ्रमणाने भ्रांत वेडा । जीवनी जीव ।।२।। आता स्वरूपी उजेड । कैसा तया अखंड । दृष्टी लागले कवाड । तो दृष्य जाले ।।३।। दृष्टी कवाडासी कवाड । लागता दृष्टी उघड । अंतरी देखता प्रचंड । उजेड स्वरूपी ।।४।।

**अर्थ :** प्राणधारी प्राण्यास ही गती प्राप्त झाली की ते द्वैताच्या काळोखात पडतात, की त्यांना सत्यासत्याचा निवाडाच होत नाही व अशा भ्रमणाने भ्रांत झालेल्या भ्रमित जीवांना स्वरूपाची प्राप्तीच होणे शक्य होत नाही. (२१)

**२२) सूक्ष्मपणे सुवर्ण रज । तया प्रकाशे दिसे तुज ।**
**ते मूळ माया हे गूज । ओळखी जे तुवा ।।२२।। (मूळ)**

**टीका :** आत्मप्रभा प्रकाशे । पीतप्रभा सूक्ष्मत्वे विलसे । साक्षात्कार विशेषे । ते मूळ माया ओळखे ।।१।। हे जाणोनि घेई उद्धवा । तेणे हा अभ्यास बरवा । विस्तार दृष्याचा आघवा । जेथ जाला ।।२।।

**अर्थ :** आत्मप्रकाशानेच सूक्ष्म अशा पीतप्रभेचा साक्षात्कार होत असतो.

प्रचिती । जीवनसत्वाचिये आधी । तोचि तो ।।३।। निजगतीकर । या शब्दाचा विचार । घेता अपरंपार । अर्थरूप ।।४।।

**अर्थ :** सत्वगुणाने धारणा उत्पन्न करणारे दंडायमान तारक स्वरूप हे विष्णुचे असून, त्याचे गतीनेच कोणत्याही दृश्यास स्थिती येते व त्याचे पालनपोषण होते. (२५)

**२६) नाना तेजाचे गुंडाळे । लक्षिता तरंगिसी फळे ।**
**तोचि शेषशायी विमळे । भ्रांती नाही ।।२६।। (मूळ)**

**टीका :** जीवनाचे भ्रमण । चित्त भ्रांत म्हणोन । पायावरी चक्र कारण । फिरे सदा ।।१।। जीवनात चित्ताचे । केंद्रीकरण होता साचे । स्थिरचि होय याचे । नवल वाटे ।।२।। उपाधी फिटे जीवन फिरे । तेथ चित्त तादात्म्ये जीवन ओसरे । ऊर्ध्वगामीत्वेचि सरे । उपाधी हे ।।३।। उपाधीची उपाधी । जाता होय स्थिरबुद्धी । साधिली संधी । निज भेटीची ।।४।। भ्रांतीचे पैल । नाना तेजांचे गुंडाळ । पंचप्राणांचा धारणा । निखळ शुद्ध होय ।।५।। तेथ शेषशायी घोर । स्वरूपाचा साक्षात्कार । पहाता कळे प्रकार । संशय नाही ।।६।।

**अर्थ :** भ्रमणरहित भ्रांतीचे पैल नाना तेजांचे गुंडाळे पाहिले की, ती पंचप्राणांची धारणा आणि शुद्धस्वरूपात शेषशायीचा होणारा घोर स्वरूप साक्षात्कार होय. (२६)

**२७) तेज दिसे वर्तुळाकारेसी । चक्र चक्रात प्रवेशी ।।**
**तोचि सदाशिव निश्चयेसी । ओळखी तू ।।२७।। (मूळ)**

**टीका :** आधारचक्रापासून । सहस्रदळापर्यंत जाण । चक्री परिपूर्ण । तेजोवलय ।।१।। वायूप्रकाश स्फुरे । आपणची आविष्कारे । येई जीवा साक्षात्कारे । तो सदाशिव ।।२।। जेथ सदाचि कल्याण । कदा नोहे अकल्याण । ठाण मोडोनी साधी ठिकाण । तया प्रती ।।३।।

**अर्थ :** चैतन्याचे गतीमान चंद्रसूर्यदृष्टीने पाहता सहस्रदलस्थानात मयूरपिच्छ नीलपाणी स्वरूपाचाच एक अनुभव येतो. एक स्वरूपच तेथे रहाते की ज्यायोगे सर्व दृश्यादृश्याची प्रचिती एकच येते. (३०)

**३१) तया खोविजे दृष्टी । तया भ्रूमध्ये होय भेटी ।**
**ते येऊनी नेत्र संपुटी । होतसे स्थिर ।।३१।। (मूळ)**

**टीका :** दृष्टी तादात्म्य ते ठिकाणी । की भ्रूमध्यस्थानी । स्वयंप्रकाश भेट होऊनी । नेत्र संपुटी स्थिर होय ।।१।। अद्वैत मौज द्वैती लुटे । म्हणोनि तेथ द्वैत नुठे । आपणया आपण झगटे । दुजे दिसेना ।।२।। ऐसा तो प्रकाश । जो असे निराभास । तेथे दृश्य भासाभास । उरेचिना ।।३।।

**अर्थ :** त्याठिकाणी दृष्टीचे तादात्म्य झाले की भ्रूमध्यस्थानी त्या स्वयंप्रकाशाची भेट होऊन तो नेत्र संपुटात स्थिर होतो व द्वैतात अद्वैताची मजा लुटून दुसरे दृश्य त्या प्रकाशात दिसतच नाही.(३१)

**३२) त्याते निजदृष्टीचा प्रवेश । सहज उन्मनी सौरस ।**
**मग निजतेजाचा प्रकाश । ब्रह्मरूप ।।३२।। (मूळ)**

**टीका :** सहजस्थिती चैतन्यातू । निजदृष्टीचा प्रवेश होतू । तया उन्मनी अवस्थू । ब्रह्मरूप प्रकाशू ।।१।। मनाचे नुरता मनपण । ते सहजेची उन्मन । शब्दग्रासे विलीन । आकाशही ।।२।।

**अर्थ :** सहजस्थितीत निजदृष्टीचा चैतन्यात प्रवेश म्हणजेच उन्मनी अवस्था असून, त्यात पसरणारा निजतेजाचा प्रकाश म्हणजेच ब्रह्मरूपता आहे. (३२)

**३३) ऐसी ब्रह्मस्वरूपाची पेटी । पाहता उघडेल दृष्टी ।**
**तटस्थाची वृत्ती । कोण सांगे ।।३३।। (मूळ)**

**टीका :** सहस्रदलाचे पेटीमाझारी । ब्रह्मानुभव ये जिव्हारी । मुद्रा लागता

ऐसे जे सुरंग । सांग तेचि कथिले ।।२।। निजत्व ते माझे अंग । जाणिजे सांगोपांग । वायुप्रकाश जीवन संग । असंग जे ।।३।। सर्व संगी जे असंग । जेणे होय दृश्य संग । दृश्य हे तो वरपंग । सर्व ढंग इये अंगे ।।४।। ना तरी काय वरकड अंग । असोनिया ते चांग । दीनवाणे बापुडे जडांग । उपेगा न ये ।।५।। हे उद्धवा जाण निश्चित। तेणे होसी तू निश्चिंत। चिद्विलासयोग समस्त। जाणता माझा ।।६।।

**अर्थ :** असा हा माझा ऐश्वर्ययोग तुला पूर्णतः सांगितला असून, हेच माझे (निश्चयपूर्वक) निजांग आहे, हे तू निश्चित जाण. (३५)

**३६) पाषाण देव देऊळा । अंतर्बाह्य एकचि शिळा ।**
**तैसा प्रकाशिला अवलीला । हृदयस्थ जो ।।३६।। (मूळ)**

**टीका :** पाषाणी देव देऊळा । अंतर्बाह्य एकचि शिळा । तेथ नसे वेगळा । पदार्थ तो ।।१।। नाक कान जिव्हा नेत्रास । तालुसह जोडे अंतराकाश । ऐसिया हृदयी प्रकाश । आत्मयाचा ।।२।। ऐसा जो हृदयस्थ । तो आत्माच सर्वगत । असे सर्व शरीरात । दृश्यामाजी ।।३।। अंतर्बाह्य प्रकाशमान । जाला तोचि आपण । हे जाणतली खूण । संतजनी।।४।।

**अर्थ :** पाषाण देव आणि देऊळ म्हणजे अंतर्बाह्य एक शिळाच आहे. त्याप्रमाणे नाक, डोळा, कान, जिव्हा व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेल्या अंतराकाशात्मक हृदयात वास्तव्य करणारा आत्माच सर्व शरीरात अंतर्बाह्य प्रकाशमान झाला आहे.(३६)

**३७) ऐसा विष्णु आत्मलिंग । बोधा आलिया सांग ।**
**तेथे कैचे सांगोपांग । स्वयंज्योती ।।३७।। (मूळ)**

**टीका :** लिंगाकृती प्रवेशून । विष्णु आत्माचि आपण । प्रचिती बोध जाल्या पूर्ण । बोधा आला ।।१।। बोधी बोधिले बोधता । न ये ऐसे जाले तत्त्वता । मीपण हे सरता । सांगोपांग स्वयंज्योती ।।२।। जे कां

**४०) ऐसा हृदयस्थ मनोरम । सर्व सुखाचे निजधाम ।**
**भ्रांती येणे सम विषम । मानितु असे ।।४०।। (मूळ)**

**टीका :** पृथ्वीचे परिभ्रमण । दिवसरात्र तेणे करून । तेवी जीवाचे भ्रमण । सम विषम स्थिती तेणे ।।१।। मना रमविणारा राम । हृदयस्थ आत्माराम । माहेरघर सुख परम । द्वैत मानी भ्रांतीने ।।२।।

**अर्थ :** हृदयस्थ मनास रमविणारा, सर्व सुखाचे माहेरघर आत्माराम असता, पृथ्वीच्या परिभ्रमणाने दिवस रात्र, त्याप्रमाणे जीवाच्या परिभ्रमणाने सम विषम स्थिती, जीव भ्रांतीने मानित असतो. (४०)

**४१) भ्रमरी कीटक न्याय । झाला जरी उपाय ।**
**तरी स्वरूपाची सोय । जपतपाची ।।४१।। (मूळ)**

**टीका :** आळी ध्यासे होय भ्रृंगी । तैसा जीव आत्मरंगी । आत्मानुसंधाने गुंगी । स्वरुपाकार सहजेचि ।।१।। न लगे जप तप । काही करणे अमुप । सांडोनि सविकल्प । निर्विकल्प ध्यासेचि ।।२।। मी पणाचे ध्यान । जेवी सहजे अनुसंधान । तेवीच येई घडोन । निदिध्यासे ।।३।। एक या निदिध्यासे । मुक्त झाले शुका ऐसे । सहजे आप ऐसे। उपाधी सरल्या ।।४।।

**अर्थ :** अळी ज्याप्रमाणे ध्यासाने भ्रृंगी होते, तसा उपाय झाल्यास आत्मानुसंधानाने जीव स्वरूपाकार सहजच होतो. (४१)

**४२) मग प्रत्यक्ष तत्त्व दिसे । चक्षुरग्नि मणिमय प्रकाशे ।**
**जो पूर्णत्वचि असे । सर्व साक्षी ।।४२।। (मूळ)**

**टीका :** पूर्णत्वेचि पूर्ण । जो आत्मा परिपूर्ण । साक्षी चैतन्य । भ्रूमध्ये ।।१।। भ्रूमध्यांतर्गत । चक्षू प्रकाशमान होत । आधारचक्र मणिपुरा प्रकाशित। अनुभव संती ।।२।। भ्रूर्वोघ्राणस्य मध्यमे । जो आला या माध्यमे । तो मागुती संभ्रमे । भ्रमेल काई ।।३।।

दशमद्वारी । ज्वलन जेथ देह चारी । आतळे तेथे ।।४।।

**अर्थ :** स्थूल, सूक्ष्म, कारण शरीरापलिकडे जे उपाधीभूत जीवनात आकाशरूप जीवन ऊर्ध्वमुख झाले की नाद, बिंदूचे अनुभव साधकास क्रमशः येतात व मसुरप्रमाण तेजस्थितीत अंतरदृष्टीने पीतप्रभेचा लखलखाट होतो. (४५)

**४६) नील सुनिल अमल । देव साळी शुक केवळ ।**
**तयाहूनी अतिनिर्मळ । सूक्ष्मज्योती ।।४६।। (मूळ)**

**टीका :** अत्यंत निर्मळ । सूक्ष्मज्योती प्रकाशनील । सोऽहंधारणे विमल । अनुभव येई ।।१।। जैसा करतळीचा आवळा । तैसा देव दिसे डोळा। स्वस्वरूपी जरी डोळा । तोचि उमाळा तेजाचा ।।२।। ऐसी हे निज ज्योती । ज्याची नयनी प्रचिती । हे जाणितले संती । अध्यात्म पै ।।३।।

**अर्थ :** अत्यंत निर्मळ अशा नीलप्रकाशयुक्त सूक्ष्मज्योतीचा अनुभव सोऽहं धारणेत येतो. (४६)

**४७) चक्षुचिये दशांश भागी । तेथे पहाती जे योगी**
**स्वयंतेज निजांगी । स्वतेजे असे ।।४७।। (मूळ)**

**टीका :** नीलबिंदू दृष्टी । पहाणे विसावले दिठी । तया बिंदूपोटी । दशांश भागी ।।१।। ज्यांनी साधिला योग । जीवपणाचा सरता वियोग । तेथ साधिला भोग । दशांशाचा ।।२।। दृष्टीचे दशांश भागी । जे आले देहाचे भागी । तेथ लक्षुनि भोगी । आले आत्मसुख ।।३।। तेथ जे तादात्म्य होती । निजत्वी स्वयंतेज प्रचिती । परी अभ्यासाची रीती । साधिली पाहिजे ।।४।।

**अर्थ :** नीलबिंदूच्या दहाव्या निराळ्या भागात जे योगी तादात्म्य होतात, त्यांना निजत्वाचे स्वयंतेज प्रचितीस येते. (४७)

जे उमगोन । प्राणलिंग ।।४।। सोऽहंचिया अवकाशी । स्पंदन होय प्रकाशी । प्राणलिंग दिसे सावकाशी । लिंगाकृती ।।५।।

**अर्थ :** सोऽहंरूप सत्‌चिदानंद परब्रह्माचे तेजाचे धारणेत समरस झालेल्या जीवास स्पंदनरूप प्राणलिंग प्रत्यक्ष दिसते. (५०)

**५१) ऐसेनि सर्वांगे पाहता । परमात्मा दिसेल तत्त्वता ।**
**हे निरामय कर्ता । विरुळा जाणे ।।५१।। (मूळ)**

**टीका :** जाणोनि ऐसीया प्रकारा । जो सर्वांगे पाहणारा । तो गोचर करी अगोचरा । परमात्मया ।।१।। सर्व अंगे ज्यातून । ते सर्वांग ओळखून। तेणेचि पाहता आपण । प्रत्यया ये ।।२।। म्हणोन हे जाणे । ऐसा विरळाचि जाणे । अविरळ शोधिले जेणे । अविरत ।।३।। आकाश हे विरळ । तयाही वरी जे विरळ । तया जाणतयाही विरळ । असे जनी ।।४।।

**अर्थ :** अशाप्रकारे सर्वांगाने पाहणाऱ्यालाच परमात्मा दृग्गोचर होईल व हे जाणणाराही विरळाच सापडेल. (५१)

**५२) ऐसी वस्तु चर्मचक्षु जो लाहे । ज्ञानदृष्टी करोनि जो पाहे ।**
**चिद्‌ज्ञानू होऊनी राहे । निजवस्तु पूर्ण ।।५२।। (मूळ)**

**टीका :** पूर्ण वस्तुची ओळख । अंतर्बाह्य दृष्टी चोख । चैतन्यरूप जालीया एक । घेऊ शके ।।१।। ऐसा जो धन्य जीव । हे जाणिजे उद्धव । सांगतसे माधव । संतोषाने ।।२।।

**अर्थ :** चैतन्यरूप झालेला जीवच पूर्णवस्तुची ओळख अंतर्बाह्य दृष्टीने घेऊ शकतो. (५२)

**५३) एका जनार्दना शरण । झाले उद्धव श्रीकृष्णाचे संभाषण ।**
**ते निरूपिले देशभाषे करून । श्रोती अन्यथा न मानावे ।।५३।।(मूळ)**

**टीका :** उद्धव श्रीकृष्ण संभाषण । कथिले देशभाषेतून । होऊनि जनार्दना

**अर्थ :** श्रीजनार्दनस्वामींना शरण जाऊन, उद्धव-श्रीकृष्णाचे संभाषण श्रीएकनाथमहाराजांनी प्राकृत भाषेत निवेदन केले. हे काहीतरी आहे असे न मानता, श्रोत्यांनी अभ्यासपूर्वक त्याचा अनुभव घ्यावा अशी श्रीएकनाथमहाराजांची इच्छा आहे. (५३)

।। टीका, गद्य अर्थासह श्रीप्रकाशदीपिका समाप्त ।।

(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.११६)

*****

कळे ।।१२।। जीवनाची टोके दोन । जन्म आणि मरण । तयाचे एकपण । संतोषेसी ।।१३।। समत्वाची तुष्टी । तेची गा संतुष्टी । जेणे शांती आणि पुष्टी। जीवनी होय ।।१४।। तो संतोष हा गुरू । गुप्तरूप अगोचरू । करितसे गोचरू । म्हणोनि श्रेष्ठ ।।१५।। गुप्तरूपा दाखवी । म्हणोनि गुरू ही पदवी। जेणे योगे होय ठावी । आत्मवस्तु ।।१६।। सोऽहं तोचि सद्गुरूराव । त्याचे चरणी माझा भाव । तुकयाचा अभिप्रावो । हाचि असे ।।१७।। सोऽहंभावी समभाव । तोचि तोष अभिनव । संतोषरूप गुरूराव । जनार्दन ।।१८।। नोहेची गा जन । अवघाची जनार्दन । बोलीले आपण । एकनाथ ।।१९।। तयासी वंदन । करिती नाथराय आपण । जेणे दिले आत्मज्ञान । प्रकाशयुक्त।।२०।। सद्गुरू जे शांत । स्वयेचि जे निवांत । स्थान जे निर्वात। चैतन्यमूळ ।।२१।। चैतन्याचा मूलस्त्रोत । तेथूनी गा निभ्रांत । हंसारूढ मूर्तिमंत । अरूपरूप।।२२।। सहजसिंहासनी आरूढ । स्वरूप ते गूढ । जया दर्शने मुमुक्षु मूढ । सिद्ध होती।।२३।। सकार हकाराचा जन्म । ऐसे जे स्थान परम । सिंहासन उत्तम । अनुपमेय ।।२४।। सहजावस्थे आनंद । हाच जो बोध । तेणे आनंदकंद । भोगा आला ।।२५।। आनंदापासोनि आनंद । आनंद भोगी आनंद । ऐसा पूर्णानंद । गुरू देई ।।२६।। ऐसे जे आनंदामृत । श्रेष्ठ भागवत ग्रंथ । उद्धवासी कृष्णनाथ । बोधितसे ।।२७।। भगवताज्ञे एकनाथ । एकादशी भाष्य करित । जनार्दन सद्गुरूनाथ । वोळलिया ।।२८।। गीता भागवत श्रवण । आणि अखंड चिंतन । त्यांची सेवा घडावी जाण । तुकोबा म्हणती ।।२९।। तयाचे पठण । भावे अभावे होता जाण । योगावस्था गहन। प्राप्त होय ।।३०।। लोहापरीसा झगटले । रागे रागे झोंबो गेले । परी त्याचे झाले । सोनेचि की।।३१।। भक्तीभावे अभावे । भागवत परता जीवे । परिणाम प्रभावे । दिसो येई ।। पद व्युत्पत्ती ज्ञान । धाव घेई आपण । म्हणती एकनाथ पूर्ण । विश्वासेसी ।।३३।। तयासी उपजे भक्ती । प्राप्त होय विरक्ती । ज्ञाने चिरशांती। लाभतसे ।।३४।। विषय आणि इंद्रिये । जड ओळखणे स्वये । तेचि ते होये। विरक्ती गा ।।३५।। चैतन्याकार वृत्ती । तेचि ते भक्ती

## प्रकरण क्र.३
## श्रीएकनाथी भागवतामधील श्रीदासरामहाराज संग्राहित संक्षिप्त पाठ प्रसाद स्तोत्र (श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह)

।। श्रीगणेशाय नमः ।।

**१) ॐ नमोजी जनार्दना । नाही भव अभव भावना ।**
**न देखोनि मी तू पणा । नमन श्रीचरणा सद्गुरूराया।।१.१।।**

**भावार्थः** ॐकार निर्दिष्ट, जनांचे अंतर्यामी असणाऱ्या श्रीजनार्दना, ज्या ठिकाणी काही झाले आणि झाले नाही ही भावनाच नाही, ज्या आपल्याकडे पाहताच मी तू पणा उरत नाही, त्या आपल्या श्रीचरणाप्रत हे श्रीसद्गुरूराया, माझे नमन असो.(१)

**२) ऐक राया सावधान । नामापरते सुगम साधन ।**
**सर्वथा नाही नाही आन । निश्चये जाण नेमस्त ।।२.५५३।।**

**भावार्थः** हे राजा, नामापेक्षा सुगम साधन सर्वथैव नाही हे तू निश्चितपणे व निश्चयपणे जाणून घे. (२)

**३) जागृती स्वप्न आणि सुषुप्ति । तिन्ही व्यापुनि समाधीही परती । ज्याची साक्षित्वे स्फुरे स्फूर्ती । तो जाण निश्चिती नारायण ।।३.६३४।।**

**भावार्थः**जागृती, स्वप्न, सुषुप्तिला व्यापून समाधीपलिकडे साक्षित्वाने स्फुरणारे जे स्फुटद्रूप आहे, तोच निश्चित नारायण आहे (श्रीगुरूलिंगजंगम) असे समज. (३)

**४) जो परेहून परात्परू । जो का अजन्मा अक्षरू ।**
**जो श्रुतिशास्त्रा अगोचरू । तो पूर्णावतारू श्रीकृष्ण ।।४.२५६।।**

**भावार्थः** जो परेच्या पलिकडे असून ज्याला जन्मच नाही असा अविनाश आणि श्रुतीशास्त्रालाही अनाकलनीय असा आहे, तोच पूर्णावतार श्रीकृष्ण आहे.(४)

**१०) छेदावया संसार बंधन । करावे सद्गुरू सेवन ।**
**सद्गुरूसेवा ते माझे भजन । गुरू आम्हा भिन्नभावो नाही ।।१०.१४३।।**

**भावार्थः** संसारबंधन नाहीसे होण्याकरिता सद्गुरुसेवा करावी. सद्गुरूसेवा हेच भजन असून, आम्ही आणि सद्गुरू यात भेदच नाही हे जाणावे.(१०)

**११)अहर्निशी माझी कथा । अहर्निशी माझी वार्ता ।**
**अहर्निशी माते ध्याता । भक्ति तत्त्वता ती नाव ।।११.१४९८।।**

**भावार्थः** माझी कथा, माझीच भाषा आणि ध्यान ज्या ठिकाणी अहर्निश आहे, त्यालाच तत्त्वतः भक्ति असे म्हणतात. (११)

**१२)प्राणाचेनि गमनागमने । सोऽहं हंसाचेनि स्मरणे ।**
**सावधाने जो साधु जाणे । तेणे पावणे हे स्थान ।।१२.३४६।।**

**भावार्थः** प्राणाच्या येण्या जाण्याने होणाऱ्या सोऽहंनादाचे स्मरण जो सावधानपूर्वक साधतो, त्यालाच या स्थानाची प्राप्ती होऊन तो स्थानापन्न होतो. (१२)

**१३)हरिचिंतनी एकाग्रमन । तै एक होती प्राणापान ।**
**हाचि पवनविजयो पूर्ण । योगसाधन सहजेचि ।।१३.२५९।।**

**भावार्थः** हरिचिंतनात एकाग्रता झाल्याने प्राणापान एक होतात, हाच संपूर्ण पवन विजय असून सहज घडणारे हे साधन आहे. (१३)

**१४)अगा ॐ हे स्मरो सरे । स्मरता स्वरेसी प्राणु प्रणवी भरे ।**
**मग प्रणवूचि तेव्हा स्फुरे । अखंडाकारे उल्हासतु ।।१४.४४३।।**

**भावार्थः** योगसाधन ॐकाराचे स्मरणात जीवन हे विलीन होऊन जाते, त्या स्मरणाचे स्वरात प्राण हा प्रणवाकार होतो, त्यावेळी स्फुरद्रुपाने अखंडाकार मोठ्या उल्हासमय अवस्थेत हा प्रणवच स्फुरत राहतो.(१४)

**१५)सेविता सद्गुरूचरण । कोंदाटे ब्रह्म परिपूर्ण । तेथ सिद्धिसी पुसे कोण ।**
**हे जाणती खूण हरिभक्त ।।१५.२३८।।**

**भावार्थः** सद्गुरूंची चरणसेवा केल्याने सर्वत्र ब्रह्मसाक्षात्कार होतो, तेथे सिद्धीला आधी विचारतोच कोण? ही खूण फक्त हरिभक्तच जाणतात.(१५)

**१६)माझे प्राप्तीचे मुख्य वर्म । मी हृदयी असे परब्रह्म । हें चि**
**ज्याचे नित्य कर्म । तो विभूती परम पै माझी ।।१६.१५५।।**

**भावार्थः** परब्रह्म जो मी तो हृदयातच आहे हेच माझे प्राप्तीचे इंगीत असून, तेथे घडणारे सहज कर्म हेच ज्याचे कर्म आहे, उद्धवा तो जीव म्हणजे माझी विभूतीच आहे असे समज.(१६)

**१७)सांडुनिया अभिमान । सर्व जीवाशी सर्वदा लीन ।**
**या नाव 'महध्दर्म' जाण । शुद्ध लक्षण हे धर्माचे ।।१७.४२९।।**

**भावार्थः** अभिमान सांडून सर्व जीवांचे ठिकाणी जो सर्वदा लीन असतो हा मोठा धर्म असून, हे धर्माचे शुद्ध लक्षण आहे.(१७)

**१८)करिता स्वधर्मानुष्ठान । रजतमे नाशती जाण ।**
**शुद्धसत्त्व अंतःकरण । तेथ माझे ज्ञान प्रकाशे ।।१८.३३४।।**

**भावार्थः** 'स्व' काय आहे हे ओळखून जर त्या धर्माचे अनुष्ठान केले तर रजतमाचा नाश होऊन शुद्धसत्वगुणाने युक्त अशा अंतःकरणात माझे ज्ञान प्रकाशमान होते. (१८)

**१९)ज्ञान विज्ञान निजसंपत्ती । जाहलीयावीण माझी प्राप्ती ।**
**कोणाशी नव्हे स्वरूपस्थिती । मत्पदी गती ज्ञान विज्ञाने ।।१९.४८।।**

**भावार्थः** ज्ञान आणि अनुभव ही निजत्वाची ओळख करून देणारी संपत्ती असल्याने त्या माझी प्राप्ती म्हणजे स्वरूपावस्था कोणासही प्राप्त होत नाही, यामुळे ज्ञान विज्ञानाचे जीवाला मत्पदी गती प्राप्त होते, तो माझे गतीनेच युक्त होतो.(१९)

**२०)पावोनि श्रेष्ठ नर शरीर । जो नुतरेचि संसारपार ।**
**तो आत्महत्यारा नर । सत्य साचार उद्धवा ।।२०.१८९।।**

**भावार्थः** श्रेष्ठ नरदेह प्राप्त होऊनही जो संसारातून पार होत नाही, तो खरोखरी आत्महत्यारा आहे, असेच तू उद्धवा जाण.(२०)

**२१)घोषरूपे अतिसूक्ष्म नादू । तो मी प्रणवरूपे निजवेदू ।**
**प्राणिमात्री असे स्वतःसिद्धु । परी नेणती बोधु सकामत्वे ।।२१.४००।।**

**भावार्थः** जो अतीसूक्ष्मनाद घोषरूपाने प्रगट होतो, तो मी प्रणवरूप नीजत्वाची ओळख करून देणारा वेदच आहे. हा नाद आणि मात्रांचे ठिकाणी स्वतःसिद्धच आहे. परंतु कामनेने भरलेले जीव हा बोध जाणू शकत नाहीत.(२१)

**२२)जे स्वरूपाचे विस्मरण । ते वाढवी तीव्र विषयध्यान । ते णे**
**जीवासी जन्ममरण । अनिवार जाण देहाभिमाने ।।२२.४००।।**

**भावार्थः** स्वरूपाचे विस्मरण हे विषयध्यान वाढवणारे असून, अनिवार अशा देहाचे अहंकाराने जीवाला जन्ममरण प्राप्त होत असते.(२२)

**२३)नामापरते साधन । सर्वथा नाही आन ।**
**नामे भवबंधच्छेदन । सत्य जाण उद्धवा ।।२३.६४८।।**

**भावार्थः** कोणत्याही प्रकारे पाहिले तरी नामासारखे साधनच नाही. यानेच भवबंध नाहीसा होतो. हेच सत्य आहे, हे तू उद्धवा जाणून घे.(२३)

**२४)उत्पत्ती स्थिती प्रलयात । ब्रह्म अखंड निजसत्य ।**
**हेचि सांख्ययोगे प्राप्त । जाण निश्चित साधका ।।२४.५९६।।**

**भावार्थः** उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय यामध्ये अखंडत्वाने नित्य आणि सत्य असणारे ब्रह्म सांख्ययोगाने प्राप्त होते हे निश्चितपणे, हे साधका जाणून घे.(२४)

**३०)भय नाही जन्म धरिता । भय नाही देही वर्तता ।**
**भय नाही देह त्यागिता । हे ब्रह्म परिपूर्णता हरी दावी ।।३०.४१२।।**

**भावार्थः** जन्म घेताना, देह घेऊन वर्तन करताना व देहत्यागाचे वेळीही ज्याला भय नाही असा महात्मा म्हणजे परीपूर्ण ब्रह्मच आहे असे श्रीकृष्णानी आपल्या कृतीनेच सर्वांना दाखविले आहे.(३०)

**३१)एकादशाची नवलस्थिती । मुळापासोनि परम प्राप्ति ।**
**ज्ञानवैराग्य भक्ती मुक्ती । स्वमुखे श्रीपती संवादला ।।३१.३८९।।**

**भावार्थः** अकराव्या दशकाची ही एक अवस्थात्मक नवलच करावे अशी स्थिती असून मूळापासूनच यात ज्ञान, वैराग्यात्मक भक्ती, मुक्ती कशा प्राप्त होतात हा सुख संवादच श्रीकृष्णांनी केला आहे.(३१)

**।। इति श्रीभागवते महापुराणे परमहंस संहितायां एकादश स्कंधे - श्रीकृष्णोद्धव संवादे एकाकार टीकायां एकत्रिंशति ओव्यात्मकं दासराम संग्रहितं संक्षिप्तपाठ प्रसादस्तोत्रं संपूर्णम् ।। (भावार्थासहित)**

**(श्रीदासराममहाराजांनी वर नमूद केलेला भावार्थ मंगळवार वैशाख वद्य ११, अपरा एकादशी शके १९०१ दिनांक २२.०५.१९७९ रोजी लिहिला.)**

**(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१२४)**

✻✻✻✻✻

जो का जगाचा जनकु । मुख्य गुरूत्वे तोचि एकु । त्यासी न भजे जो अविवेकु । तो नाडला लोकु सर्वस्वे ।।४४।। अंतरशुद्धीचे कारण । मुख्यत्वे हरिकीर्तन । नामापरते साधन । सर्वथा आन असेना ।।३५३।। तरावया दीन जन । कलीमाजी श्रीनारायण । नामे छेदी भवबंधन । तारी हरिकीर्तन सकलासी ।।४४८।। जो उतरावया धराभार । धर्म वाढवावया निर्विकार । संत रक्षणी शाङ्‍र्गधर । पूर्णावतार श्रीकृष्ण ।।५३६/५।।

स्वकुळ ग्रासोनि श्रीपती । निघेल निजधामाप्रती । हे जाणोनि उद्धव चित्ती। बहुतारिती कळवळला ।।३२१/६।।

एवं वाचवावयासी उद्धवासी । श्रीकृष्ण ब्रह्मज्ञान उपदेशी । शाप न बाधे ब्रह्मवेत्यांसी । हे हृषिकेशी जाणतु ।।९।। माझे स्वरूप जे सर्वगत । तेथ ठेवोनिया चित्त । सावधाने सुनिश्चित । रहावे सतत निजरूपी ।।३४।। तेथ समसाम्ये समस्त । समत्व पावेल चित्त । तेणे समभावे निश्चित । तेथीचा तेथ रहावे ।।३८/७।।

यालागी वैराग्यापरते । आन साधन नाही येथे । कृष्ण थापटी उद्धवाते । आल्हाद चित्ते प्रबोधी ।।३२६/८।।

भवमूळ कल्पना जाण । ते कल्पना मनाआधीन । ते मन स्वरूपी जाहलिया लीन । तेव्हा वस्तु चिद्‌घनसर्वत्र ।।६।। चोवीस गुरुंचाही गुरू । विवेक वैराग्य विचारू । हा नरदेही लाधे सधरू । यालागी मुख्य गुरू नरदेहो।।३४९।। गृहाश्रमु न सांडिता । कर्मरेखा नोलांडिता । निज व्यापारी वर्तता । बोधु सर्वथा न मैळे ।।४३५/९।।

एवं आदि-मध्य-अंती । मी अविनाशु धरिता चित्ती । ती कर्मेचि निष्कर्मे होती । जाण निश्चिती उद्धवा ।।७३।। छेदावया संसारबंधन । करावे सद्गुरूसेवन । सद्गुरूसेवा ते माझे भजन । गुरू आम्हा भिन्नभावो नाही ।।९४३।। टाकोनिया संसर आस्था । जो लागला भक्तिपंथा । तोचि अधिकारी भागवता । परमार्था ग्राहकु ।।७५८/१०।।

तै एक होती प्राणापान । हाचि पवनजयो पूर्ण । योग साधन सहजेचि ।।३५९/१३।।

अगा ॐ हे स्मरो स्मरे । स्मरता स्वरेसी प्राणू प्रणवी भरे । मग प्रणवूचि तेव्हा स्फुरे । अखंडकारे उल्हासतु ।।४४३।। जेथुन अक्षरे उपजती । शब्द वदोनि जेथ सामावती । मग जे उरे जाण स्फूर्ती । प्रणवू निश्चिती त्या नाव ।।४४४।। तेथ शिवशक्ती संयोग । निज ऐक्ये झाला चांग । परमानंदे कोंदले अंग । सुखाचा सुखभोग सुखरूप झाला ।।४५३।। जेवी ज्योतीसी मीनल्या ज्योती। दोहींची होय एकचि दीप्ती । तेवी जीव चैतन्याची स्फूर्ती अद्वैत सुखप्राप्ती समरसे ।।५१५।। सकळ योगांचे योगगव्हर। वेदांत निज भांडार । सकळ सिद्धींचे परमसार । भक्ति साचार हरीची ।।५४१/१४।।

सेविता सद्गुरू चरण । कोंदाटे ब्रह्मपरिपूर्ण । तेथ सिद्धिसी पुसे कोण । हे जाणती खूण हरिभक्त ।।१३८।। भुक्ति मुक्ती रिद्धिसिद्धी । सद्गुरू चरणी गा त्रिशुद्धी । हे नेणती जे मंदबुद्धी । ते नाना सिद्धी वांछिती ।।३४०/१५।।

माझे प्राप्तीचे मुख्य वर्म । मी हृदयी असे परब्रह्म । हेचि ज्याचे नित्यकर्म । तो विभूति परम पै माझी ।।१५५/१६।।

''सत्त्वप्राधान्ये'' ब्राह्मण। ''सत्वरजे'' क्षत्रिय जाण । ''रजतमे'' वैश्य वर्ण । शूद्र ते जाण ''तमोनिष्ठ''।।८२।। ''गृहस्थाश्रमाचे'' वर्तन । तीन्ही आश्रमा आश्रयो आपण। अन्नवस्त्र देऊनि जाण । संरक्षण करावे ।।१९३।। अन्न वस्त्र दान मान । पोटीच्या कळवळ्याने जाण । करावे भूती प्रियाचरण । हा स्वधर्म जाण सर्वांचा ।।२५९।। सांडूनिया अभिमान । सर्व जीवासी सर्वदा लीन । या नाव ''महद्धर्म'' जाण । शुद्ध लक्षण हे धर्माचे ।।४३९।। ऐसे जे स्वधर्माचरण । ते कर्त्यासी अतिभूषण । ये धर्मी न रिघे दूषण । ''अतिशुद्धाचरण'' या नाव।।४३०।। यालागी मनुष्यदेही जाण । करोनिया भगवद्भजन । चुकवावे जन्ममरण । आपणा आपण उद्धरावे ।।५३१/१७।।

करिता स्वधर्मानुष्ठान । रजतमे नाशती जाण । शुद्ध सत्व अंतःकरण । तेथ

घोषरूपे अतिसूक्ष्म नादू । तो मी प्रणवरूपे निजवेदू। प्राणियामात्री असे स्वतःसिद्धु । परी नेणती बोधू सकामत्वे ।।४००।। योगी म्हणती 'अनाहत शब्द' । वेदांती म्हणती 'सूक्ष्मनाद' । आम्ही म्हणो हा 'शुद्धवेद' । असो अनुवाद हा नावाचा ।।४०८।। तो ॐकार होता सप्राण । सहज स्वभावे गा जाण । झाला 'हिरण्यगर्भ' अभिधान । आपणिया आपण वेदाज्ञा ।।४१५।। 'मी ब्रह्म' हे शुद्धी स्फुरे स्फूर्ती । तेथचि ॐकाराची उत्पत्ती। तोही ब्रह्मरूप निश्चिती । त्यासी ब्रह्म म्हणती एकाक्षर ।।५०९।। कोटी कोटी साधने करिता। गुरूकृपेवीण सर्वथा । हे नये कोणाचे हाता । जाण तत्त्वतः उद्धवा ।।५३८/२१।।

ॐ नमो सद्गुरु खांबसूत्री । चौऱ्याऐंशी लक्ष पुतळ्या यंत्री । नाचविशी निजतंत्री । प्राचीन दोरी स्वभावे ।।१।। जे स्वस्वरूपाचे विस्मरण । तो वाढवी विषय ध्यान । तेणे जीवासी जन्ममरण। अनिवार जाण देहाभिमाने ।।४००।। स्नेहे द्वेषे भये । अंतकाळी जे ध्यान राहे। पुरूष तद्रुपची होये । जन्मही लाहे तैसेचि ।।४४०।। वेचिता धन लक्ष कोटी । आयुष्याची नव्हे भेटी । तेही वेचिले विषयापाठी । हतायु करंटी अतिमूढे ।।५००।। न करिता श्रवण मनन । न साधिता विवेक ज्ञान । न धरिता वैराग्यपूर्ण । भव भय जाण तुटेना ।।६४३।। झालिया गुरूकृपा सुगम । सर्वत्र ठसावे परब्रह्म । तेथ जन्ममरण कैचे कर्म । भव भ्रम असेना ।।६५८/२२।।

वये धने जे श्रेष्ठपण । ते श्रेष्ठत्व अति गौण । भगवत्प्राप्ती ते श्रेष्ठपण । तेणे भाग्ये परिपूर्ण उद्धवू ।।३८।। यालागी जो मोक्षार्थी । तेणे अर्थ न धरावा हाती। काया वाचा चित्त वृत्ती । अर्थ निश्चिती त्यागावा ।।३५०।। साधनी माझी भक्ती । त्यात विशेष नाम कीर्ती । नामे चित्तशुद्धी चित्ती । स्वस्वरूपस्थिती साधका ।।६४७।। नामापरते साधन । सर्वथा नाही आन । नामे भवबंधच्छेदन । सत्य जाण उद्धवा ।।६४८/२३।।

ब्रह्मांडी ईश्वर स्वभावो । पिंडी त्यासीच जीवभावो । ऐसा प्रकृती पुरूष निर्वाहो । मायेने पहा हो द्विधा केला ।।८९।। ऐसे ब्रह्मांड जे विद्यमान ।

'मद्‌भक्त' । तेचि संत सज्जन ।।२५५।। हे ज्ञानाचे सोलीव ज्ञान । हे वेदांचे विसावते स्थान । हेचि अविद्येची बोळवण । समाधान जीवशिवा ।।४७१।। मोक्षाहीवरील गुरूभक्ती । उद्धवे मागितली नाना युक्ती । जे जे चालली उपपत्ती । तेणे सुखे श्रीपती सुखावला ।।७५३।। उद्धवे थोर केली ख्याती । मुक्तीचे माथा वाइली भक्ती । अगम्य मागितली स्थिती । तेही श्रीपती अर्पित ।।७५८।। मुक्तीवरील मागता भक्ती । श्रीकृष्णाची अवतार शक्ती । माया नियंतृत्वाची पूर्णस्थिती । उद्धवाचे हाती स्वये आली ।।७६९/२९।।

भय नाही जन्म धरिता । भय नाही देही वर्तता । भय नाही देह त्यागिता । 'हे ब्रह्म परिपूर्णता' हरि दावी ।।४१२/३०।।

जे वेदांचे जन्मस्थान । सकळ शास्त्रांचे समाधान । षड्‌दर्शना बुझावण । तो आठवा श्रीकृष्ण पूर्णावतार ।।३६७।। एकादशाची नवलस्थिती । मूळापासोनी परमप्राप्ती । ज्ञान-वैराग्य-भक्ती-मुक्ती । स्वमुखे श्रीपती संवादला ।।३८९/३१।।

*****

## महात्म्य : फलश्रुति

श्रवणे पठणे मनने । अर्थावबोध व्याख्याने । एकादशे समान देणे । जाणे ताने त्या नाही ।।४७६।। श्रीकृष्ण वेदांचे जन्मस्थान । त्याचे मुखीचे हे निरूपण। तेथे सकळ वेदार्थ जाण । माहेरा आपण स्वये येती ।।४८८।। मंथोनी वेदशास्त्रार्थ । व्यासे केले महाभारत । त्या भारताचा मतितार्थ । श्रीभागवत हरिलीला ।।४९०।। त्या भागवताचा सारांश । तो हा जाण एकादश । तेथ वक्ता स्वये हृषिकेष । परब्रह्म रसप्रबोधी ।।४९१।। भाळे भोळे विषयी जन । याचे करिता श्रवण पठण । ते हरिभक्त होती जाण । सन्मार्गी पूर्ण बहुत होती।।५३७।। ये ग्रंथी ज्या अत्यंत भक्ती । निंदा द्वेष न रिघे त्याचे चित्ती । श्रीरामनामी अति प्रीती । सुनिश्चिती वाढेल ।।५४२।। ऐसे देवोनी वरदान । हृदयी आलिंगी जनार्दन । म्हणे ये ग्रंथी जया भजन । त्याचे भवबंधन मी

क्षेमाचे वर्म । भागवत धर्म प्रतिपादी ।।२८४/२।। ऐक राया सावधान । नामापरते सुगम साधन । सर्वथा नाही नाही आन । निश्चय जाण नेमस्त ।।५५३/२।। पूर्ण प्राप्तीचा मुख्य ठावो । सर्वाभूती भगवद्भावो । हाचि पूर्ण भक्तीचा निजगौरवो । तोचि अभिप्रावो 'हरि'संगे ।।६४०/२।।

राजा परमार्थे साकांक्षा । देखोनि सार्थक कथेचे लक्ष । हरी धाकुटा 'अंतरिक्ष'। निरूपणी दक्ष बोलता झाला ।।३१/३।। राया कल्पना वाढे जे ठायी । तेचि मायेचे दृढमूळ पाही । जो निर्विकल्प निजदेही । त्यासी माया नाही तिही लोकी ।।२१६/३।। मुख्य मायेचे तरण । ''प्रबुद्धचि'' जाणे पूर्ण । अबुद्ध जाहलिया आपण । मायेचे विंदान न तरता तरती ।।२२९/३।। ''ब्रह्म-परमात्मा नारायण'' । वस्तूसीच म्हणणे जाण । ते वस्तुनिष्ठा परिपूर्ण । राजा आपण पुसतु ।।६२५/३।। ऐकोनि रायाचा श्रेष्ठ प्रश्न । प्रबुद्ध धाकुटा ''पिप्पलायन'' । तो बोलावया आपण । स्वानंदेपूर्ण सरसावला ।।६३९/३।। जागृति स्वप्न आणि सुषुप्ति । तीन्ही व्यापूनी समाधीही परती । ज्याची साक्षित्वे स्फुरे स्फूर्ति । तो जाण निश्चिती नारायण ।।६३४/३।। रायाचे प्रश्न अति पवित्र । त्यांचे द्यावया प्रतिउत्तर । हरिखावला ''आविहोत्र'' । तो कर्मवैचित्र्य निरूपी ।।७५९/३।। एवं ईश्वरी अर्पे जे कर्ण । ते कर्मची होय निधर्म । याचि नाव परम । नैष्कर्म्य निजसिद्धी ।।७९०/३।। राया येणेचि कर्मे जाण । तुटे कर्माचे कर्मबंधन । पाविजे पूर्ण समाधान । ते हे मुख्य समाधान नृपनाथा ।।८६३/३।।

तो 'अजन्मा' परी जन्म धरी । ''अकर्मा परी कर्मे करी''। ''विदेही'' तो देहधारी । होऊनि संसारी स्वधर्म पाळी ।।३२/४।। हरिचरित्र अवतारगुण । प्रतिपादन करावयाचा प्रश्न । तो सांगावया जयंती नंदन । स्वानंदेपूर्ण 'द्रुमिल' सांगे ।।३५/४।। जो अवताराचे मूळपीठ । जो वीरवृत्ति अतिउद्भट । तो अवतारामाजी श्रेष्ठ । अतिवरिष्ठ श्रीराम ।।२२५/४।।

जो परेहून परात्परू । जो का अजन्मा अक्षरू । जो श्रुतिशास्त्रा अगोचरू । तो पूर्णावतारू श्रीकृष्ण ।।२५६।। राजा साक्षेपे बहुवस । पुसे अभक्त

## प्रकरण क्र.६

# पंचश्लोकी पंचाध्यायी

**नमनः**

ॐ नमोजी जनार्दना । नाही भव अभव भावना ।
न देखोनि मी तूपणा । नमन श्रीचरणा सद्‌गुरुराया ।।१।।

**पंचश्लोक :**

पाहोनि दशमाचा प्रांतु । एकादशाच्या उदयाआंतु । एकादशावरी जगन्नाथु । ग्रंथार्थु आरंभी ।।११४/१।। जागृती स्वप्न आणि सुषुप्ति । तिन्ही व्यापुनी समाधीही परती । ज्याची साक्षित्वे स्फुरे स्फूर्ति । तो जाण निश्चिती नारायण ।।६३४/२।। तो ''अजन्मा''परी जन्म धरी । ''अकर्मा''परी कर्मे करी । 'विदेही' तो देहधारी । होऊनि संसारी स्वधर्म पाळी ।।३२/३।। जो जगाचा जनकु । मुख्य गुरूत्वे तोचि एकु । त्यासी न भजे जो अविवेकु । तो नाडला लोकु सर्वस्वे ।।४४/४।। तरावया दीन जन । कलीमाजी श्रीनारायण । नामे छेदी अवबंधन । तारी हरिकीर्तन सकळासी ।।४४६/६।।

**फलश्रुती :**

हे पंचाध्यायी नव्हे जाण । एकादशाचे पंचप्राण । उपदेशावया शुद्धज्ञान । सामोरे आपण स्वभक्ता आले ।।५५४।। पव्हणियाहूनि पायउतारा । भागवत धर्म अतिसोपारा । तो मार्गु दावावया पुरा । हांकारी स्त्रशूद्रा पंचाध्यायी ।।५६५।।

।। इति श्रीभागवते महापुराणे परमहंस संहितायां एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धव संवादे एकाकार टीकायां पंचओव्यात्मकं ''दासराम'' संपादितम् संक्षिप्त पंचाध्यायी नित्यपाठ स्तोत्रं संपूर्ण ।।

।। श्रीष्कृणार्पणमस्तु।।

# विभाग क्रमांक २
# श्रीदासराममहाराज कृत ओवीरचना
## प्रकरण क्र.१
# अपरोक्ष गुह्यज्ञान

।। श्रीगणेशाय नमः ।।

जय जयाजी सिद्धराया । तुवा देखता निमाली काया । दावोनिया दृष्टीया हे माया । निरसिली ।।१।। कैचे दाविले साधन । जे तोडी द्वैतबंधन । परिपूर्ण समाधान । मौनत्विया ।।२।। मने ग्रासिली पवन । पवने ग्रासिले हे मन । एकमेकाते ग्रासून । शून्य झाले ।।३।। ग्रासोनिया द्विशब्द । कैचा राहिला एक शब्द । वायू जाहला अभेद । नाद कैचा मागुती ।।४।। शब्द नादाते गिळोन । ठेला स्वयमेव पूर्ण । सर्वी व्यापिले गगन । सत्वहंकारे ।।५।। नासियेले हे चंचळ । द्वैत पहाले बीज मूळ । जहाला अखंड सुकाळ । श्रोत्र जाले बीजमूळ ।।६।। श्रोत्र निमाले वक्त्री । नादवाणी आटली चारी । तव ते आपण या नेत्री । पहाणे झाले ।।७।। आपणा आपण पाहता । शब्द पूर्णत्वे आटला तत्त्वता । जाहला गगना परौता । स्वयंचक्षु होऊनी ।।८।। हे तो धन्य अशब्द स्थिती । जेथे शब्देची जाली विकृती । पंचभूतांची प्रकृती । शून्यरूप ।।९।। पहाणे पहाले आदिअंती । तेथे ठायी नोहेचि निगुती । कैसी चेष्टवी हे प्रकृती । स्वयंदृष्टा ।।१०।। अशब्दाचिया नाशे । महाशब्द सर्वी प्रकाशे । लक्ष्या अलक्ष्या भकाशे। दाखवी जे ।।११।। स्वयंनादे करी गजरू । नाही द्वैतपण साचारू । निजत्वाचिया विवरू । प्रगटची आत्मा ।।१२।। निःशब्दा तू ब्रह्मनीज । दावी चिद्गुणे विश्व सहज । कर्माकर्माचे लाविले बीज । आपणचि पाठी ।।१३।। पाणी दुभागिले तरी पाणी । तेवी परब्रह्म गगनी । चंचळत्वी अलक्ष्य खाणी । नयना तू ।।१४।। श्रवणातुनी नयनी आला। नयनी निजाते मिळाला । पहाता आपणु आपणाला । आपणचि ते ।।१५।। निजा भेटले ते निज । हेचि दर्शनाचे गुज । हरिनामी या सहज । घडो

होता सहज साक्षात्कार । जरी देह हे चत्वार । निरसी जे ।।१०।। चित्त चैतन्यी चोरले । तेथे आत्म्याचे सोहळे । तव भिकेचे डोहाळे । कैचे होती ।।११।। म्हणोनि ते वृत्तीच सरली । अलक्षतेचि कवटाळी । तादात्म्य होऊनी बाहुली । नेत्रीचिये ।।१२।। जरी का हा परिपाक । तेथे काय होय दुःख । द्वैत दाविजे सम्यक । अद्वयस्थिती ।।१३।। डोळा मिळालिया कान । सहजेचि समाधान । सहस्रदली धावे प्राण। उपाधीजीवन आकर्षे ।।१४।। जीवनाचे बाष्पीभवन । होता आकाशी गमन । भ्रुमध्य पवित्र स्थान । आकर्षण तेथेचि ।।१५।। करी जीवाशिवाची ऐक्यता । साधनी होताची एकता । असंगासंग केऊता। घडेल या ।।१६।। असंगाचा संग दृष्टी । घडता प्राणासवे गाठी । दृश्य द्रष्टा द्वैत गोठी । सरता भेटी शून्यातू ।।१७।। तेथे काही मेळविले। किंवा काही उणे केले । तरी ते जैसे तैसे राहिले । निश्चळत्वे याच रूपे।।१८।। चंचळपण चंचळी सरले । तरी ते निश्चळची उरले । नारायणी शांत केले । आधिव्याधी सरताचि ।।१९।। आधिव्याधी सरता साक्षी । निजी निज स्वये लक्षी । वाच्यांश लक्ष्यांश अलक्षी । एकसरा ।।२०।। जीवना जीवन मिळाले । तरी ते केवी होय निराळे। जरी ते परमार्थी आथिले । नारायण गुरूकृपे ।।२१।। अष्टदेभाव जेथ होती । ते ठायीच पूर्ण निश्चिती । जेथ का स्वसंवेद्य स्थिती । आकळीली ।।२२।। न कळता जाले सुख । हेची नवल विशेष । आत्म्यास मनी हरिख । होवोनी ठेला ।।२३।। अहंभाव जो शरीरी । सद्गुरू तो अंगीकारी । हस्त ठेवोनिया शिरी । कृपादृष्टी ।।२४।। ऐसे नवल महिमान । कृपे भरिले अंतःकरण । भगवान नारायण । दासरामी।।२५।।

**श्रीदासराम लेखन वही क्र.५३**
**लेखन दिनांक २६.०४.१९५४**

*****

अर्धोभावित लोचन । करूनिया स्थिर मन । गिरीच्या अग्री लक्षुन । स्वस्वरूप देखिजे ।।१३।। तेथे उडती रजबिंदु । नीलतारा अर्धचंद्रु । अग्निसूर्य पूर्ण इंदु । ज्योतिरूप निरूपाधी ।।१४।। ऐसे जे चर्यारहित । दिसे सदा दैदिप्त । वाद्य वाजे अनुहत । ते स्वरूप साधुनि घेईजे ।।१५।। नाही नाही परमार्थ । त्यावाचुनि दुजा स्वार्थ । स्वार्थ आणि परमार्थ । येणेचि घडताती ।।१६।। ऐसे सांगितले शुकदेवे । योगतारावलीत बरवे । की सकल शास्त्राचे मर्म हे । निःसंशय जाणावे ।।१७।। हे वर्म ठायी न पाडिता । सकल शास्त्रे झाला पढता । आणि यागादि कर्मे करिता । तरी ते निष्फळ ।।१८।। त्यामध्ये करावा बहु शीण । परी उपयोगा न ये काही जाण । मूढपणे कर्मे बांधुन । आपेआप घेतले ।।१९।। गर्दभावरी चंदने । लाधली उंच सुवासने । त्याचा गंध तो काय जाणे । भार मात्र वाही खरा ।।२०।।

**चतुर्वेदधरो विप्रः सुक्ष्मं ब्रह्म न विंदति ।**
**वेदभाभराक्रांतः स वै ब्राह्मणगर्दभः ।।३।।(उ.गी.२/४७)**

तैसे विप्र म्हणविती थोर । वेदे घोषे करूनि अनिवार । परी ते भले मोठे खर। भार वाही निरर्थक ।।२१।। वेदपठण पुष्कळ केले । सूक्ष्म ब्रह्म नाही ओळखिले। तरी त्याचे काय फळ झाले । म्हणुनि ते भारवाही ।।२२।। ऐसे काही न करावे। सार शोधुनि घ्यावे । याकारणे अनन्य व्हावे । शरण जावे सद्गुरूसी।।२३।। सद्गुरू जो राजयोगीश्वर । त्याचा होई जे किंकर । काया वाचा मनसा तत्पर । आज्ञा ते पाळावी ।।२४।। गुरूराज अधिकार पाहुनि मंत्रोपदेश सांगे कानी । स्वरूप प्रगटे तेचि क्षणी । या विषयी निर्धार ।।२५।। गुरूवाचुनि नव्हे गती । ऐसे वदताती वेदश्रुती । गुरुभजने मोक्षप्राप्ती । तत्काळ हे निश्चित ।।२६।। क्षुल्लक योगाचा हव्यास । न करिता सावकाश । गुरूवचनाचा अभ्यास । अनन्यभावे करावा ।।२७।। गुरूपुत्र झालिया निश्चये मुक्ती । पुढे वाढलिया भक्ती । निजसुखाची प्राप्ती । त्यालागी होय ।।२८।। नरदेहाचा महिमा थोर । करणी करे तोचि नर । साक्षात होईजे ब्रह्मपर ।

## विभाग क्रमांक - ३

# श्रीदासराममहाराज संपादित, श्रुत व कृत  वाङ्मय

### प्रकरण (अ) क्र.१

## श्रीदासराममहाराज संपादित श्रीपांडवगीता सार स्तोत्र

**पांडव उवाच :-**

प्रल्हाद नारद पराशर  पुडरीक । व्यासांबरीष शुक शौनक भीष्मदालभ्यां ।।
ऋक्मांगदार्जुन वसिष्ठ बिभीषणदीन् । पुण्यानि मां परम् भागवतान् स्मरामि ।।१।।

**लोमहर्षण उवाच :-**

धर्मो विवर्धति युधिष्ठिर कीर्तनेन । पापं प्रणश्यति वृकोदर कीर्तनेन ।।
शत्रुर्विनश्यति धनंजय कीर्तनेन । माद्रीसुतो कथयतां न भवन्ति रोगाः ।।२।।

**अभिमन्युरुवाच :-**

गोविंद गोविंद हरे मुरारी । गोविंद गोविंद रथाङ्गपाणे ।।
गोविंद गोविंद मुकुंद कृष्ण । गोविंद गोविंद नमो नमस्ते ।।३।।

**गांधार्युवाच :-**

त्वमेव माताच पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ।।४।।

**श्रीकृष्ण उवाच :-**

कृष्ण कृष्णेति कृष्णेति । यो मां स्मरति नित्यशः ।।
जलं भित्वा यथा पद्मम् । नरकादुद्धराम्यहम् ।।५।।

**भरद्वाज उवाच :-**

लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः ।
येषामिंदिवर श्यामो हृदयस्थो जनार्दनः ।।६।।

**सूत उवाच :-**

तत्रैव गंगा यमुनाच वेणी । गोदावरी सिंधु सरस्वतीच ।
सर्वाणि तीर्थानि वसन्ति तत्र । यत्राच्युतोदार कथा प्रसंगः ।।७।।

**लोमहर्षण उवाच :-**

नमामि नारायण पादपंकजम् । करोमि नारायण पूजनं सदा ।
वदामि नारायण नाम निर्मलम् । स्मरामि नारायण तत्त्वं व्ययम् ।।१७।।

**धन्वंतरी उवाच :-**

अच्युतानंत गोविंदं नामोच्चारण भेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगः सत्यं सत्यं वदाम्यहम् ।।१८।।

**श्रीमहादेव उवाच :-**

शरीरं च नवच्छिद्रं व्याधिग्रस्तं कलेवरम् ।
औषधं जान्हवी तोयं वैद्यो नारायणो हरिः।।१९।।

**शौनक उवाच :-**

भोजनाच्छादने चिन्ता वृथा कुर्वन्ति वैष्णवाः ।
यो सौ विश्वभरो देवः सभक्तान् किमुपेक्षते ।।२०।।

**वैशंपायन उवाच :-**

यत्र योगेश्वरःकृष्ण यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीविजयो भूति ध्रुवानि नितिर्मतिमम ।।२१।।

**सनत्कुमार उवाच :-**

इदं पवित्रं आयुष्यं । पुण्यं पापं प्रणाशनं ।।
यःपठेत्प्रातरुत्थाय वैष्णवं स्तोत्रमुत्तमम् ।।२२।।
सर्व पाप विनिर्मुक्तो विष्णुसायुज्यमाप्नुयात् ।
धर्मार्थ काम मोक्षार्थं पाण्डवैः परिकीर्तितम् ।।२३।।
आकाशात् पतितं तोयं । यथा गच्छति सागरम् ।
सर्व देव नमस्कारः । केशवं प्रतिगच्छति ।।२४।।

।। इति श्रीपांडवगीता सार स्तोत्रं संपूर्णम् ।।

श्रीदासराम लेखन वही क्रमांक १०७

*****

आनंदमानंदकरं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोध युक्तं ।
योगिंद्रर्मीड्यं भयरोगवैद्यं श्रीमत् गुरुंनित्यमहं नमामि ।।१२।।
इदमेव शिवं इदमेव शिवं । इदमेव शिवं इदमेव शिवम् ।
मम शासनतो मम शासनतो । मम शासनतो मम शासनतः।।
शिवशासनतः शिवशासनतः ।
शिवशासनतः शिवशासनतः ।।१४।।

।। इति श्रीगुरूगीतासार स्तोत्रं संपूर्णम् ।।

श्रीदासराम लेखन वही क्रमांक १०७

*****

## प्रकरण (अ) क्र.३

# श्रीदासराममहाराज संपादित
# सप्तश्लोकी गीता, समश्लोक व अर्थ

१) **ॐ इत्याक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम् ।।१।।**
**(भ.गीता अ.८ श्लोक १३)**

**समश्लोक :** प्राणवैकाक्षर ब्रह्म व्यवहारी जो स्मरे सदा ।
टाकिता देह तो जीव पावे श्रेष्ठ गती तया ।।१।।

**अर्थ :** ॐ्या एकाक्षरी ब्रह्माचा उच्चार करीत असता, माझे स्मरणात जो देहत्याग करतो, तो श्रेष्ठ गती संपादन करतो. (१)

२) **अर्जुन उवाच :**
**स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत् प्रहृष्यत्यनुरज्यते च ।**
**रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्ध-संघाः।।२।।**
**(भ.गीता अ.११ श्लोक ३६)**

**समश्लोक :** तुझ्या कीर्तनी तू हृषीकेश देवा । तुझ्यामुळे हर्ष नी शोक जीवा ।

म्हणतात. वेद ज्याची पाने आहेत, असा जो प्रपंचवृक्ष, याचे अज्ञान हेच मूळ असलेने, तो क्षणभंगूर आहे असे जाणणाराच खरा वेदवत्ता ज्ञानी होय.(५)

**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्त-कृद् वेद-विदेव चाहम् ।।६।।**
**(भ.गीता अ.१५ श्लोक १५)**

**समश्लोक :** सर्वा हृदी मीच व्यापूनि आहे । स्मृति ज्ञान मोहा अधिष्ठान केवी।
माझेनि वेद तया मीच जाणे । हे जाणतो तोचि हे सर्व जाणे ।।६।।

**अर्थ :** सर्व प्राण्यांच्या हृदयामध्ये मी प्रवेश करून राहिलो आहे. स्मृति विस्मृति माझ्यापासून होतात. सर्व वेदांकडून मीच जाणण्यास योग्य आहे. वेदांचा कर्ता मीच आहे. वेदांना मीच जाणतो. (६)

**मन्मना भव मद् भक्तो मद् याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।।७।।**
**(भ.गीता अ.१८ श्लोक ६५)**

**समश्लोक :** तुझे मन करी मीचि । मद्भक्त होऊनी सदा ।
सर्वत्र नमि तू माते । होईजे मत्परायण ।।७।।

**अर्थ :** माझ्या ठिकाणी मन ठेवणारा असा माझा भक्त हो. माझे यजन करणारा हो. मला नमस्कार कर, म्हणजे माझ्याप्रतच येशील. तू मला प्रिय आहेस म्हणून तुला हे प्रतिज्ञेने सांगतो. (७)

।। इति श्रीसप्तश्लोकी गीता समाप्त ।।

श्रीदासराम लेखन वही क्रमांक १०७ व २७१

*****

## प्रकरण (अ) क्र.४

# श्रीमद् अध्यात्मरामायण बालकांड उमामहेश्वर संवाद

## श्रीरामहृदय प्रथमसर्गातील ९ श्लोक

## (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)

१) **ततो रामः स्वयं प्राह हनूमन्तमुपस्थितम् ।**
**श्रुणु तत्वं प्रवक्ष्यामि ह्यात्मानात्मपरात्मनाम् ।।१।।**

**अर्थ :** महादेव म्हणतात-राम स्वतःजवळ असलेल्या मारुतीला म्हणाले, ईश्वर, जीव आणि चैतन्य याविषयीचे तत्त्व सांगतो, ते ऐक (१)

**२) आकाशस्य यथा भेदस्त्रिविधो दृश्यते महान् ।**
**जलाशये महाकाशस्तदवच्छिन्न एव हि ।**
**प्रतिबिम्बाख्यमपरं दृश्यते त्रिविधं नभः ।।२।।**

**अर्थ :** आकाशाचे तीन प्रकार दिसतात. मोठे आकाश, पाण्याने भरलेले व पाण्यात प्रतिबिंदरूपी आकाश. याप्रमाणे तीन प्रकारचे आकाश दिसते.(२)

**३) बुद्ध्यवच्छिन्नचैतन्यमेकं पूर्णमथापरम् ।**
**अभासस्त्वपरं बिम्बभूतमेवं त्रिधा चितिः ।।३।।**

**अर्थ :** बुद्धिला दिसणारे तेजरूपी व प्रतिबिंबरूपी असे त्रिविध चैतन्य आहे. (३)

**४) साभासबुद्धेः कर्तुत्वमविच्छिन्नेऽविकारिणि ।**
**साक्षिण्यारोप्यते भ्रान्त्या जीवत्वं च तथाऽबुधैः ।।४।।**

**अर्थ :** तेजरूपी चैतन्याच्या क्रियेचा आरोप, अज्ञानी लोक अमर्यादित विकाररहित केवळ साक्षिभूत अशा शुद्ध चैतन्यावर करतात आणि त्यावरच जीवित्वाचाही आरोप करतात. (४)

**५) आभासस्तु मृषाबुद्धिरविद्याकार्यमुच्यते ।**
**अविच्छिन्नं तु तद्ब्रह्म विच्छेदस्तु विकल्पतः ।।५।।**

**अर्थ :** प्रतिबिंब हे खोटे ज्ञान आहे. माया उत्पन्न करणारे आहे. मर्यादारहित जे आहे तेच ब्रह्म होय. यामध्ये भेद अज्ञानामुळे वाढतो. (५)

**६) अविच्छिन्नस्य पूर्णेन ह्येकत्वं प्रतिपाद्यते ।**
**तत्त्वमस्यादिवाक्यैश्च साभासस्याहमस्तथा ।।६।।**

**अर्थ :** तत्त्वमस्यादि महावाक्यांनी प्रतिबिंबाची शुद्ध चैतन्याशी एकरूपता होते. (६)

**७) ऐक्यज्ञानं यदोत्पन्नं महावाक्येन चात्मनोः ।**
**तदाऽविद्या स्वकार्येश्च नश्यतेव न संशयः ।।७।।**

**अर्थ :** जीव आणि ईश्वर यांच्या एकरूपतेचे ज्ञान जेव्हा महावाक्यांनी उत्पन्न होते, तेव्हा माया निःसंशय आपोआप नाहिशी होते. (७)

**८) एतद्विज्ञाय मद्भक्तो मद्भावायोपपद्यते ।**
**मद्भक्तिविमुखानां हि शास्त्रगर्तेषु मुह्यताम् ।**
**न हि ज्ञानं न च मोक्षः स्यात्तेषां जन्मशतैरपि ।।८।।**

**अर्थ :** माझा भक्त हे ओळखून तद्रुप होतो. माझी भक्ती न करणाऱ्यांनी शास्त्रज्ञान मिळविण्यात जरी शेकडो जन्म घालविले तरी त्यांना ज्ञानही होणार नाही व मुक्तीही मिळणार नाही. (८)

**९) इदं रहस्यं हृदयं ममात्मनो मय्यैव साक्षात्कथितं तवानघ ।**
**मद्भक्तिहीनाय शठाय न त्वयादातव्यमैन्द्रादपि राज्यतोऽधिकम्।।९।।**

**अर्थ :** तू निष्पाप आहेस, म्हणून माझ्या चैतन्यस्वरूपाविषयी अत्यंत गुह्य मीच तुला स्वतः सांगितले. जो माझा भक्त नाही, दुष्ट आहे, अशा माणसाला तू हे सांगू नको. याची योग्यता इंद्रापेक्षा अधिक आहे.

**श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१०७**

*******

मतिमंद । लोधला कामी ।।१६।। (५.३.५७) हाती द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ । सत्संगाचा दुष्काळ । या नाव बद्ध ।।१७।।(५.७.३९) मायाजाळे दुश्चित होये । ते निरुपणी कामा न ये । संसारिका कळे काये । अर्थ येथीचा ।।१८।। (७.१.४९) लोक मरमरो जाती । वडिले गेली हे प्रचिती । जाणत जाणत निश्चिती । काय मानिले ।।१९।। (११.३.६) अग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला । तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ।।२०।। (११.३.७) आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका । येथे आळस करू नका । विवेकी हो ।।२१।। (१२.१.१) प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायला । मग तया करंट्याला । परमार्थ कैचा ।।२२।। (१२.१.३) प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।।२३।। (१२.१.९) घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहून जाड । तेथे कैचे आणिले द्वाड । करंटपण ।।२४।। (१२.९.२९) बोलण्यासारिखे चालणे । स्वये करून बोलणे । तयाचि वचने प्रमाणे । मानिती जनी ।।२५।। (१२.१०.३९) लक्ष्मीमध्ये करंटा नांदे । त्याचे दरिद्र आधिक सारे । नवल केले परमानंदे । परम पुरूषे ।।२६।। (१७.५.२२) नरदेह परमदुल्लभ । येणे घडे अलभ्य लाभ । दुल्लभ ते सुल्लभ । होत आहे ।।२७।। (२०.५.२५) वरकड देहे हे काबाड । नरदेह मोठे घबाड । परंतु पाहिजे जाड । विवेक रचना ।।२८।। (२०.५.२६) परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी । या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ।।२९।। (१.९.२३) भल्याने परमार्थी भरावे । शरीर सार्थक करावे । पूर्वजास उद्धरावे । हरिभक्ती करूनी ।।३०।। (१.९.२७) ईश्वरी प्रेमा अधिक । प्रपंच संपादणे लोकिक । सदा सन्निध विवेक । तो सत्वगुण ।।३१।। (२.७.९) जयास वाटे सुखचि असावे । तेणे रघुनाथभजनी लागावे । स्वजन सकळही त्यागावे । दुःखमूळ जे ।।३२।। (३.१०.६३) काहीच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ।।३३।। (४.३.२१) नाम स्मरे निरंतर । ते जाणावे पुण्यशरीर । महादोषांचे गिरीवर । रामनामे नासती

ऐसा ।।५२।। (१४.७.२५) वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा । सगट लोकांचा जिव्हाळा । मोडू नये ।।५३।। (१५.१.३१) रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते । डोळे झाकणी करावी ते । कायेनिमित्त।।५४।। (१५.६.९) सद्‌वस्तु दाखवी सद्गुरू । सकळ सारासारविचारू । परब्रह्माचा निर्धारू । अंतरी बाणे ।।५५।। (४.४.५) विघडले देव आणि भक्त । जीवशिवपणे द्वैत । तया देवभक्ता येकांत । करी तो सद्‌गुरू ।।५६।। (५.२.१०) फोडूनि शब्दाचे अंतर । वस्तु दाखवी निजसार । तोचि गुरू माहेर । अनाथांचे ।।५७।। (५.२.१५) मुख्य सद्गुरूंचे लक्षण । आधी पाहिजे विमळ ज्ञान । निश्चयाचे समाधान । स्वरूपस्थिती ।।५८।। (५.२.४५) म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन । कथा निरूपण श्रवण मनन । निती न्याये मर्यादा ।।५९।। (५.२.५२) यामध्ये येक उणे असे । तेणे ते विलक्षण दिसे । म्हणौन सर्वहि विलसे । सद्गुरूपासी ।।६०।। (५.२.५३) मी कोण ऐसा हेत । धरून पाहता देहातीत । अवलोकिता नेमस्त । स्वरूपचि होये ।।६१।। (५.६.२१) सद्गुरूवचन तोचि वेदान्त । सद्गुरूवचन तोचि सिद्धांत । सद्गुरूवचन तोचि धादांत । सप्रचित आता ।।६२।। (५.६.४०) ऐक शिष्या येथीचे वर्म । स्वये तूचि आहेसी ब्रह्म । ये विषई संदेह भ्रम । धरूचि नको ।।६३।। (५.६.४५) आता हेचि दृढीकरण । व्हावया करी सद्गुरूभजन । सद्गुरूभजने समाधान । नेमस्त आहे ।।६४।। (५.६.५३) जो संतासी शरण गेला । संतजनी आश्वासिला । मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरी ।।६५।। (५.९.३) आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीचि । अहमात्मा हे कधीचि । विसरो नये ।।६६।।(५.१०.३८) जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत । जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ।।६७।। (६.१.१६) चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव । तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ।।६८।। (६.१.१७) जो जनामधे वागे । परी जनावेगळी गोष्टी सांगे । ज्याचे अंतरी ज्ञान जागे । तोचि साधु ।।६९।। (६.१.१८) याचि जन्मी येणेचि काळे । संसारी होईजे निराळे । मोक्ष

निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ।।८८।। (१२.०५.२०) जनास दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित । अखंड जयाचे चित्त । परमेश्वरी ।।८९।। (१४.७.१५) प्रत्यये बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकाला । नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ।।९०।। (१५.२.१९) परी तो कोठे आढळेना । कोणे स्थळी सापडेना । वेष पाहता हीनदीना । सारिखा दिसे ।।९१।। (१५.२.२०) उदंड करी गुप्तरुपे । भिकाऱ्यासारिखा स्वरूपे । तेथे येशकीर्ति प्रतापे । सीमा सांडिली ।।९२।। (१५.२.२१) मननसीळ लोकापासी । अखंड देव अहर्निशी । पाहाता त्यांच्या पूर्वसंचितासी । जोडा नाही ।।९३।। (१७.१.२२) येकांती मौन्य धरून बैसे । सावध पाहता कैसे भासे । सोहं सोहं ऐसे । शब्द होती ।।९४।। (१७.५.७) ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला । योगाभ्यासाचा गलबला । या कारणे ।।९५।। (१७.५.९) सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।९६।। (२०.४.२६) अनुभव होता संगत्याग नसे । संगत्यागे अनुभव न दिसे । हे अनुभवी यासीच भासे । येरा गथागोवी ।।९७।। (४.४.७) ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान । पाहावे आपणासी आपण । या नाव ज्ञान ।।९८।। (५.६.१) आपला आपणासी लाभ । हे ज्ञान परम दुल्लभ । जे आदिअंती स्वयंभ । स्वरूपचि स्वये ।।९९।। (५.६.१५) साधकासि संदेहवृत्ती । पुढे होतसे निवृत्ती । या कारणे निःसंदेह श्रोती । साधु वोळखावा ।।१००।। (५.१०.१२) आधी अध्यात्म श्रवण । मग सद्गुरू पाद सेवन । पुढे आत्मनिवेदन । सद्गुरूप्रसादे ।।१०१।। (६.२.४०) आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी । आपण आत्मा अंतरी । बोध जाला ।।१०२।। (६.२.४१) त्या ब्रह्मबोधे ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला । देहो प्रारब्धी टाकिला । सावकास ।।१०३।। (६.२०४२) यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणे पाविजे समाधान । परब्रह्मी अभिन्न । भक्तचि जाला ।।१०४।। (६.२.४३) आता

## प्रकरण (ब) क्र.१

# ।। श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेली पदे /स्तोत्रे ।।
## (प्रकाशित श्रीगुरुलिंगगीतेत समाविष्ट नसलेली पदे/स्तोत्रे)

### पद क्रमांक १

गुरुलिंग महाराजावुरू । जय जय परब्रह्म सद्गुरू ।।१।।
गुरु महाराजावुरू । जय जय परब्रह्म सद्गुरू ।।ध्रु.।।
नालकू मुक्ती कोडुवाता । चिद्वल्ली सुरतरु ।।२।।
अलक्ष अनाम बुद्धी वरिगे । स्वरूपावरू देवरू ।।३।।
सिद्धानंद गुरूलिंगजंगम । नोडुत अगोचरू ।।४।।

### पद क्रमांक २

सिद्धानंद जय सद्गुरूराज । गुरुलिंगजंगम जय महाराज ।।१।।
निंबरगीश्वर सद्गुरूराज । गुरुलिंगजंगम जय महाराज ।।२।।
श्रीनारायण सद्गुरूराज । गुरुलिंगजंगम जय महाराज ।।३।।
भाऊराय श्रीसद्गुरुराज । गुरुलिंगजंगम जय महाराज ।।४।।
शरणरू प्रेमी सद्गुरूराज । गुरुलिंगजंगम जय महाराज ।।५।।

### पद क्रमांक ३

नमगे वरव कोडुवाता । नमो नम्म सद्गुरूनाथा ।।१।।
शरणरू दासप्रेमी । नमो नमो नम्म स्वामी ।।२।।
निरंजन निर्विकारू । नमो गुरू देव देवरू ।।३।।
शरणागतरू संरक्षकने । नमो नमो नामप्रियने ।।४।।

(वरील तीन पदे शनिवार भाद्रपद शु.१ शके १८७७
दि.१७.९.१९५५ रोजी रात्रौ ११वाजता श्रुत झाली)

## पद क्रमांक ७
## गुरुलिंगस्तवन

गुरुलिंगजंगमन पूजेय माडिद । मंडिसिद प्रल्हाद गुरुसिद्धानंद ।।१।।
मूळलिंग प्राणलिंग भावलिंग नोडिद । आनाभिकमलन हृत्कंठ सहस्रद ।।२।।
ईपदे मंत्रोच्चर महामंत्रमूर्ती । ईड पिंगळ जोड गुडिसिद आत्मध्यान भक्ती ।।३।।
गुरुलिंग गुरवीनू सहस्रार वरिगे । परमार्थ प्रल्हादन गुरुनामवीग्गे ।।४।।

(वरील पद दिनांक २५.१०.१९५५
रोजी सकाळी ९.०० वाजता श्रुत झाले)
वरील पद श्रीदासराम लेखन वही क्र.२४३ पा.नं.३१,३२ मध्ये समाविष्ट आहे.

## पद क्रमांक ८

रेवणसिद्ध मरुळसिद्ध । काडसिद्ध हालसिद्ध । नमो नमो हर नमो नमो ।।१।।
रेवणसिद्ध काडसिद्ध । गुरुलिंगजंगम । नमो नमो हर नमो नमो ।।२।।
मरुळसिद्ध काडसिद्ध । गुरुलिंगजंगम । नमो नमो हर नमो नमो ।।३।।
करवीर काडसिद्ध । गुरुलिंगजंगम । नमो नमो हर नमो नमो ।।४।।
रेवणसिद्धनाथ मरुळसिद्धनाथ । काडसिद्धनाथ हालसिद्धनाथ ।।५।।
श्रीगुरूनाथ सद्गुरूनाथ । जय गुरुनाथ जयजय नाथ ।।६।।
जय जय नाथ नाथ बोला । मग तो देव कोण उरला ।।७।।
श्रीगुरु रेवणसिद्धा । जय गुरू मरूळसिद्धा । जय जय काडसिद्धा हालसिद्धा ।।८।।

(वरील पद मंगळवार त्रिपुरी पौर्णिमा शके १८९७
दि.१८.११.१९७५ रोजी श्रुत झाले)
वरील पद श्रीदासराम लेखन वही क्र.१४८ पा.नं.१६,१८ मध्ये समाविष्ट आहे.

*****

## प्रकरण (ब) क्र.४

## ।। श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेले सिद्ध स्तोत्र ।।

मूळलिंगात्मनोलिंगं प्राणलिंगस्तथैव च ।
सिद्धलिंगं महालिंगं गुरुलिंग नमो नमः ।।१।
सद्गुरू रेवणं मरुळं काडसिद्ध महेश्वरम् ।।
सिद्धेश्वरं सिद्धराजं सिद्धनाथं विशेषतः ।।२।।
एकोराम पंडिताराध्यं महासिद्ध महात्मनाम् ।
हालसिद्ध पठेन्नित्यं सोऽहं हंसानुसंधितम् ।।३।।
इदं स्तोत्रं मनोदिव्यं सिद्धं प्रत्यक्ष तारकम् ।।
गुरोः कृपाप्रसादेन श्रुतं राम प्रकीर्तितम् ।।४।।
।। इति श्रीदासरामश्रुतं श्रीगुरुलिंग सिद्धनाम स्तोत्रं संपूर्णं ।।

वरील पद श्रीदासराम लेखन वही क्र.५० पा.क्र ५ मध्ये समाविष्ट आहे.

*****

## प्रकरण (क) क्र.१

## श्रीदासराममहाराजकृत अष्टक/स्तोत्र

### ।। श्रीदासराममहाराजकृत कोटणीस कुलदेवताष्टक ।।

प्रभो व्यंकटेशा जगन्नायकेशा । कसा सावळा भाससी तू रमेशा ।।
सुरासुरा वंद्य तू हृन्निवासा । देसी वरा आपुल्या दासदासा ।।१।।
महालक्ष्मी तू हेमवर्णी विलासी । करविरवासीनि व्याप्ती आकाशी ।।
कसे गुण तिनी स्वसत्ते प्रकाशी । तुझे ठायी हे विश्व सारे आभासी ।।२।।
महाविष्णुते आणि नामा-रूपासी । स्थिती जन्मनि नेसी विश्वा लयासी ।।
करोनि कृपा शांती देसी मनासी । अहा भुक्ती मुक्ती तुझ्या दासदासी ।।३।।
स्वरुपी चिदानंद ऐश्वर्य तू श्री । प्रसादे वरे दाविसी तू जयश्री ।
महामंगले सत्यचि निर्विकारी । अविष्कार हा साच होतो विकारी ।।४।।

तस्मान्नामानि कौन्तेय भजस्व दृढ मानसः ।
नामयुक्तः प्रियोऽस्माकं कर्ममुक्तःस्तथा ॥६॥
निर्विण्ण चेतसो ये वै । नाम गायन्ति जन्तवः ।
मध्येतेषामहं स्थाता । कोन्यस्तमात्पियोऽर्जुन ॥७॥

**संजय उवाच**

यत्र योगेश्वरः कृष्णो । यत्र पार्थो धनुर्धरः ॥
तत्र श्रीर्विजयो भूति । ध्रुवानीतिर्मतिर्मम ॥८॥

॥ इति श्रीमत् भगवद्गीताष्टकसार स्तोत्रं संपूर्णम् ॥

(दासराम वही क्र.११५)

*****

**प्रकरण (क) क्र.३**

## श्रीदासराममहाराज कृत श्रीगीतानामावली स्तोत्र

**गीता नामानि वक्ष्यामि गुह्यानि श्रुणु पांडव ॥**
**कीर्तनात् सर्व पापानि विलयं याति तत् क्षणात् ॥१॥**
**गीता गंगाःच गायत्री । सीता सत्या सरस्वती ॥**
**ब्रह्मविद्या ब्रह्मवल्ली । त्रिसंध्या मुक्ति गेहिनी ॥२॥**
**अर्धमात्रा चिदानंदा । भवघ्नी भयनाशिनी ॥**
**वेदत्रयी परानंता । तत्त्वार्थ ज्ञानमंजरी ॥३॥**
**इत्येतानि जपेन्नित्यं । नरो निश्चलमानसः ॥**
**ज्ञानसिद्धिं लभेत् शीघ्रं । तयाते परमं पदम् ॥४॥**

**॥ इति श्रीगीतानामवली स्तोत्रम् संपूर्ण ॥**

श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१०७

*******

योगीराज हे उद्धव धन्यचि दासराम त्यांचे चरणी ।।१।।

**सवायी क्र. ४**

## प.पू.मातोश्री श्रीलक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेबमहाराज कोटणीस

मोक्षलक्षुमी लक्ष्मीपरी जी जगन्मातही शोभतसे ।
प्रपंच विभवे साध्य साधुनी परमार्थाचे लावी पिसे ।
हनुमंतप्रभू रामभक्त जे पती सद्गुरूराज तसे ।
ब्रह्मरूप जी होऊनी ठेली दासराम पदी लोळतसे ।।१।।

**सवायी क्र. ५**

## प.पू.सद्गुरू श्री गोपाळरावजी कोटणीस

वामन-सुत गोपालनाथ जे गुरूभक्त श्रीमंत खरे ।
अंतरी वाहती अमृत निर्झर गुरूकृपेने ओघ बरे ।
रसाळवाणी कीर्तनी ज्यांची देहभान हे तदीच सरे ।
दासराम हा हनुमंताचा जडता वृत्ती मनी विसरे ।।१।।

**सवायी क्र. ६**

## प.पू.सद्गुरू श्री शिवरामबुवा ब्रह्मचारी

शिवरामप्रभु ब्रह्मचारी खलु साधन साधुनि साधु भले ।
सज्जन रंजन अलख निरंजन अहंकार पाहता वितळे ।
रामकृपामृत सेवुनी सत्यचि ज्ञानाज्ञानाहूनि आगळे ।
दासराम त्या पदासी वंदित चित्त चांदणे दिप्ती खुले ।।१।।

*****

उभा कानडा श्रीगुरूलिंगराजा । नमस्कार विश्वंभर विश्वबीजा ।।४।।

नारायणा वाटसरूपणाने । कशी दाविली वाट श्रीविठ्ठलाने ।
सगुणी आले निर्गुणात्म्यैक बोधा । नमस्कार त्या श्रीगुरुलिंगनाथा ।।५।।

प्रपंची ज्या स्वार्थची काही नाही । देहीच जे पूर्ण झाले विदेही ।
करी विश्वसंचार गुरुराज राजा । नमस्कार नारायणालागी माझा ।।६।।

माता पिता पूर्णचि ब्रह्म वाटे । गुरु काडसिद्धापदी प्रेम लोटे ।
पितयासी जै थोर आनंद केला । नमो श्रीगुरु ब्रह्म नारायणाला ।।७।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९,१३८,१५८

## ४. श्रीमामामहाराज केळकर

आळंदीसी दर्शन सत्य जहाले । हृदयात रेखांकित मूर्त केले ।
घरी स्थापिला सांगली ज्ञानराजा । नमस्कार गोविंदरायासी माझा ।।१।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

## ५. प.पू.श्रीगणपतरावमहाराज कन्नूर

खरा ब्रह्मचारी गुणांची मिरासी । विद्वन्मणी जो करी साधनासी ।
कसा पाहता शोभला भक्तराजा । नमस्कार हा श्रीगणेशासी माझा ।।१।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

## ६. प.पू.श्रीम्हादबा पाटीलमहाराज

महादबा संत अवतीर्ण झाले । प्रभू दत्त हे काय कलीत आले ।
जयांचा गुरू पाहता रामराजा । नमस्कार हा प्रेमभावेसी माझा ।।१।।

महादबा पूर्ण जहाले विदेही । सहजेचि जे बोधिती सर्वदाही ।
कसा डोलविला गुरु रामराजा । नमस्कार साष्टांग हा त्यासी माझा ।।२।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

## ७. गुरूवर्य श्रीमामासाहेब दांडेकर

कृपा लाभली थोर विष्णुबुवांची । अखंडित वारी जया पंढरीची ।

सद्गुरूनाथा प्रार्थुनी न कळे पायी कधीच ठेली ती ।।१।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

## १३. श्री बापूसाहेब पटवर्धन

नमो बापूराया नमो कृष्णभक्ता । जेणे पाठ केला तुकारामगाथा ।।
नित् कीर्तनी जो निमग्न झाला । नमस्कार हा प्रेमभावे तयाला ।।१।।

श्रीहनुमत्गुरुचरित्र बोध सार या ग्रंथातील श्लोक

## १४. श्रीज्ञानदेव तेहेत्तिशी ग्रंथ समर्पण

गंगेसी गंगाजल हे अर्पावे त्यापरीच येथ परी ।
भगवद्गुरू हनुमंता तेहेत्तिशी सानंद अर्पिली स्वकरी ।।१।।

श्रीज्ञानदेव तेहेत्तिशी या ग्रंथालील श्लोक सन १९५२

## १५. श्रीकैवल्यधाम

कैवल्यधामीच त्रयमूर्ती पायी । गुरुपुत्र रघुनाथ चिरकाल राही ।
करी स्थापना श्रीगुरूनाथराजा । नमस्कार हा प्रेमभावेसी माझा ।।१।।

## १६. श्रीरामपाठ (श्रीरामपाठामृत)

हरिपाठ तो हा स्फुरणासी आला । श्रीरामपाठेचि साकार जाहला ।
ज्ञानेश दावित गोविंद सुभटा । नमस्कार माझा तया रामपाठा ।।१।।

श्रीरामपाठामृत या पुस्तकातील श्लोक

## १७. न. या. पै. सा. पुस्तकालय

**न**र नारी **या**ती **पै**लतीर **सा**धो । पुस्तकालयाचे नाम-सार बोधो ।
गीता माऊली गे विश्वहिता मानवी । गोविंदमार्ग उजळी राम चिरंजीवी ।।१।।

*****

३.

औदुंबरा फांदी उगवला अश्वत्थ । पिंपळ विख्यात सुवर्णाचा ।।१।।
ज्ञानाईने दिली गोविंदासी भेटी । त्याची जगजेठी साक्ष दावी ।।२।।
पिंपळाचे पारी इंद्रायणी काठी । समचरण दृष्टी उभे तेथे ।।३।।
औदुंबरवृक्षी गोविंदाची वसती । हनुमंते प्रीती जागा दिली ।।४।।
सद्गुरूचरण जये ठायी ठाती । मेळविली माती तये ठायी ।।५।।
दासराम तेथे घाली दंडवत । तया मनी आर्त सदा हेचि ।।६।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१४७

४.

दर्शनी भला हा पाहुनी दर्शन । म्हणती हे जन केवी साहे ।।१।।
दर्शन नव्हे हे खरे प्रदर्शन । खोटे परी दर्शन वाटवी जे ।।२।।
दृग्गोचर होय तया नाव दृश्य । तया तु सौरस जीवन हे ।।३।।
जीवनप्रकाश गाठी जये द्वारी । दासरामावरी दर्शन ते ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११५

५.

गुरूकृपा भाग्य थोर । वर्णवेना जे साचार ।।१।।
गुरूकृपेचे अंजन । भक्ता दावी भगवान ।।२।।
हरिनामी रंगविती । श्रीरंगा ते भेटविती ।।३।।
योगी हनुमंत संत । दाविला परमार्थाचा पंथ ।।४।।
गुरूपदी काया गलीत । दासा अनुभवाची मात ।।५।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

६.

गुरूपद कमली मनोभृंग । जडता श्रीरंगाचा रंग ।।१।।
रंगी मन गुंग झाले । चित्त चैतन्यी वेडावले ।।२।।
हनमुमंते कृपा केली । हरिकथा प्रगट झाली ।।३।।

### ९.

जे भासी भासले पहाता काकीमुख । ते असे श्रीमुख ज्ञानोबांचे ।।१।।
जये पायी ज्ञानराज पथ क्रमती । तेचि पुढे ठाती समचरण ।।२।।
जयाचा सरळु असे मेरूदंड । तया हाती दंड शोभताहे ।।३।।
तेजाचे तेजसु रुपाचे रुपसु । तो आत्मा सौरसु गोविंदी गा ।।४।।
रुप रेखांकित करी ज्ञानेश्वरी । ते आले जिव्हाग्री माझिये पै ।।५।।
समता कमंडलु अमृते भरीला । तोच हाती आला ज्ञानाईच्या ।।६।।
दासरामा ऐसे लाधले श्रीचरण । दर्शने पावन सुखरूप ।।७।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

### १०.

ज्ञानेश्वर माऊली गं माय । माझी ज्ञानराज माऊली ।।ध्रु.।।
गोविंदास्तव सांगलीस जी । येऊनी घरी राहिली ।।१।।
आळंदीसी दर्शन देऊनी । करी कृपा साऊली ।।२।।
निजभक्ताते अंतरी स्फुरवुनी । रेखांकित जाहली ।।३।।
गोविंदनंदन वंदन करितो । श्रीसमपद युगली ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

## ब) श्रीहालसिद्धनाथ संबंधित अभंग

दिनांक १४.०५.१९८० वैशाखी अमावस्या, शके १९०२, श्रीअप्पाचीवाडी येथे दुपारी १२ वाजता श्री. शंकरमामा शिपुरकर यांनी भंडारा देऊन पुढील विचार सांगितले :-

प्रश्न : श्रीज्ञानेश्वर माऊलींची प्रतिमा आळंदीस लावण्यासंबंधी प्रयत्न चालले आहेत. त्यासंबंधी काय?

उत्तर : श्रीज्ञानेश्वरांचे मंदिर जरी महाराजांचे मोठे स्थान असले तरी तेथील मंडळी आता राजकारणी बनलेली आहेत. तो राजकारणी अड्डा बनलेला

काय म्हणावे या काहीच कळेना । देवाचिया खुणा देव जाणे ।।३।।
घोसरवाडी जे का जहाले दर्शन । थोर समाधान दासरामा ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११३

**४.**

जय जय सिद्धनाथ बोला । सांगा देव काय उरला ।।१।।
जय जय सिद्धनाथ बोला । अगम्य सिद्धांची लीला ।।२।।
जय जय सिद्धनाथ बोला । सिद्धमंत्र सिद्ध विरळा ।।३।।
जय जय सिद्धनाथ बोला । नामी दासराम रमला ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११३

**५.**

राम चालिलासे प्रेमे घोसरवाडी । तुम्ही तो तातडी चला तेथे ।।१।।
देवाने संचारी बोधिले भक्तासी । भक्त ते वेगेसी आलेती वो ।।२।।
ऐसि यात्रा झाली घोसरवाडी । सूचना कोणासी तेही आले ।।३।।
दासराम तेथे प्रेमेचि धाला । वर देवे दिला परिपूर्ण ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११३

**६.**

गोविंदा भेटाया आले गोविंदनाथ । प्रसंग अद्भुत हृदयी ठेला ।।१।।
हरिहर ऐक्य झाले आम्हा घरी । आनंदाची परी वर्णवेना ।।२।।
वीरभद्रालागी भेटे हालसिद्ध । तोचि तो आनंद आम्हा झाला ।।३।।
घोसरवाड हेचि आम्हालागी काशी । सर्व तीर्थराशी दासरामी ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११३

**७.**

## सिद्धस्तुतीसंबंधी अभंग

सिद्धपूजेचे श्रवण । करिताचि प्रसन्न मन ।।१।।
प्रसाद ग्रहण जो अंतरा । भीमा लावी मज भंडारा ।।२।।
सिद्धे शंकराकडून । दिला प्रसाद पाठवून ।।३।।

## ११.

सिद्धेश्वराचिया द्वारी । नवल कीर्तनाची परी ।।१।।
धन्य हनुमंत गोविंद । जया कीर्तनी आनंद ।।२।।
थोर कीर्तनाचा रंग । रेवणसिद्ध होय दंग ।।३।।
दासरामा तेचि सेवा । पूर्वजांचा ऐसा ठेवा ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

## १२.

रामाची नवमी ते रामनवमी । प्रकर्ष तो हा मी नवमाजी ।।१।।
सत्ताविसा नऊ जाता उरे शून्य । तयाते अनन्य ऐसे काय ।।२।।
आठामाजी एक तेची ते नवमी । नसे मी तू तू मी हुतुतू हा ।।३।।
राम हरि राम राम हरि राम । जपता पूर्ण काम होत असे ।।४।।
पंधरा आणि बारा मिळूनी सत्तावीस । त्यात जाता मुख्य तेची नऊ ।।५।।
ते ज्यांनी साधिले नावांकिले आले । अठ्ठाविसी भले परमार्थी ।।६।।
नवांका परि जो असे या जगात । तयासी सतत राम दृष्टी ।।७।।
त्रेसष्ठ छत्तीस काहीही जाहले । बेरजेत आले नऊपरी ।।८।।
दासराम म्हणे नामी ऐसी हे प्रचिती । रामदास ख्याती होय त्याची ।।९।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

## १३.

स्वयंभूचि असे जेथ शिवलिंग । घोसरवाडी रंग वेगळाची ।।१।।
शंकरा लागोनी सांगितले स्वप्नी । करी मज झणी अभिषेक ।।२।।
शंकरे शिवासी अभिषेक केला । परिसोनी डोळा अश्रू आले ।।३।।
ऐसे भक्तिप्रेम सापडेल कोठे । दासरामा वाटे समाधान ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

## १४.

भेटलिया हरिहर । जप चाले सिद्धेश्वर ।।१।।
सिद्धेश्वर सिद्धेश्वर । मनी घेता परमेश्वर ।।२।।

अव्यक्त अक्षरी आकारासी आले । रघुनाथे केले उघड जगी ।।१४।।
चिन्मयाचा पंथ कैवल्याची माला । दासराम झाला लीन तेथे ।।१५।।

२.

दादांच्या माळेचा मज लाभ झाला । मिळाली जपमाळा प्रसन्न ते ।।१।।
कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । बरवी जप माळ शोभतसे ।।२।।
दासराम करी माळेसी वंदन । होय ते स्मरण मालिकेचे ।।३।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

३.

अरे मुला समजलास का रे । असे आहे देवाचे वारे ।।ध्रु.।।
कृष्णेच्या पाण्यावरती । लाटा येती आणि जाती ।।१।।
वाऱ्याने लागतो दिवा । आणि नका म्हणू मालवा ।।२।।
वाऱ्याने ढग हे जमले । मागुती कशाने गेले ।।३।।
वाऱ्याने पाऊस आला । वाऱ्याने पाऊस गेला ।।४।।
वाऱ्याने डोळे शुद्ध । वाऱ्याने गौतम बुद्ध ।।५।।
वारियाने भरले पोट । नाही तरी अक्कलकोट ।।६।।
वाऱ्याने तगला प्राण । त्या वाचुनि जगला कोण ।।७।।
डोक्यासी लागता वारे । मानव हा दुःखचि विसरे ।।८।।
वाऱ्याने मन हे शुद्ध । वाऱ्याने होती धुंद ।।९।।
जव वाहे अनुकूल वारे । तव योजुनि ठेवा सारे ।।१०।।
जव वाहे प्रतिकूल वारे । पुढे पाऊल न पडे पुरे ।।११।।
वाराचि घालवी जीव । जडपण ते जगी नवलाव ।।१२।।
वाऱ्याने सर्वही ज्ञान । वारेची करी बेभान ।।१३।।
वाऱ्याने दुनिया झाली । असुनिही नाहिशी केली ।।१४।।
हे सर्व वायुचे धर्म । चित्तात नको संभ्रम ।।१५।।
खेळखंडोबा जगताचा । त्याची जव कानी न वाचा ।।१६।।
वारा हा सद्गुरु सगुण । तो परमेश्वर निर्गुण ।।१७।।

दासराम म्हणे ज्ञानदेव खुणा । वसे ज्ञानराणा पंचप्राणी ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.८९

## ८.

राजहंसालागी  मोतीयाचा चारा । यात आला सारा परमार्थ ।।१।।
हंसरूप दावी स्वये हनुमंत । धन्य सद्गुरूनाथ बापूराव ।।२।।
सत्य श्री समर्थ गुरुलिंगनाथ । त्यांचे कृपांकित थोर थोर ।।३।।
स्वरूप लोपले तेचि ते दाविले । दासराम लोळे गुरूपायी ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१३८

## ९.

परमेश्वरा पांडुरंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।१।।
रेवणसिद्ध आत्मलिंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।२।।
हालसिद्ध दुग्धगंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।३।।
श्रीनारायण गुरूलिंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।४।।
सिद्धानंद सिद्धसंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।५।।
लक्ष्मीमात मातरंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।६।।
साधुराज साधुसंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।७।।
चिम्मड तापनाशी गंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।८।।
भाऊसाहेब भवभंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।९।।
रामचंद्र चिन्मयांगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।१०।।
हनुमत्गुरू हरिरंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।११।।
गोविंदजी बोधगंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।१२।।
चिम्मड संप्रदाय बोधा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।१३।।
दासरामी अंतरंगा । सच्चिदानंदा श्रीरंगा ।।१४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१५८

## १०.

तुकाराम ब्रह्मतनु गेले वैकुंठा ।

वाऱ्यामाजी मिळवुनि वारे । दासराम करी गान ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२७० पान नं.५९३

**१३.**

घनीभूत वारा कोठे विरळ बरा । प्रवाही तो सारा जेथे तेथे ।।१।।
विरळा विरळ ते शुद्ध चैतन्य । कोडे होय घन जडत्व ते ।।२।।
जैसा तैसा एक सर्वत्र संचला । तेथे कोण उरला दासराम ।।३।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२७०

**१४.**

आता मी नाही मी नाही । सर्व ब्रह्मचि होई ।।१।।
मीचि परीपूर्णता । सर्व ब्रह्मचि आले हाता ।।२।।
प्रयोग करी जो साचा । प्रयोगी तोचि संशयकाचा ।।३।।
विचारेचि नच सिद्धी । विचार ज्याची सहज उपाधी ।।४।।
आत्म्यावाचुनि ज्ञान । तेवी न दिसे जगी अज्ञान ।।५।।
अधिष्ठान सर्वाचे । दासरामी या वर्मचि साचे ।।६।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२७०

**१५.**

जे जे घडे तो तो वाटे चमत्कार । सहज साक्षात्कार जीवनाचा ।।१।।
उठतील लहरी अहं निरहंकार । जीवन हे सार कल्लोळाचे ।।२।।
सोहंनादाकार कला बिंदू ज्योती । गुरूकृपे स्थिती अवस्था जे ।।३।।
वारीयाचि झुळुक जाहले दर्शन । दासरामा खूण गिवसली ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२५९

**१६.**

नामात सद्गुरू डोल रे खेळिया नामात कीर्तन प्रगटे ।
नामात घनदाट ब्रह्म निघोट सकळाहुनी मोठे ।।१।।
नामाविण ते जीवन जीवाचे सकल काही खोटे ।
सतरावी जो प्रदीप्त होई भासचि सर्व आटे ।।२।।

## २०.

शनिवार ज्येष्ठ शु.१५, शके १८९८ दि.१३.८.१९७६ दुपारी १.३० वाजता
श्रीदासराममहाराज यांना ऐकू आलेला अभंग

श्रीसुवर्णसिद्धलिंगम् (नमो परमपद सोमेशं) ।
रेवण मरूळ श्रीकाडसिद्धविभु । सिद्धेश्वर वंद्यम् ।।१।।
नमो श्री गुरुलिंगजंगम् (नमोस्तुते श्रीगुरुलिंगम्) ।
साधुराम श्री हनुमंतप्रभु । पदनत गोविंदम् ।।२।।
घोसरवाडेश्वर स्तवितं । सावित्रीस्तव आविर्भूतम् ।
दुग्धप्राशार्थं ।।३।।
हालसिद्ध संचारावस्थित । श्रीगोविंदनाथम् ।।४।।
श्रीनारायण चिमडस्थं । दृष्टान्ते दत्तात्रय दर्शित श्री गोविंद सहृदम् ।।५।।
सोहं हंस महानादं । नामावली इति दासराम खलु सेवित स्वानंदम् ।।६।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५० पान नं.४

## २१.

रेवणसिद्धेशं । भज मन रेवणसिद्धेशं ।।ध्रु.।।
रेवणसिद्ध रेवणाराध्यं । श्रीरेणागिरीशम् ।।१।।
मरुळसिद्ध श्रीमरुळेश्वर वा । जय मरुळाराध्यम् ।।२।।
काडसिद्ध श्रीसिद्धगिरीश्वर । काडेश्वरनाथम् ।।३।।
एकोमय वा एकोरामम् । सुपंडिताराध्यम् ।।४।।
विश्वनाथ विश्वेश्वर वाऽपि । श्रीविश्वाराध्यम् ।।५।।
मुप्पिनस्वामी मुनीश्वरसिद्धं । सिद्धगिरीपीठम् ।।६।।
महासिद्ध मुनीश्वरवंद्यं । बोधामृत वरदम् ।।७।।
सिद्धराज श्रीसिद्धेश्वर वा । हालसिद्ध परमम् ।।८।।
श्रीनारायण निंबरगीश्वर । श्रीगुरुलिंगनाथम् ।।९।।
स्तोत्रमिदं पठयित्वा पावन । श्रीगोविंदसुतम् ।।१०।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५० पा.नं. २६५

सहज साधनी दिवस मुराला । सद्गुरू जोडला दत्तोपंत ।।४।।
परमशिवरूपी मिळोनिया गेले । कीर्तीरुपे उरले दासापाशी ।।५।।

**२५.**

## प.पू. श्रीदिगंबर यांचा निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके एकोणीसशे सहात । रसाक्षी संवत्सर उत्तरायण ।।१।।
वैशाख शुद्ध दशमी आणि गुरुवार । दिवसा तृतीय प्रहर तिसरे तासी ।।२।।
दिगंबरराये केलेसे निर्याण । स्वरूपी तल्लीन ऐक्य झाले ।।३।।
प्रभाकररुपी मिळोनिया गेले । कीर्तीरुपे उरले दासापाशी ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१११

**२६.**

## प.पू.श्रीराधाबाईअक्का, हरीपूर यांचा निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके आठराशे नवात । अक्कांनी एकांत सेवियेला ।।१।।
राधाबाईअक्कांनी केलेसे निर्याण । महिना अश्विन पावन झाला ।।२।।
भाक जे दिधली बालमुकुंदासी । नेली पूर्णतेसी नामस्मरणे ।।३।।
अश्विन वद्य तृतीया युक्त ते चतुर्थी । झाली प्राणज्योती कृष्णमय ।।४।।
दासराम वंदी  तयांची पाऊले । आणि मुखी बोले राधाकृष्ण ।।५।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११५

**२७.**

## प.पू.स्वामी अमलानंद यांचा निर्याणाचा अभंग

शालीवाहन शके अठराशे अठ्ठ्यांशीत । वैशाख वद्यात प्रतिपदा ।।१।।
स्वामी अमलानंद स्वरुपी मिळाले । नवल दाविले जगामाजी ।।२।।
योगबळे ज्यांनी साधिले जीवन । घेती संजीवन समाधी ते ।।३।।
भ्रुकुटीमाझारी तो आत्मा मेळविला । सतेज जाहला स्वामीराय ।।४।।
संत साधु ज्यांनी प्रेमे वाखाणिले । चरण वंदिले दासरामी ।।५।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२८१

**४.**

*जरी ही तनु रक्षिसी पुष्ट काही । तरी भोग तो रोग होईल देही ।*
*विपत्तीपुढे ते नये बोलता रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ।।४।।(मूळ)*

जरी या तनुचे करोनी रक्षण । आले पुष्टपण तुज लागी ।।१।।
जेणे प्राप्त होती तुजप्रती भोग । तरी तेचि रोग होती देही ।।२।।
ऐसी तरी पुढे आहेचि विपत्ती । खुंटलीसे मती बोलो नये ।।३।।
हरे राम ऐसा मंत्र हाचि सोपा । दास म्हणे जपा सर्वकाळ ।।४।।

**५.**

*खुळे हस्तपादादि हे मग्न होती । दिठी मंद होवोनिया कर्ण जाती ।*
*तनु कंप सर्वांगी होती कळा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ।।५।।(मूळ)*

हस्तपादादिक ऐसे हे शरीर । तेथे मग्न नर खुळे होती ।।१।।
होय दृष्टी मंद काहीच दिसेना । कर्णी ऐकू येता कर्ण जाती ।।२।।
शरीरासी मग सुटे पहा कंप । कळा ते अमूप सर्वांगासी ।।३।।
हरे राम ऐसा मंत्र हाचि सोपा । दास म्हणे जपा सर्वकाळ ।।४।।

**६.**

*कफे कंठ हा रोध होईल जेव्हा । अकस्मात तो प्राण जाईल तेव्हा ।*
*तुला कोण तेथे सखे सोयरे रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ।।६।।(मूळ)*

कफे तरी कंठ दाटोनिया गेला । रोध हा जाहला श्वासालागी ।।१।।
मग जरी काम होईल आकांत । जाय अकस्मात प्राण तेव्हा ।।२।।
सखे सोयरे रे कोण ते सज्जन । उपेगा कवण तुजलागी ।।३।।
हरे राम ऐसा मंत्र हाचि सोपा । दास म्हणे जपा सर्वकाळ ।।४।।

**७.**

*तुझे बाल्य तारुण्य गेले निघोनी । कळे ना कसे लोक जाती मरोनी ।*
*करीसी मुलांची स्वहस्ते क्रिया रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ।।७।।(मूळ)*
बालपण तरी निघोनिया गेले । तारुण्य सरले वृद्धपणी ।।१।।

## २९.

# ओरम् कीलणय पाठ

दासरामास भगवंताने स्वप्नामधे गुप्त भाषा सांगितली व त्यास अनुसरून दासरामाने ओरम् भाष-ईश्वराकडून दासाने तयार केलेली भाषा प्रगट केली. भगवंताने तू ओरम्- परमेश्वराचा दास आहेस असे सांगितले व ईश्वर दासाने केलेली भाषा म्हणून त्या भाषेला 'ओरम्' हे नाव ठेवले. त्या भाषेत पाच अभंगात थोडक्यात दासरामाने प्रभूची प्रार्थना करून त्या भाषेतील छोटेसे पद्य निर्माण केले आहे. यास्तव त्यास 'ओरम् कीलणय' असे नाव दिले आहे. अशी नोंद श्रीदासराममहाराजांनी लेखन वही क्र.५२ मध्ये दिनांक ०७.०७.१९४० रोजी केली आहे. हे अभंग खालीलप्रमाणे आहेत.

१.

मयझराव ओळद्ध कीरमन । हादय इयहश हामयधयन ।।१।।
नयमर इसगश मशझराव एल तर । ते इलप एहाश चरतर ।।२।।
कीर दाय सतसकीवर । फळटश पयझीना नर ।।३।।
उयगव ओरम चीणर । सहा मळख चयपपयणर ।।४।।

२.

कीर अपीय धयसचर समय । तलचर हारवय मय वयप पवगय ।।१।।
हम् तळझराव उवकूल । अखस्डयइल ते पयार ।।२।।
चीनयहार पडशमरठर । जडशरल्लस्टर हादवे ।।३।।
मयगव ओरम् दयन । कीश नराय मनर धायन ।।४।।

३.

ईयम इयहश मळखर । इयमर मन इयहश हालखर ।।१।।
ईयम इयहश ओइएणर । नाशाणरक कयनरमनर ।।२।।
इयमा हाश नावर । नानर हयहश नरीसजनर ।।३।।
शदय आरेम इयहशपदर । गलसगशनराय नयमय नसदर ।।४।।

## विभाग क्र.७

# श्रीदासराममहाराज कृत आरत्या

प.पू.श्रीदासराममहाराज केळकर कृत देव / देवी / संत महात्मे इत्यादींवरील १४७ आरत्या ''आरती संग्रह'' या पुस्तकाद्वारे प्रकाशित झाल्या आहेत. तथापि श्रीदासराममहाराज लिखित उपलब्ध वह्यातून आणखी २५ आरत्या प्राप्त झाल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

## श्रीरेवणसिद्ध

### १.

प्रारंभी तू देवा श्रीरेवणसिद्ध । माया मोहक म्हणूनी नाम मरूळसिद्ध ।
माया मोहा मर्दुनी तूचि काडसिद्ध । दुग्धासाठी येसी होसी हालसिद्ध ।।१।।
जयदेव जयदेव जय रेवणसिद्धा । आरती ओवाळू तुजला स्वतःसिद्धा ।।ध्रु.।।
गुरुलिंगरूपे येऊनी सिद्धस्वरूप जोडे । चिमडमहाराजांचे भजन गोड आवडे ।
हनुमत् गोविंदाते कीर्तनात आतुडे । गोविंदसुत रामी चरण चित्त जडे ।।२।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१२४)

### २.

आरती रेवणसिद्धा । जयजया सिद्धबोधा ।
सोमेश्वर पिंडीमाजी । प्रगटसी अगाधा ।।१।।
मोहक रुप तुझे । तूचि मरूळसिद्ध ।
बोधरूप विलससी । सिद्धेश्वर प्रसिद्ध ।।२।।
रेवातिरी प्रगटता । म्हणती रेवणनाथ ।
सिद्धी तव दृश्य होता । रेवणसिद्ध नाम ख्यात ।।३।।
माईसी मर्दियले । तव नाम काडसिद्ध ।
दुधाची हौस तुज । स्वये होसी हालसिद्ध ।।४।।
गुरुलिंगकृपे ऐसा । तव नामी या बोध ।
दासरामा सहजेची । अंतरी या आनंद ।।५।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.५०)

६.

अगाध हालसिद्धा । पंचारती माडुवे सिद्धा ।
जय जया आत्मबोधा । जगदोळू प्रसिद्धा ।।ध्रु.।।
आरती माडुत । भक्तीभाव हाडुत ।
प्रभोना निन्नभक्त । कृपा माडो कृपावंत ।।१।।
सर्वात्मक निनू । सोहंस्वरूप निनू ।
दासरामा दया माडिदी । अखंड गे प्रभंजनू ।।२।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१२४)

## श्रीज्ञानेश्वरमहाराज

७.

ज्ञानराज गोविंदे आणियेले येथे । आळंदीसी दर्शन जाहले जे निरुते ।
रेखांकित ज्ञानेश्वरी करूनी निजहस्ते । घरीच सांगलीसी स्थापियले वरूते ।।१।।
जयदेव जयदेव जय ज्ञाननाथा । ओवाळिता आरती पालटते काया ।।ध्रु.।।
पाहुनि ज्ञानी भक्तही चकितची ते होती । असेचि ज्ञानराजे आलीसे प्रचिती ।
आनंदाने डोळा अश्रु ओघवती । स्मरणमात्रे पावन खचितचि ते होती ।।२।।
ज्ञाननाथ समचरण मूर्त उभी ठेली । भोळ्या भाविक भक्ता वरदायी झाली ।
भाग्य आमुचे म्हणुनि दर्शन त्रिकाळी । दासराम सेवितसे वंदुनिया भाळी ।।३।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.२१२)

## श्रीहरिपाठ

८.

अभंग अठ्ठावीस असती हरिपाठ । हरिमुखे म्हणा हे ध्रुपद वरी मुगुट ।
कर्म भक्ती ज्ञान फलश्रुती अविट । नित्यनेमे पढता भूवरी वैकुंठ ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीहरिपाठा । ओवाळू आरती आळंदीपीठा ।।ध्रु.।।
समाधी संजीवन सहजे उत्कट । अखंड हरिपाठ घुमे घडघडाट ।
चिमडमहाराजे ऐकियेला स्पष्ट । श्रीहनुमत्प्रभुनी केला बोभाट ।।२।।
देवाचिया द्वारी उभा जरी नीट । ओळंगिल्या मुक्ती चारी वरिष्ठ ।

श्रीज्ञानेश्वर विष्णु विभु दावी वाट । गोविंदसुत राम हरिपाठी विनट ।।३।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१२४)

**९**

प्राकृत गीतादेवी  ऐसा हरिपाठ । श्रीज्ञानेश्वर विष्णु दावी निघोट ।
कर्म उपासना ज्ञान चोखट । नित्यनेमे पढता भूवरी वैकुंठ ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीहरिपाठा । ओवाळू आरती आळंदीपीठा ।।ध्रु.।।
समाधी संजीवन सहजे उत्कट । अखंड हरिपाठ घुमे घडघडाट ।
चिमडमहाराजे ऐकियेला स्पष्ट । श्रीहनुमत्प्रभुनी केला बोभाट ।।२।।
देवाचिया द्वारी उभा जरी नीट । ओळंगिल्या मुक्ती चारी वरिष्ठ ।
हरिनाम संकीर्तन सूत्र हरिपाठ । गोविंदसुत राम हरिपाठी विनट ।।३।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.५०)

१०.

## श्रीरामपाठ

रामपाठ तो हा हरिपाठ सार । गोविंदा स्फुरला अक्षरी आकार ।
ज्ञानेश्वरकृपे घडला अवतार । गोपालनाथे गाता प्रगटे चापधर ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीरामपाठा । ओवाळू आरती चिन्मयपीठा ।।ध्रु.।।
वायुसुत विज्ञान दावी अरूवार । श्रीरेवण गोविंद ठेवी वरद कर ।
भक्तीभावे भाविक पढती अपार । गोविंदसुत राम पठणी परपार ।।२।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१०९)

**११.**

## त्रैमूर्ती

आरती त्रैमूर्ती दिगंतरी गाजे कीर्ती ।
धन्य धन्य हरिभक्ती सुखद नाम गाती ।।१।।
धन्य धन्य संतराज कोटणीस हनुमंत ।
अवतार समर्थ वाढविला परमार्थ ।।२।।
मातेची इच्छा होती काही प्रपंच करावा ।

तयात देव देव गुरूकृपे जोडावा ।।३।।
मातृइच्छा पूर्ण केली कोटी कुळे उद्धरिली ।
रामायण रसामृत पूर्ण गोडी चाखिली ।।४।।
अखंड साधनी जे पूर्ण रंगोनिया गेले ।
निदिध्यासे स्मरण छंदे रामरूप होवोनी ठेले ।।५।।
कीर्तन जीवप्राण नित्य सेवा केली जाण ।
रेवणसिद्ध प्रगट झाले गुरु आज्ञाप्रमाण ।।६।।
धन्य धन्य हनुमंत गुरु रामा डोलविले ।
सांगलीचे भाग्य मोठे पुण्यक्षेत्र शोभले ।।७।।
सद्गुरू बालक रघुनाथ पिता जया सद्गुरूनाथ ।
कृपेच्या कटाक्षे तयालागी केले भक्त ।।८।।
रघुनाथ गुरूरूप धन्य धन्य हरिभक्त ।
वश केला देवराय स्वामी जहाले अंकीत ।।९।।
कीर्तनी रंगले जे सर्व वाहिले प्रभुला ।
अंतरीचा ठाव लाधे उणे काय विश्रांतीला ।।१०।।
कल्याणा ऐसा शिष्य पितृदेव गोविंद ।
सेवा ते पाहोनिया दावियेला स्वरुपानंद ।।११।।
जया ते झाली एक गुरुआज्ञा प्रमाण ।
नित्यनेमे प्रेमभावे चालविले कीर्तन ।।१२।।
साधनी रंगोनिया कीर्तनसुख भोगिले ।
गुरुपदी जडले चित्त राममय अंतर झाले ।।१३।।
दासराम लीन झाला त्रैमूर्तींचे चरणाला ।
विनवितो तुम्हालागी तारा अज्ञान बाळा ।।१४।।

(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.२१७)

## १२

## श्रीमामामहाराज केळकर

कीर्तनसुखार्थ आला भूवरी जन्मासी ।
सद्गुरू शोधियेले कीर्तन सुखराशी ।
आज्ञे अखंड कीर्तनी तोषविले गुरूसी ।
कीर्तन स्वरूपची होवूनी स्थापी कीर्तनासी ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीगोविंदा ।
नित्य कीर्तनानंदा जय कीर्तनबोधा ।।ध्रु.।।
नामी कीर्तन आले नाम कीर्तनासी ।
गंगासागर मिळणी जहाली हे कैसी ।
गुरुशिष्यांचा संगम दिसतो दृष्टीसी ।
दासराम पदी ठेला जयजयकारासी ।।२।।

(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.२७०)

## १३.

जय जया जय जया जय जय गोविंदा । आरती ओवाळू कीर्तनानंदा ।।ध्रु।।
हरिकीर्तनासाठी जन्मासी आला । कीर्तनरंगी रंगूनी तन्मयची झाला ।।१।।
कीर्तन करिता करिता देहत्याग केला । त्रयोदशाक्षरी गर्जुनी वैकुंठा गेला ।।२।।
अखंड कीर्तन महिमा जगती वाढविला । कीर्तनस्वरूपे राहूनि दासरामी रमला।।३।।

(श्रीदासराममहाराज वही क्र.५०)

## १४. श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री

आरती अवधूता । आदिनाथा गुरूदत्ता । देवाधिदेव तुम्ही । बालमुकुंद सत्ता ।।१।।
अदेह खरे तुम्ही । म्हणोनिया विदेह । जगदोद्धारालागी । दावियेला काय देह ।।२।।
करवीरी तव मूर्ती । जेथे सिद्धांची वसती । सागरापरी लीला । दासराम कळेचिना जगती ।।३।।

(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.११६)

## १५. श्रीगुंडुबुवा, बुधगांव

आरती गुंडुबुवा । ओवाळीतो देव देवा ।

राहिला बुधगावा । जय जय महानुभावा ।।ध्रु.।।
विदेही साधु धन्य । दिसे सर्वसामान्य ।
परी तो सर्व मान्य । म्हणवोनि असामान्य ।।१।।
अनेक जडजीवा । संकटी या वाचविले ।
बोलिले होय तेचि । मृत जीव उठविले ।।२।।
गोविंद कीर्तनात । भजनात नाचले ।
पंढरीचा विठ्ठल हा । देखताचि नवल झाले ।।३।।
पहाता पहाताचि । अदृश्य होऊनी ठेले ।
तुकयापरी घडले । दासरामे वंदिले ।।४।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.१२४)

**१६.**

आरती गुंडुबुवा । श्रेष्ठ महानुभावा ।
पंढरीचा पांडुरंग । प्रगटलासी देवा ।।ध्रु.।।
विदेही साधु म्हणुनि । दिगंतरी कीर्ती गाजे ।
पंचक्रोशी भाग्यवान । दीपविले नीज तेजे ।।१।।
बुधगाव धन्य धन्य । पवित्र हा परिसर ।
दासराम उभा राहे । प्रेमे जोडोनिया कर ।।२।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.८५)

**१७.**

आरती गुंडुबुवा । ओवाळितो देव देवा ।
आलासी बुधगावा । जय जया महानुभावा ।।ध्रु.।।
विदेही साधु धन्य । दिसे सर्वसामान्य ।
परी तो सर्वमान्य । म्हणवोनि असामान्य ।।१।।
अनेक जडजीवा । संकटी या वाचविले ।
बोलीले होय तेचि । मृत जीव उठविले ।।२।।
गोविंद कीर्तनात । भजनात नाचले ।

पंढरीचा पांडुरंग । संती पाहता दिसले ।।३।।
देखता देखताचि । अदृश्य जहाले ।
तुकयापरी घडले । दासराम वंदिले ।।४।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.५०)

१८.

## सन्नती चंदला परमेश्वरी

आरती सन्नतीवासी । माय अखिल जगासी ।
चंदला परमेश्वरी । सर्वांतरी तू वससी ।।१।।
निरंजन निर्विकल्प । निरामय निर्विकारी ।
प्रगटली गुणरूपे । भक्तापुढे साक्षात्कारी ।।२।।
रामाजी पुण्यवंत । भक्तराय ते निर्धारी ।
दर्शनेची उपासना । कुलदेवी चिदंबरी ।।३।।
हनुमंता वोळली ते । ऐसी कीर्ती चराचरी ।
दासराम वंदिताची । हस्त ठेविला शिरी ।।४।।
(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.५०)

१९.

## भूपाळी

उठा उठा बंधु जन । सखे सोयरे सज्जन ।
गीता माऊली आवाहन । पुण्यस्मरण सकळासी ।।ध्रु.।।
झाली निशेची परिसीमा । पूर्व दिशेच्या ह्या व्योमा ।
पहा शलाका सुचवी आम्हा । रघुत्तमाचा पूर्वज तो ।।१।।
निद्रा आता पुरे पुरे । मंद सुगंधित हे वारे ।
केले पलायन अंधारी । ज्ञानराशी उजळिता ।।२।।
निसर्ग आश्रित चराचर । होई सावध भराभर ।
मानव बुद्धि संभार । आळस आता कासया ।।३।।
प्रातःस्मरणी घ्या नाम । प्रल्हादा परी सप्रेम ।

गोविंदध्यानी हनुमान । चिरंजीवी ही नीजखूण ।।४।।

(दुसरा दीप प्रकाशन १९७०)

२०.

**श्रीभगवद्गीता**

आरती जय गीते । रणी पार्थानिमित्ते ।
श्रीकृष्ण वच स्तविते । जय गंगे अमृते ।।ध्रु.।।
गोविंद वच धैर्य । उठवी जयिष्णुवीर्य ।
सांगुनी राजगुह्य । नाम गीतानुपम्य ।।१।।
हनुमंत राम सेवा । ध्वज रथासी भगवा ।
सारथी देव व्हावा । भाग्य अगाध पांडवा ।।२।।
आदित्य रश्मि स्वर्ण । कोटी कोटी दिपून ।
विश्वरूप होई दर्शन । भक्तीबळे निधान ।।३।।
गांडीव टणत्कार । धर्म रक्षी संहार ।
करवित शारंगधर । अंतर्बाह्य विचार ।।४।।
चिरंजीव दासा स्फुरिते । राम पदाब्जी रमते ।
गोविंद प्रेम गीते । गुरुलिंगा नमस्ते ।।५।।

(दुसरा दीप प्रकाशन १९७०)

२१.

**श्रीगोविंदमहाराज दिवेकर, वाटेगाव**

आरती गोविंदा । जय जया आनंदा ।
आनंद सांप्रदाय । हंसरूप प्रसिद्ध ।।ध्रु.।।
वैकुंठ चतुर्दशी । जन्म झाला तया दिवशी ।
भागवत सप्ताहात । अंती साधिली एकादशी ।।१।।
वासुदेव सर्वामिती । ऐसी तुमचिये मती ।
दुर्लभ महात्मा तो । याचि दाविली प्रचिती ।।२।।

## २३. श्रीम्हादबा पाटीलमहाराज

पाटील महाराजा ओवाळू आरती । वाऱ्यासरशी तुमची दिगंतरी कीर्ती ।
अवधूत योगी तुम्ही परब्रह्ममूर्ती । असूनी विदेही जहाली राजयोग ख्याती ।।१।।
जयदेव जयदेव जय पाटीलमहाराजा । ओवाळू आरती दत्तगुरूराजा ।।ध्रु.।।
सोटा हाती पहाता अरिष्टे पळती । मंगल होय जगाचे लाविताची विभूती ।
नरसोबावाडीची वारी ही पुरती । स्वरूपाकार होऊनी दत्तगुरू प्राप्ती ।।२।।
पूर्णज्ञानी तुम्ही दासबोध कथिता । ज्ञानेश्वरी तुकया भागवता पढता ।
थक्क होती ज्ञानी नमवुनिया माथा । रामानंद कृपा ही काय वानू आता ।।३।।
रामानंद बोले मजवरी ज्या परीने । तुम्ही कौतुक केले तैसे त्या परीने ।
भाविक भक्ता लाभ भक्तीचे लेणे । गौरव अमलानंदा पूर्ण समाधाने ।।४।।
स्वरूपानंद समाधी सोहं ऐकियले । ऐसे नाही कोठे कर्णी आयकिले ।
तुम्हीच अण्णाबुवा हेचि मनी आले । दासराम वंदी प्रेमे पदकमले ।।५।।

(परब्रह्मस्वरूप त्रैमासिक सप्टेंबर १९८८)

## २४.

## स्वामी अमलानंद

आरती अमलानंदा । स्वरूपी या अभेदा ।
साकार जगी जहाला । धन्य धन्य सोहंनादा ।।ध्रु.।।
नादरूप तुम्ही स्वामी । जय जया सत्य नामी ।
नाम नामी एक झाले । जेथ नुरल्या उर्मी ।।१।।
आनंद संप्रदाय । आनंदाचे स्वरूप ।
पहाता पहाताचि । जीव होय तद्रुप ।।२।।
जगद्गुरू जगन्नाथ । गिरनारी प्रभू दत्त ।
आलिंगन दिले असे । पहाताची रेवणनाथ ।।३।।
दासरामालागी कैचा । स्वरूपाचा सोहळा ।
दाविला जीव तेथे । गुंतोनिया राहिला ।।४।।

(श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.२८१)

## विभाग क्र.८

# श्रीदासराममहाराज कृत प्रासंगिक काव्ये व मंगलाष्टके

प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांनी विविध संप्रदायातील अध्वर्यू तसेच अधिकारी संतमहात्मे यांच्या संदर्भात विशेष प्रसंगांचे अध्यात्मिक अंगाने काव्यरूपाने वर्णन केले आहे. यात प्रामुख्याने षष्ठ्यब्दीपूर्ती, अमृतमहोत्सव, श्रद्धांजली, पुस्तक प्रकाशन, जन्म शताब्दी इ.प्रसंगांचा समावेश आहे. ही काव्ये श्रीदासराममहाराज लेखन वह्यात विविध ठिकाणी लिहिलेली दिसून आली. ती सर्व एकत्र करून छापावीत या हेतूने या विभागात ही २९ काव्ये समाविष्ट केलेली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत.

## अ) प्रासंगिक काव्ये

### १. श्रीमद् प.पू.श्रीसद्गुरू श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर यांचे षष्ठ्यब्दीपूर्ती दिन महोत्सव प्रसंगी केलेली आर्या

षष्ठ्यब्दीपूर्ती दिन हा मंगलमय भासला सुजन लोकी ।
चिन्मयध्वजाची भूवरी फडकत ठेली सुकीर्ती जनलोकी ।।१।।
लाभे भलाचि गुरू हा श्रीनारायण अहा जन विलोकी ।
आत्मियता कशी विलसे पूर्णचि विश्रांती याची पायी निकी ।।२।।
रघुनाथप्रिसाधु महाराजा वोळला जणु हा की ।
गुरूनिष्ठेचे वैभव तेणे वाढेची सत्य त्रयलोकी ।।३।।
भेद भयंकर आटला साधन साधोनि काय किमया की ।
निर्लोभ अहं रहितचि नारायणासम गमेचि आजी हा की ।।४।।
माता माईसाहेब पितृदैवत परेश लाभे की ।
श्रीरामचंद्र सद्गुरू बहु पुण्ये लाभलीच जोडी की ।।५।।
दाजी उद्धव बंधु वाटे मत्स्येंद्र काय योगी की ।
मोक्षाची लक्ष्मीच जी लक्ष्मीअक्का माऊलीच बोले की ।।६।।
नारायणपुत्राते जवळी घेऊनी सत्य नित्य सुखी ।

परमकृपा सिद्धाची हेलावे वृत्ती हे पाहताच ।।६।।
सिद्धांचिया कृपेने सिद्रामेश्वर प्रकाशिला तारा ।
भाऊराव समर्थे ओळखुनी त्यापदी दिला थारा ।।७।।
त्यांचे अनुग्रहाने सिद्धगिरीश्वर तसे पुढे आले ।
राजयोग हा त्यांचा पाहुनिया वाटले नवल झाले ।।८।।
निंबरगी नी चिमड हे उमदी (इंचगेरी) आणिक तसेचि निंबाळ ।
सांगलीत सत्कीर्ती दुमदुमली सागरापरी निखिल ।।९।।
सामावुनी सकलही झोड उठविली रूढीवरी ज्यांनी ।
सिद्धगिरी संदेशी संदेशचि देती जे आवर्जुनी ।।१०।।
ऐसीया मूळपीठा प्रेमेची दासराम वंदितसे ।
सिद्धगिरीश्वर पदी या अकरा ही बिल्वपत्र अर्पितसे ।।११।।
कैवल्यधामी हनुमत् समाधीसी स्वगृहीच गोविंद ।
सिद्धगिरीश्वर भेटती चिमडपंथा काय वानु स्वानंद ।।१२।।
अहं ब्रह्म हे विसरूनि उरला तो भ्रम जगासी दावियले ।
गुरूबंधु बहु जमवुनी शिवरात्रीचे महत्व वाढविले ।।१३।।
श्रीदासराम लेखन वही क्र.८९ त्रैमासिक सिद्धगिरी संदेश दि.जून,१९७५

### ३. श्रीमामासाहेब दांडेकर श्रद्धांजली काव्य

श्रद्धांजली दिन आजिचा हेलवे मनाला ।
श्रद्धांजली अर्पण करू शंकरा शिवाला ।।ध्रु.।।
विष्णुबुवा जोग जया करिती निजकृपेला ।
ज्ञानेश्वरीचा झेंडा जगी फडकविला ।।१।।
ब्रह्मचर्य व्रत ज्यांचे नेमनिष्ठ धाला ।
पंढरपूर आळंदी या वारीचा सोहळा ।।२।।
हरिकीर्तनी रंगे जो विसरवी जगाला ।
देहभाव नुरे जया भक्तीभाव ल्याला ।।३।।
विद्वत्ता गाढ जया तत्त्वज्ञची झाला ।

शतवर्ष आयु हे लाभावे श्रीकवीश्वरालागी ।
परमेश्वरासी प्रार्थना मनोमनी आणि याची सत्संगी ।।६।।
सद्भावपुष्प ऐसे समर्पिले श्रीपदी गुरूदत्ता ।
दासराम हा पायी सुमनेचि ठेवीतो स्वये माथा ।।७।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

## ६. श्रीनृसिंहसरस्वती मठीमध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराज चित्र स्थापना प्रसंगीचे काव्य

पावन दिन आजि सुदिन उगवला मना रे ।।ध्रु.।।
नृसिंहसरस्वती मठी सोहळा भला रे ।
श्रीज्ञानेश्वर विष्णु येथ पातले रे ।।१।।
प्रथम कर्ता गोविंदजी रेखांकित करी रे ।
शांतारामस्तवी रुजवी मधुकर जीव बा रे ।।२।।
श्रीमंत नि ऋषितुल्य माधव श्रेष्ठी रे ।
स्थापियली वृत्ती ऐसी क्षेत्र आळंदी रे ।।३।।
गुरूनाथे कैसे हे घडविलेचि सारे ।
हनुमंत दासराम वंदी सत्पदा रे ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१२९

## ७. श्रीपांडुरंग विजय या ग्रंथावरील काव्य

कुलकर्णीसह नरहरीची । ओंजळ भरे सुमनांची ।।१।।
काय ही प्रसन्नता त्यांची । द्विगुणित शोभा भक्तीची ।।२।।
पूजा जहाली या मनीची । आर्ती पुरविली भक्तीची ।।३।।
गोडी लागली चरणांची । पांडुरंग विजयी विजयी हो राम तया आर्चीं।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.५०

उभा विणा केला पारायण सोहळा । बोलीलो समयाला चार शब्द ।।३।।
फुलाचिया परी बर्गे यांनी नेले । दर्शन जाहले तेलीयांचे ।।४।।
निंबरगीमहाराजे योग हा आणिला । पुढे उभा केला नाथपंथ ।।५।।
घेवारी यांची इच्छा पूर्ण झाली । प्रेमे संतोषली संतमाता ।।६।।
तात्यामहाराजे दिलीसे सुपारी । प्रेमे धरीली करी दासरामी ।।७।।

श्रीदासराम लेखन वही क्र.१५८

## ११. श्री.मोरबा कुलकर्णी (भजनपटू) यांचेवरील काव्य

श्रीनारायण भक्तराजचि जया भजनी आनंदु करी ।
मामा बोलती नेहमी हरिकथे की मौज केली खरी ।
कृष्णाजीसुत श्री मयुर बरवे भजनीपटू जाहले ।
संकेश्वर श्री शंकराचार्य जगद्गुरू हे जयाप्रती पदवी ही देती भले ।।१।।
सोनोपंत प्रसिद्ध संत जगती जे शोभती पंढरी ।
विद्वद्वर्य आचार्य निस्पृहचि जे वैराग्य ज्या अंतरी ।
संकीर्तन निरुपमेचि पाहता ते स्फुर्ती ज्या सत्वरी ।
लाभे या मयुरा नितांत सुमने घोषे कई अंबरी ।।२।।
मामांचे चरणी जया स्फुरण ते काव्यासी या जाहले ।
संतश्रेष्ठ तुका जया हरितुके तेथे पदी जागले ।
काव्याची सुमने सुगंधीत अशी गुंफोनिया प्रेमळे ।
पुष्पांचा खलु हार वाहुनी पदी काव्येचिया शोभले ।।३।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२६३

## १२. सिटी हायस्कूल हीरक महोत्सव प्रसंगी केलेले काव्य

सांगली शिक्षण संस्था उभारिली ज्यांनी । थोर महात्मे तेचि आम्हा पूज्य स्थानी ।।ध्रु।।
सुसंस्कृत शिक्षण हे दिधले जै छात्रा । ज्ञानदान पवित्रचि ऐसाचि पवित्रा ।।१।।
दृष्टीपुढे सद्विद्या नसे स्वार्थ जेथे । विद्यार्थी बोलताती परमार्थचि येथे ।।२।।

## १४. गुरूपौर्णिमेनिमित्त पुष्पांजली

धन्य ते वामन दत्तरूप झाले । तयांची पाऊले श्रेष्ठ जगी ॥१॥
गुरुपौर्णिमेसी तयांचे पूजन । सुवर्णाचा क्षण ओळखावा ॥२॥
हेचि व्यासपूजा मनी उमगावी । तरीच पदवी परमार्थी ॥३॥
रोटीथोर तेचि थोर रोटी त्यांची । संगती तयांची असो द्यावी ॥४॥
दासराम करी चरणा वंदन । मना समाधान तेणे मिळे ॥५॥

श्रीदासराम लेखन दि. आषाढ शु.पौर्णिमा शके १९०८

## १५. श्रीगुरूदेव रानडेसाहेब जन्मशताब्दी निमित्त प्रेमपुष्पांजली

रानडे म्हणजे नेम नेमचि रानडे भले ।
सांगती स्वरूपानंद यात सर्वची आले ॥१॥
शताब्दि गुरूदेवांचा शताब्द करती पहा ।
योगचि आगळा ऐसा योगायोगे गमे पहा ॥२॥
तात्या केळकरांनी ही केली पुनीत सांगली ।
भली असे पहा कैसी नवाई वाटते मुळी ॥३॥
अमलानंदजी तैसे माधवानंदही आले ।
तुळपुळे श्रेष्ठ भक्तीचे वरप्रदची जाहले ॥४॥
मामांचा गुरुदेवांचा सहयोगची आगळा ।
नेमिला गुरूलिंगानी अपूर्व वाटतो मला ॥५॥
दासराम समर्पितो प्रेमपुष्प मनी जसे ।
हनुमंत गुरूनाथे ऐक्य हे दाविले कसे ॥६॥

श्रीदासराम लेखन दि.९.७.१९८६

## १६. श्रीदासराममहाराजांनी स्वतःचे साठीशांती निमित्त केलेले पद

जरी का झाली साठी । साठी तरी कशासाठी ॥१॥
जरी व्यक्तीचिये साठी । तरी व्यक्ती काय मोठी ॥२॥

## १९.
## श्रीमामामहाराज केळकर दीपलक्ष्मी विशेषांक समर्पण काव्य

मामांचा विशेषांक प्रकट हाती येई । दर्शन हे मामांचे समाधान होई ।।ध्रु.।।
हनुमत्गुरू पूर्णकृपा त्यांची हे नवाई । उपासना मामांची काय ते कमाई ।।१।।
चिमडपंथ गौरवांक वाटतो मनाला । जरी असे की मामांचा भला लाभ झाला ।।२।।
आशीर्वाद सद्गुरूंचा घडविताती सारे । त्यांचे मनी जे येई घडे सहज बा रे ।।३।।
प्रेरणा ही नानांची त्वरा वसंताची । तळमळ मनी रायकरा साकारली साची ।।४।।
केशव आणि नरहरी सहाय्य करती ज्याते । परंपरा ही उजळली समाधान चित्ते ।।५।।
दीक्षित मुळगावकर चित्र काढती जे । मामांना प्रत्यक्षचि दावित नीजतेजे ।।६।।
सुमन आणि सुनील तो स्मृती मनासी होई । अनंतात विरले जे थोर परीक्षा ही ।।७।।
महाराजे मनोधैर्य देऊनिया सर्वा । दिव्यातुनी घडविली ही विशेषांक सेवा ।।८।।
मनःशांती सर्वांना द्यावी महाराजे । प्रार्थना ही पुनःपुनः करितो अधिराजे ।।९।।
गुरूपीठा वंदुनिया नतमस्तक होई । पर्वकाळ साधुया ठेवुनी पदी डोई ।।१०।।

श्रीदासराम लेखन दि.०३.०२.१९७१

## २०. श्रीहरेरामपंत बोडस यांचेवरील काव्य

हरेराम बोडस जे धन्यचि जहाले पहा इया जगती ।
मातृपितृ प्रभूसेवा साधुनिया जे कृतार्थचि होती ।।१।।
एकादशीप्रती जे सांगती ज्ञानेश्वरी खलु प्रेमे ।
निरुपणी ते तल्लीन प्रासंगिक होत काय हरिनामे ।।२।।
विद्वन्मंडीत असुनी भक्तीने जहालेची मंडीत जे ।
द्विगुणीत होय शोभा सत्संगती लाभली जया तेजे ।।३।।
प्राणी डॉक्टर तेविच गुरूभक्ती लाभली जया अंगी ।
वामनराव गुळवणी कृपा करे शांती सौख्य सर्वांगी ।।४।।
चमत्कृती नसताही नमस्कृती होय ही अशी पहाता ।
चमत्कार हा मोठा सत्कारा आणवीच हरिसत्ता ।।५।।
वारकरी पंथाचे अध्वर्यू संत येती प्रेमाने ।

त्वदीय वस्तु योगेश तुभ्यमेव समर्पये ।।१०।।
पंचवक्त्र-प्रसादोऽयं साक्षात् श्रीसद्गुरोःकृपा ।
सद्भाग्येनाधुना प्राप्ता हालसिद्ध प्रसादतः ।।११।।
अखंड सततं येन कीर्तितं नाम कीर्तनम् ।
कल्याणं साधितं चैव एकनाथो द्वितीयकः ।।१२।।
तस्य गाथा अभंगानां ग्रथिता साधुतुष्टये ।
अर्प्यते दासरामेण सिद्धपंचकमूर्तये ।।१३।।
।। इति श्रीमद् 'अमृतवाणी'-अर्पण-पत्रिका-श्रीसद्गुरू- श्रीपंचसिद्ध-
सेवायां 'दासरामेण'- परम भावभक्त्या समर्पिता अस्तु ।।

## २२. श्रीगोविंदचरितमानस या ग्रंथावरील - सुमन गुच्छ

गोविंदचरितमानस लेखक जे धन्य सत्य नरहरी ।
साकार करी मामा निराकार जरी जसा नरांत हरी ।।१।।
रामचि सखा जगाचा, सखाराम करी प्रकाश ग्रंथाला ।
म्हणुनि प्रकाशन ज्यांचे, प्रकाशकु एक योग्यचि गमला ।।२।।
शंकर गौरविती बहु गोविंदा जाणुनि सुसंताते ।
संतचि संता जाणती या उपरी काय बोलू मी त्याते ।।३।।
आमुचे मामा भरले ग्रंथांतरी नी तसेच जगतात ।
सुविचार सुमनमाला मामांते अर्पि राम हा येथ ।।४।।
तृतीया कथा गुरूंची कीर्तन-सरिता अखंड ओघवती ।
केशव स्तवितो सुमने अखंडचि तीच सत्य गोड स्मृती ।।५।।
श्रीहनुमत्गुरूंचे छत्र शीरावरी असेच मामांचे ।
स्मरूनी सदा तया ते समर्पितो सत्कृती मने वाचे ।।६।।

## २३. हनुमत्सद्गुरूदर्शन स्तोत्र ग्रंथासाठी मांगलिक आशीर्वाद

श्रीगुरुतृतीया स्तोत्र । लिहिले असे स्वतंत्र ।

## २५. श्रीतुकाराम चरित्र ग्रंथासाठी काव्य आहेर

श्रीनारायण संतराज म्हणती भजनी आनंदु करी ।
मामा बोलती नेहमी हरिकथे की मौज केली खरी ।
कृष्णाजीसुत श्रीमयूर बरवे भजनीपटू जाहले ।
संकेश्वर आचार्यचि पदवी ही प्रेमेचि देती भले ।।१।।
सोनोपंत प्रसिद्ध संत जगती जे शोभती पंढरी ।
विद्वद्वर्य आचार्य निस्पृहचि जे वैराग्य ज्या अंतरी ।
भाग्याने जाहली कृपा म्हणुनिया ते स्फुर्ती ज्या सत्वरी ।
लाभो या मयूरा नितांत सुमने घोषे कई अंबरी ।।२।।
मामांचे चरणी जया स्फुरण ते काव्याचिया जाहले ।
संतश्रेष्ठ तुका जया हरितुके तेथे पदी जागले ।
काव्याची कुसुमे सुगंधित अशी गुंफोनिया प्रेमळे ।
पुष्पांचे खलु हार घालुनि गळा सेवेचिया शोभले ।।३।।

श्रीदासराम लेखन सन १९६५

## २६. संतसहस्रनाम ग्रंथ प्रकाशन समयीचे काव्य

नारायण संत सहस्रनाम आगळे रे । संत वाङ्मया शोधुनि सार काढियेले ।।ध्रु.।।
व्ही.के.कुलकर्णी कसे एकनिष्ठ गमले । आयुष्याचे चीजची बहुमौलिक केले ।।१।।
निंबरगीमहाराजे अजरामर जहाले । एकशतावरी एक होती भक्ती सोहळे ।।२।।
वैभव हे पाहुनिया मन माझे धाले । दासराम चरणावरी जन्म जन्म लोळे ।।३।।

श्रीदासराम लेखन दि.२१.०४.१९८६

## २७. स्वामी चिन्मयानंद श्रीरामनिकेतनमध्ये आले होते त्याप्रसंगीचे काव्य

चिन्मयानंदजी आले । सांगली क्षेत्र हे पुनितची झाले ।।ध्रु.।।
सारे विश्वची पहाता चिन्मय । ते का आहे सांगा मृण्मय ।

दासराम हालसिद्धा गुरूलिंगा प्रार्थितोचि नीळकंठा ।
बळवंत थोर होवो बलिष्ठची भक्ती मागी या सुभटा ।।६।।
श्रीदासराम लेखन मार्गशीर्ष शु.११ शके १९०५

## २९. श्रीसेनामहाराज मंदिरात तैलचित्र अनावरण प्रसंगीचे काव्य

पुण्यकाळ आजिचा हा उगवला भला रे ।।ध्रु.।।
सेनाजी भक्त थोर । मानिती ज्या ज्ञानेश्वर ।
संमेलन संतांचे । सहजची सुकाळ रे ।।१।।
संमेलन श्रीसमर्थ । संतांचे प्रस्थापित ।
सामर्थ्याने समर्थ । म्हणुनी योग तो रे ।।२।।
श्रीहनुमतपुत्र थोर । बाबुरावजी गुरुवर ।
भाग्य आम्हा सांगलीचे । संत येती तेथ रे ।।३।।
सद्गुरू प्रेरणेचि । स्वारी आली श्रीमंतांची ।
स्थापना ही सेनाजींची । योग लाभला रे ।।४।।
समारंभ चालकानी । संधी दिली ही पर्वणी ।
सेनाजी संतपदी । दासराम वंदी रे ।।५।।
श्रीदासराम लेखन श्रावण वद्य ९ शके १८८३

*****

ते निष्ठा मम अंतरंगी विलसो ऐसी गुरो याचना ।
चरणांबुजि विनम्र राम स्वमनी कुर्यात सदा मंगलम् ।।४।।
कैवल्यालयी थोर वास करिती चुलते रघुनाथजी ।
वहिनी शोभती त्यापरीच उपरी आशीर्वचा देत जी ।
सरोजनी ही माधवासी भगिनी शुभचिंतना ते करी ।
पावो ऐक्य मुदे सुखे वधुवरा कुर्यात सदा मंगलम् ।।५।।

## २. श्री. केशव वामन आपटे

सावित्री जशी सत्यवान पतिला श्रीजानकी राघवा ।
कृष्णाची जशी रुक्मिणी तदुपरी श्रीअंबिका श्रीशिवा ।
तेविया सुमने दिसे सुमनही की सद्‌गुणी केशवा ।
विद्याशील कृती सुसंगम घडो कुर्यात सदा मंगलम् ।।१।।
विद्या रत्नकरी विभूषित पहा विद्वन्मणी वामना ।
लक्ष्मी जोड दिली विनम्र विनये जे तोषवी सज्जना ।
शीलाची करी जोड ही सुमन ते की केशवाच्या मना ।
पावो ऐक्य सुखे चिरायु सदनी कुर्यात सदा मंगलम् ।।२।।
माता आणि पिता तई परी सखा रामा स्वये मानिका ।
आशीर्वादचि देती त्याच करवी पाहोनिया कौतुका ।
ही लीला करी साईनाथ उपरी नारायणी जो तुका ।
श्रीगुरुलिंग करी कृपाचि विभवे कुर्यात सदा मंगलम् ।।३।।
आले सज्जन नी सुविद्यचि भले साधावया मंगला ।
झाला संगम पाहता समसमा जो वानिजे चांगला ।
संसारी परमार्थ चित्त खुलवी हा लाभची लाभला ।
विद्या शील जिथे तिथे विजयची कुर्यात सदा मंगलम् ।।४।।

दि.१७.०६.१९५३

कृष्णाची जशी रुक्मिणी तदुपरी श्रीअंबिका श्रीशिवा ।
योगिनी उपरी तशी खलु तरी यशवंतराया गमे ।
संसारी परमार्थ हा तरी घडो कुर्यात सदा मंगलम् ।।३।।
आला हा बहु चांगदिन आजिचा साधीतसे मंगला ।
मांगल्ये बरवा मुहूर्त खलु तो मंत्रादिकी शोभला ।
गार्हस्थ्याश्रम श्रेष्ठचि गमतसे सर्वाश्रमी चांगला ।
पावो ऐक्य मुदे चिरायु सदनी कुर्यात सदा मंगलम् ।।४।।
दिनांक ७.६.१९६४

## ५. श्री. प्रकाश सदाशिव भावे

अधिष्ठा कुलदेवता ही पहाता वंशी आभास असे ।
अधिष्ठान तिचे म्हणोनि जुळले धागे पहा हे कसे ।
आशीर्वाद तिचा खराचि बरवा ठावे तिला हे नसे ।
पावो ऐक्य मुदे सुखे वधुवरा कुर्यात सदा मंगलम् ।।१।।
आले श्रीगुरुलिंग पूर्ण विभवे साधावया मंगला ।
मांगल्ये बरवा मुहूर्त खलु तो मंत्रादिकी शोभला ।
गार्हस्थ्याश्रम हा विचार करिता सर्वाश्रमी चांगला ।
गोविंदासी आनंद भक्तीसुमने कुर्यात सदा मंगलम् ।।२।।
माता आणि पिता नी बंधु भगिनी जे लाभले या कुळा ।
तेथे हा सुत तो प्रकाशचि पहा प्रेमेचि जोपासिला ।
रेखा ही विलसे तया पदी अशी हा योगची आगळा ।
झाला संगम हा कसा समसमा कुर्यात सदा मंगलम् ।।३।।
रेखा आणि प्रकाश भौतिकगुणे अविलग जे राहती ।
अध्यात्मिकपणे तसेचि पाहता त्यांची दिसे संगती ।
रेखांकित प्रकाश कीर्ण पहाता अद्वैत चित्ती अहा ।
सिद्धी अमृतयोग थोरचि दिसे कुर्यात सदा मंगलम् ।।४।।
संसारी परमार्थ साधित जरी निश्चित ये श्रेष्ठता ।

वाढो यावरी भक्ती ही सततची कुर्यात बटोर्मंगलम् ।।४।।

## ८. श्री. संजय कोटणीस यांचे मुंजीचे मंगलाष्टक

आले श्रीगुरुलिंग सिद्ध ही इथे संपूर्ण ची वैभवे ।
तेवी श्रीरघुनाथप्रिय बरवे श्रीरामचंद्रासवे ।।
आक्कामाऊली मोक्षलक्ष्मीसह श्रीहनुमत रघुनाथजी ।
आशीर्वादचि देती बटुप्रती कुर्यात सदा मंगलम् ।।१।।
श्रीगुरुनाथ पिता सुमात हि उषा तेवी आजी जानकी ।
श्रीकांतापरि साधुवृत्ती चुलता हे भाग्य ज्या लौकिकी ।
ऐसा की रघुनाथ बाल बटुश शोभे कसा एथजी ।
गायत्री गुरुमंत्र त्या सफलहो कुर्यात् बटोर्मंगलम् ।।२।।
आला हा बहु चांग दिन आजिचा साधावया मंगला ।
मांगल्ये बरवा मुहूर्त खलु तो मंत्रादिकी शोभला ।
आण्णांची तरी प्रेमदृष्टी विसले आनंद तोचि भला ।
संस्कारात द्विज उक्ती हि बहु भली कुर्यात बटोर्मंगलम् ।।३।।

## ९. श्री. नारायण केशव आपटे यांच्या मुंजीचे मंगलाष्टक

आली ही कुलदैवते सुसमया साधावया मंगला
तेवी श्रीगुरुलिंगजंगमकृपे आशीश हा लाभला ।
गायत्री गुरुमंत्रराज बरवा कर्णी जया वोतिला ।
लाभो ज्ञान निके सदैव बटुसी कुर्या बटोर्मंगलम् ।।१।।
विद्वन्मंडित जो बहुगुणी ऐसा पिता केशव ।
मायाही बरवी सुमात जगती माया करी लाघव ।
नारायण सुपुत्र शोभत पहा माते गमे माधव ।
मौजीबंधन साधुनी बटु भला कुर्यात् बटोर्मंगलम् ।।२।।

आले श्रीगुरुलिंगजंगम पूर्ण विभवे मुहूर्त संपादुनी ।
आजे आणि आजी प्रसन्न बरवे हा सोहळा पाहुनी ।
आशिर्वादचि देति ते बळटुस या कुर्यात् बटोर्मंगलम् ।।२।।
पांडुरंग पिता सुमात हि तशी ज्या मंजुषा लाभली ।
हनुमंत प्रसन्न जेथ मिरवे प्रेमेचिया सत्कुळी ।
मौजीबंधन साधुनी निजगुणे संपादुनी ज्ञान ते ।
व्हावा हा कुलदीपकू तदुपरी कुर्यात् बटोर्मंगलम् ।।३।।

*****

भाग क्रमांक - २

# श्रीदासराममहाराज लिखित संकीर्ण वाङ्मय

## गद्य विभाग


| प्रकरण क्र. | तपशील |
|---|---|
| १. | कैवल्य वैभव या ग्रंथामधील कूट अभंगावरील श्रीदासराममहाराज लिखित संक्षिप्त टीपा |
| २. | श्रीदासराममहाराज लिखित अध्यात्मिक संज्ञा व स्पष्टीकरण |
| ३. | श्रीदासरामहाराज यांची प्रश्नोत्तरे, टिपणे, प्रासंगिक कीर्तने, मुलाखत व पत्रे |
| ४. | श्रीदासराममहाराज लिखित निबंध (१२) |
| ५. | श्रीदासराममहाराज लिखित संतांची संक्षिप्त चरित्रे व माहिती |
| ६. | श्रीदासराममहाराज यांच्या जपाची नोंद |
| ७. | श्रीदासराममहाराज लिखित भीमरूपी स्तोत्राचा गद्यार्थ |
| ८. | प्रा.डॉ.के.वा.आपटे संकलित, श्रीदासराममहाराज यांच्या जीवनातील कालानुक्रमे घटना व प्रसंग |
| ९. | श्रीदासराममहाराज लिखित विविध ग्रंथांसाठीचे अभिप्राय व इतिवृत्त. |
| १०. | श्रीदासराममहाराज लिखित त्यांचे अमृतहस्ते झालेले समारंभ व महत्वपूर्ण घटनांची यादी |
| ११. | श्रीदासराममहाराज संकलीत ५४ देहांची यादी. |


-

१२. श्रीदासराममहाराज लिखित तिथीनुसार
जयंती व पुण्यतिथी यादी

१३. श्रीदासराममहाराज यांच्या लेखन वह्यातील उपलब्ध
नोंदीनुसार त्यांच्या लिखित वाङ्मयाचा तारीख, वार,
तिथी, शके, सन नुसार तपशील

१४. श्रीदासराममहाराज लिखित गुरुलिंग गीतेतील पदांचा
तपशील दर्शविणारा तक्ता

–

**पूरक संत अवतरणे -** अ) मुंगीचे मुखी त्रिवेणी गंगा - नामदेव ब) संसार सागर सागर - माणकोजी बोधले क) दया क्षमा शांती हेचि वाळवंट - एकनाथ ड) नाम शर्करा गोड - अमृतराय, इ) वाळवंटी साखर पडे । गज येऊनी काय रडे । - तुकाराम, ई) देह पाचाचा पाच जण नेतील - एकनाथ उ) दहा आणि एक अकरांचा खेळ - दासराम ऊ) पाचा पासोनि पंचवीस - समर्थ ए) छत्तीस तत्त्वांचा हरि झाला - एकनाथ.

**३) सत्वर पाव गे मला । भवानी आई रोडगा वाहिन तुला ।।१।। सासरा माझा गावी गेला । तिकडेच खपवी त्याला ।।२।। सासू माझी जाच करती । लवकर निर्दाळी तिला ।।३।। जाऊ माझी फडफड बोलती । बोडकी कर गे तिला ।।४।। नणंदेचे पोर किरकिर करिते । खरूज होऊ दे त्याला ।।५।। दादला मारून आहुती देईन । मोकळी कर गे मला ।।६।। एका जनार्दनी सगळेचि जाऊ दे । एकटीच राहू दे मला ।।७।।**

(एकनाथ - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.३० पा.नं.२७५)१०.३.४३

**टीपा :** १) भवानी - निर्गुण देवता २) सासरा - अहंकार ३) सासू - कल्पना ४) जावा - माया-ममता ५) नणंदेचे पोर - मोह ६) दादला - लोभ

**पूरक संत अवतरणे -** अ) अनादी निर्गुण प्रगटली भवानी - एकनाथ ब) माया ममता जावा यांनी मांडियली दैना - मुक्ताबाई क) लोभ माझा दादुला सखे बाई भलतीकडे जातो - मुक्ताबाई ड) जनी म्हणे खंड्या अवघेच मरू दे - जनाबाई.

**४) परेस सद्गुरूराया रे ! खेळया । परेस सद्गुरूराया रे ।।ध्रु.।। देव पुजू गेला देऊळ उडाले परेस सद्गुरूराया रे । चिंचेच्या पानावर देऊळ रचिले आधि कळस मग पाया रे ।।१।। दोही तोंडी हरिणी पाण्यावर**

३) रामा - स्त्री/वासना ४) गाय - गो नाम इंद्रियवृत्ती ५) गाढवाचे - गाढ वाचेने ६) बहीण - भक्ती ७) भाव - भाऊ- भाव

**पूरक संत अवतरणे -** अ) मायबाप वोखटे त्यजू म्हणसी ब) अहंकार अविद्येचे कोरड्या- ज्ञानेश्वरमहाराज क) वासना बायको शेजारीण - एकनाथ ड) एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही - रामभाऊमहाराज इ) मुकुंदराज म्हणे गोलिंगा माझारी - मुकुंदराज ई) फट गाढवाच्या लेका - एकनाथ उ)भक्ती ते बहीण भाऊ भावपूर्ण - दासराम.

**६) नवल वर्तले नवल वर्तले नवल गुरूचे पाई । कापूर जळून गेला परि ते काजळी उरली नाही ।।ध्रु.।। साकर पेरून ऊस काढिला कान झाला डोळा । निबर बायको भ्रतार तान्हा सासरा तो भोळा ।।१।। नवल मायवो नवल मायवो नवल चोजवेना । डोहामाजी मासोळीने वाचविले जीवना ।।२।। नवल वर्तले नवल वर्तले नवल चक्रपाणी । गोकुळ चोरून नेले तेथे कैची दासी जनी ।।३।।**

(जनाबाई - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.२५ पा.नं.२७३)

**टीपा :** १) कापूर - ४ देह २) काजळ - अज्ञान ३) ऊस - ब्रह्मरस ४) कान - श्रवण ५) डोळा - प्रचिती ६) निबर बायको - माया ७) तान्हा भ्रतार - ब्रह्म ८) सासरा - सतहंकार ९) डोहा - विज्ञान १०) मासोळी - मन ११) जीवन - जीव १२) गोकूळ - देह

**पूरक संत अवतरणे -** अ) कापूराची वाती उजळली ज्योती - ज्ञानेश्वर ब)जा जा जा तुम्ही झटका रे ... घ्या नामरसाचा घुटका - समर्थ क) श्रवणाचा झाला विज्ञान डोहो - जनाबाई ड) प्रकृती कामारी - ज्ञानेश्वर इ)रुप कोवळे कोवळे - गुलाबरावमहाराज ई) माझे तीन हो सासरे... तीजा सज्जन तो विचरे - मुक्ताई उ) मनोमासा ओळखावा - एकनाथ ऊ) जीवन कळा ते जीवन - एकनाथ. ११.०३.४३

**७) स्वप्नामाजी सभा बैसली अद्भूत । करी न्याय नित ज्ञातेपणी ।।१।।**

**मुका पुराण सांगे बहिरे ऐकत । आंधळे न्याहाळीत अक्षरासी ।।२।। थोटे लेहू जात पांगुळे धावत । वेडे शिकवित शहाण्यासी ।।३।। तैसा हा संसार मायिक विस्तार । जन्म-मरण थार कैचा असे ।।४।। सावध होवोनि पावे स्वरूपासी । हरि म्हणे त्यासी भय नाही ।।५।।**

(हरिबुवा - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.७१ पा.नं.२८८)

**टीपा** : १) मुका - मूक २) थोटे - देणे-घेणेचे अतीत ३) वेडे - वेड लागलेले.

**पूरक संत अवतरणे -** अ) वाचेवीण बोलणे - मुकुंदराज ब) श्रोतेविण ऐके नेत्रेविण देखे - हरिबुवा क) लिहू जे शिकलो ॐ श्रीराम ड) महामूर्ख तो पंडिता बोधीताहे - समर्थ. ११.०३.४३

८) **काट्यांच्या अणिवर वसती तीन गाव । दोन ओसाड एक वसेचि ना ।।१।। वसेचि ना तेथे आले तीन कुंभार । दोन थोटे एक घडीच ना ।।२।। घडीच ना त्याने घडली तीन मडकी । दोन कच्ची एक भाजेचि ना ।।३।। भाजेचि ना त्यात रांधले तीन मुगे । दोन हिरवे एक शिजेचि ना ।।४।। शिजेचि ना तेथे आले तीन पाहुणे । दोन रुसले एक जेवीच ना ।।५।। जेवीच ना त्याला दिल्या तीन म्हसी । दोन वांझा एक फळेचि ना ।।६।। फळेचि ना तिला झाले तीन टोणगे । दोन मेले एक वाचेचि ना ।।७।। वाचेचि ना त्याचे आले तीन रुपये । दोन खोटे एक चालेचि ना ।।८।। चालेचि ना तेथे आले तीन पारखी । दोन आंधळे एक दिसेचि ना ।।९।। दिसेचि ना त्याला मारल्या तीन बुक्या । दोन हुकल्या एका लागेचि ना ।।१०।। ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव । सद्गुरूवाचोनि कळेचि ना ।।११।।**

(ज्ञानेश्वर - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.१ पा.नं.२६६)

**टीपा** : १) काट्याची अणी - चित्त  २) तीन गाव - पहाणेपण, पहाणे, शून्य ३) कुंभार - जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा  ४) मडकी - रामकृष्ण महाशून्य अग्निरूप  ५) मूग - अज्ञान ज्ञान विज्ञान  ६) पाहुणे - राम कृष्ण हरि  ७) म्हशी - स्वात्मता आनंदता निःशब्दता  ८) टोणगे - निर्गुण अलक्ष्य निरंजन  ९) रुपये - कर्म उपासना ज्ञान (भक्ती) १०) पारखी - विश्व तैजस प्राज्ञ  ११) बुक्क्या - स्वेद कंप रोमांच.

**पूरक संत अवतरणे -** अ) सद्गुरूवाचोनि नुमजे ही मात - वामनकाका ब) हे खुण गुरू जाणे - उद्धव चिद्‌घन. १२.०३.४३

**९) ऐसा गे माय कैसा हा योगी । जे ठायी जन्मला तो ठाव भोगी ।।ध्रु.।। माय कुमारी बाप ब्रह्मचारी । एकवीस पुत्र झाले उदरी ।।१।। आचार सांडोनि झाला से भ्रष्ट । मावशीसी जेणे लाविला पाट ।।२।। आणिक याचे नवल सांगू मी काई । बहीण भोगिली एकेचि ठायी ।।३।। पितयाचा अंश घेऊनी आला । मातेसी जेणे उपभोग केला ।।४।। ज्ञानदेव म्हणे अनुभवे जाणे । अनुभवावाचोनि काहीच नेणे ।।५।।**

(ज्ञानेश्वर - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.२ पा.नं.२६७)

**टीपा** : १) ठाव - आत्मरूप  २) माय - माया  ३) बाप - ब्रह्म ४) एकवीस पुत्र - २१ स्वर्ग  ५) मावशी - ममता  ६) बहीण - भक्ती

**पूरक संत अवतरणे -** अ) अनुभवावाचोनि । काय सांगसी कहाणी - तुकाराम  ब) अनुभवे अनुभव अवघाचि साधिला - तुकाराम. १२.०३.४३

**१०) पार्वतीवर । नमिला म्यां शिवशंकर ।।ध्रु.।। शंभू कैलास शिखरी । पार्वती आदिमाया सुंदरी । बैसुनि शंकराचे शेजारी । जोडूनी कर ।।१।। गिरिजा पुसे शंकरासी । तरी मी काय होय तुम्हासी। शंकर म्हणे माता होशी । मी तुझा कुमर ।।२।। ऐकुनि बोलली गिरिजा । मी तर तुमची आत्मजा । तुम्ही पिता शंभूराजा । माझे माहेर ।।३।।**

**वाटा । जन चोहटा नागविले ।।२।। नागविला चोहाटीचा वाणी । आणिक नेली प्रभुची गोणी । शेळी आली लांडगा घेऊनी । गाढव बंदीखानी बोंबलत ।।३।। एका संन्याशाने कुतरे खादले । गावच्या खाटका प्रायश्चित्त दिले । बापुडे कुंभार नागविले । डोचके फोडिले म्हातारीचे ।।४।। ऐशा सिद्धांतीच्या खुणा । एक जाणे पंढरीराणा । विष्णुदास नाम करी विज्ञापना। संत प्रेमळ जाणती ।।५।।**

(नामदेवमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.१९ पा.नं.२७१)

**टीपा :** १) ब्राह्मण - ब्रह्म जानाति ब्राह्मणः । २) घर - परे परते ठिकाण ३) खाण - शून्य - आकाश विवर ४) सात चोर - सात धातु ५) एक मुसळ - अहंकार ६) बापुडे ब्राह्मण - ब्रह्मा विष्णु शंकर ७) नागविले - मूळ प्रकृतरूपात उपाधीरहित पाहिले ८) वोसगाव - शून्य ९) हनुमंत - वायुस्वरूप आत्मभाव १०) खोटा - खरा ११) बाप जुनाट - भगवान १२) चोरटा - श्रीकृष्ण १३) मारुनी - जीवभाव नाहीसा करून १४) दाही वाटा - दहातून हिंडून दहाच्या वाटेने १५) जन - इंद्रियवृत्ती १६) चोहटा- चार वाटा जेथून फुटतात ते बिंदुरूप १७) चोहाटीचा वाणी - चार शून्यात व्यापार करणारा १८) गोणी - भांडवल १९) शेळी - मनाची मूक वृत्ती २०) लांडगा - काळ २१) गाढव - गाढ वाचारूप जीवभाव २२) बोंबलत- प्रणव गर्जना २३) एक संन्यासी - सर्व त्यागी २४) कुतर - कु-नाम द्वैतापैल असलेले मन २५) खाटीक - यम २६) कुंभार - जीवात्मा शिवात्मा परमात्मा २७) म्हातारीचे डोके - मायेची आशा.

**पूरक संत अवतरणे -** अ) परे परते घर - नामदेव ब) काट्याच्या आणीवर वसती तीन गाव । दोन ओसाड एक वसेचि ना । - ज्ञानेश्वर. दि.१३.०३.४३

**१२) हरणाचे भेणे चिता पळोनिया गेला । नाग जन्मला गायी पोटी ।।१।। श्वानाचिये पाठी ससे लागीयेले। अंधारे गिळीले सूर्यासी।।२।। मुंगीयेच्या डोळा हस्ती बुडोनिया गेला । वंध्यापुत्रे त्याला काढीयेले ।।३।।**

(ज्ञानेश्वरमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.४ पा.नं.२६७)

**टीपा :** १) रिंगण - आकाश २) खोडी - जीवभाव ३) हत्ती - अहंकार, हकार ४) मुंगी - मूकवृत्ती ५) पर्वती - देहवृत्ती ६) तृण - दृश्य ७) धेनू-नाम ८) तंतूपट - सोहंभाव - वायुस्वरूप ९) साळी - जीवभाव १०)वीण- एकजीव ११) पाने - चिदांकुर १२) तांबोळी - जीव १३)पोथी - ज्ञान १४) पंडित - जाणपण १५) वाचियेला - ओळख करून घेतली. दि.१३.०३.४३

**१५) आकाशात मळा लाविला बा एक । वांझेचे बालक शिंपीतसे ।।१।।
अग्निकुंड मने बालके निर्मिले । प्रत्ययासी दिले मजलागी ।।२।।
ज्ञानदेव म्हणे उफराटे पाहता । सर्व सौख्यदाता निवृत्ती एक ।।३।।**

(ज्ञानेश्वरमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.५ पा.नं.२६७)

**टीपा :** १) आकाशात मळा - चिद्रुपाची लागवड २) वांझेचे बालक - जीव ३) अग्निकुंड - अग्नि ज्या साधनेने प्रदीप्त होतो ते ठिकाण ४) मने बालके - मन आणि जीव यांचे संगाने ५) निवृत्ती - प्रवृत्ती पैल. दि.१३.०३.४३

**१६) अ) एक माझी माता दोघे जण पिता । कन्या झाल्या कांता सुत दोघे ।।१।। दोघे जण बंधु दशक बहिणी । कन्या झाल्या तिघी तिच्या पोटी ।।२।। बहीणभावाचे वाल्हाव पै केले । अघटित केले सांगवेना ।।३।। ज्ञानदेव म्हणे सांगावे हे गूढ । नाही तरी मूढ होऊनि राहे ।।४।।**

(ज्ञानेश्वरमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.६ पा.नं.२६८)

**ब) माय तेचि माता जीवशिव पिता । अवस्था त्या कांता जाण बापा ।।१।। सुत तेचि भाव विश्वास हे दोघे । बंधु जाणे चौघे पुरुषार्थ ।।२।। दशक इंद्रिये त्या जाण बहिणी । शांति क्षमा दया तीन कन्या झाल्या ।।३।। भाव भक्ती यासी स्वये झाले लग्न । देखतांचि**

**टीपा :** १) मुंगी - मूकवृत्ती २) आकाश - नादरहित शब्द ३) सूर्य - नाडी ४) वांझा पुत्र प्रसवला - जीवभाव आत्मरूपाला पाहू लागला म्हणजे आपरूप वेगळे करून द्वैतरुपाने एकत्व पाहू लागला. ५) विंचू - अहंकार ६) पाताळ - अधःपतन ७) शेष - शेषवृत्ती ८) माशी - मनोवृत्ती ९) घार - उत्क्रांत भूमिका १०) मुक्ताई - मुक्त स्थिती.

**पूरक संत अवतरणे -** अ) शब्द जो राहिला नादाते गिळोन । दासरामी गगन शून्यरूप - दासराममहाराज. दि.१३.०३.४३

**१९) असत्य न बोलो तोंडे रे खेळया! ।।ध्रु.।। मुंगीने मेदिनी धरियली माथा, वायुची बांधली मोट । सशाने सिंह फाडून खादला, तिळानं फोडिली लाठ ।।१।। शीताने सूर्य बांधला पायी, चंद्रासि झोंबला ताप । गायीने व्याघ्र फाडियला, तेणे बेडके गिळिला साप ।।२।। वाळूची बेटी थोट्याने विणली, तोंडाळ झाले मुके। पांगुळ चढला गिरीच्या माथा, गगनी फोडिले टाके ।।३।। वांझेच्या पुत्राने उदीम केला, कुपानं खादले शेत । स्त्रिविणे पुरूष बाळक व्याला, पुरला तयाचा अंत ।।४।। मुक्ताबाई म्हणे गुरूपुत्रा! आम्ही बांधली गगनी वाट । सकळ ब्रह्मांडे घेऊनी हाती, भरिला त्याचा घोट ।।५।।**

(मुक्ताबाई - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.१३ पा.नं.२७०)

**टीपा :** १) मुंगी - मूकवृत्ती २) मेदिनी - धारणाशक्ती ३) ससा - चिद्गुण ४) सिंह - नाद ५) तिळ - प्रेम ६) लाट - दृश्य ७) शीत - शीतगती ८) सूर्य-चंद्र - नाड्या ९) गाय - नाम १०) व्याघ्र - क्रोध ११) बेडुक - सत्वहंभाव १२) साप - सर्पगती १३) वाळू - दया क्षमा शांती १४) थोटा - देणेघेणेचे अतीत असलेला जीवभाव १५) टाके - स्वरूप १६) कूप - शून्यवृत्ती १७) शेत - दृश्यतत्त्व १८) पुरूष - आत्मा

९)सतरावी - जीवनकळा - अमृतधारा. १३.०३.४३

**२२) वळेना वर्षे वरवर पूर आला । तेथे जन बुडाला बाईयांनो ।।१।। बुडाला बुडाला परी म्हणताती । बुडाल्याची बुद्धी कोणी न घेती ।।२।। ऐल उडाला पैल उडाला । कोरड्याच डोही जन बुडाला ।।३।। ज्ञानदेव सांगडी मुक्ताबाई तारू । चांगा पैलपारू पावविला ।।४।।**

(चांगदेवमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.१७ पा.नं.२७१)

**टीपा** : १) ज्ञानदेव - ज्ञाना देव तु कैवल्यं २) मुक्ताई - मुक्त स्थिती ३) चांगा - चांगभाव.दि.१३.०३.४३

**२३) अबाबाबा बायको मोठी । घेतले मुसळ लागली पाठी ।।१।। अग बायको नको मारू । तुझे वासरू नेतू चारू ।।२।। बायकोने दादला गरवार केला । मनाचा मनोरथ पूर्ण झाला ।।३।। एका जनार्दनी हुडा । साही शास्त्रांचा केला चुराडा ।।४।।**

(एकनाथमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.३१ पा.नं.२७५)

**टीपा** : १) बायको - शक्ती २) मुसळ - अहंकार ३) वासरू - जीवभाव ४) दादला - शिव ५) गरवार केला - शिवरूपात आत्मरूपाची प्रचिती आली (शिवाचे ठिकाणी शक्तीभाव एकरूप झाल्यावर). दि.१३.०३.४३

**२४) एक नवल देखिले दृष्टी । पहाता पहाणे गिळिले उठाउठी ।।१।। जे निजे चोजवेना जे निजे चोजवेना । अंधारे सूर्य गिळिला जाणा ।।२।। कल्पने विरहित पुत्र झाला । कल्पना गिळुनि आपणचि धाला ।।३।। स्त्रीपुरूष नामे नटला प्राणी । एका जनार्दनी प्रत्यक्ष देखो ।।४।।**

(एकनाथमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.३४ पा.नं.२७६)

**टीपा** : १) अंधार - शून्य २) सूर्य - नाडी ३) पुत्र - जीवभाव

(तुकाराममहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.४४ पा.नं.२८०)

**टीपा :** १) जोंधळा - नाम. दि.१३.०३.४३

**२७) दादांनो! ठकडी बायको आली । भल्याभल्यासी ठकवून गेली ।।ध्रु.।। शामसुंदर सावळी । उभी नेत्राचे राऊळी । ती आकाश ब्रह्मांड गिळी ।।१।। चारी शून्याचे वरती । ज्ञानदृष्टीने न्याहाळती। चारी सूत्रे तिचे हाती ।।२।। बायको नव्हे पुरुष नव्हे । दावी नाना रंग नटभाव । जैसी आकाशी वीज लवे ।।३।। जे जे पाहू गेले तिसी । तिने झोडपिले तयासी । तुकाराम शरण तिसी ।।४।।**

(तुकाराममहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.४६ पा.नं.२८१)

**टीपा :** १) ठकडी बायको - विठाई - विज्ञान स्थिती.दि.१३.०३.४३

**२८) सप्त पाताळाचे तीरी । तेथे गंगा वाहे निळी ।।१।। तिये मध्ये खेळे मासा । माझ्या तोंडी एक ससा ।।२।। ससा मुंगीने गिळीला । दोन तोंडे त्या मुंगीला ।।३।। सहा पाय तीन वरा । आकाशाचा खाय चारा ।।४।। तिची वस्ती निरंजनी । तुका लागे तिच्या चरणी ।।५।।**

(तुकाराममहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.४८ पा.नं.२८१)

**टीपा :** १) गंगा वाहे निळी - इडापिंगलेचा ओघ सैरा दिसे २) मासा - मन ३) ससा - सकार धारणा ४) मुंगी - मूकवृत्ती ५) दोन तोंडे - रामकृष्ण ६) सहा पाय - सहा भाव ७) तीन वरा - अकार - उकार - मकार ८) निरंजन - अधिष्ठान. दि.१३.०३.४३

**२९) मात्रा गमनी जे का होती । ते तुज आवडती ।।१।। आम्हा तयाचि संगती । देई विठ्ठल श्रीपती ।।२।। परद्वारी रत नर । आम्ही तयाचे किंकर ।।३।। तुका म्हणे भांग खाऊ । बोध निजपदी राहू ।।४।।**

५) गाय - पांडुरंग  ६) चहूधारी - (चार देहात) रामकृष्णहरी शून्य. दि.१३.०३.४३

**३२) मेरुचिया माथा ऊर्ध्व गंगा वाहे । पक्षी तेथे आहे पंचरंगी।।१।। एकवीस पाय नऊ त्यासी शिरे । बावन्न हे पर नेत्र तीन ।।२।। मुखाविण चारा चरे त्रिभुवनी । वस्ती निरंजनी निरंतर ।।३।। ऐसा पक्षी बळी श्रीहरी समर्थ । तुका हृदयात पाळी तया ।।४।।**

(तुकाराममहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.५४ पा.नं.२८३)

**टीपा** : १) मेरू - मेरूस्थान  २) ऊर्ध्व गंगा - षड्चक्रावरी त्रिकुटा भितरी। त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे ।। (तुकाराममहाराज) ३) पंचरंगी - रंगातीत - पंचतत्त्वात रंग करणारा ४) एकवीस पाय - २१ स्वर्ग  ५) नऊ शिरे - इंद्रिये  ६) बावन्न पर - ५२ अक्षरे  ७) नेत्र तीन - राम कृष्ण हरी. दि.१३.०३.४३

**३३) गंधर्वनगरी क्षण एक न रहावे । तेचि करावे मूळक्षेत्र ।।१।। ख पुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावे ।।२।। वंध्यापुत्राच्या लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळा पहा वेगी ।।३।। मृगजळी पोहे घालूनी सज्ञाना । तापलिया जना तोषवावे ।।४।। तुका म्हणे मिथ्या देहेंद्रिय कर्म । ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ।।५।।**

(तुकाराममहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.५५ पा.नं.२८३)

**टीपा** : १) गंधर्वनगर - माया  २) ख पुष्प - आकाशरूपी पुष्प  ३) वंध्या पुत्र - जीव. दि.१३.०३.४३

**३४) नवल नेणो कोणी तुम्ही सांगा ब्रह्मज्ञानी ।।ध्रु.।। चहुरंगा वेगळी गाय दुभते माझे घरी । मांजर बाई चोरटे मोठे टपले लोण्यावरी ।।१।। लोण्याकडे मांजर टपले पाही गे उमाबाई । लोण्याने ते मांजर खादले**

(श्रीधरस्वामी - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.६५ पा.नं.२८६)

**टीपा :** १) पाणी - जीव २) वळचणीचे पाणी - जीवन ३) आढ्याला गेले - शिवरूप झाले ४) हात - व्यापार क्रिया ५) घागर - देहभाव ६)बाहेर पाणी - आत्मरूप ७) पाणी पाणी एक झाले - आले बांधोनी ८)शेत - नाम ९) कणसासी - फळासी १०) राखणवाला - साक्षी ११)मडके - देहभाव १२) भात - सत्वभाव १३) बकरा - सोहंभाव १४) देव कापिला - शिवभाव लयास गेला. दि.१३.०३.४३

**३७) परद्वार नाही ठाव । त्यांचा संतपणा वाव ।।१।। नाही घडले मात्रा गमन । जळो त्यांचे संतपण ।।२।। परवस्तुचा अभिलाष। करी तोचि विष्णुदास ।।३।। ऐसा संत होय कोणी । मुक्तेश्वर लोटांगणी ।।४।।**

(मुक्तेश्वर - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.४१ पा.नं.२७९)

**टीपा :** १) परद्वार - परपुरुषाचे द्वार २) मात्रा गमन - मात्रांशी एक होणे ३) परवस्तु - आत्मवस्तु श्रेष्ठ

**३८) चाल माझ्या राघो । डोंगरी दिवा लागो ।।ध्रु.।। घर केले दार केले घरी नाही वरो । सेजारणी पापिणीची पाच पोरे मरो ।।१।। घरी पाच पोरे ती मजहूनी आहेत थोर । पाचांची बाळे खादली बावन्न केले चोर ।।२।। घरी केले दार केले दुकानदार मोठा । पाटाची राणी धांगडधिंगा तिचा मोठा ।।३।। दुकान केला मोठा पदरी रुका खोटा । हिजडा म्हणसी जोगी । सोळा सहस्र भोगी चाटा ।।४।। तुका म्हणे वेगी हरि म्हणा जगी । सांडून देई सर्व काही करा भक्तीलागी ।।५।।**

(तुकाराममहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.४२ पा.नं.२७९)

**टीपा :** १) राघो - रामगतीस उद्देशून २) पापिणी - अष्टधा प्रकृती ३) पाच

हा प्राणरूप रामाचा पिता. २) रघुनाथ - रघुवंशनाथ ३) राम - आत्मा ४)हनुमंत - वायुस्वरूप ५) सौमित्र - जीवभाव ६) वनवास - देह ७) राम- नाडी ८) दिनकरा - रविप्रकाशासारख्या उज्ज्वल सिद्धांताला. दि.१३.०३.४३

**४१) मुंगीयेचे डोळा रचियेले देऊळ । आधि कळस मूळ मग पाया रे ।।१।। उदकावीण पाही भरियेले तळे । जैसे मृगजळ झेपावत।।२।।**
**हरण धावूनि चित्ता मारीयेला । गाईने भक्षीला व्याघ्र पाही ।।३।।**
**शेळीयेने सर्प सगळाची खादला । मुंगीने गिळिला गज मुखी ।।४।।**
**हरी म्हणे ऐसे न घडेचि कदा । जन्म मरण बाधा तैशा परी ।।५।।**
(हरीबुवा - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.७४ पा.नं.२८९)

**टीपा :** १) हरण - हरीवृत्ती २) चित्ता - चित्त ३) गाय - नाम ४) व्याघ्र - क्रोध ५) शेळी - शुद्ध मनोवृत्ती ६) सर्प - गती ७) मुंगी - मूकवृत्ती ८) गज - गजगती. दि.१३.०३.४३

**४२) नवलाचे नवल आज म्या देखिले । सागराचे पाणी रांजणासी आले।।१।।**
**नवल गे माये नवल गे माये । गंगा येऊनी रांजणात सामाये ।।२।।**
**निर्मळ पाणी डहुळते जहाले । डहुळले पाणी रांजणात आले ।।३।।**
**मृगजळाचे नीर रांजणी भरले । एका जनार्दनी नवलचि केले ।।४।।**
(एकनाथमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.३३ पा.नं.२७६)

**टीपा :** १) सागर - महदाकाश परमात्मजीवन २) रांजण - देहोपाधी ३) गंगा - त्रिवेणी ४) डहुळले झाले - जीवभावाला आले ५) मृगजळ नीर - भासरूप. दि.१३.०३.४३

**४३) एक जटाधारी दिसत । एक डोळे वटारूनि पहात । एक गुरकावुनी बोलत । एक गिळावयासी पहात ।।१।। ग ग ग ग कस करतंय ।**

(केसरी - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.६७ पा.नं.२८७)

**टीपा** : १) परद्वार - परपुरुषाचे द्वार  २) अनामिका घरी - निनाव्याचे घरी ३) गोवध - इंद्रियवृत्तींचा वध  ४) सुरापान - सुराचे पान  ५) स्त्री - वासना ६) सुवर्ण - नाम. दि.१४.०३.४३

**४६) खरे बोले तो नकी बुडे । लटके बोले तो वैकुंठी चढे ।।१।। लटके बोले तो अमृत चाखे । खरे बोले तो लागे भिके ।।२।। लटके बोले तो अमर झाला । खरे बोले तो जिताचि मेला ।।३।। लटके बोले त्या होय सुख । खरे बोले तो पावे दुःख ।।४।। लटके बोले त्या समाधान । खरे बोले तो दुःश्चित मन ।।५।। लटक्या एवढे नाही सार । खरे बोलता न चुके फेर ।।६।। लटके कळले जयासी । त्याची चुकली चौऱ्यांयसी ।।७।। हरि म्हणे लटके कळे । तेचि ब्रह्म होती निखळे ।।८।।**

(हरिबुवा - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.७२ पा.नं.२८८)

**टीपा** : १) खरे - जगाचे दृष्टीने खरे पण तत्त्वतः खोटे, २) लटके - जगाचेदृष्टीने खोटे, पण वस्तुतः लटक लावणारे खरे. दि.१४.०३.४३

**४७) बापाचिये पोटी कन्या पुत्र झाली । सोयरीक केली बहिण भावा ।।१।। कन्येचा हो वर बाप आपण झाला । पाहू जाता त्याला बहिण होय ।।२।। भावाची बाईल बहीणची झाली । कन्या येक झाली तिये पोटी ।।३।। मामाचेही घरी भाची जे निघाली । तिघे पुत्र व्याली तीन कन्या ।।४।। आजीयांचे घरी निघाली नार ती । तीस पोरे होती तये लागी ।।५।। हरि म्हणे ऐसे आमुचे हे नाते । पापपुण्य तेथे काही नाही ।।६।।**

(हरिबुवा - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.७३ पा.नं.२८८)

**टीपा** : १) बाप - जीवभाव  २) कन्या पुत्र - भक्तीभाव  ३) कन्या -

**५०) रावतावरी बैसोनिया घोडे । दुर्गावरी चढे ऊर्ध्वपंथी ।।१।। तेथील कवाड उघडोनि निवाडे । जाऊनी पहूडे सिंहासनी ।।२।। अनुहात तुतारे वाजताती भेरी । चंद्रज्योती बरी हावई ते ।।३।। तेथे लखलखाट प्रकाश तो होय । अंधःकार जाय मावळोनी।।४।। उतरले घोडे बैसले आसनी । राऊत हरपोनी गेला तेथे ।।५।। तेथील नवलाव सांगता अभिन्न । हरि म्हणे जाणे ज्याचा तोचि।।६।।**

(हरिबुवा - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.८१ पा.नं.२९१)

**टीपा** : १) रावतावरी - आसनसिद्धीने जीवभावावर २) घोडे - मने ३) दुर्ग - आत्म. दि.१४.०३.४३

**५१) पाढा नवाचा वाचिता । येती नवचि गणिता ।।१।। मुळापासुनि विस्तार । नवा अंकाचा निर्धार ।।२।। न होती अधिक उणे । घेता देता परिपूर्ण ।।३।। येता जाता दिसे दोन । ब्रह्म नाही अधिक उणे ।।४।। आला गेला मिथ्याभास । सदोदित असे।।५।। हरि म्हणे स्वयंभू आहे । जेथे आकार न साहे ।।६।।**

(हरिबुवा - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.८२ पा.नं.२९१)

**टीपा** : १) ९ x १ = ९ २) ९ x २ = १८ = १ + ८ = ९ वगैरे

**५२) लटके न बोलू आम्ही लटके न बोलू । अणुमात्र खोटे आम्ही लटके न बोलू ।।ध्रु.।। मुंगी व्याली शिंगी झाली तिचे दूध किती। सतरा रांजण भरून ठेवले प्याले बारा हत्ती ।।१।। लटका गेला लटकीपाशी तेथे सुगडी येवढे राळे । उंट चिमणी रंगना आली तिचे वाढी येवढे डोळे ।।२।। शेळी करी घुसळण मांजर काढी लोणी । उंदीर गेले देशांतरी त्यांनी ताका भरल्या गोणी ।।३।। पाण्यात कासव गीत गाये कडेस कोल्हा नाचे । सायळ मनी संतोषली खेकड पुस्तक वाचे ।।४।। कांतिणीने मंदिरी लग्न मांडियेले सरड कणीक कांडी । मंदोदरी झाली**

७) अंबा - पूर्णरूप ८) जांभूळ - कृष्णरूप ९) दोन - कारण, महाकारण १०) चार - शब्द, अशब्द, शून्य, जीवस्वरूप ११) घागर - अहंकार १२) सात - अश्व १३) पाच - पंचप्राण वृत्ती १४) रुईची खोडी - नियमवृत्ती १५) झाडावर झाड - दोन शून्यांचा विस्तार १६) मसूर - बिंदुले १७) सात - धातू १८) पाच - तत्त्वे १९) पाखरू - सोहं रूप. दि.१४.०३.४३

**५४) हाट करूनि घरासी आणली बैसली वसरीच्या काठी रे । घरची बाईल बाहेर निघाली वसवसून लागे पाठी रे ।।१।। शंखीण बाबा डंखीण त्याघरी शंखीण बाबा डंखीण रे ।।ध्रु.।। चौशेराचा वरणभात केला वर भाजीचा गोळा रे । मोठे मोठे घास घेती भुरळ फिरवी डोळा रे ।।२।। आठ भाकरी बारा पोळ्या धिरडी खादली सोळा रे । पाणी पिऊनी ढेकर दिला मराठी तिचा मोळा रे ।।३।। बारा सोळा लुगडी नेसली येईना पाठी पोटी रे। नव खणांची चोळी शिवली उराशी येईना गाठी रे ।।४।। एका जनार्दनी म्हणे बाबा ऐशी बाईल केली रे । तिच्या भयाने सर्व दैवते पळूनिया गेली रे ।।५।।**

(एकनाथमहाराज - कैवल्य वैभव कूट अभंग क्र.३२ पा.नं.२७६)

**टीपा** : १) घरची बाईल - आजपर्यंतची वासना २) चौशेराचा वरणभात - चार शून्ये व त्यात वावरणारा सत्वहंकार, पीतकळा, चार शून्ये आकाशापैल भूरळ ३) डोळा - सर्वात्म कळा ४) आठ भाकरी - अष्टधेच्या आठ वृत्ती ५) १२ पोळ्या - १२ प्रकारच्या सगुण-निर्गुण वृत्ती, षडवृत्ती x २ ६) १६ धिरडी - १६ लक्षणे ७) पाणी - जीवन ८) ढेकर - तृप्ती ९) बारा सोळा लुगडी - कळा १०) नवखण चोळी - ९ इंद्रिये. दि.१४.०३.४३

**५५) दीपाचे तेज कळिके ग्रासिले । उदय अस्त ठेले प्रभेविण ।।१।। लोपलीसे प्रभा तेजाचे तेजस । जाहली समरस दीपज्योती ।।२।। फुंकिल्यावाचुनी तेज ते निघाले । त्रिभुवनी प्रकाशिले नवल देख ।।३।। एका जनार्दनी ज्योतीचा प्रकाश । जाहला समरस देही देव**

## प्रकरण - २

# श्रीदासराममहाराज लिखित अध्यात्मिक संज्ञा व स्पष्टीकरण

### १. चार देह व चार अवस्था यांचे स्पष्टीकरण

**अ) अवस्था :-** जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुरीय

**ब) देह :-** स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण

स्थूल देहात मनुष्य असला म्हणजे जागृती अवस्थेत असतो. तेव्हा जीवात्मा डोळ्यात असतो. सूक्ष्मदेहात तो स्वप्नावस्थेत असल्याने जीवात्मा कंठात असतो. कारणदेहात असला की सुषुप्ती अवस्थेत जीवात्मा हृदयात असतो. महाकारणदेहात असला की तुर्यावस्थेत असतो. तेथे तो समाधानी जीवात्मा असून यात तो तीन देहांचा व तीन अवस्थांचा साक्षीभूत होतो. येथे येणारी झोप, ती साधुंची झोप. म्हणजे समाधी अवस्थाच होय. निजताना तरी देवाचे नाव घेऊन निजावे. मनुष्य जागा झाला की पुनः देवाचे नाव चालू राहील. श्रीपाद भटजी वेद सदोदित म्हणत जागे झाले म्हणजे निजताना जेथपर्यंत आले होते, त्यापुढे म्हणत. ते इचलकरंजीस रहात होते.

**रामकृष्णनाम :-**

अ) राम हा सूर्यवंशातला - सूर्य नाडी

ब) कृष्ण हा चंद्रवंशातला - चंद्र नाडी

**तन, मन, धन :-**

अ) तन :- स्थूल देह ब) मन :- लिंग देह क) धन - कारण देह

श्रीदासराम लेखन वही क्र.२७०

पणतू तोंडे भक्षितो पणजा । मूळ बापासी मारी वोजा ।
चुकाऱ्या गेला राजा । चौघाजणांचा ।।१।।

उत्पत्ती :- मूळ ब्रह्म - आकाश - वायू - तेज - आप - पृथ्वी

या तत्त्वांचे प्रमाणाधिक्य करून आकाशाचा - कैवल्यदेह, वायू - महाकारण देह, तेजाचा - कारण देह, आपाचा - सूक्ष्म देह, पृथ्वीचा - स्थूल देह झाला. स्थूल देह हा पणतू. वायूचा महाकारण देह हा पणजा. श्वसनक्रियेत स्थूल देह पणतू. वायूरुपी महाकारणदेह पणजाला भक्षितो. लोहाऱ्याचे भात्याप्रमाणे ही गोष्ट सर्व पिंडात प्रत्ययाला येते. पण गुरुनामाशिवाय उद्धार नाही. गुरुकृपेने याठिकाणी आप बोधपुत्र जिवाहंभावाचे ठिकाणी निर्माण झाल्याने जीवाहंभाव बोधाचा बाप झाला. या बोधपुत्राने अहंकारपित्याचा नाश केला. लोहाऱ्याचे भात्याप्रमाणे चालणाऱ्या वायूस अखंडत्व मिळणीचे योगाने प्राप्त झाल्याने व घर्षणक्रियेने आत्म्याचा स्फुल्लिंग निर्माण झाल्याने, प्राणापानाचे द्वैत खंडन होऊन, ऊर्ध्वगामी वायुप्रवाहाचे योगाने उच्छ्वास क्रियेचा निरोध होऊन, कुंभकाचे योगाने सकारधारणा वाढून हकारधारणा नष्ट झाल्याने अहंकार नाहीसा झाला. याबरोबर आत्मरूपाला चुकविणारा, त्यापासून परावृत्त करणारा, चराचरांचे ठिकाणी वास करणारा मनोरूपी राजा गेला. मावळा स्वर्गवासी झाला. स्वरात गमन करून स्थिर झाला. मनाचे उन्मन झाले.

श्रीदासराम लेखन वही क्र.३२

*****

म्हणून तसे म्हणतात.

४. जीव सगळीकडे आहे तर मेल्यावर तो कुठे जातो ?

जीव कोठेही जात नाही. तो सर्वच ठिकाणी आहे. आतील चैतन्य गेले म्हणजे त्याला आपण जीव गेला असे म्हणतो. जीव कुठे जातही नाही व कोठून येतही नाही.

५. जीव हा जातो कोठून?

सायकल मधील हवा जाते कोठून ? जेथे झिजली असेल तेथून. त्याप्रमाणे आपले जे इंद्रिय झिजले आहे, तेथून हा जीव जातो. कोणाचा डोळ्यातून, कोणाचा नाकातून, काहींचा तोंडातून, तर कोणाचा टाळूतून जातो. ज्याचे जे इंद्रिय बाद झाले असेल, त्यामधून त्याचा जीव जाणार.

६. एखादे इंद्रिय बाद झाले तर त्यासाठी जीव जाणार?

हो. एखादे इंद्रिय बाद झाले तर त्यासाठी जीव जाणारच.

७. संतांचा जीव जातो कोठून?

संत ही माणसेच आहेत. त्यांचे जे इंद्रिय बाद झाले असेल त्यातूनच त्यांचा जीव जाणार. जीव कोठून जावा हे काय आपण ठरवायचे आहे? कलेक्टरने टांग्यातून जावे की मोटारीतून जावे हे आपण ठरवाचय? नाही. तो टांग्यातून जाईल, मोटारीतून जाईल किंवा विमानातून जाईल. त्याप्रमाणे जीवाने कोठून जावे हे त्यानेच ठरवायचे आहे, आपण नाही.

## २. टिपणे

### श्री.शरद वामन आपटे व श्रीदासराममहाराज यांच्या चर्चेमधील टिपणे

जगात सगळीकडे चमत्कारच भरले आहेत. एखादा माणूस जिवंत झाला हाही चमत्कारच आणि माणूस मेला हाही चमत्कारच. एखादा माणूस मेल्यावर जिवंत होतो म्हणजे त्या जीवाचा स्फुल्लिंग कोठेतरी असतो. त्याला

घातला आहे. साधु म्हणजे ज्याने सहा धुतले आहेत तो. परंतु संत म्हणजे सहांचा अंत. सहा धुतले तरी त्याचा वास असतो. म्हणून साधु कुसंगाने नाडतो, परंतु संतांचे तसे नाही.

५. मॅट्रीकला ठोकर बसेल म्हणून सहा तास अभ्यास करावा लागतो. ही ठोकर चुकविण्यास जर सहा तास अभ्यास करावा लागतो, तर जन्म मरणाची ठोकर चुकविण्यासाठी किती तास करावा लागेल?

माणसांनी चांगले म्हणण्यासाठी जर अगदी कसोशीने वागावे लागते, तर संतांनी चांगले म्हणण्यासाठी किती कसोशीने वागावे लागेल ?

बर का, शरद, आपल्याला हे समजून येत नाही. परमेश्वराच्या राज्यात प्रत्येक चुकीला शिक्षा असतेच. किरकोळ चुकीला किरकोळ शिक्षा. खोटे बोलले तर पायात काटा मोडतो.

६. मनुष्य हा तळातूनच वर जातो. परमेश्वराने जसे चांगले शब्द निर्माण केले आहेत तसे वाईटही केले आहेत. आपण वाईट शब्द वापरू नयेत. चांगल्या शब्दाने जर काम होत असेल, तर वाईट शब्द वापरावेतच का? मनुष्य हा आपल्या पातळीप्रमाणे वागत असतो. त्याला Push केले की तो वर जातो हा Nature आहे.

७. ज्याच्यावर प्रेम अधिक त्याच्यावरच राग असतो.

श्रीदासराम लेखन वही क्र.२४८

*****

आहे. एक माणुस होता. तो जेवायला बसला. त्याला एक पदार्थ फार आवडला. तो म्हणाला - आणखी थोडा जास्त खाऊया. असे म्हणून त्याने जास्त खाल्ले. तेव्हा त्याला अजीर्ण होऊन दुःखच प्राप्त झाले. अशा तऱ्हेने दुःख व सुख सापेक्ष आहे. हे जसे सापेक्ष आहे, तसे दृश्य व अदृश्य सापेक्ष आहे. आपण काय म्हणतो की, जेवढे डोळ्याला दिसते आहे, तेवढे दृश्य व जेवढे दिसत नाही, तेवढे अदृश्य. पण तसे नाही. जेवढे दिसते तेवढे दृश्य व जेवढे दिसत नाही तेवढे अदृश्य, असे म्हणून चालणार नाही. जे दिसते तेवढे दृश्य म्हटले तर सर्व व्यवहार बंद पडतील. आपल्याला हवा दिसत नाही. परंतु ती दृश्य आहे. अशा अनेक गोष्टी आहेत. देव म्हणे महाप्रलय करतो; सर्व सृष्टी बुडवून टाकतो आणि आपण स्वतः वटपत्रावर अंगुष्ठप्रमाण देह धारण करून आंगठा चोखत असतो, व जगाची मजा बघतो. मग एवढी सृष्टी करून जर बुडवायची आहे, तर मग ही सृष्टी उत्पन्न केलीय कशासाठी? एवढा उपद्व्याप त्याने का केलाय ? सृष्टी उत्पन्न करायची, आम्हा जीवांना गुंतवायचे, शेवटी बुडवायचे आणि मग गंमत बघायची. देव जसा महाप्रलय करतो, तसा महाप्रलय आम्ही रोज करतोय; रोज अगदी रोज करतोय, आम्ही जागृतावस्थेतील सृष्टीचा प्रलय करून, आम्ही स्वप्नसृष्टी उत्पन्न करतो म्हणजे हा महाप्रलयच आहे. 'आप मेला जग बुडाला' आपण निजलो म्हणजे आपल्याला काय काय दिसते? काही दिसत नाही. एक जण म्हणाला की, मला काल स्वप्नात पंख फुटले. मग काय मजा आली हो! मी आकाशातून घारीसारखा उंच उंच उडू लागलो. काय मजा होती म्हणून सांगू! हे दृश्य कधी जागृतावस्थेत होणे शक्य आहे काय? असे जर झाले तर केवढी मौज होऊन जाईल ! हे जागृतावस्थेत शक्य नसून सुद्धा तो पाहू शकला ना? आपण ज्याला अदृश्य म्हणतो ते दृश्य आहे ना? सहज एक गोष्ट आठवली ती सांगतो :- एक गृहस्थ मला म्हणाला, " काय रामभाऊ, काय सांगू? काल केवढी मौज आली! काल स्वप्नात मी मेलो होतो, लोकांनी तिरडी आणली, मला त्यावर घातले, हे सर्व मला समजत होते बरं का! मग मला

तुका म्हणे ऐसी आर्त ज्याचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे ।।३।।

या अभंगात तुकाराममहाराजांनी तळमळ व्यक्त केली आहे. ज्याला ज्याची तळमळ असेल, तो तेथे येणारच. म्हणून तुकाराममहाराजांनी म्हटले आहे, ''जीवनावेगळी मासोळी । तुका तैसा तळमळी ।।'' अशी तळमळ पाहिजे. ज्याच्याजवळ जशी भावना, तशी त्याची तळमळ. जशी तळमळ, तसे फळ. जितकी तळमळ जास्त तितके फळ जास्त.

सर्व व्यवहार संपत्तीवर अवलंबून आहेत. संपत्ती म्हणजे नुसता पैसा नव्हे. संपत्ती म्हणजे पैसा, संपत्ती म्हणजे देह, संपत्ती म्हणजे मन. 'देहही आटे संपत्ती आटे' हा देहही जातो व संपत्तीही जाते.

परमेश्वराचे हे जगत् संपत्तीवरच उभारले आहे व संपत्तीच्या सोहळ्यामध्ये सर्व जग गुरफटलेले आहे. सर्व जग असे गुरफटले असल्याने प्रलय होत आहे. हे सर्व ज्या मनावर आहे ते मनही जाते. हे मन ज्या धारणेवर आहे ती धारणाही जाते. ही धारणा ज्यावर आहे त्या चंद्रसूर्य गतीही जातात.

नंतर पंढरीचा टकळा लागतो. कोणी म्हणतात, आम्ही वारीला जाणार नाही, पण प्रत्येकाला वारी ही करावीच लागते. पंढरीची वारी कोणाला चुकली आहे? तुकाराममहाराज पंढरीला जातात. काही लोक म्हणतात - चिमड - संप्रदायात वारी नाही, आपले बरे आहे. परंतु वारी कोणाला चुकली आहे? 'एका एका योनी कोटी कोटी फेरा । नर देहाचा वारा मग लागे।।' एका एका योनीत कोटी कोटी फेरा घ्यावा लागतो. मग वारी कुणाला चुकली आहे? वारी कुणाला चुकली नाही.

'आवा चालली पंढरपुरा । वेशीपासुनी आली घरा ।।' यात तुकाराममहाराज म्हणतात, आवा पंढरपुराला चालली, परंतु ती वेशीपासून घराकडे आली. कोणी म्हणेल - तुकाराममहाराजांचा रोख बायकांवर दिसतो

पंढरीबद्दल ज्यांची भावना असेल, आदर असेल, निष्ठा असेल, त्याची चक्रपाणी वाट पहातो.

३.

## सोमवार, दि.१२.०७.१९५४ वेळ सकाळी ८.३० ते १०.३०
## स्थळ -श्रीरामनिकेतन येथील कीर्तन

कीर्तनाचे पद

राम राम म्हणता जावा माझा प्राण । एवढे कृपादान तुमचे मज ।।१।।
नको विद्या वय आयुष्य फारसे । नाही मज पिसे मुक्तीचेही ।।२।।
नको धन मान न वाढो संतान । मुखी नारायण प्राण जावा ।।३।।
तुका म्हणे दीन काकुळती येतो । तुज आठवितो पांडुरंगा ।।४।।

या अभंगात तुकाराममहाराजांनी मागणे मागितले आहे. ते म्हणतात, 'राम राम म्हणता जावा माझा प्राण । येवढे कृपादान तुमचे मज ।।' जो तो आपल्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे मागणे मागत असतो. ज्याची जशी कुवत तसे त्याचे मागणे. एक भटजी होता. देव त्याला प्रसन्न झाला. तेव्हा त्याने देवाजवळ दर्भाचे जंगल मागितले. श्राद्धपक्षासाठी. जो तो आपल्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे मागणे मागत असतो. पण मागणे काय मागायचे ते कळले पाहिजे. एक भटजी होता. त्याची बायको कुरूप होती. त्याला देव प्रसन्न झाला. देवाने त्याला तीनदा दर्शन देईन असे सांगितले. त्याने देवाजवळ 'बायको सुरुप कर' असे मागितले. देवाने तथास्तु म्हटले. त्याची बायको सुरूप झाली. राजाने तिला पळवून नेले. भटजीने देवाला हाक मारली. देव आला. त्याने बायकोला अस्वल करण्यास सांगितले. देव तथास्तु म्हणाला राजा तिच्या महालात गेला. त्या अस्वलाला त्याने पिटाळून लावले. अस्वल आपल्या घरी आले. भटजीने परत देवाला हाक मारली. देव आला. त्याने देवाला बायको पूर्ववत करण्यास सांगितले. तेव्हा देव म्हणाला, तुला तशीच दिली होती. 'ठेविले अनंते तैसेची रहावे । चित्ती असोद्यावे समाधान ।।'

'असंगाशी संग' घडला पाहिजे. मी चार दिवसापूर्वी म्हटले होते की, 'वारा हा फुलबागेवरूनही जातो व शौचकुपावरूनही जातो. तो सुगंधही वाहून नेतो व दुर्गंधही वाहून नेतो'. वारा हा जरी सुगंध व दुर्गंध वाहून नेतो तरी तो कशाचाच संग घेत नाही. म्हणून वारा हा असंग आहे.

उपाधिभूत जीवनात जड ही आहे व चैतन्यही आहे. जड हे चैतन्याला खेचते आहे. जड हे चैतन्याला खेचते असे हल्लीचे शास्त्रही सांगते. पृथ्वी गोल आहे. तिच्या सर्व बाजूवर माणसे आहेत. पण ती पडत का नाहीत? किंवा वर का जात नाहीत? तर जड चैतन्याला खेचते आहे. आपण चैतन्य आहोत. पृथ्वी जड आहे. म्हणून आपण वर किंवा खाली जात नाही.

आता आपण खरी कृपा पाहू या. तुकाराममहाराज म्हणतात, 'नको वय विद्या आयुष्य फारसे । नाही मज पिसे मुक्तीचेही ।।' मला विद्या नको असे मागणे कोणी मागितले आहे काय? विद्येवर सर्व गोष्टी अवलंबून आहेत. मग खरी कृपा कोणती? 'रामराम म्हणता जावा माझा प्राण । एवढे कृपादान तुमचे मज ।।' ही खरी कृपा. राम राम म्हणता प्राण जाणे हीच खरी कृपा. 'याजसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ।।' जन्मभर साधन करूनसुद्धा शेवटचा दिवस गोड होईल अशी खात्री नाही, भरंवसा आहे. म्हणून म्हटले आहे, 'तरले तरती हा भंरवसा । नामधारकाचा ठसा ।' सद्गुरुंच्याकडून नाम घेतले म्हणजे तरतील अशी खात्री नाही, भरवसा आहे. तो माणूस ही गोष्ट करील असे नाही, याला भरवसा म्हणतात. नामाचा ठसा असूनसुद्धा तो करेल अशी खात्री नाही, भरवसा आहे. 'राम राम म्हणता म्हणता जावा माझा प्राण' ही गोष्ट काही हलकी नाही. जन्मभर नामस्मरण करूनसुद्धा शेवटचा दिवस गोड व्हावयाची मारामार. शेवटचा क्षण जरी गोड झाला तरी पुरे आहे. एकाद्याचा जर जन्मभर नामस्मरण न करता शेवटचा दिवस गोड झाला तर त्याला काय म्हणावयाचे? एकादा विद्यार्थी वर्षभर अभ्यास न करता परीक्षा पास झाला तर त्याने अभ्यास केला नाही असे म्हणावयाचे काय? मी एक गोष्ट वर्तमानपत्रात वाचली : एक ५ वर्षाचा

ज्या वारकरी संप्रदायाचा ज्ञानेश्वरमहाराजांनी पाया घातला, नामदेवांनी विस्तार केला, नाथमहाराजांनी ध्वज लाविला आणि तुकाराममहाराज कळस झाले असा हा संप्रदाय आहे : जनार्दनाचा एकनाथ । ध्वजा लाविली भागवत।।

देवाने कृपा केल्यास काहीही अशक्य नाही. उद्देश वेगळा की कार्य वेगळे. हेतूप्रमाणे कार्य बदलते.

जीव-शिवाची ऐक्यता होण्यास नामाशिवाय काही नाही. 'आपुलिया जीवे शिवासी पहावे । आत्मसुख घ्यावे वेळोवेळा ।। ' यात 'जीवे' म्हटले आहे. जीव म्हणजे काय? मन म्हणजे काय? चित्त म्हणजे काय? बुद्धी म्हणजे काय? एक गृहस्थ होते. ते पंढरीला गेले. तेथे ज्ञानेश्वरी सांगण्याची त्यांना इच्छा झाली. एकाने त्यांना विचारले, 'मन म्हणजे काय?' 'चित्त म्हणजे काय?' 'बुद्धि म्हणजे काय?' ते म्हणाले, ''मन म्हणजे मन, चित्त म्हणजे चित्त, बुद्धि म्हणजे बुद्धि.''

मन म्हणजे ' संकल्प-विकल्पात्मक मन'. संकल्प-विकल्प (विचारा मागून विचार) येणे म्हणजे मन. त्याचे चिंतन होणे म्हणजे चित्त. तोच निश्चय, तोच विचार कृतिरूप झाला म्हणजे बुद्धि. 'तुका म्हणे मनी नाही । नये आकाराते काही ।।' मनात नसले म्हणजे ते कृतीत येत नाही. आता जीव म्हणजे काय ते पाहू या. ज्याच्या अधिष्ठानावर श्वसनक्रिया आहे, त्यावरून जीव ओळखावा, असे सांगितले आहे. श्वासोच्छ्वासावरून जीवाचे अस्तित्व कळून येते. 'रामकृष्णहरी भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा रामजप ।।' रामकृष्णहरी हा जीवाचा भाव आहे. रामकृष्ण या दोन गती आहेत आणि या गती ऊर्ध्वमुख होऊन जेथे पडतात, तेथे शिवाचा रामजप असतो. नाम म्हणजे रूप आणि रुप म्हणजेच नाम.

जीवात्मा व शिवात्मा यांना मन, चित्त, बुद्धि हे दाखवू शकत नाहीत. जशी वाऱ्याने दुनिया गेली तशी वाऱ्यानेच दुनिया आली. आत्मा हा वायु - ''आत वारा बाहेर वारा । त्याचा निर्गुणात पसारा । त्या वाऱ्याचा शोध करा ।। वाऱ्याने दुनिया गेली रे गड्यानो वाऱ्याने दुनिया गेली ।।''

उघडुनि चैतन्याची तंटी । चला जाऊ पहाया ।। सगुण गुण कामा आली कोल्हाटीण खेळाया।।' ज्या ढोलावर आत्म्याचा नाच आहे, तो नाच संपला की ढोलगे बंद होते.

नवरात्र म्हणजे नऊ भक्ती. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ।।' ज्या योगाने आत्म्याचे वैभव दृष्टीला पडते त्या या नवविधाभक्ती आहेत.

'लक्ष चौऱ्यांशी घरे चारी । या या देवाची केली वारी । प्रसन्न झाला देव मल्हारी । सोहंभावे राहिलो ।।' ज्यायोगे जन्ममरणाचा फेरा चुकतो, ती ही वारी.

पाप जास्त झाले की अधोयोनी, पुण्य जास्त झाले की स्वर्ग, पापपुण्य सम झाले की नरजन्म. जन्म मरण नाहीसे झाले की मोक्ष.

'चित्त धावे विषयावरी । नाम वदताहे वैखरी ।।' जो आत्मानुभवी आहे, त्याचे चित्त विषयावर जाणार नाही. चित्त हे प्रवाही आहे. 'विषय तो झाला त्यांचा नारायण' त्यांचा विषय नारायण होतो. एका विषयाची प्रचीती एकच. प्रत्येक वस्तूची प्रचीती म्हणजे आत्मानुभवच. चित्त नारायणापाशी तादात्म्य झाल्यावर नामच येणार.

स्मरण होते तेव्हाच विस्मरण नाहीसे होते. नाम म्हणजेच रूप, रूप म्हणजेच नाम. हा मेळ घालता येत नाही म्हणूनच वाचेचा गोंधळ होतो.

*****

एक अवतारी पुरुष ठरले.  माझे प.पू.पितृदेव श्रीमामामहाराज केळकर हे सिटी हायस्कूलचे अगदी प्रथमपासूनचे आजीव सदस्य होते. त्यांना भावी पिढी ही नितीमान करावयाची होती.  शालेय विद्यार्थी जर नितीमान झाले तर हे देशाचे आधारस्तंभ होऊन, अनेकांच्या जीवनात उत्क्रांती, निर्माण करून आपल्या देशाची शान वाढवतीत असा त्यांचा हेतू होता. यामुळे आपण स्वतः लोकमान्य टिळकांचेसारखे, महात्मा गांधींचे सारखे आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी व त्यांचे सहकारी गुरुवर्य तोरोमास्तर यांनी आमरण नितीमूल्यांची जोपासना केली आणि तो आदर्श आपल्या विद्यार्थ्यांचे पुढे ठेवला. मग हे विद्यार्थी त्यागी, विरागी, सदाचरणी आणि अजोडपणे कार्य करणारे असेच झाले.  श्रीमामांना काय किंवा तोरो गुरुजींना काय, हे विद्यार्थी आपले गुरुच म्हणत असत आणि हे सांगण्यातही त्यांना मोठा अभिमान वाटे.  श्री. बळवंतराव गोडबोले, योगी अरविंद बाबूंचे शिष्य असून, त्यांनीही विद्यार्थ्यांच्यापुढे एक आदर्श ठेवला होता, हे सांगणेचाही येथे मला मोह होतो.  न्यायमूर्ती राम केशव रानडे, समाज कल्याण मंत्री त्र्यंबकराव नरवणे असे आणि अशाप्रकारचे निरनिराळे क्षेत्रात अतुलनीय विद्यार्थी या संस्कारानेच प्रभावी झाले.  श्री. हरी नाना पवार हे श्रेष्ठप्रतीचे मल्ल देखील आपल्याला लहानपणी शाळेमध्ये नितीपाठांचे कृतीपाठ देऊन शाळेने घडविले म्हणून मला शक्तीमान होता आले असे आजही ताठपणाने सांगतात.  येथे एक गोष्ट ध्यानात घेणेसारखी आहे. या लोकांना आपण या जगातीक शाळेमधील एक विद्यार्थी आहोत असे प्रौढपणेही वाटत होते. आपण जे दुसऱ्या शिकवतो, ते आधी आपल्या अंगी किती मुरले आहे हेही शिक्षकांनी आपल्या मनासी तपासून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. ''जे जे आपणाला ठावे । ते ते दुसऱ्यासी शिकवावे । शहाणे करुनी सोडावे । सकल जन ।।'' ही समर्थांची शिकवण समर्थपणे विचारात घ्यावी इतकी ती समर्थ आहे. त्याचे समर्थन करणेची येथे जरुरीच नाही.  आधी केले मग सांगितले हे महत्वाचे आहे.  'उलट येथे कोणाचे काय बा गेले, ज्याचे त्याने अनहित केले' हे श्रीतुकाराममहाराजांचे

लक्षणीय आहे. यादृष्टीने विद्यार्थी दशेत शालेय विद्यार्थ्यांचेवर त्यांचे आई-वडिलांनी आणि शिक्षकांनी अशाप्रकारचे सुसंस्कार करणे हे सद्यस्थितीस फार महत्वाचे आहे. आमचे श्रीमामांनी शाळेमध्ये रामायण, महाभारत विद्यार्थ्यांना शिकवून त्यांचेवर योग्य ते संस्कार केले. ते केवळ याचदृष्टीने केले. यावरून मला येथे काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होईल असे वाटते.

## २. मुलांनी काय पाठ करावे असे दादा तुम्हाला वाटते?

छान प्रश्न विचारलात. सांगतो. हे बघा मनाचे श्लोक, भगवत्‌गीता, ज्ञानेश्वरी, नाथ भागवत, दासबोध, तुलसी रामायण, गुरुचरित्र, बायबल, कुराण अशाप्रकारचे ग्रंथ मुलांनी अवश्यमेव पाठात ठेवावेत. धर्म कोणताही असो, सर्वांची नितीमूल्ये सारखीच आहेत. खोटे बोलावे, चोरी करावी, परपीडा करावी, अपेयपान, अभक्ष्य भक्षण करावे असे कोणीही कोठेही सांगत नाही. कालमानपरत्वे आणि देशाचे कटीबंध लक्षात घेता खाण्या-पिण्यात थोडा फरक होईल, कारण भक्ती ही जिवंत राहिल्याविना करता येत नाही. त्याला खावे लागते. त्यासाठी पैसा, नोकरी, उद्योग व शिक्षण हे सारे आलेच. सद्‌ग्रंथ वाचनाने मुले सत्वशील होतात. आमचे श्रीमामा यासाठी तर मनाचे श्लोक आणि भगवत्‌गीता शिकवीत होते. त्यावेळी नितीशास्त्राचा पेपरही परीक्षेसाठी असावयाचा. सायन्स ७५ मार्कांचा पेपर तर नितीशास्त्र हा २५ मार्कांचा पेपर असावयाचा. दोन्ही विषयात जे गुण मिळतील त्यावर विद्यार्थी पास होत असे. त्यामुळे हे शालेय विद्यार्थी नितीशास्त्राचाही अभ्यास करीत. वेदमूर्ती श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनी हिंदुधर्म शिक्षण हे पुस्तक लिहिले होते. त्याचाही समावेश या नितीशास्त्र शिक्षणात असून त्याचेही पाठ मामा देत असत. शिवाय बायबल, कुराण, आणि इतर धर्मग्रंथ यातील महत्वपूर्ण अशा गोष्टी विद्यार्थ्यांचे मनावर बिंबवीत असत. मुलेही अगदी एकाग्र होऊन या तासाला बसत असत. हे खरेच त्याकाळातील एक विशेष म्हणून सांगता येण्यासारखे आहे. मानसशास्त्र दृष्टीने पटेल अशा पद्धतीने

कीर्तनात सांगत असत.  लहानपणी विद्यार्थीदशेत इतके जपावे लागते हे यातील एक रहस्य आहे.

### ३. दादा, मुलांनी कसे वागावे असे तुम्हास वाटते?

सांगतो, मुलांनी परोपरीने आंधळे, पांगळे, मुके, थोटे अशा अपंगाचेकडे आपुलकीने पहावे, कारण सर्वाभोवती एक ईश्वरच नटलेला आहे, **''ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया।।''** हा श्रीमद्‌भगवद गीतेतील श्लोक मानवजातीने विचार करावा असा आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, सर्वत्र तो भरलेला आहे, म्हणून माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे हेच खरे. मी माणूस आहे हे जरी कळले तर मग माणसाप्रमाणे वागण्याची जबाबदारी ही आलीच. श्रीमंतीची ऐट करावयाची म्हटले तरी श्रीमंतांचे पंगतीत भरमसाठ खाता येत नाही, कारण श्रीमंत लोक नुसते त्या पदार्थाला हात लावूनच रिकामे होतात, मग तेथें अधाशासारखे खावयाचे कसे? असा प्रश्न आहे, ''देवासारखा बैस पाहू'' असे मोठी माणसे मुलांना म्हणतात. त्यांनी काय देव पाहीला आहे काय? नाही. पण त्यांना एवढे माहीत आहे, की तो सर्वांना सारखा आहे, तेथे आपपर हा भावच नाही. ''जें का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोची साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ।। ज्यासी अपंगिता नाही। त्यासी धरी जो हृदयी । दया करी जे पुत्रासी । तेची दासा आणि दासी । तुका म्हणे सांगो किती । तोची भगवंताची मूर्ती ।।'' अशी अवस्था त्या मानवाची होते आणि तो महामानव होतो. आपण सनातन धर्मीय, आर्य धर्मीय, हिंदू धर्मीय, भागवत धर्मीय आहोत. कालमानाने ही नावे बदलत गेली असून आता मानव धर्माची स्थापना होऊ पहात आहे. ''धर्म स्थापनेचे नर ते ईश्वराचे अवतार । झाले आहेत पुढे होणार  देणे ईश्वराचे ।'' असे समर्थ ठोसपणे सांगत आहेत. आपला धर्म हा सर्व धर्म समावेशक आहे.  सूर्य ही आपल्या धर्माची वेदकालापासून देवता आहे. त्यात चंद्र आणि अग्नी हे अंतर्भूत आहेतच. सूर्याला नमस्कार केला तर त्यात नामस्मरण, ध्यान, प्राणायाम, आर्घ्य सारे

**असे तुम्हास वाटते?**

हे पहा, मनन, चिंतन हे एकाग्रतेशिवाय होत नाही. गणिताचा अभ्यास केला तर मन एकाग्र होण्याचा अभ्यास दृढमूल होतो व ईश्वराशी एकतान होण्याने अभ्यास सहजसुलभ असा साधकास होतो. असा आपला अभिप्राय स्वामी रामतीर्थांनी प्रगट केला आहे. सूर्य, चंद्र अग्नी, ओंकार बिंदू, निरांजन, उदकाडी यावर एकाग्रता ककरता येते. जो आपल्या आवडीचा विषय आहे तो डोळ्यासमोर आणून मन एकाग्र करता येते. नंतर मग ती सवय झाली की देव देवता मनःचक्षु समोर आणून ध्यानाने एकाग्रता साध्य होऊन मनाला समाधान निश्चितपणे होते. नामाशी एकाग्र होणे हे तर फारच चांगले आहे. मानसिक शांती याने लाभते. ''एकाग्र करी मन, तेणे होईल समाधान'' हे श्रीज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या एका पद्यात प्रस्तुत केले आहे. आपण जे सुख म्हणतो तो काही पदार्थ नाही. ज्या विषयात मन सहज एकाग्र होते त्यात मनाला सुख होते. पदार्थ नाशवंत, मग सुख ही क्षणमात्र होते. ईश्वरी चिंतनात शाश्वत शांती, समाधान मिळाल्याने प्राणीमात्र हा खरा सुखी होतो. श्रीतुकाराममहाराज हे आपल्या एका अभंगात आवर्जुन सांगतात, ''समाधान त्यांची इंद्रिये सकल । जया तो गोपाल ध्यानी मनी ।। गोविंदाचा झाला प्रकाश भितरी । मग त्या बाहेरी काय काज ।। काम काज त्यांचे सरले व्यापार । नाही आपपर तुका म्हणे ।।'' झाडाच्या मुळाला पाणी घातले तर ते शेंड्यापर्यंत येते. पण शेंड्याला पाणी मारू ते मुळाकडे येत नाही आणि ते झाड वठते. ''म्हणोनी जाणतेनी गुरु भजिजे । तेणेची कृत कार्य होईजे । जैसे मुल संचने सहजे । शाखा पल्लव संतोषिती ।।''ही माऊलींची ओवी सतत नित्य चिंतनात घ्यावी अशी आहे. यावरून मनन कशाचे हे स्पष्ट होईल असे वाटते. मन हे न म्हणजे नाही असे झाले तरच त्याला मनन म्हणतात. ''मन मुरे मग जे उरे । ते तु का सेवेशीना ।।'' असे माऊलीने आपल्या एका अभंगात या दृष्टीनेच बोधवचन सांगितले आहे. ज्यावरून काही बोध होतो त्याचे मनन करावे, मग तो कोणीही केलेला असो. त्याचा

## ५.

# सांत्वन पत्र

## ह.भ.प. श्रीकेशवराव तथा प.पू.श्रीआजरेकर माऊली यांच्या वैकुंठगमनानंतर त्यांचे चिरंजीव ह.भ.प. श्रीविठ्ठलराव यांना लिहिलेले पत्र

''रामकृष्णहरी''

''श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न''

''श्रीराम जयराम जय जय राम''

ह.भ.प. श्री विठ्ठलराव यासी सप्रेम नमस्कार वि.वि.

आपले प.पू. वडील महाभागवतोत्तम श्री आजरेकर संप्रदायाचे प्रमुख ह.भ.प. श्री केशवराव यांचे वैकुंठगमनाची वार्ता शुक्रवार दि.८.५.१९८७ रोजी कानावर आली. नभोवाणीवर प्रादेशिक बातम्यात हे वृत्त सर्वतोमुखी झाले. ऐकून काय वाटले ते पत्री लिहिणेच कठीण. रविवार दि.१९.०४.१९८७ रोजी परमपूज्य श्रीलक्ष्मणराव कुलकर्णी यांचेकडे सकाळी गेलो असता श्री गुरुवर्य ह.भ.प. श्री केशवराव यांचे प्रसन्न दर्शन झाले. ''आळशावरी गंगा आली'' असेच वाटले. श्री केशवराव यांचे निरूपण श्री सेनामंदिरात होत असे. परमप्रीय ह.भ.प. श्री बापूसाहेब माने वकील यांचेमुळे तेथे श्रावणात जात असे. माऊलीची ती अमृतवाणी ऐकून अत्यंत आनंद होई. आमचे घरीही श्रीबापूसाहेबांचेमुळे ते आल्याने ''तुका म्हणे आले घरा । तोचि दिवाळी दसरा ।।'' असेच प्रत्येक भेटीत वाटले. आमचा चिमडसंप्रदाय, तर माऊलींचा वारकरी संप्रदाय. तरीपण प.पू.ह.भ.प. श्री विठोबा आण्णा कगनोळीकर यांचे पासून आमचे एकमेकांकडे जाणे येणे असलेने तीच परंपरा विशुद्ध प्रेमाने आजवर चालू राहिली. श्री.माने यांचेमुळे प.पू.ह.भ.प. बाबामहाराज सातारकर यांचेही दर्शनाचा योग येऊन, आम्हा उभयतांना भेटीत समाधन झाले.

तात्पर्य श्री. बेडगकर यांचे व आमचे हे जिव्हाळ्याचे संबंध ध्यानी

## प्रकरण - ४

## श्रीदासराममहाराज लिखित निबंध (१२)

## निबंध १ ला - वर्तमानपत्रे दि.१९.०६.३८

वर्तमानपत्रांविषयी जर आपण विचार करावयाचा म्हटले तर तो आपणास पुष्कळरितीने करिता येण्याजोगा आहे. दिसण्यास विषय तर साधा, पण विचारवंतास तो अत्यंत विचारात्मक आणि मनोरंजक वाटेल व तो त्या संबंधी काही काल चिंतनही करील.

सदर विषयासंबंधी विचार करिताना प्रथम आपणास वर्तमानपत्र म्हणजे काय हे पहावयास पाहिजे. जगातील राजकारण, समाजकारण, धर्म इत्यादी संबंधीची माहिती संकलीत रूपाने, ठराविक काळाने छापून, सर्वत्रांच्या उपयोगाकरिता प्रसिद्ध केली जाते. तीच बातमीपत्रे म्हणजे वर्तमान पत्रे होत. आपल्या हिंदुस्तानात प्राचीन काळी वर्तमानपत्रे ही माहित नव्हती व ही कल्पनाही त्याकाळी उत्पन्न होण्याचा संभव नव्हता. कारण आत्तासारखी त्यावेळी मुद्रण कलेची प्रगतीही झालेली नव्हती. मुद्रण कलेचा शोध लागल्यावर प्रथम या वर्तमानपत्रांची कल्पना चीनमध्ये निघाली व तिचा प्रसार पाश्चात्य देशात सर्वत्र झाला. सरासरी ही कल्पना चीनमध्येसुद्धा दोन-तीनशे वर्षापूर्वी निघाली. शे-दोनशे वर्षात वर्तमानपत्राचा प्रसार सर्वत्र झाला व शेवटी या कल्पनेचा अभ्युदय अठराव्या शतकात आमच्या हिंदुस्थान देशात झाला व सुधारकांची मते, राजकारण यासारखे विचार व्यक्त करण्याजोगे व काही मनोरंजक असे विषय लोकांच्या डोळ्यापुढे उभे राहिले.

हिंदुस्थानामध्ये या कल्पनेचा अभ्युदय होऊन ती यशस्वी करण्यासाठी प्रथम प्रयत्न केलेले व वर्तमान पत्रांचा प्रसार होण्यास कारणीभूत झालेले लोक काय ते प्रामुख्याने तीनच. १. कै. चिपळूणकर, २. कै. लोकमान्य टिळक व ३. कै. आगरकर हे होत. कै. आगरकरांनी व लोकमान्य टिळकांनी कै. चिपळूणकर यांनी काढलेल्या या उदात्त कल्पनेस सहाय्य केले. लोकमान्य

तर त्यास अवश्य अशा लागणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत हेही पहाणे अनावश्यक होणार नाही. वर्तमानपत्र उत्तम निघून त्याचा खप बराच व्हावा असे वाटत असेल तर त्यास अडगळ एजन्सीपेक्षा विद्वान माणसांची जरुरी जास्त आहे. अशामध्ये जे कोणी मुख्य असतील ते संपादक होत. संपादक हा शरीरातील मेंदूप्रमाणे असतो व त्याचीच सर्वांवर सत्ता असते. त्याचे हाती दुय्यम संपादक असतो. तो सर्व माहिती संक्षेपरुपाने थोडक्यात मुद्देसुद रितीने मांडून ठेवतो. वर्तमानपत्रास माहितीचा पुरवठा पाहिजे असल्याने त्यास लेखकांचीही जरुरी असते व ते लेखकही चांगले असावे लागतात. त्यात भरताड भरती मुळीच चालावयाची नाही. वर्तमानपत्राच्या किंमतीही अल्पच पाहिजेत, तर खप होईल. यादृष्टीने आपल्या इकडे वर्तमानपत्रांच्या किंमती थोड्याच आहेत. पूर्वी मात्र वर्तमानपत्रांचे दर जास्ती होते. परंतु ते दर कमी केल्याने त्यात पुष्कळांची सोय झाली आहे.

काही वर्तमानपत्रातील लेख मात्र विचारपूर्वक न लिहिल्याने, ज्या गोष्टींचा आपण मुळीच विचार केलेला नाही, जी गोष्ट अभ्यासिलेली नाही व जिचा आपणास गंधही नाही अशा गोष्टीवरही निरुद्योगीपणाने राहणाऱ्या लोकांचेकडून व सुखवस्तु लोकांकडून साहजिकच हरताळ फासले जातात व त्यांना त्या विषयाचे पूर्ण ज्ञान आहे अशा लोकांचेकडून ते लेख उपहासास्पद होतात.

सारांश, आपल्या इकडे केसरी शिवाय इतर बहुतेक पत्रातील विषय पोचट, मनोरंजक, शरीर व मनाची कमकुवता उत्पन्न करणारे असतात असे दिसून येईल. आता जी वर्तमानपत्रे आपल्या देशाच्या उज्वलतेविषयी प्रयत्न करितात त्यांचा खप व्हावयास पाहिजे. पण ज्यारितीने तो खप व्हावयास पाहिजे तसा तो निदान आपल्या देशात तरी होत नाही. याचे कारण लोकांमध्ये ज्ञानाची अभिरुची नाही हे एक व दुसरे म्हणजे बेकारी हे होय.

वर्तमानपत्रांचा उपयोग काय आहे हेही कित्येकांना फुरसत न झाल्याने

व शोध लागताहेत. पूर्वीसुधा आमच्या अध्यात्मशास्त्राच्या योगाने व अथर्व वेदाच्या सहाय्याने अनेक शोध लागले होते व पाश्चात्यदेशातील शोधही आमच्या अथर्वातुनच लागले आहेत. पाश्चात्य लोकांनी आमच्या वेदांचा बराच फायदा घेतला आहे, पण ज्ञानाच्या अभावी त्यातील अर्थाच्या अभावी आम्ही मात्र सर्वस्वी मुकलो. असे कित्येक सिद्धांत, कित्येक ज्ञान आमच्या पूर्वजांनी बोलून ठेवले आहे, की ते प्रत्यक्ष प्रयोगांती मान तुकविणाऱ्या पाश्चात्यांनाही कबूल करणे प्राप्त आहे. ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. आधिभौतिक शास्त्र हे केव्हाही अध्यात्म सोडून नाही. तेव्हा हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे लागल्याप्रमाणे आमच्या देशाची स्थिती झाल्याने त्यास मोठे दुर्दैव प्राप्त झाले आहे.

पुराणांतरी रामायणकालीन पुष्पक विमानाची हकिकत तर सर्वश्रुत आहेच. श्रीतुकाराममहाराज किंवा तिरुपन्नवर या नावाचे महान भगवद्भक्त संत हे विमानातून वैकुंठास गेले हा मजकूर सर्वत्र प्रसिद्ध आहे. अर्थात ही विमाने अध्यात्मबलाने प्राप्त होणारी असून, त्यांचे अंतिम ध्येय फार श्रेष्ठ आहे व हे विमान म्हणजे तरी काय व या गोष्टी काय आहेत व त्या कशा घडल्या हे फार गूढ आहे व हे सिद्ध करण्याचे हे स्थळ नव्हे. तात्पर्य ही कल्पना प्राचीन आहे व या कल्पनेवरूनच हा शोध लागला आहे.

मुले कागदी दिवे करून ते हवेत सोडून देतात ही गोष्ट आपणास माहित आहे. त्या दिव्यातील हवा उष्णतेने हलकी होते व त्या कारणाने दिवा वर जातो. या कल्पनेचा या विमानाच्या रचनेस काही उपयोग झाला आहे. एखादवेळेस विमान जास्त वर गेले असता तेथे श्वासोच्छ्वास करता येत नाही, अशी स्थिती असल्याने हल्ली त्यांनी विमानातून ऑक्सिजन भरलेल्या पिशव्या नेण्याची सोय केली आहे. विमान म्हणजे पतंगाप्रमाणे असते. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे विमान म्हणजे एक राक्षसी पतंगच!!

सर्व वहानांमध्ये विमानाचे महत्व फार आहे. विमानाची गती ही

सारांश, एकंदरितदृष्टीने या विमाना संबंधी विचार केल्यास विमानाने जग मागासले. विमानाचे योगाने जग आकुंचित झाले हे जरी खरे आहे तरी त्यातील द्वैतभाव मात्र नामशेष झाला नाही व कोठेच ऐक्यमत उत्पन्न झाले नाही, हेही तितकेच लक्षात घ्यावसास पाहिजे. ज्यागोष्टी मुख्यतः घडावयास पाहिजेत, त्या जर घडत नसतील तर मग या साधनाचा उपयोग तरी काय झाला!!

*****

## निबंध ३ रा - मातृभाषा दि.१४.०७.३८

मातृभाषा हा विषय माननीय आणि हृदयस्पर्शी असा आहे. मातृभाषेविषयी प्रत्येकाच्या मनात स्वदेश, स्वधर्म किंवा जन्मदात्री अशी जी महान मातृदेवता याविषयी जो आदर किंवा जे निरलस प्रेम अंतःकरणात वसत असते, तसेच ते स्वान्तःकरणात उदय पावले पाहिजे. आपल्या मनात स्वदेश किंवा स्वधर्म किंवा कुलगोत्र याबाबतीत जसा अभिमान वास करित असतो, तसाच या मातृभाषेविषयी आपणास स्वाभिमान वाटला पाहिजे.

मातृभाषा ही कुलपरंपरेने चालत आलेली भाषा आहे. या भाषेनेच आपले ज्ञान व सामर्थ्य वाढते आहे. या भाषेने बुद्धीद्वारा नाना तऱ्हेचे शोध लावले जात आहेत. या भाषेमध्ये मोठमोठ्या ज्ञानेश्वर, तुकाराममहाराजांचे सारख्या संतकवींनी अद्वैतपर व भक्तीपर अशी कविता केली की ज्या योगाने ब्राह्मणांची शेंडी व जानवी टिकून राहिली व आज जगतो की मरतो अशा परिस्थितीत सापडलेला हिंदुधर्म या महाराष्ट्रीय संतांनी मराठी भाषेतून ज्ञानप्रसाराचे महत्कार्य करून व भगवत्प्राप्तीचा जगताला मार्ग दाखवून, वाचविला व ''मराठी भाषाचि बोलु कौतुके'' असा मराठी भाषेबद्दल स्वाभिमान व्यक्त केला. महाराष्ट्रीय संतांनी या मराठी भाषेचे नाव अजरामर केले व ''न भूतो न भविष्यती'' असे ग्रंथ निर्माण करून ठेवले. अमृतरसाने परिपूर्ण

जितराष्ट्रावर अप्रत्यक्षरीतीने किंवा प्रत्यक्षरीतीने ही परराष्ट्राच्या संस्कृतीचा परिणाम जाहल्याशिवाय रहात नाही. अशावेळी गलीत झालेला धर्माभिमान लोकात जागृत करण्यासाठी, समाजातील झालेली फाटाफूट नाहीशी करण्यासाठी, आपल्या धर्मातील नितीतत्त्वे लोकांना पूर्णपणे पटवून देण्यासाठी, परधर्म हा नाशास कारणीभूत आहे हे दाखविण्यासाठी, तात्पर्य ज्या काळात समाजात धर्मजागृती आलेली असते, अशा वेळी स्वधर्मरक्षणासाठी या मातृभाषेचा चांगल्यारीतीने उपयोग होतो. मातृभाषेच्या योगाने स्वधर्माभिमानाप्रमाणे स्वदेशप्रीती ही नैसर्गिक रीतीने अंतःकरणात उद्भव होते. आपल्या पूर्वजांनी काय कार्य केले, त्यावेळची त्यांची परिस्थिती कशी होती, सध्याची परिस्थिती काय आहे व आपण काय कार्य करावयास पाहिजे याची मनुष्यास सारासार विचाराने जाणीव उत्पन्न होतेच. त्याच्या डोळ्यांपुढे पुढची स्थिती उभी राहून तो आपल्या स्वत्वाला जागृत रहातो. त्या योगाने या जितराष्ट्रास त्याच्या उर्जितावस्थेस एकप्रकारे बरीच मदत होत असते.

तात्पर्य, जे लोक पारतंत्र्यात आहेत त्यांनी मातृभाषा टिकवली पाहिजे. मातृभाषेची आठवण राहिली तर आपले अस्तित्व आहे. मातृभाषा ही परदास्यातून मुक्त करण्याची किल्ली आहे. मातृभाषेचे योगाने लोकांमध्ये संघटना होण्यास एकप्रकारे मदत झाल्याशिवाय कधी रहाणार नाही. तेव्हा ज्या मातृभाषेचे महत्व इतके आहे व जिचा आपणास अत्यंत उपयोग आहे, तिची आठवण ठेऊन, प्रत्येकाने मातृभाषेतील वाङ्मयाचा अभ्यास करणे हे आद्य कर्तव्य आहे.

*****

त्याचे ठिकाणी समता आणि विश्वबंधुत्व निर्माण होऊन स्वत्वाला जागृत राहण्याची व ज्याचे योगाने आपणास अस्तित्वभाव टिकविता येतो. त्या धर्मस्वरूप आत्म्याची प्रसन्नता संपादन करण्याची अनुपम हातोटी प्राप्त होऊन परमपदास जाता येते व जगताला स्वधर्माचा मार्ग दाखविण्याची पात्रता येते. ''नर करणी करे तो नर का नारायण हो जाय ।'' हे वचन ज्या योगाने सिद्ध करून दाखविता येते, त्या धर्माविषयी अंतःकरणात सदैव निष्ठा ठेवणे, त्याचा विचारपूर्वक अभ्यास करणे व जो आमचा वैदिक धर्म श्रीमत् आद्यश्री जगत्गुरु शंकराचार्य यांनी बुद्धमताचे खंडन करून पुनःप्रस्थापित केला, जो श्रीसमर्थांनी मुसलमानी आमदानीतही महत्प्रयासाने टिकविला व स्वामी विवेकानंदजी यांनी सर्वधर्म परिषदेचे वेळी ज्या वैदिक धर्माचा ध्वज अढळ रोवला व सर्व अन्य धर्मियांना या वैदिक धर्माचे महत्व पटवून देऊन, अमेरिकेसारख्या ठिकाणी परकीय देशातही आपल्या धर्माचे अनुयायी तयार केले व आपल्या सद्गुरूंचे म्हणजे श्रीरामकृष्ण परमहंसांचे नाव राखले आणि त्यांना संतोषित केले, अशा या आपल्या उच्च धर्माचे रक्षणासाठी लोकात धर्मजागृती निर्माण करणे व त्यातील अंधश्रद्धेचे निर्दालन करणे ही दुसरी गोष्ट आहे व ती लोकमान्य टिळकांचे ठिकाणी पूर्णपणे होती हे त्यांच्या 'गीता रहस्य' या विचारपूर्ण ग्रंथावरून सहजच कळून येईल.

आता सर्व समाजाची जबाबदारी ज्याचे शिरावर तो जर बलहीन, बुद्धिहीन असेल तर मुळीच चालावयाचे नाही. बुद्धी व शक्ती, ही मोठी शक्ती निर्माण करण्याची, समाजात ऐक्य उत्पन्न करण्याची, दोन साधने आहेत. जसे गाडीचे एक चाक निखळले तरी गाडी चालणार नाही, तद्वत् बुद्धी आहे, पण शक्ती नाही तरी उपयोग नाही व शक्ती आहे, पण बुद्धी नाही तरी निकामीच. श्रीमारुतीरायांचे ठिकाणी शक्ती आणि पराकाष्ठेची बुद्धी असल्याने त्यांनी रामायणकाळी ''न भूतो न भविष्यति'' असे महत् कार्य करून ठेवले. तसेच श्रीशिवाजीमहाराज यांचे ठिकाणीही शक्ती व बुद्धी या दोन गोष्टी परिपूर्ण असल्याने ''शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने कार्य होतसे ।।'' या

## निबंध ५ वा प्रभातकाल वर्णन दि. २३.०७.१९३८

प्रभातकालचे वर्णन करणे म्हणजे आकाशास गवसणी घातल्याप्रमाणे होणार आहे. एका कवीने म्हटले आहे की, ''गगनं गगनाकारं । सागरं सागरोपमं। रामरावणोयोर्युद्धं । रामरावणयोरिव ।।१।।'' तद्वत्‌च येथे आहे. पूर्वकालीन ऋषी लोकांना या प्रभातकालचे महत्व फार होते. ऋग्वेदात वगैरे याचे वर्णन कोठे कोठे केलेले आढळून येते. निरनिराळ्या कवींना प्रभातकालची रमणीय शोभा पाहून काव्यस्फुर्ती झाली व त्यांनी नानाप्रकारे त्याचे वर्णन करून ठेवले. यादृष्टीने पाहिले असता, प्रभातकाल म्हणजे ईश्वराने मनुष्यास दिलेली एक अमोल देणगीच आहे, असे म्हणावयास काही हरकत नाही. या काली ऋषीमुनी प्रातःसंध्या, ध्यान धारणा वगैरे करीत असत.

प्रभातकाली आपण जर जरा घराच्या बाहेर पडलो तर अजूनीही कोठे कोठे बायका जात्यावरील गाणी म्हणत असताना ऐकू येतील. त्याचप्रमाणे कोंबड्यांचे आरवणे ऐकू येईल. ज्यांच्या घरामध्ये गाई-म्हशी वगैरे असतील तेथे त्यांच्या वासरांचे गोठ्यातील हंबरणे ऐकू येईल. पक्ष्यांचा गोड असा मधून मधून किलबिलाटही ऐकू येईल, की ज्या योगाने मनुष्याच्या मनास आनंदच झाला पाहिजे. अशावेळी ही वेळ मोठी शांत असल्याने हुशार विद्यार्थी मनःपूर्वक अभ्यास करीत असलेले किंवा संस्कृतसारखे विषय घोकित असलेले दृष्टीस पडतात. शिवाय काही म्हाताऱ्या बायका कुडकुडत स्नानास गेलेल्या व काही कर्मठ ब्राह्मण मुखाने विष्णुसहस्रनामाचा पाठ म्हणत कृष्णाकाठावर प्रातःसंध्येला जात असलेले दिसतात.

अशावेळी या अंधःकाराचा नाश करून पृथ्वीस प्रफुल्लीत करण्याकरिता, जगाचे व्यापाराचे गाडे चालू करण्याकरिता, व सृष्टीमध्ये नवजीवन, जोम उत्पन्न करण्याकरिता, या मेघपटलातून भगवान श्रीसूर्यनारायणांची स्वारी क्षितीजावर आलेली दिसते. वेदांमध्ये एके ठिकाणी सूर्य हा जगाचा आत्माच असून, या तेजोमयी अशा प्रत्यक्ष दृष्टीस दिसणाऱ्या देवतेची जो कोणी

म्हणाला तरी त्याला तृप्ती ही होणारच किंवा कोणी जरी अगदी कासवाचे गतीने हरिपुरास जावयास निघाला तरी तो दीर्घकालाने का होईना पण तेथे जाऊन पोहोचणारच. तद्वत् मनुष्य जर आपल्या उच्च ध्येयासाठी योग्य त्या तऱ्हेने निःस्वार्थीपणे प्रयत्न करू लागेल तर त्यास त्या कार्यात उत्कर्ष प्राप्त होऊन, त्याचे स्वयंप्रकाशी उज्ज्वल मार्ग त्यास दिसू लागतील व ते ध्येय जरी असाध्य असले तरी तो केवळ प्रयत्नाने सहजच मिळवून आत्मसात करू शकेल.

कूपमंडुक वृत्तीने आपल्या पोटापुरताच प्रयत्न करणाऱ्या लोकांना स्वार्थीपणा धरावा लागेल, पण आपणास ही वृत्ती धरून मुळीच चालणार नाही. का तर आपला देश काही स्वतंत्र नाही, म्हणून आम्ही निःस्वार्थीपणेच कार्यास झटले पाहिजे व लोकमान्य टिळकांचेसारख्या थोर विभूतींचेच कित्ते गिरविले पाहिजेत. तरच काहीतरी तरणोपाय आहे. एरव्ही नाही. ''असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।'' श्रीतुकाराममहाराज म्हणतात की, कितीही जरी एखादी गोष्ट दुष्कर असली तरी ती प्रयत्न करून साध्य होणार नाही असे मुळीच नाही. तर ती प्रयत्नाअंती साध्य झालीच पाहिजे. म्हणूनच 'प्रयत्नांती परमेश्वर' असे आपल्या मराठीतील एका म्हणीत म्हटले आहे. मनुष्याचे ठिकाणी थोर सामर्थ्य ईश्वराने दिले असता आळशीपणाने जर तो निरोद्योगी बनेल, तर ईश्वराने तरी त्याचे कौतुक का करावे? हेच समजत नाही. ''नर करणी करे तो नर का नारायण हो जाय.'' मनुष्याने कर्तव्यदक्षतेने प्रयत्न केला तर त्यास देवपणा प्राप्त होतो. पण बिन करणीचा जो आहे, तो मात्र काहीच करू शकणार नाही.

टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवकळा कशी येणार? दगडाने टाकी सहन केली तर तो ती पदवी लाहील. पण पदराचा किंवा पिठा दगड तेथे काय कामाचा? तसेच राष्ट्रकार्यास स्वार्थीपणाने, हीनवृत्तीने आपल्या पोटा करिताच झटणाऱ्यांची काय जरुरी आहे?

आपल्या देशाच्या नाशाचे कारण म्हणजे रिकामपणा. उद्योगी व रिकामा

# निबंध ७ वा खेडेगावची रहाणी

सदर विषय जितका साधा वाटतो तितकाच तो व्यापक आहे आणि त्याचा विचार पुष्कळबाजूंनी करिता येण्याजोगा आहे. खेडेगावची रहाणी ही शहरातील लोकांचे रहाणीपेक्षा फार भिन्न आहे. खेडेगावची जी रहाणी आहे ती काहीदृष्टीने सुखाची आहे असे म्हटले तर काही वावगे होणार नाही. मात्र ती सर्वस्वी सुखदायी आहे असे कोणी मानावयाचे कारण नाही.

खेडेगावातील लोकांचेकडे पाहिले तर त्याठिकाणी काही विशेष आहे असे नाही. पण त्यांचे तेथील परिस्थितीने त्यांच्यात निर्माण झालेले जे काही स्वाभाविक गुण, ते मात्र निंद्य म्हणून सांगण्यास कोणाचीही जीभ उचलणार नाही. खेडेगावातील लोक सर्वसाधारणपणे दणकट असतात. याचे कारण असे की, त्यांचा तेथील मुख्य धंदा शेतकी हा असतो व या शेतामध्ये राबणे ही गोष्ट काही साधी नसल्याने त्यांचे अंगी दणकटपणा, काटकपणा, धिटाई हे गुण उत्पन्न होतात. ''तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे। येरा गबाळ्याचे काम नाही ।।'' या श्रीतुकाराममहाराज यांचे उक्तीप्रमाणे ही कामे उगीच कोणी मी हुम्मण दांडगेपणाने करीन असे म्हटले तर ते मात्र होणार नाही. त्याला त्यातील वाक्बगाराचे हातूनच तयार व्हावयास पाहिजे आणि ही कला लहानपणापासूनच अवगत करून घेतली पाहिजे, नाही तर व्यर्थ. ज्याला श्रम होतात, त्याला भूक चांगली लागते, अन्न पचते व शरीर निरोगी रहाते. 'खायला कोंडा निजायला धोंडा' ही गोष्ट कशी सार्थ आहे याची प्रचिती याठिकाणी येते. जो शेतकरी आहे, त्याचे अंगी खाईन ते पचवीन असे सामर्थ्य असते. तेथे असलेली स्वच्छ हवा हेही त्याचे निरोगी प्रकृतीस कारण होते. शिवाय खेडेगावात दुध-दुभतेही भरपूर. या सर्व कारणांनी मनुष्याला आवश्यक अशी जी झोप ज्याला इंग्रजीत 'Sound Sleep' असे म्हणतात, तीही त्यांना नुसती पाठ टेकल्याबरोबर भरपूर येते व ते घोरू लागतात. याचे उलट अन्नच पचत नाही, भूकच लागत नाही, झोपच येत

# निबंध ८ वा मी श्रीमंत असतो तर

मनुष्य हा नैसर्गिकच भावनांनी युक्त असतो. असा हा मनुष्याचा स्वभावधर्म असल्याने तो नेहमी कल्पनेच्या लाटांनी मनरूपी समुद्रावर एकसारखा आदळत असतो. मात्र कल्पना नानाविध केल्या तरी काही फलनिष्पत्ती होणार नाही, याची त्याला कल्पनाच नसते. मी श्रीमंत असतो तर या गोष्टीचा विचार 'आत्याबाईला मिशा असत्या तर' या विचाराप्रमाणेच आहे. मनोराज्यामध्ये आम्ही जरी हवेत बंगले बांधले तरी, तशा गोष्टी होणार आहेत थोड्याच!

मनुष्याने काही कृती केली पाहिजे. करणी केल्याविना सर्व काही व्यर्थ. मानवी सामर्थ्याची कल्पना मोठी अफाट आहे. परमेश्वराने मनुष्याला जी बुद्धी दिली आहे, तिचा उपयोग त्याने आचरणद्वारा करून, शाश्वत सुख अद्वैत सुख घ्यावे याकरिता आहे. न होऊन काही मनोराज्य निर्माण करून नाशिवंत, काल्पनिक आनंद मानण्यासाठी मात्र बुद्धी दिलेली नाही. ''नर करणी करे तो नर का नारायण होय'' मनुष्याने प्रयत्न केला तर त्याचे आकुंचित स्वभावधर्म पालटून, द्वैताची बंधने नाहीशी होऊन, तो अद्वैताचा अनुभव घेऊन, अद्वैती प्रत्यक्ष देवच होतो व चिरकाल सुखस्थानाचे स्वराज्याचे सिंहासनावर अधिष्ठित होतो. मग प्रयत्नाने तो श्रीमान होईल, मान्यस्त होईल किंवा स्वराज्य मिळविता येईल हे सांगणे नकोच! तो जगामध्ये अद्वैताचे साम्राज्य आपल्या अंगचे गुणांचे जोरावर चोहिकडे निर्माण करील. अशा तऱ्हेचे साम्राज्य आमच्या महाराष्ट्रात होऊन गेलेल्या गतःकालीन संतांनी चोहीकडे निर्माण करून ठेवले आहे. की जे कोणत्याही शत्रूला हिरावून घेता येणे शक्य नाही.

श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, निळोबाराय, स्वामी रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ व आधुनिक ५४ वर्षापूर्वी होऊन गेलेले प्रख्यात संत श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी अद्वैताचे साम्राज्य चोहीकडे कसे निर्माण केले

आहे. हिंदू हे देवाचे सिंहासनाजवळ जाऊन पोचलेले आहेत. जितकी संस्कृती उच्च तितके विचारही त्याठिकाणी अधिक मोलाचे निघतील व जितके विचार मोलाचे तितकी ज्ञानाची परिपक्वस्थिती हाताशी येईल व त्यायोगे शांततेचे शिखर गाठून असूरवृत्तीचा पाडाव करून सूरवृत्तीनेही आपल्याला आपले कोणचेही ध्येय गाठता येईल. जो संस्कृतीचे योगे आपले शील चांगले राखील, तो हे राष्ट्र सहज मुठीत धरील व लोकांचे विचार उच्च भूमिकेला आणील. जो स्वतः मनाच्या अधीन होईल आणि इंद्रिये स्वैर सोडील, तो परावलंबी झाल्याने स्वत्व गमावून राष्ट्रामध्ये नवचैतन्य निर्माण करण्यास असमर्थ होईल. जितकी संस्कृती उच्च तितके युद्धाचे, मारामारीचे आणि खटल्या-खोकल्यांचे प्रसंगही कमी. समाजातील एकवाक्यता ही समाजास समर्थ करण्याची एक निशाणीच आहे. समता, बंधुभाव हे गुण जर आपल्यात येतील तर संघटक होण्यास मुळीच विलंब लागणार नाही. निष्कपटपणा, निःस्वार्थीपणा हे गुण अंगी बाणल्यास अत्याचार व्हावयाचा नाही आणि रक्तपात न होता जर राष्ट्र राजीखुषीने, खुल्या दिलाने जर स्वतंत्र होत असेल तर ते कोणास नको आहे?

लोकमान्यांनी केलेली घोषणा जर ''नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ।'' या न्यायाने सिद्ध होणार असेल तर म.गांधींनी दिलेले व स्वतः आचरणात आणलेले तत्त्व अमलात आणल्यास काय वावगे होणार आहे. आपल्या शरीरावर आणि मनावर ज्याचा ताबा चालत नाही तो स्वराज्याच्या गोष्टी बोलू लागला, तर त्यात काय अर्थ आहे. सध्या आपल्या हिंदुस्थानची परिस्थिती पहाता तो आज सर्व बाजूनीच कमकुवत झाला आहे. आमचा समाज प्रथम शस्त्रहीन झाला आणि स्वैरवर्तनाने तो बलहीन आणि चौकस बुद्धीचे अभावी बुद्धीहीन झाल्याने, देशात बेकार स्थिती फार वाढली आहे. असूरवृत्तीने जर आम्ही आमचे राष्ट्र मिळवू म्हटले तर ते सर्वथा अशक्य आहे. असूरांनी असूरवृत्ती धारण करून असूरी कामे केली तर ते कोणी निंद्य म्हणणार नाहीत व अयोग्यही होणार नाही. पण देवांनी जर हुम्मणदांडगेपणास

चालत आलेला आहे व तो पुढेही चालत रहाणारच. आम्ही जर अत्याचार केला तर तो परमेश्वरास तरी कां खपावा? उच्च दानत जर आम्ही सोडू लागलो तर त्याबद्दल ईश्वरास तरी कां न राग यावा? आम्ही परमेश्वराचे सिंहासनाजवळ उभी असलेली आमची संस्कृती ही निर्मळ व सोज्वळ असल्याने, त्यास जर एखादा बारीकसा डाग लागला तर तो भडक उठून दिसतो व त्याचे प्रायश्चित्तही घडल्याशिवाय रहात नाही, असा सर्वसाधारण अनुभव आहे. आमच्याजवळ पूर्ण ज्ञानसंपत्ती असूनसुद्धा जर आम्ही अडाण्याप्रमाणे वागू लागलो व ''घरी कामधेनु पुढे ताक मागे'' याप्रमाणे जर करू लागलो, वडिलांनी लाखो रूपयांची इस्टेट करून ठेऊनसुद्धा एखाद्या कमनशिबाला फडक्याला गाठी देण्याची हौस असावी, त्याप्रमाणे जर पूर्वीचे सर्व तुच्छ करून हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे लागू लागलो, तर हानी झाल्यास नवल ते काय? ज्याचे ठिकाणी माणुसकी नाही, काळीज नाही अशा उलट्या काळजाच्या लोकांचेकडूनच अत्याचाराची कृत्ये होतात व त्याचे नाशकारक फळ जरी मिळाले तरी ते खाण्यासही त्यास लाज नसते. पण ज्यांना काही सत्संस्कार झालेले असतात त्यांचे हे काम नव्हे. शस्त्रानेयुक्त व शस्त्रहीन सैन्य यातील युद्ध, हे युद्धनीतीस सोडून आहे. आम्हाला धड काठी घ्यावयाची परवानगी नाही, तेथे हा हिंदुस्थान बामगोळ्याशी काय टक्कर देणार? मात्र स्वतःचे मन धीट व शरीर भक्कम असणे हे हल्लीच्या काळी अत्यंत आवश्यक असल्याने त्याची फार जरुरी आहे. सर्व संतांची चरित्रे पाहिली तर त्या संतांचे कट्टर वैरी त्यांना एक त्यांचे शांतवृत्तीमुळे, शीलसंपन्नतेने, सदाचरणाने शरण आल्याचे दिसून येते. मनुष्याला सर्व संकटे सहन करण्याची शक्ती प्राप्त झाली असता त्यास देवकळा प्राप्त होते. फक्त शांतपणाने आणि धिम्मेपणाने युक्तीपूर्व उदात्त विचाराने सतत कार्य करणे येवढे मनुष्यमात्राचे काम आहे. तात्पर्य आपणास अनत्याचाराचे योगानेच राष्ट्रसंपदा मिळवणे हे फार सोपे आहे. ''सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।''

पहावयास मिळणार म्हणून व वडील मंडळींना मिळणाऱ्या या आनंदात अंशतः आपणास भागीदार होता येणार म्हणून आनंद.

पण हा सर्व आनंद कृष्णामातेने जोपर्यंत फार उग्र स्वरूप धारण केले नाही तोपर्यंत! नाहीतर आपले उग्र स्वरूप माघारी घेऊन आपण आपले शांतपूर्ण कोमल स्वरूपच या भक्तापुढे प्रगट करा, आपले हे विराट स्वरूप आमच्याने आता पहावत नाही असे म्हणण्याचा बहुधा प्रसंग यावयाचा!

*****

## निबंध क्र.११ कलावान चित्रकार

मनुष्य एक कलावान चित्रकार असून त्याला जगातील सौंदर्याची इतकी माहिती असते की तो निसर्गाच्या सौंदर्याचा स्वतःच्या कृतीने भागीदार होऊ शकतो. सौंदर्याच्या शोधाने तो सुंदर वस्तुच्या गुणग्राहकतेसंबंधी या जगामध्ये अभ्यास करीत आलेला आहे. त्या कारणाने तो जे काही करतो, त्यात तो सौंदर्य निर्माण करू शकतो. तो जे काही करील ते सिद्ध होते. आपल्याला समाधान करण्यासाठी तो सौंदर्य निर्माण करतो. आपण त्याच्या कामाची योग्यता ओळखली पाहिजे. त्या कलावंताच्या अनुरोधाने आपण जगातील गोष्टी पाहिल्या पाहिजेत. या जगातील वस्तु कलावंताच्या दृष्टीने पहाण्याची जर सवय लावली व आपल्याला त्यातली मार्मिकता समजली तर कलावंतांची कलाकृती त्यांचे ठिकाणी उतरून त्याला समाधान होईल. एखाद्या गोष्टीत जर कोठे कलाकृती कमी असेल तर ती ओळखता येईल.

*****

झाला.

जगात अनेक तऱ्हेचे नाना रंग करणारे भिकारी दिसतील, पण त्यात खरखरमुंडेच फार. लोकांना सतावून सोडण्याची वृत्तीच सर्वत्र दिसेल. संतोषी व निरपेक्षवृत्तीचा, जे काही मिळेल त्यातच आनंद मानणारा असा भिकारी विरळाच! पाश्चिमात्य देशामध्ये भीक मागणे हा गुन्हा समजला जातो. तसा तो हिंदुस्थानात नाही, म्हणून या खरखरमुंड्यांचे पीक आपणास दृष्टीस पडते. पण हा भिकारी तसा नव्हता.

परमेश्वराने कोठे काय देणगी दिली असेल ते सांगता येत नाही. त्याचे अंगी उत्कृष्ट गाण्याचीही कला होती. त्याचेजवळ जरुरीपेक्षा जास्त असलेले धान्य, तो त्याला जे अनाथ वाटतील, त्यास देत असे. यावरून त्याचे अंगी असलेली त्यागी वृत्तीही निदर्शनास आली.

या सर्व गोष्टी पहाता मनाला असे वाटले की, याला भिकारी कोणी म्हणावे? तो वेषाने भिकारी असेल, पण मनाने ''श्रीमान कोण म्हणावा! जो नर संतुष्ट नित्य चित्त असे'' या न्यायाने श्रीमान आहे. स्वार्थी संपत्ती टिकत नाही पण त्यागी संपत्ती चिरकाळ टिकते. तो भिकारी ''आरी झालो भिकेचे।'' या न्यायाने व ''हम तो भिकारी । मौजा करते लहरी ।।'' या कबीरसाहेबांनी सांगितलेल्या कोटीतला होता. असले भिकारी व त्याच्या ठिकाणी ज्या चांगल्या वृत्तींचा परिपोष झालेला आपणास दिसतो तशा वृत्तीचे इतर लोक जर निर्माण होतील तर आपला उत्कर्षच होईल.

*****

साधुमहाराजांचे प्रित्यर्थ खर्च. राम देतो राम नेतो. पुन्हा देणारा तो आहे. त्याचे दरबारात कमी काय? हीच वृत्ती. साठविणेची वृत्ती नाही. साधुमहाराजांचेप्रमाणे बैठकीवर साधन व सेवा. पुढे काही मंडळींनी विचारले, पुढे महाराजांचे मुलांना काही शिल्लक ठेवणार की नाही? राजाराममहाराज म्हणाले, ''हे मला काय करायचे? त्यांना राम देईल की.'' तो देतो ते त्याला खर्च करायचे की तो देतो. कमी पडणार नाही. पण हा विरोध पहाता, साधुमहाराजांचे देवालयापुढे येऊन झाली ही इतकीच सेवा. यापुढे आपली सेवा करण्याचा योग नाही. पण आपली माझेवर कृपा असू दे, आपले भजन व साधन ही तो खरी सेवा असे म्हणून काडसिद्धाला गेले. सोळा वर्षे अखंड साधन केले. साधुमहाराजांचेकृपेने ते परमात्मरूप होऊन महासाक्षात्कारी झाले. काडसिद्धांनी दर्शन देऊन मस्तकावर हात ठेवले. फिरत निघाले, ते देवपिंपळीला निघाले असता पाटलाला दृष्टांत झाला की, नदीकाठी एक साधू बसले आहेत, तू दर्शन घेऊन ते सांगतील ती सेवा कर. दुसरे दिवशी श्रीराजाराममहाराज नदीकाठी एका झाडाखाली देवपिंपळीस जाऊन बसले. पाटील गेला व त्याला हेच ते साधु असावेत असे वाटले. ते अस्ताव्यस्त बसले होते. पण त्यांना पाहिलेवर समाधान होऊन ते साधु असल्याचे तो उमगला व पाय धरून महाराज आमचे घरी याल का? आपण कोण? काय करता? असे विचारले. आम्हाला ठावठिकाण नाही, आम्ही फिरस्ते, आई-बाप देव, साधुमहाराजांचे भजन व साधन ही नोकरी. आम्हाला घरी काय बोलावणे केले काय? पाटील :- महाराज, मी तुम्हाला काय नोकरी देतो? आपण अनंत ब्रह्मांडाधीश परमात्म्याचे लाडके. लाखोपती लोकांना अनेकानेक नोकऱ्या द्याल. मी नोकरी मागणेकरिता आलो. दासानुदास आहे. राजाराम :- असे, नोकरी करणार? मग नाही म्हणशील बघ. पाटील :- छे छे वाटेल ते सांगा केल्याशिवाय राहणार नाही. तेथे निवडुंग बराच बेसुमार वाढला होता. राजाराममहाराज :- मी आखुन देतो इतकी जागा अशी साफ कर,

करून ते इंचगेरीस त्यांचेजवळ कायमचे राहिले. त्यांची सर्व सेवा ते करीत असत. भक्तमंडळी श्रीभाऊसाहेबमहाराजांना गावोगावी नेत. ते रामभाऊमहाराजांना सुद्धा बरोबर नेत. त्यांची सर्व सेवा पाहून महाराजांनी त्यांना नाममंत्र दिला.

श्रीभाऊसाहेबमहाराज यांचा सर्व स्वयंपाक रामभाऊमहाराज करीत. त्यामुळे भाऊसाहेबमहाराज त्यांना प्रेमाने मातोश्री म्हणत व नेमाची (साधनाची) तू काळजी करू नकोस, मी तुझा नेम करतो, असे म्हणत. आपल्या संप्रदायात गव्हाची खीर करणेची पद्धत आहे. खीर घोटण्याचे काम रामभाऊमहाराज करीत असत.ते महान शक्तीचे काम आहे. ते रामभाऊमहाराज अगदी सहज करीत. म्हणून भाऊसाहेबमहाराज यांनी त्यांना हनुमंताची उपमा देऊन सोन्याचे कडे दिले होते व दंडात मारुतीची पेटी घातली होती. श्रीभाऊसाहेबमहाराज यांची नात व रामभाऊमहाराज हे नेहमी महाराजांच्या खोलीत असत. सोलापूरचे गोविंदराव गोडबोले यांच्या मातोश्री श्रीउमदीकरमहाराजांच्या नामधारी होत्या. त्यांचेकडे रामनवमी सप्ताहानिमित्त ते येत असत. पुढे पुढे वयोमानाने रामभाऊमहाराजांना जाणे-येणे अशक्य झालेने काही भक्त मंडळींनी त्यांची सोय सोलापूरला हाजीभाई चौकातील शिष्याच्या विठ्ठलमंदिरात केली होती. त्याच जागी १९५० साली आषाढ वद्य चतुर्थी या दिवशी दुपारी ४ वाजता त्यांचे निर्याण झाले.

निर्याण होणेचे आधी ते म्हणत असत ''मी असा कोणाच्या बंधनात पडणार नाही.'' त्यांची मूर्ती ठेंगणीशी होती. स्वभाव फार शांत होता. सकाळी स्नान-संध्या झाली की, ते नेमाला बसत. त्यावेळी त्यांचे मौन असे. नातवंडांना नेमाची व मौनाची किंवा सोवळ्या ओवळ्याची काय कल्पना! ती त्यांचे अंगावर पडत, पण हे तसेच बसलेले असत. काही बोलत नसत, रागवत नसत. नेम झाल्यावरही नातवंडांचा त्यांनी कधी समाचार घेतला नाही.

# ३. श्री हालसिद्धनाथ व चिमड परंपरा यांच्या संबंधाविषयी माहिती

श्रीरेवणसिद्ध हे घोसरवाडी दूध मागावयास आले म्हणून ते हालसिद्ध झाले. तेथे श्रीगोविंदपंतांचे अंगी बालपणापासून सिद्धांचा संचार होऊ लागला. अनेकांना त्यांनी अनेक चमत्कार दाखविले. सिद्धांचाच हा चिमड संप्रदाय असलेने सिद्धांनी श्रीगोविंदपंतांना चिमडचा गुरुपदेश घेण्याचा आदेश दिला. चिमडमहाराजांचे परमशिष्य श्रीदत्तोपंत कुलकर्णी यांचेबरोबर जाऊन श्रीगोविंदपंतांनी श्रीनारायणमहाराजांचा उपदेश घेतला. श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे आज्ञेने माझे तीर्थरूप प.पू.श्रीमामा रोज कीर्तन करीत. त्यांचे कीर्तनास श्रीदत्तोपंतांच्या कन्या श्री.चंद्राक्का कुलकर्णी रोज येत. श्रीगोविंदपंत सांगलीस आले की या चंद्राक्कांचेकडे उतरत. त्यांचे मनात हालसिद्धनाथांची परंपरा व चिमड पंथ जर एक आहेत, तर एकमेकांची एकमेकांना जवळीक रहावी असे फार वाटे. यामुळे श्रीगोविंदपंतांचा व आमचे श्रीमामांचा चांगलाच परिचय झाला व संचारावस्थेत श्रीकेळकरमामा हे या चिमड संप्रदायात अधिकारी पुरुष ठरतील असा त्यांनी आशीर्वाद दिला. श्रीमामांनी त्यांचे आयुष्यातील शेवटचे दिवसापर्यंत एकही दिवस खंड न होता अखंड हरिकीर्तन केले व त्यांचे कीर्तन अजुनही चालू आहे. या सर्वदृष्टीने या नाथपरंपरेची व चिमडपरंपरेची जवळीक निर्माण झाली. या नाथांचे स्थानीही चिमडचीच पंचपदी म्हटली जाते. ही या देवाला फार प्रिय आहे. श्रीगोविंदपंतांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीबाबूराव व या नाथ परंपरेतील विद्यमान थोर पुरुष श्रीशंकरमामा यांचे प्रेमामुळे घोसरवाड व अप्पाचीवाडी येथे आमचे जाणे-येणे होऊ लागले. या कारण जे मला काही ऐकावयास मिळाले, ते एकत्र करून येथे प्रकाशित केले आहे. श्रीचंद्राक्का असत्या तर त्यांना हे सर्व दृश्य पाहून अंती आनंद झाला असता. त्यांचे चिरंजीव परमप्रिय गजाननराव मास्तर यांचेमुळेच ही सिद्धस्तुती साकार होत आहे. अशीही

सिद्ध स्तुती श्रीरेवणसिद्धांचे चरणी अर्पण करितो आहे.

## ४. प.पू.सद्गुरू श्रीदादासाहेब कोटणीसमहाराज यांच्या निर्याणाची हकीकत

इ.स.१९७२ चा श्रावण महिना. भगवान प.पू. श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराजांचे पासून श्रीगोकुळअष्टमीचे निमित्त फडणीसांचे घरी चाललेली कीर्तनाची परंपरा. श्रीतात्यासाहेब घरी करणेचे कीर्तनच तेथे करीत असत. आमच्या गु.दादांनी ती परंपरा अगदी कसोशीने पाळली होती. मला आठवते, एकच वर्ष दादा फार आजारी असलेने ती.प.पू.श्रीमामांची कीर्तने फडणीसांचे घरी झाली. फक्त जन्मकाळाचे कीर्तन श्रीदादांनी केले. त्यावर्षी प्रस्तुत लेखकाचे तेथे निरूपणही झाले होते. हा एकच अपवाद जर सोडला तर श्रीदादांचे कीर्तन कडेपर्यंत झाले, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

गु.दादांची एक्काहत्तरी मोठ्या थाटाने कैवल्यधामात झाली. श्रीतात्यासाहेबांचा पुण्यतिथी महोत्सवच जीव की प्राण असल्याने, तीही आपले जन्मतिथीस साजरी न करता त्यांनी पुण्यतिथी महोत्सवातच साजरी केली. श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथीस यामुळे त्यावर्षी दुप्पट महत्व प्राप्त झाले. गु. दादांचे भक्तमंडळींनी यानिमित्ताने त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून थैली अर्पण करणेचे ठरविले. या गौरव समितीचे अध्यक्ष श्री. डी. टी. कुलकर्णी असून, स्वागत समितीचे अध्यक्ष युवराजमहाराज हे होते. दादांनी थैली घेण्याचे साफ नाकारल्याने, दादांची कीर्तने संकलीत करून प्रसिद्ध करावीत असे या मंडळींनी ठरविले. त्यात श्रीतात्यासाहेबांचे चरित्र थोडेतरी घालावे असे दादांनी सुचविले व या ग्रंथ प्रकाशनास मान्यता दिली. येथे पुनः एक गोष्ट ध्यानात येईल की ते पुस्तकही श्रीतात्यासाहेबांचेशिवाय निघाले नाही. याचा प्रकाशन समारंभ मुंबईचे श्रीनिसर्गदत्तमहाराज यांचेहस्ते मोठ्या थाटाने झाला. श्रीदादांनी आपले प्रिय बंधु माझे तीर्थरूप प.पू.कै.मामा यांचे

छायाचित्रही आपले हातून श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथीस आराधनेचे प्रारंभीच आपले घराचे, देवघराचे खोलीवर प्रतिष्ठीत केले आणि हा त्रिवेणी संगम सोहळा उत्साहपूर्ण असा झाल्याचे दिसून आले.

त्यानंतर मात्र दादांची प्रकृती दादांना साथ देईना. मग त्यांचे मनानेच काय घेतले हे कळणेस मार्ग नाही. ब्लड प्रेशर तर त्यांना पूर्वीपासूनच होते. प्रकृतीची तक्रार थोडीफार सुरु झाली आणि इ.स. १९७२ चे गोकुळाष्टमीचे उत्सवात तर त्यांना बेसुमार ताप आला व दादांनी आपले चिरंजीव गुरुनाथ यांनाच फडणीसांचे घरी कीर्तन करणेस सांगितले. गुरुनाथांची कीर्तने दादांच्या इतकी सरस वठली आणि सर्वांनाच ते एक मोठे आश्चर्य वाटले. आजोबांचे प्रेम नातवावर असते म्हणतात हेच खरे.

भाद्रपद, आश्विन, कार्तिक महिना गेला. श्रीतात्यासाहेबांचे जन्माष्टमीचे कीर्तन परमप्रिय गुरुनाथांनीच केले. श्रीमंत युवराजमहाराज व गु.श्रीदादा हे कीर्तनास बसले होते. कीर्तन फारच रंगले आणि कथा त्रिवेणी संगम या न्यायाने कैवल्यधामात मोठीच शोभा आली. जन्मोत्सव म्हणून एक गर्दी व दादांची प्रकृती पहाणेकरिता एक गर्दी अशी माणसांची मोठीच गर्दी झाली. कीर्तनोत्तर प्रसाद वाटणेत आला व सर्व मंडळी दादांना नमस्कार करून परतली. यानंतर श्रीदादांना श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथीचा मोठाच ध्यास लागला होता. स्वतःची प्रकृती परस्वाधीन झालेली. दुष्काळी परिस्थिती व त्यात ही पुण्यतिथी कशी पार पडणार? हीच एक मोठी त्यांना रात्रंदिवस विवंचना होती. त्यांचे पुतणे डॉ. माधवराव यांचेच औषध व इंजेक्शन्स चालू होती. दादांचे धाकटे बंधू ती.रा.रा. गोविंदराव अण्णा व सौ. इंदिरावहिनी यांचे तर पूर्ण लक्ष होतेच, परमप्रिय गुरुनाथ, त्यांच्या पत्नी सौ. उषाताई व माधवराव, त्यांच्या पत्नी सौ.कुसुमताई यांनी फारच उत्तमप्रकारे दक्षता घेतली होती. दादांच्या पत्नी सौ. जानकीवहिनी या तर सेवातत्परच होत्या.

दादांची प्रकृती इतकी व्याकूळ होती, त्यामुळे जास्त वेळ बसणेचे खरे धैर्यच होत नव्हते. तथापि सर्वांच्या समजुतीकरिता थोडे जात असे. दादा प्रस्तुत लेखकाला म्हणाले, ''रामभाऊ, आता या जगाचा निरोप घ्यावा असे वाटते. या देहाचा कंटाळा आला आहे. उगीच परस्वाधीन किती रहावयाचे?'' प्रस्तुत लेखक म्हणाला, दादा तुम्ही असे का म्हणता, महाराजांनी आज खरे म्हणजे तुम्हाला काय कमी केले आहे? राजैश्वर्याने सर्व काही तुमचे व्यवस्थित चालले आहे. इतके सर्वजण तुमचे करता सर्वतोपरी झटत आहेत. औषधात - पथ्यात - सेवेत - कशातही कसूर नाही. हे तर खरे ना? व असे आपण म्हणता, हे ऐकले तर गुरुनाथांना काय वाटेल ? शिवाय आमच्या संप्रदायात तुमचे सारखी आता मोठी माणसे आहेत तरी कोण? मला तरी आमचे मामांचे नंतर तुमचाच खरा आधार आहे. तेव्हा तुम्ही असे बोलला की आत चर्रर होते. तुम्ही असे बोलत जाऊ नका. पेक्षा मीच आता बेता बेतानेच येईन म्हणजे झाले.

दादा म्हणाले, ''रामभाऊ, तुम्ही असे करू नका. तुम्ही आला म्हणजेच खरे मला औषधाशिवाय बरे वाटते. फक्त मी म्हटले एवढ्या करताच की, जगात आता मजा राहिली नाही. जगाला अनिष्ट वळण लागले आहे आणि याच काळात परमेश्वराने आम्हाला जन्मास घातले आहे.''

प्रस्तुत लेखक म्हणाला, यात देवाचा काहीतरी हेतू आहे. आपणच या परिस्थितीशी मुकाबला करणेस योग्य असलो तर? हे ऐकल्यावर दादा हसू लागले व म्हणाले, रामभाऊ, मी आपले उगीच म्हटले. फक्त मला परावलंबीत्व आले त्यामुळे लोकांनी कितीही केले तरी करून घेताना संकोच वाटतो इतकेच. त्यानंतर एकदा गुरुनाथ, दादांचे तेथे असताना अशाच प्रकारची भाषा निघाली. गुरुनाथ म्हणाले, दादा तुम्हाला श्रीतात्यासाहेबांचा जो गाथा ''कैवल्यसागर'' तो प्रसिद्ध झाल्याशिवाय जाताच येणार नाही. तुम्ही असले

एकदा श्रीरामप्रभूंचे घरी काही प्रयोजन होते. प्रशस्त मांडव घातलेला, रांगोळ्या काढलेल्या, पाट घातलेले, आसने घातलेली. पाने मांडावयाची होती. श्रीलक्ष्मणांनी आमचे दादांना केळीची पाने मांडावयास सांगितली. दादा पाने मांडू लागले. मधेच त्यांचे पायातून गोळा आल्याने मटकन खाली बसले. हातात पाने तशीच. मागून राम आले व त्यांनी दादांना विचारले, पाने मांडून झाली की नाही? दादा म्हणाले, इतकी मांडली, पण यापुढे माझे हातून होईना म्हणून मी मटकन खालीच बसलो आहे. श्रीरामप्रभू म्हणाले, अरे बाबा या केळीच्या पानातील किड्याने तुझे सारे दुखणे खाल्ले आहे. हे होते न होते तोच दादा जागे झाले. वैद्यक तपासणीत दादांचे शरीरात काही दोष नाही हेच ठरले. फक्त नावन्नाव शक्ती मात्र कमी होत चालली आहे, हेच त्यांना दिसून आले. दुखणे म्हणण्याजोगे काही नाही.

यानंतर दादांचे स्वप्नात एकदा बसवेश्वर आले होते. ते म्हणाले, तुला घेऊन जाणेकरिता आलो आहे. दादा म्हणाले माझी प्रकृती अगदी अशक्त झाली आहे. श्रीमंत युवराजमहाराज यांची मोटार आहे, खरे पण आत्ता नादुरुस्त आहे. मग मी येणार कसा? बसवेश्वर म्हणाले, मी मोटार घेऊनच आलो आहे. दादा मोटारीत बसले आणि जागे झाले.

या सर्व स्वप्न दृष्टांतावरून पुढे काय हे आता दिसतच होते. चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली. डॉ. माधवराव यांनी मोठी भारी भारी औषधे व इंजक्शने चालू ठेवली. यातूनही दादा बरे होतील ही एक मनाला प्रत्येकाच्या वेडी आशा होती. पण छे!! तसे लक्षण मात्र दिसेना. गु.भ.प. गंगाधरराव सिंग, अंतोबा म्हसकर, नारायणराव जोग, मणेश्वर अत्रे व शंकरराव इनामदार वगैरे मंडळी मधून मधून सवडीप्रमाणे येऊन प्रकृती पाहून जात असत. दादांचे शिष्यवर्गांपैकी गु.भ.प. भा. प.म्हसकर, राम करजगार, शाम करजगार, कवठेकर मास्तर वगैरेंनी विशेष दक्षता घेतली. पण बोलायचीच शक्ती नाही. आत चर्रर होत होते. काही सुचेना.

जपल्या आहेत, त्या जतन कराव्या. कैवल्यधामातील संतांची छायाचित्रे मी लावली आहेत, ती व्यवस्थित ठेवावीत. श्रीमंत युवराजमहाराज यांना अंतर देऊ नये व गोपाळराव पुजारी यांचे छायाचित्र कैवल्यधामात लावावे, त्यांनी श्रीतात्यासाहेबांची पूजा अर्चा मोठ्या निष्ठेने केली आहे. घरातील सर्वांनी एकविचाराने रहावे. चिमडमठ व चिमड संप्रदाय सोडू नये. अशा आशयाचा मजकूर आहे, त्यामुळे काही सांगणेची आवश्यकता नव्हतीच.

दादांचे आवडते भजन - विठ्ठल रखुमाई हे तोंडाने चालू होते. मामासाहेब दांडेकरांचे निरूपण ऐकल्यापासून त्यांनी हे आपले कीर्तनात कायमच केले होते. रात्र याप्रकारे गेली. सकाळी गुरुनाथांनी व सौ. वहिनींनी दादांचे तोंडात थोडे चिमडचे तापनाशी तीर्थ घातले. ती. कल्लव्वाक्कांना (श्रीदादांच्या थोरल्या भगिनींना) माडीवर नेणेत आले. रविवार, भाद्रपद शु. षष्ठी, इ.स.१९७४ या दिवशी सकाळी ७ वाजले, दादांनी आपला देह विसर्जन केला.

कैवल्यधामात हाहाःकार झाला. कळेल तसे माणसे येऊ लागली. कैवल्यधाम गच्च भरले. येवढी मंडळी गोळा झाली. दादांचे शरीर श्रीतात्यासाहेबांचे समाधी समोर आराम खुर्चीवर लोकांना दर्शन घेता यावे म्हणून ठेवले होते. जो जो येईल तो डोळ्याला पदर लावी. गंगाधररावसिंग, अंतोबा म्हसकर वगैरे मंडळी आली. प्रस्तुत लेखकाने दादांना प्रथम हार घातला. मग हारावर हार सुरू झाले. हारांची गर्दीच झाली. ती. जानकी वहिनींची व गुरुनाथांची, श्रीमंत युवराजमहाराज, गंगाधरराव वगैरे मोठ्या माणसांनी समजूत केली. दादांचे दहन कृष्णाकाठी श्रीतात्यासाहेबांचे समाधीमागे व्हावे अशी योजना आखण्यात आली. गंगाधरराव दीक्षित यांची ती जागा, पण त्यांनी ताबडतोब या गोष्टीस मान्यता दिली. परमप्रिय ह.भ.प. बापुसाहेब देशमुख वकील व परमप्रिय गु.भ.प. बापूराव गोडबोले यांनी कलेक्टरची व डी.एस.पी.ची परवानगी आणली.

दुपारी चार वाजता अंत्ययात्रा निघणार याची कल्पना सर्वांना दिली होती. भाविक लोकांनी कैवल्यधाम फुलून गेले. कैवल्यधामातील विजेचे सर्व दिवे लावण्यात आले. तेथे दादांची आरती झाली व ''राजाधिराज सद्गुरूनाथ महाराज की जय'' ''कोटणीस महाराज की जय'' या गगनभेदी आरोळ्यात आरामखुर्चीसह ताटी उचलण्यात आली व ''सद्गुरुनाथ माझे आई मला ठाव द्यावा पायी'' हे भजन म्हणत अंत्ययात्रा मंदगतीने निघाली. त्यात भजनी मंडळीही सामील झाली होती. रस्त्यावर दुतर्फा प्रेक्षक आपला खेद व्यक्त करीत होते. तृप्तीवरून, सिटी हायस्कूलवरून श्रीहनुमान समाधी मंदिरापाशी यात्रा आली. तेथे भजन वगैरे होऊन प्रस्तुत लेखकाने व श्री. बापूराव गोडबोले यांनी दादांना हार घातला. यात्रा मंदगतीने मागील बाजूस आली.

समाधीचे मागील उत्तर बाजूस दादांचा अंत्यसंस्कार दादांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री.श्रीकांत यांचे प्रकृतीचे दृष्टीने, कनिष्ठ चिरंजीव श्री गुरुनाथांनीच केला. यात्रेमध्ये प्रमुखत्वाने श्रीमंत युवराज महाराज व त्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी हे प्रामुख्याने दिसत होते. याचप्रसंगी श्री. बापूसाहेब दप्तरदार, डॉ. तगारे, श्री.रामभाऊ जामदार, डॉ. घालेवाडीकर वगैरे मंडळींची समयोचित भाषणे झाली. दादांचा देह अनंतात विलीन झाला व सर्व मंडळी सुमारे सहा वाजणेचे सुमारास जड अंतःकरणाने आपापले ठिकाणी परतली.

दहावे दिवशी काकस्पर्शास थोडा वेळ लागला. ती.रा.रा. अण्णा कोटणीस यांनी रामभाऊ केळकर यांना व गंगाधररावांना ही कोटणीस फॅमिली यापुढे कधीही विसरणार नाही म्हणून मिठी मारली आणि कावळा शिवला.

पुढे चौदावे दिवशी प्रस्तुत लेखकाचे सायंकाळी कैवल्यधामात दादांचे संबंधी कीर्तन झाले व पुढे गुरुनाथांनी दादांची कीर्तनपरंपरा चालू केली.

कैवल्यधामात दादांची तीन छायाचित्रे सांगलीचे एक सत्पुरुष श्री. आर. एन. जोशी, मुंबईचे श्री. टाकी महाराज यांचे प्रिय शिष्य श्री. गोपाळराव पाटकर  व श्रीमंत युवराज महाराज यांच्या हस्ते कैवल्यधामात प्रतिष्ठित झाली. त्याचप्रमाणे पुढे श्रीतात्यासाहेबांचे पुण्यतिथी महोत्सवात श्रीहनुमान षष्ठीस दादांचे दहनभूमीवर डॉ. माधवराव कोटणीस यांनी स्थापिलेल्या वृंदावनात दादांचे पादुकांची स्थापना श्री.ह.भ.प. गोपाळराव रिसबुड यांचे अध्यक्षतेखाली व गु.भ.प. श्री. आर. एन. जोशी यांचे हस्ते झाली. त्यावेळी तेथे बराच जनसमुदाय उपस्थित होता. आपले तीर्थरुपांचे व सद्गुरुंचे चरणी दादांनी अखेरची विश्रांती घेतली हेच खरे!!

*****

# ५. श्री. रामचंद्र गोपाळ दीक्षित यांची स्मृती

## गोपाळराव दीक्षित यांचा वंश

१. गोपाळ वासुदेव दीक्षित  २. रामचंद्र गोपाळ दीक्षित  ३. गोपाळ रामचंद्र दीक्षित   ४. काशीनाथ गोपाळ दीक्षित ऊर्फ भाऊराव दीक्षित,

गोपाळराव दीक्षित हे चिमड महाराजांचे कल्याण.  त्यांचे चिरंजीव रामचंद्र गोपाळ दीक्षित हेही चिमडचे श्रीरामचंद्रावमहाराज यांचे शिष्य. लक्ष्मीबाईअक्का या रामचंद्र गोपाळ यांना 'दादा' म्हणत व तेव्हापासून लोकही त्यांना दादा म्हणत.  चिमडचे महाराज वैकुंठ चतुर्दशीला त्यांचे घरी असणाऱ्या श्रीसाधुमहाराज यांच्या पादुका स्थापनेच्या वाढदिवशी जात.  त्यांनी देह ठेवल्यावर श्रीलक्ष्मीबाईअक्कांना येण्याबद्दल श्री. दादांनी प्रार्थना केली.  त्या म्हणाल्या, ''मला देखील यावे असे वाटते, पण मठ सोडून जाण्याची मला आज्ञा नाही.  माझे व्रत आहे, म्हणून मला येता येत नाही.'' आणि विशेष

म्हणजे अक्का मठ सोडून कोठेच गेल्या नाहीत. श्री. दादांनी प्रसाद आणून देतो म्हणून सांगितले. श्रीअक्का म्हणाल्या, ''प्रसाद दे, पण भाकरी आणि चिंचेचा खरडा दे.'' त्यांना वाटले, असे कसे द्यावे म्हणून पुरणाची पोळी, तूप घालून आणली. पण अक्का म्हणाल्या, मला हा प्रसाद नको. भाकरीच पाहिजे. मग त्यांनी पुनः मुधोळास परत जाऊन भाकरी व चिंचेचा खरडा आणला. मग तो प्रसाद अक्कांनी मोठ्या संतोषाने ग्रहण केला. श्रीअक्का चिमड येथे ज्या खोलीत ध्यानास रात्र रात्र बसत, तेथे श्री. दादा दीक्षित हे लहान पणतीत दोन चमचे एशेल तेल घालून ती पणती लावून ठेवीत. श्रीअक्का म्हणायच्या, माझ्या डोळ्यासमोर सारखा प्रकाश आहे, मला पणती लागत नाही बाबा! म्हणून सांगितले तरी दादा म्हणायचे, अक्का भोवताली सगळी झाडी आहे, किडा मुंगी नाना प्रकार येथे असणार, पणती असू दे. बर असू दे, बाबा! असे अक्का म्हणाल्या. पण आश्चर्य तेवढेच, तेल घातलेली पणती सकाळपर्यंत जळत असे. अक्का हे कसे घडले असे दादांनी विचारले. अक्का म्हणाल्या, ते तुला काय करायचे आहे? आणि हसल्या. श्री. दादांनी त्यांचे सामर्थ्य ओळखले.

श्रीलक्ष्मीबाईअक्का श्रीमाईसाहेबांना म्हणत, माझे प्रयाणाचे वेळी तू तापनाशी तीर्थ माझे तोंडात घातले पाहिजेस. श्रीमाईसाहेब म्हणावयाच्या, योगायोग असेल तसे होईल. श्रीअक्कांनी निर्याणाचा दिवस मुक्रर केला आणि श्रीमाईसाहेब आदले दिवशीच अस्पर्श राहिल्या. श्रीअक्कांनी आपले निर्याण तीन दिवस पुढे ढकलले आणि श्रीमाईसाहेबांचे हातून त्यांनी निर्याणापूर्वी तीर्थ घेतले व मगच जगाचा निरोप घेतला!!

## ६. प.पू.स्वामी श्रीवीरेश्वरानंदजी यांचा जीवनपट

स्वामी वीरेश्वरानंदमहाराज हे या लोकी ३१.१०.१८९२ रोजी गुरुपूर गावी कर्नाटकात अवतीर्ण झाले. त्यांचे आई-वडील हे अत्यंत धार्मिकवृत्तीचे

आणि तसेच मोठे उदार होते. स्वामींच्या मातोश्रींचे नाव सौ. नेत्रावतीदेवी व तीर्थरूपांचे नांव श्रीकृष्णप्रभू असे होते. त्यांचे चिरंजीव पांडुरंगप्रभू हेच पुढे वीरेश्वरानंद म्हणून प्रसिद्ध झाले.

पांडुरंगप्रभू हे पाच वर्षांचे असताना आपले वडिलांचे समवेत जगद्‌विख्यात स्वामी विवेकानंद यांचे दर्शनास गेले होते. त्याचवेळी या बालकावर श्रीविवेकानंदानी मोठ्या प्रेमळ दृष्टीने कृपेचा वर्षाव केला.

पांडुरंगप्रभू पाच वर्षाचे असतानाच त्यांचे मातृछत्र हरपले व वयाच्या दहाव्या वर्षी पितृछत्रही हरपले. एवढ्या लहान वयातच त्यांचेवर हे घणाघाती दोन प्रचंड आघात झाले. एवढ्या वयातच विवेक जागृत झाल्याने त्यांनी हे दोन्ही आघात मोठ्या धारिष्ठ्याने पेलले असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

श्रीपांडुरंगप्रभूंनी आपले शिक्षण त्यांचे मामांचेकडे केले. मामांनीच त्यांचा आईवडिलांप्रमाणे सांभाळ केला व आईवडिलांची उणीव भासू दिली नाही. १९१४ साली श्रीपांडुरंगप्रभू हे मद्रास विद्यापीठातून बी.ए.च्या परीक्षेत उत्तम यशस्वी झाले. पुढे कायद्याचे अभ्यासासाठी ते त्रिवेंद्रमला आले. शाळा महाविद्यालयातून क्रिकेट, टेनीस, फुटबॉल उत्तम खेळत असून त्यांनी त्यातही चांगलाच लौकिक संपादन केला होता.

ईश्वरी संकेताने स्वामी विवेकानंदांचे समग्र ग्रंथापैकी एक ग्रंथ वाचनात आला. त्याचे मनन चिंतन होऊन पांडुरंगप्रभूंचे जीवन हे आरपार बदलूनच गेले. या अध्यात्म विचाराने जीवनात क्रांती होऊन ते अध्यात्म जीवन कसे जगता येईल याचा आपल्याशी शोध घेऊ लागले.

स्वामी विवेकानंदांचे सर्वच ग्रंथांचे अवलोकन करावे म्हणून त्यांनी मद्रास मठाशी संपर्क साधला. त्या ग्रंथांचे अवलोकन, मनन चिंतनपूर्वक झाल्याने त्यांना पुढे शिक्षणात रस वाटेना. श्रीपांडुरंगप्रभूंनी जीवसेवा हीच

मलेशिया वगैरे देशात गेले होते.

जीवसेवा म्हणजे दरिद्री नारायणाची सेवा, शिवभावाने करून चित्त शुद्ध केले तर ध्यान, धारणा, जप, अनुष्ठान या साऱ्या गोष्टी सुव्यवस्थित होतात अशा आशयाची त्यांची सहज सोप्या भाषेत श्रीरामकृष्णांचे किंवा भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेप्रमाणे मोठी गोड शिकवण होती. माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे आपले कीर्तनातून सारे विषय अगदी लहान मुलांना समजेल इतक्या सोप्या भाषेत सांगत. त्यामागे मोठी कळकळ होती, कळवळा होता. त्यांचे कीर्तनात श्रीरामकृष्ण, विवेकानंद, शारदामाता, राणी रासमणी यांच्या सुलभ अध्यात्मपर गोष्टी वारंवार येत म्हणून तर आमचे घरी प.पू. श्रीभौमानंद किंवा पुण्याचे प्रति रामकृष्ण परमहंस - श्री. हरीबाबा दीक्षित - परमप्रिय श्री. बाबूराव गोखले यांचे व्याही आले होते. त्यांचे दर्शनाचा व प्रवचन श्रवणाचा लाभ आम्हाला श्रीमामांचे अद्वैत साम्राज्यात सहजच घडला. असो.

श्रीवीरेश्वरानंद यांनी शांकरभाष्य, श्रीमत् भगवद्गीतेवर टीका, धार्मिक जीवन असे अमोलिक ग्रंथ लिहिले असून वयाची ६९ वर्षे रामकृष्ण मठाच्या सेवेतच समर्पित केली. संपूर्ण जीवनच रामकृष्ण सेवेला वाहिले होते.

आश्चर्य असे, स्वामी वीरेश्वरानंदजींनी आपले आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत विश्रांती अशी कधी खरी तर घेतलीच नाही. ‘आयुष्याच्या या साधने सच्चिदानंद पदवी घेणे’ या श्रीतुकोपनिषदाप्रमाणे आयुष्यच साधनीभूत करून ते सच्चिदानंदपदी आरूढ झाले. वीरेश्वरानंद हे पूर्ण ब्रह्म सच्चिदानंद झाले. ‘जयाचे पिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद ।। तरी मग सदेह सच्चिदानंद । का नोहावे ते ।।’ या श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे उक्तीप्रमाणे त्यांनी अध्यात्माची शीग गाठली असेच म्हणावे लागेल.

वीरेश्वरानंदांना शेवटी कॅन्सरचे दुखणे झाले. त्यांचे गुरुबंधुंनी त्यांना

इष्ट देवता श्रीसद्गुरु रामकृष्णच होत, मी फक्त त्यांचा प्रतिनिधी म्हणून दीक्षा देतो. रामकृष्ण हेच एक श्रेष्ठ गुरुपद आहे. आपण सर्वांचे तेच एकमेव गुरु आहेत असे श्रीवीरेश्वरानंद सांगत असत. त्यांचे जीवन श्रीरामकृष्णमय झाले होते. ते त्या रामकृष्ण रूपातच फाल्गुन वद्य सप्तमीस दि.१३.०३.१९८५ रोजी विलीन झाले. अशा महापुरुषाची थोरवी कोणत्या शब्दात वर्णन करता येईल असा प्रश्न आहे. त्यांचे पवित्र चरणी आमचे शतशः विनम्र अभिवादन!

## ७. श्री. गंगाधरपंत केळकर यांची संक्षिप्त माहिती

श्रीगंगाधरपंत केळकर व त्यांचे पुतणे श्री. नारोपंत केळकर हे दोघेही आचरे गावचे रहाणारे. हे आणि तिसरे श्री. गोविंदपंत बोडस देवगड तालुक्यातील मोंड गावचे. हे या दोघांचे जीवश्च कंठश्च मित्र होते.

सुमारे १५० वर्षांपूर्वी या तिघांनी कोकणातून कोल्हापूर मार्गे सांगली पर्यंतचा प्रवास पायीच चालत पूर्ण केला. वय अवघे १५-२० वर्षाचे होते. प्रत्येकाजवळ फक्त २५ रुपये होते. इथे आल्यावर एखादा उद्योग करावा असे तिघांनी ठरविले. सांगलीतील टिळक मंदिराजवळील काळे वाड्यात नारोपंतांची दूरच्या नात्यातील एक मावशी रहात असे. तिचा पत्ता शोधून हे तिघेही तिच्याकडेच राहू लागले. ती एकटीच असल्याने या तिघांचीही तेथे जेवणाची व्यवस्था झाली. त्याकाळात पाच-सहा रुपयात एक माणूस साधे जेवण पोटभर जेवित असे. येथे हे चौघेही एकजुटीने राहू लागले. पुढे उद्योगाचे काय? हा प्रश्न उभा राहिला. तेव्हा मावशीने सांगितले, ''इथे एक गाडगीळांचे मोठे घराणे आहे. तेथेही तुझी एक दूरची आत्या आहे. त्या लोकांचेबरोबर मी तुझी ओळख करून देते, ते सोन्या चांदीचे व्यापारी आहेत. ते तुम्हाला मार्गदर्शन करतील. मंडळी फारच चांगली आहेत.'' लगेच थोड्याच दिवसात या तिघांनी आपले पैसे एकत्र करून गाडगीळांचे

सांगण्यावरून कवड्यांचा व्यापार चालू केला. त्यावेळी कवड्यांचा पैशासारखा वापर होत असे. त्या धंद्यात त्यांना देवाने व दैवाने चांगलाच हात दिला. कवड्यांच्या व्यापाराचे रूपांतर सावकारीत झाले. तिघेही अतिउद्योगी व जीवाला जीव देणारे असल्याने त्यांना पैसा चांगलाच मिळू लागला.

त्याच सुमारास सांगलीचे पहिले राजे आबासाहेब पटवर्धन यांनी सध्या जुनी सांगली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात हवी तेवढी जागा फुकट घ्या व आपल्या खर्चाने घरे बांधा असे जाहीर केले. त्याप्रमाणे नारोपंत व गंगाधरपंत यांनी या गल्लीपासून मागच्या गल्लीपर्यंत बरीच मोठी जागा अंदाजे (२०० x २००) मोजमाप करून ताब्यात घेतली.

निम्म्या जागेत पूर्वीच्या पद्धतीने बळकट बांधकाम केले. घर पूर्ण केले. त्या घराचे समान चार भाग केले. उत्तरेकडील बांधलेला व दक्षिणेकडील मोकळा भाग श्रीनारोपंतांनी घेतला. व उत्तरेकडील मोकळा व दक्षिणेकडील बांधलेला भाग श्रीगंगाधरपंतांनी घेतला. असे अगदी सलोख्याने वाटप झाले.

यानंतर थोड्याच दिवसांनी श्री. नारोपंत केळकर व गोविंदपंत बोडस यांनी सांगलीवाडी येथे ३० एकर शेत जमीन विकत घेतली. हे सर्व होईतो दहा-बारा वर्षांचा काळ लोटला. हे तिघेही इकडे आले तेव्हा तिघांची लग्ने झाली. सर्व जम बसल्यावर गोविंदपंत बोडस मोंड ला गेले. तेथे त्यांची शेती होती. त्यातच वाढ करून ते तेथेच राहू लागले. नारोपंत व गंगाधरपंत आचऱ्याला जाऊन आपल्या कुटुंबास घेऊन आले व इथेच राहू लागले. गंगाधरपंत हे आपल्या घरातच रहात असत. नारोपंत हे पेठेत मावशीच्या आग्रहावरून रहावयास गेले. नारोपंतांना मथुरा म्हणून एक मुलगी झाली व गंगाधरपंतांना अनंत हा एकच मुलगा झाला.

गंगाधरपंतांनी आपली उत्तरेकडील मोकळी जागा गोणते व गिड्डे या दोघांना विकली. त्या दोघांनी तेथे घरे बांधली. अनंताचे पुढे अंतुनाना झाले. त्यांना गोविंद आणि गंगू अशी दोन अपत्ये झाली. गंगाधरपंतांनी बेळगाव नजिक शहापूरजवळ कलखांब येथे शेती घेतली. ते शेताचे काम जाऊन येऊन पहात होते. नारोपंतांची मुलगी मथुरा, अभ्यंकरना दिली. त्यांना मुलगीच. ती विश्वनाथराव वझे यांना दिली. त्यांनाही मुलगीच. ती बापटांना दिली. लेकी वारसाने केळकरांचे अभ्यंकर, मग वझे व नंतर बापट झाले. बापट पुढे कायम झाले. मूळ नारोपंत केळकरच आणि या नारोपंतांचे गंगाधरपंतांचे घराण्यात आजतागायत सलोखा राहिला आहे. हे ध्यानात घेण्यासारखे आहे.

*****

## प्रकरण - ६

# श्रीदासराममहाराज यांच्या जपाची नोंद

प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांना वयाच्या १४ व्या दिवशी प.पू.सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा स्पर्शद्वारा व नेत्रद्वारा अनुग्रह प्राप्त झाला व संप्रदायाचे वायुसाधन त्यांच्या अंतर्यामी प्रगट झाले. श्रीदासराममहाराज हे वयाच्या ५ व्या वर्षापासून जप, साधन व कीर्तन करु लागले.

श्रीदासराममहाराज यांच्या लिखित उपलब्ध वही क्र.५६ मध्ये त्यांनी सन १९३२ ते सन १९३९ या ७ वर्षामध्ये केलेल्या जपाची नोंद केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे. :-

**सन १९३२ फाल्गुन शु. १ ते सन १९३९ फाल्गुन शु. २ अखेर वेळ रोज १.३० तास प्रमाणे रोज १३००० प्रमाणे एकही दिवस न चुकविता व एखादा दिवस राहिल्यास, दुसरे दिवशी दुप्पट करून श्रीसंप्रदायिक मंत्राचा दासरामाचा ३,१७,६४,००० जप झाला. या व्यतिरिक्त साधनात झालेल्या जपाची मोजदाद नाही.**

*****

## प्रकरण - ७

## श्रीदासराममहाराजकृत
## भीमरुपीस्तोत्राचा गद्यार्थ

भीमरुपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती ।
वनारी अंजनीसुता रामदूता प्रभंजना ।।१।।

**भीमरूप म्हणजे वायुचे रूप, महारुद्रा म्हणजे शिवाचा अवतार, वज्र म्हणजे परजलेले हत्यार हातात घेतलेला मारुती, वनात रहाणाऱ्या अंजनीचा पुत्र, रामाचा सेवक असा प्रभंजन म्हणजे वारा - वायुस्वरूप.**

महाबळी प्राणनाथा सकळा उठवी बळे ।
सौख्यकारी दुःखहर्ता धूर्त वैष्णव गायका ।।२।।

**महाबळी म्हणजे बलिष्ठ, शक्तिमान, प्राणदाता म्हणजे जीवन देणारा, आपल्या बळाने सगळ्यांना उठवतो, सुख देणारा, दुःख निवारण करणारा, हुशार, विष्णुचा भक्त, विष्णुचे गुण गाणारा.**

दीनानाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा ।
पातालदेवताहंता भव्य सिंदूर लेपना ।।३।।

**गरीबांचा स्वामी, हरीस्वरूप, जगात सुंदर, पाताळातल्या देवतांचे हनन करणारा, ज्या मूर्तीला मोठा शेंदूर लावावा असा.**

लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका ।।४।।

**तिन्ही लोकांचा स्वामी, जगाचा आधीश, प्राणाचा मालक असणारा, अतिशय प्राचीनकाळापासून असलेला, ज्याचे नांव घेतले असता पुण्य लाभते, शीलवान, पवित्र व समाधान देणारा.**

ध्वजांगे उचली बाहो आवेशे लोटला पुढे ।
काळाग्नी काळरुद्राग्नी देखता कापती भये ।।५।।

**पताकाच्या टोकावर हात पसरून पुढे सरसावला, काळाचा ग्रास करणारा, शंकराचा अवतार असलेला, ज्याला पाहिले असता कळीकाळ माघार घेतो.**

ब्रह्मांडे माईले नेणो आवळे दंतपंगती ।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठील्या बळे ।।६।।

**ज्याच्या पोटात अनंत ब्रह्मांडे साठविलेली आहेत, पण ज्याला हे माहित नाही, दात आवळून, दात ओठ खाऊन पुढे सरसावतो, ज्याच्या नेत्रातून ठिणग्या पडतात, कपाळाला आठ्या पडलेला.**

पुच्छ ते मुरडीले माथा किरीटी कुंडले बरी ।
सुवर्ण कटिकासोटी घंटा किणी किणी नागरा ।।७।।

**ज्याचे शेपूट मुरडलेले आहे असा, कपाळाला किरीट व कानात कुंडले आहेत असा, सोन्याची लंगोटी असलेला, ज्याच्या कंबरेला बारिक किणकिणाऱ्या घंटा आहेत.**

ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू ।
चपळांग पाहता मोठे महाविद्युल्लतेपरी ।।८।।

**पर्वताएवढे शरीर असून नेटके, नेमके व सुटसुटीत आहे असा, ज्याचे अंग चपळ आहे, ज्याचे शरीर विजेप्रमाणे सळसळणारे आहे असा.**

कोटीच्या कोटी उड्डाणे झेपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्रीसारिखा द्रोणु क्रोधे उत्पाटिला बळे ।।९।।

**उत्तरदिशेला कोटी कोटी वेगाने उड्डाण करणारा, द्रोणागिरी पर्वत रागाने व त्वेषाने उचलून नेणारा.**

आणिला मागुती नेला आला गेला मनोगती ।
मनासी टाकीले मागे गतीसी तुळणा नसे ।।१०।।

**मनाच्या वेगाने तो पर्वत आणला व नेला, मनाच्या वेगालाही ज्याने मागे टाकले असा, त्याच्या गतीची, वेगाची तुलना कशाशीही होणार नाही असा.**

अणुपासोनि ब्रह्माण्डा एवढा होत जातसे ।
तयासी तुळणा कोठे मेरुमंदार धाकुटे ।।११।।

**अणुपासून ब्रह्माण्डाएवढा मोठा झालेला, मेरूपर्वतसुद्धा लहान होईल, त्याची तुलना या कोणाबरोबरही होणार नाही असा.**

ब्रह्मांडा भोवतेवेढे वज्रपुच्छे करू शके ।
तयासी तुळणा कैची ब्रह्मांडी पाहता नसे ।।१२।।

**ब्रह्मांडालासुद्धा शेपटीने विळखा घालणारा, त्याची तुलना या ब्रह्मांडातही होणार नाही.**

आरक्त देखीले डोळा ग्रासीले सूर्यमंडळा ।
वाढता वाढता वाढे भेदिले शून्य मंडळा ।।१३।।

**ज्याचे डोळे लालभडक, रक्तवर्ण असून, जन्माला आल्यावर सूर्याला ग्रास करणारा, ज्याने आपले शरीर वाढवून ब्रह्मांडाला भेदून टाकले.**

धनधान्य पशुवृद्धी पुत्र पौत्र समस्तही ।
पावती रुप विद्यादी स्तोत्रपाठे करोनिया ।।१४।।

**धनधान्य, पशु, पुत्रपौत्र, सर्व विद्या या स्तोत्राचा पाठ केला असता प्राप्त होतात.**

भूतप्रेत समंधादि रोगव्याधी समस्तही ।
नासती तुटती चिंता  आनंदे भीमदर्शने ।।१५।।

**भूतप्रेत, संमंध, रोग, यांना नाहीसे करणारा, ज्याच्या दर्शनाने मनाच्या चिंता नाहीशा होतात.**

हे धरा पंधरा श्लोकी लाभली शोभली बरी ।

## प्रकरण - ८

## प्रा.डॉ.के.वा. आपटे संकलित श्रीदासराममहाराज केळकर यांचे जीवनातील कालानुक्रमाने घटना / प्रसंग

(श्रीदासराममहाराज चरितामृत ग्रंथावरून संकलन)

अधिक श्रावण व.६,शके १८४२ ) मातोश्री इंदिरांचे मामांचे घरी,
गुरुवार दि.०६.०८.१९२० ) कुरुंदवाडास ७ व्या महिन्यात अवतार (पृ.१२)

| | |
|---|---|
| दि.२०.०८.१९२० | वयाच्या १४ व्या दिवशी श्रीदादांना कोटणीसमहाराजांचा अनुग्रह (पृ.१३) |
| इ.स. १९२३ | कोटणीसमहाराज मामामहाराज केळकरांचे घरी भोजनास आले. त्यांना दादांनी पाहिले (पृ.१५) |
| इ.स.१९२३-१९३० | श्रीदादांचे बालपणीचे छंद (पृ.१५) |
| इ.स.१९२५ | दादांचा कीर्तनाचा व साधनाचा प्रारंभ (पृ.१५/१६). |
| इ.स.१९२७ | श्रीदादांचे उपनयन (पृ.१६) |
| इ.स. १९२७ | श्रीदादांच्या काव्यलेखनास प्रारंभ (पृ.१६) |
| इ.स. १९२८ | शाळा नं.२ मध्ये शिक्षणासाठी दादांचे गमन(पृ.१६) |
| इ.स. १९२९ | रोज १३००० जप करण्यास प्रारंभ (पृ.१७) |
| इ.स. १९२९ | श्रीदादांची रामेश्वराची पूजा (पृ. १७) |
| इ.स. १९२९ | श्रीदादांना रामानंदमहाराज खटावकर यांचे दर्शन आणि रामदासबोध ग्रंथ पूर्ण केला. (पृ.१८) |
| इ.स. १९२९ | श्रीदादांचे कीर्तनात सिद्धानंद प्रगटले (पृ.१८) |
| इ.स. १९२९ | श्रीदादांनी साधनेचे अभंग रचले (पृ.१९) |
| इ.स. १९३० | होळीचा प्रसंग (पृ.२०) |
| इ.स. १९३१ | श्रीदादांना रामाचे दर्शन (पृ.२१) |

| | |
|---|---|
| इ.स. १९३९ | वही क्र.१६ मध्ये दैनिक कार्यक्रमाची नोंद (पृ.४८) |
| इ.स. १९३९ | श्रीदादा मॅट्रिकच्या वर्गात गेले (पृ.४८) |
| फाल्गुन शु.१ १९३२ ते १९३९ | श्रीदादांनी केलेल्या जपसंख्येची नोंद (पृ.४८) |
| इ.स.१९३९ | श्रीदादा काडसिद्धांच्या दर्शनास दोनदा गेले (पृ.४९) |
| इ.स. १९३९ | श्रीदादांनी सिद्धकथामृतसार लिहिले (पृ.४९) |
| इ.स. १९३९ दिवाळी | रथोत्सवासाठी दादांचे चिमडास गमन (पृ. ५०) |
| कार्तिक प्रतिपदा इ.स.१९३९ | श्रीदादांचे चिमडमठात कीर्तन (पृ.५२) |
| इ.स.१९३९ ) ) | चिमडास नागाप्पाण्णा श्रीदादांना प्रल्हाद म्हणाले व श्रीनिंबरगीकरमहाराज बोध करतील असे बोलले (पृ.५२) |
| इ.स. १९३९ | नागाप्पाण्णामहाराजांनी श्रीदादांना निंबरगीकरमहाराजांची चिलीम दिली. (पृ.५३) |
| इ.स. १९३९ | पंढरपुरात मामांना तुळशीची माळ मिळाली (पृ.५३) |
| इ.स. १९३९ | श्रीदादांचे दिवसभर साधन (पृ.५३-५४) |
| पौष शु.९ शके१८६१ इ.स. १९३९ | श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना ‘येनू इल्लेदानू’ हे कानडीपद श्रुत केले (पृ.५४) |
| इ.स.१९४० | श्रीदादांनी मनोहर मंगळवेढेकर यांचे चरित्र लिहून ते प्रकाशित केले (पृ.५५) |
| २०.९.१९४१ ते ३०.०९.१९४१ | गुरुलिंगगीतेतील आठ पदे दादांना मिळाली (पृ.५७) |
| ०२.१०.१९४१ | श्रीमामांचे कीर्तन चालू असताना श्रीदादांना ‘समाधान शांतीवू’ हे गुरुलिंगगीतेतील पद ऐकू आले. (पृ.५७) |
| इ.स. १९४१ | मुमुक्षूंना अनुग्रह देण्यास श्रीदादांनी प्रारंभ केला(पृ.६०) |

| | |
|---|---|
| इ.स. १९४४-४७ | श्रीदादांची सरकारी नोकरी (पृ.७२) |
| इ.स. १९४७ | ट्रेझरी ऑफिस कलेक्टर भेटीचा प्रसंग (पृ.७४) |
| २३.१२.१९४७ | श्रीदादांच्या सूर्यकांत या पुत्राचा जन्म (पृ.७४) |
| इ.स. १९४७ | घोसरवाड येथील शतसावंत्सरिक सोहळ्यात दादांचे कीर्तन (पृ.७५) |
| इ.स. १९४७ | घोसरवाड येथे देवाची पालखी दादांचे जवळ आली (पृ.७६) |
| २९.०५.१९४८ | श्रीदादांच्या घरी श्रीगुरुसिद्धाप्पामहाराजांचे पद पूर्ण (पृ.७८) |
| इ.स.१९४८ | आपले पद गुरुलिंगगीतेत घालण्यास गुरुसिद्धप्पामहाराजांनी परवानगी दिली. (पृ.७९) |
| वैशाख व.७ श.१८७०) 30.05.१९४८ ) | आपले पद गुरुसिद्धप्पांनी दादांच्या वहीत कानडी लिपीत लिहून दिले. (पृ.७९) |
| वैशाख व.७ ) इ.स.१९४९ ) | दादांच्या घरी गुरुलिंगगीतेची पहिली जयंती साजरी (पृ.८०) |
| माघ व.१ इ.स.१९४९ | मामांच्या कीर्तनाचा रौप्यमहोत्सव दादांनी साजरा केला. (पृ.८७) |
| १८.११.१९४९ | श्रीदादांच्या अनल या पुत्राचा जन्म (पृ.८९) |
| ०३.०८.१९५१ | ट्रेझरी ऑफिसमध्ये दादा असताना ‘रामेश्वरनी’ इ. गुरुलिंगगीतेतील पद ऐकू आले. (पृ. ९०) |
| १९५१ | श्रीदादांनी सरकारी नोकरीचे त्यागपत्र दिले.(पृ.९१) |
| १९५१ | पालघर येथील माईसाहेब दांडेकरांच्याकडे दादांचे गमन (पृ.९१-९२) |
| १९५२ | देहू गावी श्रीदादांचे निरूपण (पृ.९२) |
| २४.०१.१९५३ | श्रीदादांना कानडीतील काकड आरती आणि शेजारती श्रुत झाली (पृ.९४) |

| | |
|---|---|
| माघ शु.१०, १९६२ | श्रीदादांच्या नित्यकीर्तनाचा प्रारंभ (पृ.१०८) |
| रथसप्तमी, १९६३ | श्रीमामांच्या सिंहासनातून श्रीदादांना अभंग ऐकू आला. (पृ.१०९) |
| माघ शु.४ शके१८८४ इ.स. १९६३ | श्रीदादांच्या इंदिरामातेचे निर्वाण (पृ.११०) |
| इ.स.१९६३ | श्रीमामांचे 'गोविंदचरितमानस' हे चरित्र प्रकाशित झाले. (पृ.११०) |
| इ.स.१९६३-६४ | श्रीदादांचे नित्यनैमित्तिक आणि नवीन सुरु झालेले कार्यक्रम (पृ.१११-१२) |
| ऑक्टोबर १९६३ | श्रीदादांनी शरद आपटेला केळ्याचा प्रसाद दिला. (पृ.११२) |
| १९६४-६५ | श्रीदादांना स्वप्नात विठोबाचे दर्शन (पृ.११२). |
| १२.०३.१९६७ | ताप असताना श्रीदादांनी कर्तीन केले (पृ.११३) |
| १७.०४.१९६७ | श्रीदादांना आकाशात विमान दिसले(पृ.११४) |
| माघ शु.८ शके१८८९) ०६.०२.१९६८ ) | 'मुद्राप्रकाश' ग्रंथाचे प्रकाशन (पृ.११५) |
| चैत्र व.१ शके १८९०) दि.१४.०४.१९६८ ) | 'प्रणव' या अभंगाचा गद्यार्थ पूर्ण (पृ.११५) |
| फाल्गुन शु.१०, ) शके १९०९ ) १७.०२.१९८८ ) | 'नासदीयसूक्ताचा भावार्थ' हा ग्रंथ प्रकाशित (पृ.११६) |
| इ.स.१९६९ | रेवणसिद्धांचे स्थानी गमन (पृ.११६) |
| इ.स. १९६९ | श्रीदादांचे इतरांसह चिमडास गमन (पृ.११७) |
| गोकुळाष्टमी शके १८९१ ०३.०९.१९६९ | 'वायुलहरी' या ग्रंथाचे प्रकाशन (पृ.११७) |

| | |
|---|---|
| ३१.५.१९७४ | ऐकू आला. (पृ.१२९) |
| १७.१२.१९७४ | श्रीदादांच्या ज्योती या नातीचे निर्वाण. (पृ.१३०) |
| आषाढ शु.१४<br>इ.स.१९७५ | श्रीगोंदवलेकरमहाराजांच्या चिपळ्या श्रीदादांना मिळाल्या. (पृ.१३२) |
| ०८.१२.१९७६ | श्री. अनलचे लग्नानंतर सहकुटुंब अप्पाचेवाडीस श्रीदादांचे गमन व सुगंधाचा घमघमाट (पृ.१३५) |
| इ.स.१९७६ | श्री. अशोककाका जोशी यांना स्वप्नात श्रीदादांचे दर्शन (पृ.१३६) |
| चैत्र व.१२<br>इ.स.१९७७ | श्रीदादांना एका सत्पुरुषाचे दर्शन (पृ.१३७) |
| इ.स. १९७७ | बरडे विठ्ठल मंदिरात श्रीदादांच्या निरुपणात पांडुरंग नाचला. (पृ.१३७) |
| २३.०१.१९७७ | 'सिद्धस्तुती' ग्रंथाचे प्रकाशन (पृ.१३८) |
| १९७७-७८ | श्री.आबासाहेब परांजपे यांचा मृत्यूयोग टळला.(पृ.१३९) |
| इ.स. १९७८ | श्रीनानामहाराज तराणेकर यांचे आगमन (पृ.१३९) |
| इ.स. १९७८ | श्री. पंडित दांपत्याला अनुभव (पृ.१४०) |
| फेब्रुवारी १९७८ | श्रीरुकडीकरमहाराजांच्या पुण्यतिथी निमित्त कोल्हापूर येथे श्रीदादांचे कीर्तन (पृ.१४१-१४२) |
| २३.०७.१९७८ | श्री.वासुदेवराव जोशी यांच्या निर्वाण यात्रेत श्रीदादांचा सहभाग. (पृ.१४०) |
| ३०.०३.१९७९ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची यशोगाथा प्रकाशित.(पृ.१४३) |
| चैत्र शु.३,श.१९०१<br>दि.३०.०३.१९७९ | 'अमृतानुभव मंगलाचरण' या ग्रंथाचे प्रकाशन (पृ.१४३). |
| मार्गशीर्ष अमावस्या<br>श.१९०१/१९.१२.७९ | अप्पाचेवाडी येथे श्रीदादांचे हस्ते सभामंडपाचा शुभारंभ (पृ.१४३) |

| | |
|---|---|
| १९.०८.१९८४ | 'रामपाठामृत' या ग्रंथाचे प्रकाशन (पृ.१७२) |
| इ.स. १९८४ | श्रीबाबासाहेब मुजुमदार चरित्रग्रंथाचे प्रकाशन(पृ.१७२) |
| इ.स. १९८४ | श्री.द.वि.कुलकर्णी यांच्या रामनाम सप्ताहाच्या सुवर्ण महोत्सवाचा प्रारंभ श्रीदादांच्या प्रवचनाने (पृ.१७३) |
| जून १९८४ | श्रीमहादबामहाराजांच्या प्रथम पुण्यतिथीला श्रीदादांचे प्रवचन (पृ.१७४) |
| २७.०६.१९८४ | श्रीगंगादासमहाराजांना प्रसाद म्हणून दादांनी पेढे दिले. (पृ.१७५) |
| १२.०७.१९८४ | 'संप्रदाय बोध' या ग्रंथाचे प्रकाशन (पृ.१७५) |
| २३.०८.१९८४ | श्री. शेडजी यांचे घरी दत्तमूर्तीची श्रीदादांचेहस्ते स्थापना आणि गुरुपाठ या ग्रंथाचे प्रकाशन.(पृ.१७५) |
| ०२.०३.१९८५ | श्रीदादांचे इच्छेप्रमाणे 'संत सहस्रनाम' या ग्रंथाचे प्रकाशन. (पृ.१७८) |
| ०२.०४.१९८५ | संतसहस्रनामाचे सामुदायिक पठण. (पृ.१७८) |
| ०५.०४.१९८५ | प्रा. डॉ. दा.वि.कुलकर्णी यांचे घरी श्रीदादांची शर्करातुला. (पृ.१८०) |
| २ जुलै, १९८५ | 'पवनस्मरणिका' दादांच्या लेखाचे वाटप (पृ.१८०) |
| गोकुळाष्टमी ७.९.१९८५ | गुरुलिंगगीता ग्रंथाचे प्रकाशन (पृ.१८२) |
| २०.०८.१९८५ | श्री. फडके यांच्या शंकांचे श्रीदादांनी निरसन केले. (पृ.१८३) |
| २६.१०.१९८५ | माधवनगर येथील गोसलिया हायस्कूलमध्ये श्रीदादांच्या हस्ते भूमीपूजन झाले. (पृ.१८३) |
| ११.११.१९८५ | दत्तमहाराज कवीश्वर यांना श्रीदादांनी प्रवचन करण्यास सांगितले (पृ.१८३) |

| | |
|---|---|
| कार्तिक शु.३ ) | |
| शके १९१० ) | श्री.ल.कृ.कुलकर्णी यांचे घरी श्रीदादांची पाद्यपूजा |
| इ.स.१९८८ ) | (पृ.२०४) |
| इ.स. १९८८ | श्रीदादांच्या मोतीबिंदूचे ऑपरेशन (पृ.२०४) |
| २४.१२.१९८९ | खामकरबाईंचे घरी श्रीज्ञानेश्वर यांच्या मूर्तीची श्रीदादांचे हस्ते स्थापना.(पृ.क्र २०५) |
| ०३.०२.१९९० | 'गुरुलिंगगीतम्' ग्रंथाचे प्रकाशन (पृ.२०६) |
| १०.०४.१९९० | 'गुरुलिंगगीतम्' चे सामुदायिक पठण (पृ.२०६) |
| इ.स. १९९० | श्रीदादांच्या सत्तरीचा उत्सव (पृ.२०७) |
| ०२.०६.१९९१ | 'दासरामगीतम्' चे प्रकाशन (पृ.२०८) |
| ०२.०६.१९९१ | 'श्रीगुरुमहिमा' ग्रंथाचे प्रकाशन (पृ.२१२) |
| ०५.०९.१९९१ ) | भूविकास बँकेच्या आवारात श्रीदादांच्या हस्ते |
| ) | दत्तमूर्तीची स्थापना |
| ०२.११.१९९१ ) | श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या फोटोत श्रीदादांना |
| ) | श्रीनिंबरगीकरमहाराजांचे प्रत्यक्ष दर्शन व आश्वासन |
| ) | (पृ.२१२) |
| २५.०६.१९९२ ) | श्रीदादांच्या पायाचा अस्थिभंग, भक्तीक्लिनीकमध्ये |
| ) | वास्तव्य व तेथेच कीर्तन (पृ.२१३) |
| ऑक्टोबर १९९२ | श्रीदादा कुबड्या घेऊन चालतात (पृ.२१३) |
| १०.११.१९९२ | श्रीअक्कोळकरमहाराजांचेकडून श्रीदादांना रुद्राक्षाची माळ प्राप्त. (पृ.२१४) |
| ३१.१२.१९९२ | श्रीदादांना स्वप्नात श्रीसेनामहाराजांचे दर्शन(पृ.२१४) |
| १२.०१.१९९३ | श्रीदादांना मारुतीरायांचे दर्शन (पृ.२१४) |
| मे, १९९३ | श्रीडोंगरेमहाराज, श्रीदादांच्या घरी आले. (पृ.२१४) |
| जुलै, १९९३ | श्रीदादा साधनास बसले असताना |

| | |
|---|---|
| २५.१०.१९९९ | श्रीदादांचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा. (पृ.२२५) |
| २५.१०.१९९९ | 'दासरामगौरवगीत' चे सामुदायिक पठण (पृ.२२६) |
| बुधवार नागपंचमी संध्याकाळी षष्ठी दि.२५.०७.२००१ | श्रीदादांचे संध्याकाळी ७.४० वाजता महानिर्वाण (पृ.३२१) |
| २६.०७.२००१ | श्रीदादांची निर्वाण यात्रा (पृ.३२३) |
| २६.०७.२००१ | श्रीदादांचे चिरंजीव श्रीचंद्रशेखरअण्णा यांचे नित्यकीर्तन सुरु. (पृ.३२८) |
| २७.०७.२००१ | श्रीदादांचे रक्षाविसर्जन (पृ.३२८) |
| ०३.०८.२००१ | श्रीदादांचे पिंडास काकस्पर्श (पृ.३२९) |

**संकलनकार : प्रा.डॉ. के. वा. आपटे**

*****

सद्भक्ती मंदिराकडे धाव घेतली. जोगेश्वरीत उतरलो तो पर्जन्यवृष्टी! तेव्हा महाराजांच्या कृपेचा जणू वर्षावच होतो आहे की काय असे भासले.

माता जशी बालकाचे कवतुक करते, तसेच माझे सर्व कोड पुरवून प्रेमाने अत्यंत कवतुक केले. त्यामुळे आपल्या कृपाशीर्वादाने मला अत्यंत समाधान वाटले. **'परगुण परमाणून् पर्वतीकृत्यनित्यं । विकसती मदिसंतःसंतिसंतः किमंतः।।'** असे जे म्हटले आहे ते अगदी यथार्थ आहे असे वाटले. गु.भ.प. गोपाळराव पाटकर यांनी प्रेमाने रहाणेबद्दल आग्रह केला. परंतु मला ठाणेस नेण्याकरिता श्री. वासुदेवराव करमरकर माझेबरोबरच आले असल्याने, मला अगदी नाईलाजाने थोड्याच अवधीत परतावे लागले. परत येताना हृदयात जी कालवाकालव झाली, ती शब्दाने व्यक्त करता येण्याजोगी नाही. गु.प.पू.श्री. बाबूरावांचे बरोबर येईन असे म्हटले आहे. पाहू, महाराज केव्हा नेतात ते! योग केव्हा येईल ते पहावे. आपला आशीर्वाद हेच आपले दर्शन इतकी दृढभावना आहे. पाल्हाळ का लावावा? आपण सर्व अंतःकरण जाणत आहाच. गु.भ.प.गोपाळरावजींना सप्रेम नमस्कार. बालकावर सदैव कृपाशीर्वाद असावा ही प्रार्थना.

आपला नम्र बालक,

**(राम गोविंद केळकर)**

*****

कैवल्यधामात घडवून आणलेल्या गु.प.पू.श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचे छायाचित्राचे अनावरण समारंभाचेवेळी  ह.भ.प. श्रीधुंडामहाराज यांचा कैवल्यधामातील रौप्यमहोत्सव प्रसंगी कार्तिक वद्य ७, शके १८७१ या दिवशी श्रीमंत राजे श्रीएकनाथ संस्थानाधिपती श्रीरंगनाथ भानुदासबुवा तथा श्रीभैय्यासाहेबमहाराज यांचे हस्ते श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ थाटाने साजरा करण्यात आला. त्यावेळी श्रीटाकीमहाराज यांचा मंगलाशीर्वाद घेण्यात आला.  शिवाय श्रीतात्यासाहेबांच्याप्रमाणे श्रीदादाभाई आम्हास पूजनीय असल्याने त्यांचे हस्ते या पुतळ्याचे पीठाचा कोनशीला समारंभ पूर्वी साजरा करण्यात आला होता. त्या प्रसंगाला अनुसरून खालील पद म्हणण्यात आले होते :-

**''कोनशिळा बसवू, आजि आम्ही कोनशिळा बसवू ।।ध्रु.।।**
**हनुमंतरावजी गुरुवर्यांच्या, चरणकमली ठेवू ।।१।।**
**चातकापरि करुणदृष्टीने, वाट आम्ही पहाऊ ।।२।।**
**धातु-मूर्ती प्रस्थापित होता, धन्यचि की होऊ ।।३।।''**

ज्या संतांचे आशीर्वादाने श्रीतात्यासाहेबांचे पारमार्थिक वैभव दाखविले त्यानेच या उत्सवात त्यांचा निरुपाधिक परमार्थही दाखविला व त्याला अनुकूल परंतु दुःखदायी अशी परिस्थिती श्रीतात्यासाहेबांचे परमप्रिय एकनिष्ठ बंधु ह.भ.प. पुंडुकाका कोटणीस यांचे निर्याणाने निर्माण झाली.  श्रीबाबुरावजींचे वरील हे एक छत्रच निखळल्यागत झाले.  ईश्वरी इच्छेपुढे इलाज नाही.

श्रीटाकीमहाराज व श्रीदांडेकरमहाराज हे शरीराने उत्सवास आले नाहीत. तरी मनाने कैवल्यधामात खास होते. म्हणूनच उत्सव निःसंशय त्यांचे आशीर्वादाने व्यवस्थितरीतीने पार पडला.  उत्सवास कऱ्हाडचे सुप्रसिद्ध संत ह.भ.प. फुटाणेमहाराज, ह.भ.प.राघुअण्णा धोपाटे वकील, किर्लोस्करवाडीचे ह.भ.प. मोघे, शहापूरचे उभयभाषाविशारद, ह.भ.प.रामनामे, मिरजेचे ह.भ.प. डॉ. प्राणी व ह.भ.प. नारायणराव जोग, एरंडोलीचे ह.भ.प. बंडोपंत कुलकर्णी,

श्रीवेणाबाईंचे मठातील मठपती ह.भ.प. कल्याणस्वामी यांचे श्रीतात्यासाहेबांचे चरित्रावर बहारीचे कीर्तन झाले. कीर्तनास ह.भ.प. डोळे यांनी केलेले चरित्राख्यान घेतले होते. दुपारी २ ते ३.३० ह.भ.प. दाणेकरी यांचे व ३.३० ते ५ ह.भ.प. जोगळेकरकाका यांचे कीर्तन झाले. दोघांचेही कीर्तने चांगली झाली. सायंकाळी ५ ते ७ गु.श्रीबाबुरावजी कोटणीसमहाराज यांचे कीर्तन झाले. आजचा हा दिवस वाढदिवसाचा असल्याने गु. श्रीबाबुरावजींनी मुद्दाम सायंकाळी कीर्तन केले व हे कीर्तन प्रतिवर्षी श्रीबाबुरावजींनीच करावयाचे असे प्रस्तुत लेखकाचे आग्रहावरून ठरले आहे. रात्री मिरजेचे सुप्रसिद्ध डॉ.ह.भ.प.प्राणी यांचे सुंदर निरूपण व सांगलीचे ह.भ.प. मोरुबुवा कुळकर्णी यांचे प्रेमळ भजन झाले.

**शुक्रवार, ता.०६.०१.१९५० :-** हा पादुकास्थापनेचा दुसरा दिवस होय. यादिवशी प्रथम सकाळी ७.३० ते ८.३० , अनगोळचे वकील ह.भ.प. विनायकराव जोशी यांचे 'चिरंजीवपदा'वर सुंदर प्रवचन झाले. नंतर ९ ते ११ ह.भ.प. बिहुबुवा गोसावी यांचे कीर्तन झाले. दुपारी २ ते ३.३० ह.भ.प. बुवासाहेब गोडबोले यांचे कीर्तन झाले. सदर गृहस्थ गोंदवले सांप्रदायापैकी असून फार भाविक आहेत. श्रीतात्यासाहेबांचे उत्सवास प्रतिवर्षी यांचेकडे ट्रेझरीचे काम असते व ते हे काम अगदी नेकीने पार पाडतात. त्यांचे आयुष्यातील हे पहिलेच कीर्तन असून ते फारच चांगले वठले. त्यांनी श्रीतात्यासाहेबांची बरीच कीर्तने ऐकलेली होती. यानंतर गु.श्रीबाबुरावजींचे ''निर्गुणज्ञान सगुणभक्ती'' या विषयावर मार्मिक प्रवचन व शहापूरचे सुप्रसिद्ध ह.भ.प. श्री. रामनामे यांचे कीर्तन झाले. रात्रौ ह.भ.प. श्री. महादेवअण्णा वडगावकर यांचे भजनी निरूपण व ह.भ.प. वसंतराव ओतारी यांचे सुरस भजन झाले. महादेवअण्णा वडगावकर हे श्रीतात्यासाहेबांचे मागील मंडळीपैकी एक भाविक गृहस्थ आहेत.

**शनिवार दि. ०७.०१.१९५० :-** हा श्रीतात्यासाहेबांच्या पुण्यतिथी

**सोमवार दि.०९.०१.१९५० :-** हा श्रीतात्यासाहेबमहाराजांचा परमपावन पुण्यतिथी दिन होय. यादिवशी श्रीटाकीमहाराजांचे मंगलाशीर्वादपर प्रवचनाने कार्यक्रमास सुरुवात व्हावयाची. पण ते यासमयी आलेले नसल्याने ह.भ.प. बंडोपंत कुलकर्णी यांचे सकाळी ७.३० ते ८.३० प्रवचन झाले. नंतर काल्याचे कीर्तन हे गु. प्रि.दांडेकरसाहेब यांचे व्हावयाचे, पण ते यावेळी उपस्थित राहू न शकल्यामुळे तो कार्यक्रम गु. श्रीबाबुरावजींनी आपल्या प्रिय लेकराकरवी म्हणजे प्रस्तुत लेखकाकरवी साजरा केला. श्रीटाकीमहाराजांच्या आशीर्वादानुसार त्यास काल्याचा प्रसाद, सेवा करून मिळावयाचा होता, असेच यावरून दिसते. षष्ठीचे सकाळचे श्रीटाकीमहाराजांचे प्रवचन व गु.प्रि.दांडेकरसाहेब यांचे पंचमीचे रात्रीचे निरूपण व षष्ठीचे सकाळचे काल्याचे कीर्तन हे पूर्वीपासूनच कायम ठेवण्यात आलेले आहेत. आजच्या या काल्याचे कीर्तनाचे प्रसंगी भजनीमंडळीत ह.भ.प. पांडुरंगराव पतंगे, बंडोपंत एरंडोलीकर, हरिभाऊ कुष्टे सराफ, रामय्या गायकवाड, बापू सावंत, ह.भ.प. बापूराव जोशी, बी. ए., वासुदेवराव जोशी, केशवराव आपटे, लक्ष्मणबुवा, लक्ष्मण फाटक, बाबूराव शिराळकर व्यापारी वगैरे मंडळी प्रामुख्याने दिसत होती. यानंतर दुपारी २ वाजता गु.प.पू.श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचे आराधनेचे कीर्तन झाले. यावेळी स्वर्गातून देव कैवल्यधामावर पुष्पवृष्टीच करीत आहेत की काय असे भासले. आराधनेचा सोहळा अवर्णनीय झाला. यावेळी महाराजांचे प्रसादाचे नारळ मस्तकावर घेऊन सरंजामानिशी प्रदक्षिणा घालण्याचा प्रघात आहे व तो श्रीतात्यासाहेबांचे एकनिष्ठ सेवक गु.भ.प. रामचंद्र मार्तंड अत्रे यांनी चालविला आहे. त्यातील एक नारळ फडणीस यांना व दुसरा रामचंद्रपंतांना देण्यात येतो. रात्री वे.शा.सं. राजवैद्य अप्पासाहेब सांभारे यांचे भजन झाले. कीर्तन निरुपणापेक्षा उत्सवाचा शेवट भजनानेच व्हावा व पूर्वीपासूनचा कै. आबासाहेब सांभारे यांच्यापासून चालत आलेला संबंध पुढे कायम व्हावा म्हणूनच की काय श्रीतात्यासाहेबांना चिठ्ठी टाकून त्यात आल्याप्रमाणे त्यांचे भजन ठेवण्यात आले व ते कायम करण्यात आले.

## प्रकरण - १०

# श्रीदासराममहाराज यांचे अमृतहस्ते झालेले समारंभ व महत्वपूर्ण घटना

१. कैवल्यधाम माडीवरील श्रीतात्यासाहेबांचे पुतळ्याचे पुढील दरवाज्याचे उद्‌घाटन. (पांडव पंचमीस)

२. ब्रह्मचैतन्य मंदिर पादुका स्थापन (श्री.गोमेवाडीकर)

३. बरडे विठ्ठलमंदिर मूर्तीस्थापना (सौ.सीतावहिनींसमवेत)

४. हनुमान समाधीमंदिरा मागील पार कट्ट्यावरील विठ्ठल मूर्ती स्थापना.

५. वखारभाग (टिंबरएरिया) येथे दत्तमूर्ती स्थापना.

६. एस.टी.स्टॅण्डकडे दत्तमूर्ती स्थापना.

७. 'दासराम' अपार्टमेंट भूमीपूजन.

८. श्रीरामनिकेतन स्लॅब शुभारंभ

९. सिटीहायस्कूल इमारत पायाभरणी समारंभ.

१०. परांजपे मेमोरियल हॉस्पिटलचे उद्‌घाटन.

११. सांगलीवाडीतील विठ्ठलमंदिरात अखंड वीणा उभारणी.

१२. बिनीवाले विठ्ठल मंदिर मूर्तीस्थापना.

१३. ब्रह्मचैतन्य शिशूविहार उद्‌घाटन व दीप प्रज्वलन. (सौ.सीतावहिनींसमवेत)

१४. निळकंठमहाराज पादुका स्थापना, सांगलीवाडी.

१५. सेनामंदिरमध्ये श्रीज्ञानेश्वर चित्र व श्रीमामांचे चित्राचे अनावरण.

१६. हरिपाठ स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीसवाटप समारंभ.

१७. ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उद्‌घाटन व कीर्तनकार हाटेबुवा यांना केंगणेश्वरीचौकात मानपत्र देणेचा समारंभ.

३९.	संत सेवा मंडळ उद्‌घाटन
४०.	श्री. दा. वि. कुलकर्णी यांनी श्रीदासरामांचे तुला दान केले.
४१.	श्री. कोटणीसवाड्यात श्रीज्ञानेश्वरमूर्तीची स्थापना.
४२.	मालू हायस्कूलमध्ये दप्तरदारांचे हस्ते श्रीतात्यासाहेबांचा फोटो बसविला.  त्याप्रसंगी भाषण.
४३.	गाडगीळ सराफ दुकानात दीडशेवर्षानिमित्त आशीर्वाद. (सौ.सीतावहिनींसमवेत)
४४.	माने, कुलकर्णी, काटकर, हडरदे, जाधव, ठोंबरे व ढोबळे डॉक्टरांकडे भक्तीसोहळा.
४५.	श्री.साठे यांचे घरी श्री टेंबेस्वामी पादुका पूजा
४६.	मीना आर्टस् येथे लोकमान्य टिळक जयंती पुष्पहार समर्पण.
४७.	श्री. मधुसूदन कुलकर्णी यांचेकडे महारुद्र स्वाहाकार सांगता समारंभ.
४८.	श्री. एम. आर. कुलकर्णी यांनी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची तुला केली. त्याप्रसंगी आशीर्वादपर भाषण. (सौ.सीतावहिनींसमवेत)
४९.	श्री.संभाजी (चहावाले) यांचे घराची वास्तुशांत. (सौ.सीतावहिनींसमवेत)
५०.	तरुणभारत रामनवमी रथयात्रा शुभारंभ.
५१.	सहजयोग दर्शन प्रकाशन (गुळवणीमठ)
५२.	गोसलिया हायस्कूल, माधवनगर येथील जलकुंभ उद्‌घाटन
५३.	सिटी हायस्कूल मध्ये श्री गुरुदेव रानडे यांचे फोटोचे अनावरण.
५४.	नगरवाचनालय, सांगली येथे ज्ञानेश्वरमाऊलींचे छायाचित्राची स्थापना.
५५.	श्री. उत्तमराव जप्तीवाले यांचे घराची वास्तुशांत.
५६.	श्री.विनायकराव गाडगीळ कापड दुकान यांचेकडे प्रवचनाचा शुभारंभ.

७५. श्री. व्ही. के. कुलकर्णी यांचे मुलीचे मंगल विवाहात श्रीदासरामांची यथायोग्य पूजा करून सीमांतपूजन झाले.

७६. श्रीमती अंबुताई वाटवे यांच्या घराची वास्तुशांत व ३ नारळ झाडांचे वृक्षारोपण.

७७. श्री.सुभाष कुलकर्णी जत, द्राक्षवेल पूजन व द्राक्षतोड श्रीदासराम व चि.चंद्रशेखर यांचे हस्ते.

७८. पलूस येथे वास्तुशांत, द्राक्षवेल पूजन व द्राक्षतोड श्रीदासराम व चि.चंद्रशेखर यांचे हस्ते.

७९. 'कैवल्यमार्ग' या पुस्तकाचे प्रकाशन श्रीदासरामांच्या हस्ते व श्रीकोटणीसदादांच्या अध्यक्षतेखाली, पालघर येथे झाले.

८०. अप्पाचीवाडी येथे जलकुंभ पूजन.

८१. अप्पाचीवाडी येथे ध्यानमंदिराची पायाभरणी.

८२. श्री.घैसास डॉक्टरांचे घरी गोपाळकृष्णाची स्थापना.

८३. संभाजीराव भिडे सांस्कृतिक मंडळाची स्थापना व शुभारंभ.

८४. श्रीतात्यासाहेबमहाराज यांचा प्लॅस्टरचा पुतळा लायब्ररी हॉलमध्ये बसविला.

८५. सौ. गोडबोले बाई यांचेकडे गोवर्धन पूजा.

८६. थोटे वखारीचे उद्घाटन.

८७. कोल्हापूर येथे श्रीमामांचे फोटोस हार घालून गुरुकृपा बिल्डींगचे उद्घाटन.

८८. जी.वाय.देशपांडे, कोल्हापूर यांचेकडे वास्तुशांत व वृक्षारोपण.

८९. डी.एच.कुलकर्णी, कोल्हापूर यांचेकडे संतांचे छायाचित्राचे अनावरण.

९०. श्री. दादा सांगलीकर गुरुपौर्णिमा चि.सौ.अनुराधाने सचैल स्नान (पंचामृती) घातले. तिला साक्षात्कार झाला.

९१. श्री.भा.गोखले यांच्या सौभाग्यवतीस ताई दामले यांचे रुपात दर्शन.

आनंदमूर्तींच्या पादुका चकाकल्या. चकचक, लाईट गेल्यावरही होत होते. सौ. अंबूताई भावे बरोबर होत्या. ट्रस्टींतर्फे श्रीदासरामांचा सत्कार झाला.

१०८. बिसूर येथे श्रीबिसूरकरमहाराज यांचे पुण्यतिथी निमित्त कीर्तन समारंभ झाला. दत्तमंदिरास भेट झाली.

१०९. सिद्धगिरी येथे श्रीकाडसिद्धेश्वरांच्या शिवरात्री यात्रेत दासरामांनचे निरूपण थाटाने झाले. ५ ते ७ हजार साधक उपस्थित होते. महाराजांनी हार घातला व कीर्तीसुगंध संप्रदायाचा दरवळेल असा आशीर्वाद दिला.

११०. वाटेगावचे श्री. बापूंनी श्रीदासरामास गोडबोले यांचे घरी अखंडभक्तीरस्तु असा आशीर्वाद सर्वसाधकांसमोर दिला. समारंभ लक्षात राहील असा झाला.

१११. कन्नूर येथे दासरामांचे थाटाने शांतीकुटीर आश्रमात कीर्तन झाले.

११२. निंबरगी येथे दोनदा दासरामांचे कीर्तन, समाधी मंदिरात थाटाने झाले.

११३. श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे नातू चि. दिलीप पाटणकर यांचे झेरॉक्समशीनचे उद्‌घाटन श्रीदासरामांचे हस्ते झाले.

११४. श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्राचे प्रकाशन बापूसाहेब यांचे अध्यक्षतेखाली व दासरामांचे तथा लेखकाचे हस्ते झाले.

११५. कैवल्यधामातील प्रत्येक समारंभात श्रीदासरामांचे भाषण व ग्रंथ परिचय किंवा ग्रंथास अनुसरून काव्य समाविष्ट आहे.

११६. 'श्रीतुकाराममहाराज यांचे सदेह वैकुंठगमन', लेखक टाकीमहाराज या ग्रंथास त्यांनी सांगितलेवरून आरती दासरामांनी लिहून दिली. याचा समारंभ देहूस लाड यांचे हस्ते झाली त्यावेळी समारंभाचे शेवटी ही आरती म्हटली गेली.

१२९. रामभाऊ सहस्रबुद्धे अमृतमहोत्सव प्रसंगी त्यांनी दासरामांचा श्रीरामनिकेतनमध्ये कीर्तनात सत्कार केला.

१३०. दाजीसाहेब गावडे यांना विठ्ठलवाडीचे गादीवर समारंभाने दासरामांनी बसविले.

१३१. मिरजेमध्ये साधकनाथांना गादीवर बसविले.

१३२. श्रीपतीबुवांनी कनकेश्वर येथे भक्तीकार्य करावे असे कीर्तनात उद्गार काढले.

१३३. राणी सरस्वती कन्या शाळा येथे महाबळांच्या फोटोचे अनावरण व आशीर्वादपर भाषण.

१३४. काचेच्या गणपतीमंदिराचे उद्‌घाटन. (प्रतिकृती)

१३५. 'सिद्धांत कौमुदी' पुस्तकाच्या छपाईची सुरवात व पूजन.

१३६. प्राजक्त प्रेस येथे श्रीमामांचे चरित्राची छपाई सुरुवात व पूजन.

१३७. श्रीगुणवणीमहाराज मठात महाराजांची जन्मशताब्दी दासरामांच्याहस्ते साजरी झाली. त्यांचे भाषण होऊन फुले उधळली व प्रसाद वाटला.

१३८. पुढील दारी दत्तस्थापनेचा अमृतमहोत्सव दासरामांचे हस्ते झाला. पुष्पहार अर्पण केला. कीर्तनात ताई बापटांचे दासरामांबद्दल मामांचेपासून आलेल्या, परंपरेबद्दल चार शब्द झाले.

१३९. कन्या महाविद्यालयात गुरुसिद्धप्पांसमवेत दासरामाचे गुरुपूजन व दोघांची भाषणे झाली.

१४०. भोसले सायकल दुकानाचे उद्‌घाटन.

१४१. भोसले यांचे चक्की मशीनचे उद्‌घाटन.

१४२. श्रीक्षेत्र चिमड येथे माईसाहेबांचे पादुका स्थापनेचे दिवशी दासरामांचे कीर्तन व त्यांचे करवी आराधनेची सुरुवात.

१४३. श्रीक्षेत्र निंबरगी येथे श्रीज्ञानेश्वरमहाराज, निंबरगीकरमहाराज व

तेथे त्यांचे फोटोचे अनावर व श्रद्धांजलीचे चार शब्द.

१५८. अनिल, अनल, जाधव, विजु जोशी, केशव यांचे लॅम्ब्रेडा गाडीचे पूजा समारंभ.

१५९. रविंद्र पाटील, शेखर जोशी, ठोंबरे यांचे गाडीचा शुभारंभ व पूजन दासरामांच्या हस्ते झाले.

१६०. नरसोबावाडीस आईचे मामा असताना, दत्तजयंती उत्सवाचे कीर्तन दासरामांनी तीन वर्षे केले. कुरुंदवाड येथे तुकारामबीजेचे कीर्तन तीन वर्षे केले. तसेच कुरुंदवाड राजवाड्यात श्रीतात्यासाहेबांचा पोवाडा व कीर्तन झाले. राणीसाहेबांनी पाच रुपये बक्षीस दिले.

१६१. कळंकीचे देवळात दोन प्रवचने व कीर्तन व मालगाव वेशी जवळ मिरजेस गणपती मंदिरात ५-७ कीर्तने यथाक्रम २-३ वेळा झाली. युवराज महाराज घेऊन जात व आणून सोडत.

१६२. कुरुंदवाड येथे गणपती मंदिर, विष्णु मंदिर, राम मंदिर, साठे वकील, एल. पी. कुलकर्णी, जमदग्नी यांचेकडे बरीच कीर्तने थाटाने झाली. बाबूराव आरगे यांचेकडे प्रवचने व शंकरराव फडणीस यांचेकडे प्रवचने झाली.

१६३. बेळगावला आण्णासाहेब घाणेकर, लेले वकील, शहापूर येथे वामन भटजी बाळेकुंद्रीकर, हातकणंगले येथे गोपाळराव कुलकर्णी यांचेकडे सांगलीस काचमाल व्यापारी कुलकर्णी, तूपवाले गाडगीळ, हरिभाऊ हरिदास व फडणीस डॉक्टर यांचेकडे कीर्तने व प्रवचने झाली.

१६४. श्री. शंकर भटजी अग्निहोत्री यांचे देहावसान झालेवेळी कीर्तनात श्रद्धांजली वाहिली.

१६५. श्री. राजाभाऊ आपटे अग्निहोत्री गेल्यावर श्रद्धांजली वाहिली.

१६६. गीत गजानन याचे प्रकाशन बिनीवाले विठ्ठल मंदिरात दासरामाकरवी दीपप्रज्वलन करून झाले.

१६७. हरिभाऊ गाडगीळ यांचे ध्यानमंदिरात विष्णुची स्थापना व पूजा दासरामांच्या हस्ते झाली.

१६८. 'श्रीतुकाराम नित्यपाठ' याचे प्रकाशन जोशी यांनी दासरामांच्याहस्ते केले.

१६९. परमप्रिय श्री. हडदरे यांनी नवीन स्कूटर घेतली. त्याचे दु.२ वाजता दासरामांच्या हस्ते पूजन झाले.

१७०. चिकुर्डे गावात दि.२४.०८.१९८८ रोजी निंबरगीकर महाराज पादुका स्थापना व भक्तीसोहळा थाटात झाला.

१७१. हेमंत शिवदेकडे पादुका स्थापना, मंत्र्याला लाजवेल अशा थाटाने दासरामांच्या हस्ते झाली.

१७२. देशिंग येथील खंडोबाच्या मंदिराचा पायाभरणी समारंभ.

१७३. प.पू.डॉ. रा.प्र. पारनेकरमहाराज यांच्या 'परिचय' या ग्रंथाचे तृतीय आवृत्तीचे प्रकाशन बुधवार दि.०९.०४.१९९१

१७४. संजयनगर येथील आत्माराम पाटणे यांच्या श्री रामजानकी मंदिराची कोनशीला बसविली. २७.०३.१९९१

१७५. पायोनियर इंजिनिअरिंग कंपनीच्या स्टील फर्निचरच्या नव्या शोरूमचे उद्घाटन. दि.१८.०३.१९९१

१७६. अयोध्या श्रीराम मंदिर निर्माण कार्यक्रम भाग म्हणून विजया दशमी दिवशी निघालेल्या श्रीरामविजय यात्रेचे नेतृत्व व पालखी पूजन. दि.०२.१०.१९९०.

१७७. श्रीलक्ष्मीमाता सेवा मंडळ, सांगली येथे महिषासूरमर्दिनी मूर्ती स्थापना, १९.०२.१९९०

१७८. सांगली नगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या देखावे व सजावट स्पर्धेचे पारितोषिक वितरण. दि.८.९.१९९०

१७९. केसरी गणेशोत्सव मंडळाच्या श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना दि. २४.०८.१९९०

१८०. संतशिरोमणी नामदेवमहाराज पुण्यतिथी निमित्त झालेल्या हरीपाठ स्पर्धेचे पारितोषिक वितरण. दि.१५.०७.१९९०

१८१. श्रीज्ञानेश्वरमहाराज संजीवन समाधी सप्तशताब्दीनिमित्त श्रीवेणाबाई मठ मिरज येथे श्रीज्ञानेश्वर पारायणाचे उद्घाटन. दि.१३.८.९०

१८२. आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी श्री. केशव फडके यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार. दि.३.६.१९९०

१८३. संदीप मेडिकल्स या मेडिकल स्टोअर्सचे उद्घाटन. दि.२७.७.१९९०

१८४. शास्त्रीय मसाज केंद्र, गावभाग सांगली याचे उद्घाटन

१८५. सांगली अर्बन बँक शाखा टिंबर एरिया या शाखेचे उद्घाटन

१८६. वसगडे येथे श्रीज्ञानेश्वर मूर्तीची प्रतिष्ठापना २३.१२.१९८९

१८७. म्हैसाळ येथील दत्तमंदिरातील ज्ञानेश्वर पारायण सुरुवात व प्रतिमेचे पूजन व अनावरण समारंभ. दि. १७.०५.१९८९

१८८. रामकृपा व प्रबोधन संस्थेच्यावतीने झालेल्या कार्यक्रमात 'जय जय रघुवीर समर्थ' या अंकाचे प्रकाशन व पारितोषिक वितरण.२७.२.८९

१८९. सांगलीतील कृष्णा घाटावर कृष्णामातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना दिनांक २२.०२.१९८९.

१९०. श्रीमामासाहेब देशपांडे यांचा अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार दि.२९.०१.१९८९.

१९१. नावंधर ट्रस्टच्या दुर्गामाता मंदिरातील देवीला मुकुट चढविला. दिनांक १३.१०.१९८८

१९२. डोंबिवली येथील प्रा. अनंतराव कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'नवनाथ भक्तीसार नवनीत' संक्षिप्त ग्रंथाचे प्रकाशन दि. २२.०८.१९८८

१९३. नृसिंहवाडी येथील श्रीमहादबा पाटील ट्रस्टतर्फे 'श्रीपरब्रह्मस्वरूप' या त्रैमासिकाचा उद्घाटन समारंभ. दि.०२.०६.१९८८

१९४. सांगली अर्बन बँकेच्यावतीने ज्ञानेश्वर पारायणासाठी मंडप उभारणी

## प्रकरण - ११

## ५४ देहांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. गकार शब्द | १९. अपरा शब्द | ३७. स्वयं शब्द |
| २. वर्ण्य शब्द | २०. अनिर्वाच्य शब्द | ३८. अः शब्द |
| ३. ध्वान शब्द | २१. मनः शब्द | ३९. शून्य |
| ४. मौन शब्द | २२. स्फुरण शब्द | ४०. अःशून्य |
| ५. अप्राप्य शब्द | २३. प्रेरक शब्द | ४१. अचित् शून्य |
| ६. भर्ग शब्द | २४. द्वयताल शब्द | ४२. चिद् शून्य |
| ७. आकार शब्द | २५. त्रिताल शब्द | ४३. निर शून्य |
| ८. उकार शब्द | २६. ताल शब्द | ४४. महा शून्य |
| ९. मकार शब्द | २७. छंद शब्द | ४५. निजात्म शून्य |
| १०. गुकार शब्द | २८. महाशब्द | ४६. निःशब्द |
| ११. मंत्र शब्द | २९. तेजस शब्द | ४७. नामब्रह्म |
| १२. हंभाव शब्द | ३०. सगुण शब्द | ४८. विमलनाम ब्रह्म |
| १३. सकार शब्द | ३१. निर्गुण शब्द | ४९. रूपैक्यनाम ब्रह्म |
| १४. ध्वन्यशब्द | ३२. प्रणव शब्द | ५०. केवलनाम ब्रह्म |
| १५. वाच्य शब्द | ३३. अक्षर शब्द | ५१. सहजनाम ब्रह्म |
| १६. माध्यम शब्द | ३४. शून्य शब्द | ५२. सिद्धनाम ब्रह्म |
| १७. पाश्यंतशब्द (पहाणे गाळून) | ३५. निर्विकार शब्द | ५३ स्वयंनाम ब्रह्म |
| १८. परा शब्द | ३६. स्वयंनाद शब्द | ५४. निरंजन |

१२. **श्रीदासराममहाराज यांच्या लेखन वह्यातील उपलब्ध नोंदीनुसार त्यांच्या लिखित वाङ्मयाचा तारीख, वार, तिथी, शके, सन नुसार तपशील**

१३. **श्रीदासराममहाराज लिखित गुरुलिंग गीतेतील पदांचा तपशील दर्शविणारा तक्ता**

१४. **श्रीदासराममहाराज लिखित तिथीनुसार जयंती व पुण्यतिथी यादी**

**(वरील तिन्ही विषयांचे तक्ते पुढे जोडलेले आहेत)**

## प्रकरण - १२ : श्रीदासराममहाराज यांच्या

| अ. क्र. | तपशील | अभंग/ओवी/ श्लोक/पदे इ. संख्या | वय वर्षे | वही क्र. |
|---|---|---|---|---|
| ०१. | गुरुचा पंखा | १ | ७ | -- |
| ०२. | रामदास बोध ग्रंथ | १६९ओव्या | ९ | २१ |
| ०३. | श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेवरील पोवाडा | -- | १३ | -- |
| ०४. | आत्मबोधप्रत्ययामृत (ओव्या) | ६५ ओव्या | १७ | २२ |
| ०५. | श्रीतात्यासाहेबमहाराज जन्माख्यान | -- | १७ | ४६ |
| ०६. | नामपाठ अभंग | ६० | १७ | -- |
| ०७. | चिमड संप्रदायातील संतांवरील अभंग | -- | १५ | ३४ |
| ०८. | जगद्गुरु श्रीशंकराचार्य जन्माख्यान | -- | १६ | -- |
| ०९. | सिद्धकथामृतसार | -- | १८ | ५५/५५अ/५६ |
| १०. | संत चरित्रामृत कथासार | १०८ओव्या | १९ | ५४ |
| ११. | सद्बोध दशक | १० अभंग | १७ | ४१ |
| १२. | हरिपाठ पहिल्या ७ अभंगांवरील टीपा | -- | १८ | ६५ |
| १३. | श्रीतात्यासाहेबमहाराज चरित्र | -- | १८ | ९४ |
| १४. | श्रीमामा पंढरपूर यात्रेस गेले त्याचे वर्णन | १ अभंग | १९ | ७५ |
| १५. | श्री मनोहर मंगळवेढेकर चरित्र | -- | १९ | ७४ |
| १६. | साधन पाठ | ६० अभंग | १९ | २ |

## लेखनाची यादी

| वार | दिनांक | तिथी | शके | इतर तपशील |
|---|---|---|---|---|
| -- | १९२७ | -- | १८४९ | |
| -- | १९२९ | -- | १८५१ | |
| -- | १९३३ | -- | १८५५ | |
| -- | १९३७ | -- | १८५९ | |
| -- | ११.११.१९३७ | -- | १८५९ | |
| -- | १९३७ | -- | १८५९ | |
| -- | १९३५ | -- | १८५७ | |
| -- | १९३६ | -- | १८५८ | |
| -- | १९३८ | माघ व.३ | १८६० | |
| -- | १८.०६.१९३९ | -- | १८६१ | |
| -- | २१.०५.१९३७ | -- | १८५९ | |
| -- | १९३८ | -- | १८६० | |
| -- | १३.१२.१९३८ | -- | १८६० | |
| मंगळवार | १९३९ | अधिक श्रावण शु.१० | १८६१ | |
| -- | १९३९ | आश्विन शु.१० | १८६१ | |
| -- | ०८.१२.१९३९ | -- | १८६१ | |

| अ. क्र. | तपशील | अभंग/ओवी/ श्लोक/पदे इ. संख्या | वय वर्षे | वही क्र. |
|---|---|---|---|---|
| १७. | हरिपाठ | ३८ अभंग | १९ | ४८ |
| १८. | चैतन्यपाठ | २४ अभंग | १९ | ४८ |
| १९. | चक्षुपाठ | ३५ अभंग | १९ | २७ |
| २०. | श्रीनिवृत्तीपाठ | २४ अभंग | १९ | २९ |
| २१. | श्रीस्तुतीपाठ | १८ अभंग | १९ | २९ |
| २२. | चिन्मयपाठ | १२०अभंग | १९ | १६ |
| २३. | कैवल्यपाठ | ६० अभंग | १९ | १८ |
| २४. | श्रीस्वधर्मपाठ | २९ अभंग | २० | ३४ |
| २५. | श्रीश्रुतीपाठ | २८ अभंग | २० | ३४ |
| २६. | गुरुपाठ | १३ अभंग | २० | ६ |
| २७. | निरंजनपाठ | २७ अभंग | २० | १६ |
| २८. | नामदीपाठ सार | ३४ अभंग | २० | १२ |
| २९. | जीवनपाठ | ३१ अभंग | २० | १४ |
| ३०. | स्मरण पंचक | ५ अभंग | २० | १४ |
| ३१. | संतचरित्र पाठ | १७ अभंग | २० | ४० |
| ३२. | सदानंद पाठ | २४ अभंग | २० | ४० |
| ३३. | रेवणसिद्धपाठ | १८ अभंग | २० | ७ |
| ३४. | श्रीनारायणपाठ | २८ अभंग | २० | ३१ |

| वार | दिनांक | तिथी | शके | इतर तपशील |
|---|---|---|---|---|
| -- | १५.१२.१९३९ | -- | १८६१ | |
| -- | १७.१२.१९३९ | -- | १८६१ | |
| -- | १९३९ | किंक्रांत | १८६१ | |
| -- | १९३९ | पौष शु.३ | १८६१ | रात्री ८.३० ते १०.३० |
| -- | ११.०१.१९३९ | पौष शु.२ | १८६१ | सकाळी ८ ते ९ |
| -- | १९३९ | -- | १८६१ | |
| -- | १९३९ | -- | १८६१ | |
| -- | १२.०१.१९४० | -- | १८६२ | रात्री ९.३० ते ११.३० |
| -- | १४.०१.१९४०. | -- | १८६२ | रात्री १२ ते १२.३० |
| -- | २१.०१.१९४० | -- | १८६२ | |
| -- | २०.०२.१९४० | -- | १८६२ | |
| -- | २८.०२.१९४० | चैत्र शु. ३ | १८६२ | |
| -- | १३.०३.१९४० | फाल्गुन शु.४ | १८६१ | |
| -- | १४.०३.१९४० | -- | १८६१ | गणेश धों. कानिटकर यांचे शंकानिरसनार्थ |
| -- | ०२.०६.१९४० | -- | १८६२ | |
| -- | ०८.०६.१९४० | -- | १८६२ | |
| -- | ०२.०७.१९४० | -- | १८६२ | |
| -- | ०३.०७.१९४० | -- | १८६२ | |

| अ. क्र. | तपशील | अभंग/ओवी/ श्लोक/पदे इ. संख्या | वय वर्षे | वही क्र. |
|---|---|---|---|---|
| ३५. | ओरमकीणलय | ५ अभंग | २० | ५२ |
| ३६. | स्वात्मतरंग | २४ अभंग | २० | ८ |
| ३७. | सहजानंद लहरी व नामानंद लहरी | १० अभंग | २० | १७ |
| ३८. | चिन्मयसिद्धांत दर्शन पंचक | ५ अभंग | २० | ३ |
| ३९. | आत्मसुधा | ४० अभंग | २० | ५ |
| ४०. | प्रसादाचे अभंग | १३ अभंग | २१ | १८ |
| ४१. | हरिपाठ -२ | १४ अभंग | २१ | ५०,८५ |
| ४२. | तत्त्वज्ञान | ८ अभंग | २१ | १८ |
| ४३. | गुरुलिंगगीतेच्या पहिल्या २३ पदांचा अंतर्यामी स्फुरलेला मराठी अर्थ | २३ पदांचा अर्थ | २१ | ४४ |
| ४४. | वायुलहरी | ११ अभंग | २२ | ४ |
| ४५. | ज्ञानदेवतेहेत्तिशीवरील सानंद टीका | | २३ | ७२अ |
| ४६ | श्रीनित्यपाठ अभंग | २२ अभंग | २३ | २१८ |
| ४७. | कैवल्य वैभव या ग्रंथातील ५२ कूट पदांवरील टीका | -- | २३ | ४४/४४अ |
